मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका


युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

एप्रिल–मे–जून २०१९



अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

वर्ष ७४ वे

एप्रिल-मे-जून २०१९

युगवाणी

संपादक

प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

संपादक
प्रफुल्ल शिलेदार

मुखपृष्ठ क्र. १, २, ३ वरील चित्रे : अतुल दोडिया
आतील रेखाटने : राजू बावीस्कर
इतर छायाचित्रे आंतरजालावरून व लेखकांच्या व्यक्तिगत संग्रहातून साभार
मुखपृष्ठावरील सुलेखन : चंद्रमोहन कुलकर्णी

संपादकीय पत्रव्यवहार
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५
ई-मेल : edityug@gmail.com

प्रकाशक
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

जाहिरात सहयोग : प्रदीप दाते, वर्धा

मुद्रितशोधन : दीपक रंगारी

अक्षरजुळणी व मुद्रण :
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर । भ्रमण : ९३२६९९९०१५

युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :
- युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी-विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
- युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
A/c. No.: 04650100 005638
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
Fifth Character is 'ZERO'

- युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

व्यवस्थापन :
वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :
नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ । भ्रमणभाष : **९४२३१०३३०१**

प्रकाशनाची कालनियतता : त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये
वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये भरणे गरजेचे आहे.

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

यु ग वा णी । एप्रिल-मे-जून २०१९

अं त रं ग

संपादकीय...

आज आपण एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या टोकावर उभे आहोत. आधुनिकतेचे नवे रूप घेऊन आलेल्या या शतकाने या टप्प्यावर आपल्यापुढे अनेक आव्हाने उभी केली आहेत. यातील जगभर उफाळून येणाऱ्या आक्रमक नवपुनरुज्जीवनवादासारखी काही आव्हाने वैश्विक स्वरूपाची आहेत तर भारतीय समाजाच्या परिप्रेक्ष्यात जीवनशैलीच्या संदर्भातील काही प्रश्न पृथकपणे पडलेले असू शकतात. आजच्या काळातील सभ्यता आणि संस्कृतीच्या संदर्भातील आव्हानांना आर्थिक व सामाजिक अंगांसोबतच जीवनदृष्टी, मूल्यविवेक, परंपरा, वैज्ञानिकता, समता, अस्मिता, व्यक्तिस्वातंत्र्य असे अनेक कंगोरे आहेत. या सगळ्यांचा साकल्याने विचार करताना आपल्या विश्लेषणातील महत्त्वाचे साधन गांधीविचार होऊ शकते हे आता सर्वमान्य झालेले आहे. गांधीविचारांच्या साहाय्याने आपल्याला आपला काळ अधिक नेमकेपणाने समजून घेण्यास मदत होऊ शकते. गांधींनी आपल्या चिंतनातून देशाच्या भूत-भविष्य-वर्तमानाचा खोलवर विचार केला. त्यांनी आपल्या लेखनातून आणि आपल्या जीवनातून भारतीय समाजापुढे दिशादर्शक होकायंत्रच ठेवले आहे. पारतंत्र्याचे विश्लेषण करताना ते 'हिंद स्वराज'मध्ये म्हणतात, 'आपल्याच गुलामीतून राष्ट्र गुलाम बनले आहे आणि आपण मुक्त होऊ तसे तेही मुक्त होईल.' गुलामीच्या मुळाशी जाऊन असे सांगताना त्यांच्या मनात असलेली स्वातंत्र्याची संकल्पनादेखील स्पष्ट होते; सोबतच त्यांच्या लढ्याची दिशा काय असू शकते याचेही सूचन होते. गांधीविचाराची मूलभूत तत्त्वे सत्य आणि अहिंसा ही आहेत. गांधींनी आपल्या लढ्यात वापरलेले आणि सामान्य माणसाच्या हातात दिलेले महत्त्वाचे शस्त्र म्हणजे आत्मबळ. त्याबाबत ते म्हणतात, 'बळ हे निर्भय होण्यात आहे; आपल्या शरीरावर मांस किंवा चरबी किती प्रमाणात आहे यावर नाही.' निर्भयताच सर्वसामान्यांना बळ देऊ शकते हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी आधी माणसाला भयमुक्त करण्यावर भर दिला. त्यातूनच पुढे सर्वसामान्यांचा सहभाग त्यांच्या अनेक आंदोलनांमध्ये शक्य झाला आणि लाखो लोकांच्या सहभागाने स्वातंत्र्यलढा उभा राहू शकला.

जसजसा काळ पुढे जात आहे तसतसे गांधीविचाराचे महत्त्व जगभर वाढतच आहे. गांधीविचारांच्या अगदी विरुद्ध टोकावर असलेल्या लोकांनीही गांधींचे महत्त्व मान्य केलेले आहे. काहींनी गांधीविचारांचा प्रतिवादही केलेला आहे; मात्र त्यातून एका प्रकारे गांधीविमर्श पुढे जाण्यास मदतच झाली. गांधींचा द्वेष करणारेही आपला द्वेष पोटात ठेवून त्यांच्या नावाचा सत्तेपर्यंत पोहोचवणारी अपरिहार्य शिडी म्हणून वापर करीत आहेत. गांधींचा वापर करीत लोकांना भ्रमित करून आपली विश्वासार्हता नव्याने बनवू पाहात आहेत. गांधी विचाराची मूलतत्त्वे बाजूस ठेवून गांधींचा चष्मा, त्यांची काठी, त्यांचे भजन, त्यांनी हातात घेतलेला झाडू, चरखा, सूतकताई, त्यांची प्रतिमा अशा प्रतीकांच्या वापरातून एक मोठा संभ्रम तयार करण्याचा प्रयत्न होतो आहे. गांधींना गांधींच्याच प्रतीकांमध्ये गुरफटून गांधींबद्दल एक मोठा स्मृतिभ्रंश तयार करणे हे या प्रयत्नांचे लक्ष्य आहे. गांधींबद्दल अशी मोहीम सुरू असताना पुन्हा मूळ गांधींकडे जाणे, हा एकमेव मार्ग आपल्यासाठी उरतो.

सध्या महात्मा गांधींचे (आणि सोबतच कस्तुरबांचेही) १५० वे जन्मवर्ष सुरू आहे. १९६९ मध्ये जेव्हा म. गांधींचे जन्मशताब्दी वर्ष होते त्या वेळेस 'युगवाणी'ने आवर्जून म. गांधी विशेषांक प्रकाशित केला होता. त्यानंतर आज पन्नास वर्षांनीही 'युगवाणी'त म. गांधींवर विशेष मजकूर देणे आम्हाला औचित्यपूर्ण वाटत आहे. आजच्या काळात गांधीविचार कसा प्रासंगिक आहे आणि आपल्यापुढील प्रश्नांमधून मार्ग शोधण्यास तो कसा मदत करू शकेल याचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न या अंकातील मान्यवरांच्या लेखनातून केलेला आहे. याच संदर्भात ज्येष्ठ कवी वसंत दत्तात्रेय गुर्जर यांच्यावर गेल्या पंचवीस वर्षांपासून सुरू असलेल्या खटल्याचे स्मरणही आम्ही वाचकांना करून देऊ इच्छितो. या अंकाच्या मुखपृष्ठाकरिता सुविख्यात चित्रकार अतुल दोडिया यांनी चित्र दिले आहे. गांधीविचारांवर त्यांचे दीर्घकाळ चिंतन सुरू आहे आणि ते त्यांच्या चित्रकलेतून प्रभावीपणे व्यक्त होत असते, याचा प्रत्यय वाचकांना इथे येईलच.

– प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

कविता



उडत्या पाखराची पिसं

(दीर्घकवितेचा अंश)

– अविनाश गायकवाड

भरवशाचा हिरवा चारा पाहून
डुरकेल आता
मौनाच्या गाईचा सांड

ज्यांना वाटायला पाहिजे लाज
ते निघतात निगरगट्ट आणि
ज्यांनी मन केले पाहिजे घट्ट
ते असतात हळवे सुरवंट

गांडुळलेल्या हवेवर भुरुभुरु उडतात
संभ्रमाच्या ढवळ्या म्हाताऱ्या
पिसारे फुलवून नाचू लागतात थयथय
अल्लड सुखोप्याचे विभ्रम
गार गार हवा बनून
बाता पोचतात उडत उडत
दूर दूर उन्हातान्हात
सुकल्या झाडांना फुटतात
आशेची कोवळी कोवळी पानं
सगळ्या गढूळ दुःखाचा भार
सोपवला जातो भरवशावर
आणि हात परत गुंतून जातात
ऊनकापणीला घाम गाळत

तळं राखील तो पाणी चाखील
या गाफील समजुतीने
राखणदार पिऊन टाकतो तळंच अख्खं
वाट पाहणारे लोक बसतात बोंबलत
पशुपक्ष्यांची तर बातच सोडा

तो झटकतो जिम्मेदारी
ढकलतो ती तिऱ्हाइतावर
आणि गाऊ लागतो भसाडे सर्ग
तरी भुलू लागतात लोक
त्याच्या बातांवर होतात गर्क

भक्षण करील रक्षण अशी
कुणीच धरीत नाही अपेक्षा भाबडी
पण जेव्हा रक्षक निघतो भक्षक
भूमिकेची होते अदलाबदल
चांगलं म्हणावं तो वाईट निघतो
वांग्याचा खुट्टा फिट्ट बसतो

नावात बरंच काही असतं असं म्हणतात
अर्थ सांगणारं
भ्रमित करणारं
अगदी भुलवणारंसुद्धा

खंग्री बंडा
फिरवतो आहे
रापलेल्या चेहऱ्यावरून हात
त्यावर आहे भोगलेल्या काळाचं
विस्तीर्ण पठार
तिथे नाहीत आता
फुटू फुटू तरारून उगवणारी
नव्हाळ्याची मुरमं

ज्यावरून पडलं होतं त्याला नाव
खंग्री बंडा
तो नाही खंग्री
वाईट फालतू डेरिंगबाज असे
कसकसले अर्थ लोकभाषेतून
चिकटलेत खंग्री या शब्दाला

त्याला बंड करायचंय
खोटेपणाविरुद्ध
समस्त जाँबाज लबाडीविरुद्ध
कुरूप दुनियेविरुद्ध
खोटारडेपणाचे वणवे जाळीत सुटतात
त्याच्या सर्वांगाला
दिसायला वरून शाबूत
आतून हाडांचा खुळखुळा

खंग्री बंडा नाव पडायला
निमित्त आहे प्रसिद्ध नटाचा चित्रपट
कशाला कशाचा ताळमेळ नाही
सांप्रत काळात
संत-योगी साधू-साध्वी
अशा कैक शब्दांच्या
अर्थांनी शीर्षासन केलेल्या काळात
हे नामकरण तर काहीच नाही

पडद्यावरचे नायक भुरळ घालतात तरुणांना
नायक पडदा फाडून येतो बाहेर
घुसतो तरुणांच्या अंगात
निव्वळ फॅशन म्हणून
म्हणूनच कल्पकथेतले नायकही
घुसू शकतात त्यांच्या शरीरात
आणि वास्तव असतं वेगळंच

तसे तर लफंगेही निवडले तर
आपसूक होऊन जातात समाजसेवक
त्यांना मिळूनच जातं जणू
काळ्याचं पांढरं करायचं लायसन

खंग्री बंडा तर आहे
करोडोंसारखाच करोडोतला एक
कधीही कसाही धारातीर्थी पडणारा
कष्टाची दुःखाची ओझी वाहणारा
त्याला स्वयंशाप आहे विचार करण्याचा
ज्यातून दिसतं दुःखाचं मूळ ढळढळीत
ज्यानं दुःख होतं आणखी खरमरीत

नावं चकवा देतात बरेचदा
शीलाकडे नसते शीलाची गॅरंटी
अबोल असू शकतो बोलबच्चन
तडीपार असतो सज्जनसिंग
जागोजागी बंगले असणारा असतो अनिकेत
इतिहासाचा कवडीचा गंध नसतो स्मृतीला
धूर्ताला आवडते रथाची स्वारी
तो करतो परिक्रमा यात्रेची
भाबड्यांना वाटतो अचंबा
पवित्र भावनेने तडतडू लागतात त्यांच्या शिरा
हीच वेळ असते कुरापत काढण्याची
जख्खड म्हातारीला बाळ समजून जोजवण्याची
इतिहासाला विषाचा प्याला देण्याची
भूगोलाच्या विस्ताराचं स्वप्न दाखवण्याची
लोकांना पुतनामावशीचं दूध पाजण्याची

इतिहास देणार नसतो भाकर
भूगोल होणार नसतो चाकर

सुखासाठी निरंतर चातक होणारे लोक
जगण्याच्या रणावर मार खाणारे लोक
बहकून जातात आवईने
त्यांच्या डोळ्यांवर येते अंधारी
ते कशालाही समजतात तीर्थप्रसाद
प्रसाद म्हणून तयार असतात
काहीही प्राशन करायला
अशा वेळी विसरून जातात आजचे प्रश्न
माथी मारलेल्या विवंचना
बहाल केलेल्या वेदना
आणि दुःखाचं मूळ
सुरू होते जुन्या दुःखाची नवी गोष्ट
जुन्या गोष्टीचं नवीन दुःख

अनुक्रमणिका

दुनिया झुकते झुकवणाऱ्यासमोर
घाबरते भेवाडणाऱ्याला
शेपूट घालते सत्तेच्या विक्राळ अवसानासमोर
लाळ गाळते पैशाच्या थप्पीसमोर
उभी राहते नवी बार्टर सिस्टम
पैदा होतात बातम्या सांगणारे
आंधळे संजय
जातात चेव्हरून
वाहून नेतात धडधडीत खोट्याचे भारे
मारा करतात दिवसरात्र पैसपरभारे
ज्यांनी आधार द्यायचा असतो निकोपपणाला
खांब म्हणून उभं राहायचं असतं भक्कमपणे
सत्य बरबटू नये म्हणून
सत्यावर आळ येऊ नये म्हणून
माणसांच्या प्रश्नांना मिळावी झळाळी
ज्यातून निघतील उत्तरं लखलखीत
तहानभूक सुकर करणारी
सन्मानाचा चंद्र माथ्यावर टेकवणारी
लांडीलबाडी हाकलून लावणारी
अन्यायाच्या हातापायात बेड्या ठोकून
कोठडीत डांबायला भाग पाडणारी

उत्तरं हवी आहेत लोकांना
प्रश्नांच्या अगणित दगडमाऱ्याने
ते झालेत घायाळ
झालेत रक्तबंबाळ
त्यांच्या जखमांसाठी हवं आहे आयोडीन
हवा आहे रक्त पुसायला स्वच्छ कापूस
जखमांवर चोपडायला हवा आहे मलम
पण झाली आहे सगळी हवा
सगळे दिग्गज खांब
उभ्याउभ्या झोपी जाऊन कसं चालेल
आख्खी इमारत होऊन जाईल भुईसपाट
जिथं सत्यात उतरण्यासाठी
करोडो स्वप्नं वास करतात
ती नाहीए केवळ इमारत
ती आहे करोडो जीवांचं आशास्थान
आणि
तत्त्वं निजून आहेत ग्रंथालयातल्या ग्रंथांत
नियम झोपी गेलेत कार्यालयातल्या कार्यात
जणू सगळ्यांनी घेतलीय भांगेची गोळी
चालू आहे बरळणं तारेत
पोळी भाजून घ्यायला पूरक

करोडो हात गुंतून गेलेत
भाकर बनवायला
दात आहेत तर चणे नाहीत
पिठाला वास येतोय शेतकऱ्याच्या सरणाचा
आणि
बागेत व्यस्त आहेत कष्टाळू रेशीमकिडे
त्यांना करायचं आहे निर्माण
अवाढव्य अद्‌भुत रेशीम
जे झाकील चंद्र-सूर्याला
उग म्हणलं की उगवेल
ढळ म्हणलं की ढळेल
समुद्र तोंडानं पिऊन
आख्ख्या छिद्रांतून वाहील
उंचच उंच आभाळात
रेशीमध्वज फडकवता येईल

• • •

▪ **अविनाश गायकवाड** । ए-३०१, प्रमिला अपार्टमेंट, पंचरत्न द्वार, खारेगाव, कळवा (प.), ठाणे -४०० ६०५ । **प्रमणभाष** : ७५०६८३६१६२

कविता

श्रीधर नांदेडकर यांच्या कविता

■

सहयात्रा

आपल्या उपस्थितीनं
पाखरं बिचकू नयेत
म्हणून खिडकी बंद ठेवली झाडाजवळची
रात्रीतून भरून ठेवलं पाण्याचं मडकं
आणि मनात उच्चारल्या सगळ्या प्रार्थना

मौनाला अहंकार समजू नकोस
अशी मनातल्या मनात विनवणी केली

ह्या कडाक्याच्या थंडीत
खोप्यात किंचित मळका कापूस ठेवला
कवी होणं म्हणजे
अशा धुकाळ अंधाऱ्या गारठ्यात
थोडीशी ऊब असावी यासाठी धडपडणं

खरंतर कुणाच्यातरी
निर्भय विहारासाठी
ह्या आकाशाचा निरोप घ्यावा लागतो
असं समजावलं स्वतःला

जसं वस्तीतलं लहानसं पोरगं
धावत्या आगगाडीला हात हलवतं
तशी दुरून पाहात राहीन
जिवलगाची सर्जनयात्रा

तिकडे रानात
झाडाखाली कुडकुडणाऱ्या
कुत्र्याच्या छोट्याशा पिलाशी
आत्म्याची अदलाबदल करेन
आणि
स्वतःला कापडात लपेटून
त्याच्या अंगावर कुणी पांघरुण घालेल
म्हणून वाट पाहात राहीन.

• • •



धूळफेक

धूळफेक करत
अभिनय करत
अनवाणी चालत
तुम्ही पोहचालच पुन्हा
संसदेच्या पवित्र प्रवेशद्वाराशी

भावनांवर हुकूमत दाखवत
पुन्हा भावुक व्हाल
प्रभू रामचंद्रांनी
बहाल केलेला असेल तुम्हाला
सत्तेचा सुवर्णमुकुट
आणि गंजलेलं असलं
लोखंडी असलं तरीही
काळीज आहेच की दिलेलं

महाराज
संसदेच्या पायपुसण्याला
चाळीस वेळा पाय स्वच्छ पुसा
आपल्याच जवानांचं रक्त
असेल तळपायांना लागलेलं

होणार नाही तुमचं दर्शन
सत्तामहालात शिरताना
आमच्या डबडब डोळ्यांतून
सांडणार नाही
आणि सुकणारही नाही
एकोणपन्नास विधवांचं माहेरपण

• • •

अनुक्रमणिका

कबुलीनामा

एवढा गुन्हा कबूल करू दे
पुरुष जातीनं
हजार वर्षं केलेल्या
तुझ्या अपमानाचा
सल सांगू दे सगळ्यांदेखत
मग जन्माचा अबोला धर
वाळीत टाक
तरसू दे मला
तुझी हाक ऐकण्यासाठी

पीठ मळताना
जे थेंब सांडले डोळ्यांतून
त्या खारट भाकरीचा तुकडा
पिंजऱ्यात ठेव
भिरभिरू दे भोवताली
मला तडफडू दे
तुझ्या दुःखाला स्पर्श करण्यासाठी

स्वप्नांकडे धावशील
तेव्हा हुसकून लाव
माझं रूपक असलेला
लंगडा कावळा
उडू दे तुझ्या आयुष्यातून
अशुभाची ही काळी फडफड

सगळ्यांनी केलेल्या अपराधाची
मला एकट्याला शिक्षा दे

तुझं आकाश
तुझं झाड
तुझं अंगण
तुझी कूस
नाकार मला
एकाकीपणाच्या तापल्या वाळूत
भाजू दे माझे तळपाय

हजारो वर्षं तुझ्यावर उगारणारे
हे हात कलम कर
मला कलंडू दे
भेलकांडू दे
तहान तहान म्हणत
पाण्याच्या भांड्यावर
पडू दे अडगळीत
हे प्रायश्चित्त घेणारं
तुटकं खेळणं

पण खूप सोसल्यावर
कधीतरी
फुटेल हुंदका
माझ्यातल्या बाईच्या अंशाला
तेव्हा क्षमाशील होऊन
तुझा पदर दे
ज्यात मी माझं
पुरुषाचं तोंड लपवून
ओक्साबोक्सी रडेन...

• • •

सोबत

कधीतरी
शब्दांच्या सगळ्या कवड्यांचं दान
आपल्या बाजूनं पडलं
आणि आपण पोचलो
कवितेच्या घरात

दुःखाची गोष्ट सांगायला
याहून सुंदर घर नव्हतं
या जगात

आतल्या एकाकीपणाला
एका तळहाताची सोबत लागते
म्हणून मोल आपल्याला
नाव नसलेल्या नात्याचं

तुझ्या गोष्टीत
तापलेल्या वाळूवर
अनवाणी चालणारी पोर पाहून
मी भुईखालचा झिरा होऊन
तुझ्या तळव्यांना
मायेचा गार स्पर्श करू पाहतो

अनुक्रमणिका

माझ्या गोष्टीत
अपमानित झालेला माणूस
दिवस दिवस उपाशी राहताना
तू घालू पाहतेस
भाकरीची शपथ दरवेळी

आणि काही न बोलता
कळत गेलं
की तिकडे झाड कोसळलं
तेव्हा तिथं रुजून उगवण्याची
फोफावून डवरण्याची
आण घातलीय आपल्याला
या घरानं

घर
ज्याच्या परसात
आपली आसवं लपवता येतात

घर
जे अंतर मोडून
मोडून पडताना
कुशीत घेतं

घर
ज्याच्या कोपऱ्यात बसून
सावरता येतं
धडधडतं काळीज
वडील नावाचा ढग
नाहीसा झाल्यावर

म्हणून ही तळहाताची
सोबत असावी लागते
म्हणून प्रेम नावाच्या मृगजळामागे
धावणाऱ्याच्या मागे
पाण्याची ओंजळ घेऊन धावावं लागतं
म्हणून फिटता फिटत नाही
या घराचं ऋण
• • •

विस्मरण

दारातून बाहेर पडून
दोन पायऱ्या उतरणार
तोवर पाठीवर आवाज उमटतो
'बाबा, भांग काढायचा राहिलाय'
'बाबा, शर्टचे बटन्स नाही लावलेले'
'पँटचा कोपरा बुटात अडकलाय'
कधी जिना उतरून मागोमाग धावत
'हा टिफीन विसरलात'
'हा मोबाईल'
'हा रुमाल'
'ही किल्ली'
मी स्वतःशीच कुजबुजतो
अरुणला कुठं विसरलोय?
उज्जैनच्या स्टेशनवरून
देवताले काकांना न भेटता
यावं लागलं
ते कुठं विसरलोय?
पाखरांसाठी भरून ठेवायचं
पाणी कुठं विसरलोय?
अकरावीच्या मुलींच्या पायातल्या
लग्नाच्या बेड्या कुठे विसरलोय?
भावाचं आजारपण नाही विसरलो
मानलेली बहीण मला विसरली
ते कुठं विसरलोय?
आता एखाद्या वर्षात माझी चिमणी
माझ्या आकाशातून उडून जाणारय
ते कुठे विसरलो?
वस्तू विसरल्या तर चालतात दादू
माणसांची मनातली धूळपावलं
नाही विसरायची कधीच.
• • •

▪ **श्रीधर नांदेडकर,** प्लॉट क्र. २, ३-द्वारका रेसीडेन्सी, शक्तीनगर, सीबीएस रोड, औरंगाबाद - ४३१ ००१ । मो.: ९४२३२३३६३१

अनुक्रमणिका

कविता

अशोक कोतवाल यांच्या कविता



रखुमाईचे आर्जव

मध्यरात्री,
रखुमाई म्हणते विठ्ठलाला
मला नकोय
हे लादलेलं देवपण
रे देवा,
दे मला बाईपण

जीव गुदमरतो
माझा या दगडी काळोखात
दे मला
परत माझ्या इच्छा
नटेन मीही, मुरडेन जरा
भटकेन मुक्त

देवा रे,
तुझ्या भक्तांच्या जडशीळ मस्तकांनी
चिरडलेले पाय माझे
खूप दुखतात
आकसूनही घेता येत नाहीत
अन् वळवताही येत नाही मान

माझ्या युगवैऱ्या
बंदिस्त मी
या मायावी काळमहालात
जळोत तुझे भक्त
जळो तुझी माया
दे मला माझी षड्‌विकारी काया...

• • •

तो 'काळा' नाही साधाभोळा

विठ्ठलाशी भांडण केलंस अन् उदास होऊन
जाऊन बसलीस चंद्रभागेवर.

चंद्रभागा हसली तुला
म्हटली, तो 'काळा' नाही साधाभोळा
त्याचा नाद एक चकवा
ना सुटतो ना कळतो, नेतो पुन्हा त्याच्या दारी.

कितीदा आलीस तू पंढरीला
घेऊन दुःखाची शिदोरी
अंजारले गोंजारले चरण त्याचे काळे
पीत राहिली त्याला नजरेने

काय नेलंस नि काय गेलीस ठेवून
नाहीच कळले तुला
हलत राहिला त्याच्या भरोशावर
तुझा गहिवरणारा काळीजझुला...

बाई गं, कशी होतेस एवढी निःसंग
नि येतेस चालत वारीला
असशील शहाणी तर जा निघून
दे ना टाकून कैवल्याचा भारा...

• • •

अनुक्रमणिका

कुणब्यांचा देव

आवंता आत्या
भरउन्हाळ्यात पंढरपूर करून आली
आई तिच्या पायांवर
पदरासह डोकं टेकवीत म्हटली,
कावो बाई, चंद्रभागेत पानी हाये का?

कसं राहीन पानी
तेबी मानूसपरेत वाटलं गेलं.
चंद्रभागा बसलीये बिचारी
अंगाचं मुटकुल करून
अन् मान्सं वाळवंटाले पाय लावून येतात.

मग आत्या,
सर्वांच्या कपाळावर बुक्का लावीत
पुढे सांगू लागली
इठ्ठल भलताच मढायेल व्हता दागिन्यांनी.
मह्या मनातला इठ्ठल काही
वाटे ना बहिना तो...

मले वाटे,
कुनब्यांचा देव असा
दागिन्यांनी मढायेल राहतो का?
आपण जसे तसा तो बी.
पण हे पुजारी
भलतीच मनमानी करतात माय

मी म्हणते
आता काही पंढरीले जाऊ नही
आपला देव आपल्या मनात.
त्याले कोन धक्का लाईन
अन् कोन मढाईन...

आत्या बोलतच होती
अन् मी निरखत होतो तिला.
कुणब्यांच्या देवाचं रूप डोळ्यांसमोर आणून
पाजळत होतो ज्ञान माझं...

• • •

दिंड्यांच्या महाकल्लोळात

आषाढीला पंढरपुरात
दिंडीत पताका घेऊन नाचणारा
एक वारकरी
जवळ येत म्हणाला,
माउली, धा रुप्पे द्याकी च्या प्यायला

मी त्याच्या हातावर
दहाची नोट ठेवीत म्हटलं,
माउली, कोठून आलात?
तो लाचारीचं हसून म्हणाला,
पार खानदेशातून... मुक्ताबाईसोबत.
तुमच्या रूपात इठ्ठलच भेटला बघा...

मनात म्हटलं,
अशी किती शतकं गेली
कुणाच्या तरी रूपात
विठ्ठल भेटतोच आहे वारकऱ्यांना.
ते इतके तल्लीन त्याच्या रूपात
की लाचारीचा झेंडा
कधी उतरलाच नाही त्यांच्या खांद्यावरून.

दिंड्यांच्या महाकल्लोळात
शिक्षणाचं बाह्यंद्रिय घेऊन भटकणारा मी
येऊन पडतो देवळाच्या पायरीशी.
तिथे, 'माउली, गंध लावा की दोन रुपयात'
या वाक्यानं होतो सैरभैर
अन् अभावितपणे करतो पटकन मस्तक पुढे

वर कळसावर बसलेला कावळा
मला म्हणतो कसा
शेवटी आलाच ना पंढरीत
आता घे ठरवून तुझा तूच
तू विठ्ठलाचा की विठ्ठल तुझा?

अजूनही मी ठरवतोच आहे
जे युगानुयुगे नाही ठरवता आले कुणालाही...

• • •

अनुक्रमणिका

असा कसा डसतो विठ्ठल

हयातभर गावातल्या विठ्ठल मंदिरात
मृदंग बडवणारा जगनबुवा
देवळाच्या पायरीवर
एकटाच बसलेला पाहून मी म्हटलं,
काय बुवा बरं हाये ना?

देवळाकडे हात जोडीत
बुवा म्हटला, इठोबाची मरजी
तरुण वयात मुलगा गेला, बायको गेली
आता एकलाच
पण तो काही भुकेलं राहू देत नही बरं

बुवा, कधी पंढरीले जायी आले का?
देखा भौ, देवानं जी सेवा करायची
ती इथेच करून घेतली
पण इठोबानं काही पंढरीले बलावलं नही.
आता महीबी काही आमना राह्येल नही.

काय बोलावं मला काही कळेना.
मग बुवाच मला कसंनुसं हसत म्हटला,
काही बिडीकाडी पाजता की नही
का नुसत्याच कोलड्या चौकशा?
तुम्ही तर लैच मोठ्ठे सायब झाले भौ आता.

मी तर सुन्नच.
मनात म्हटलं, बुवासारख्या असंख्य माणसांना
असा कसा डसतो विठ्ठल जन्माचा?
अख्खी हयात त्याच्या भरोशावर सोडून
माणसं कशी राहू शकतात इतकी निःसंग?
• • •

पंढरीचा कुकु–बुक्का

शेजारच्या तिरमक बुवाला
आजी म्हणते,
पंढरीले जायी राहिले तर,
मह्यासाठी कुकु–बुक्का घी येजा

मी म्हटलं आजी,
हे तर आपल्या गावातही मिळतं ना?
भाऊ रे, मियत अशीन
पण पंढरीच्या कुकु–बुक्क्याले
देवाचा वास असतो...

आजीच्या कपाळावरील बुक्का
बोटावर घेऊन
नाकाजवळ नेत म्हणालो,
आजी, मला तर
काही येत नाही देवाचा वास

मग आजी म्हणते कशी,
तुला कसा ईन भाऊ
तू तर बुकातून पाहतो इठ्ठलाले
आम्ही मनातून पाहतो
तुह्या देव न्यारा आमचा देव न्यारा.

मला कळे ना,
शतकानुशतकं कष्टणाऱ्या
आजीसारख्या असंख्य कुणबिणींना,
कपाळावर कुकु–बुक्का लावून
त्यांचा देव, मनातून कसा दिसत असेल?
• • •

देवपण

खूप दिवसांनी गेलो गावाकडे
आई म्हटली,
आबाजींचं दर्शन घेऊन ये


मी म्हटलं, का? काय झालं?
अरे ते पंढरी करून आले.
म्हटलं, मग का ते देव झाले?

आईच्या या भाबड्या श्रद्धेनं
माणसाला दिलेलं देवपण
मला डसू लागलं अंगोपांगी

किती शतकं माणसं गावागावांत
पंढरीतून देव होऊन येताहेत
माणूसपणाचं कुठलं गाणं गाताहेत?
• • •

■ अशोक कोतवाल, 'कल्पदीप' प्लॉट नं. १५, गट नं. ९०, अग्रवाल प्रोव्हिजनसमोर, दादावाडी, जळगाव ४२५ ००१ । मो.: ९८५०११७५३९

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

महात्मा गांधी
१५०वे जन्मवर्ष

गांधीजी का आठवत राहतात ?

■

नरेंद्र चपळगावकर

महात्मा गांधींचा जन्म झाला त्याला आता दीडशे वर्षे झाली. त्यांचे निधन झाले त्यालाही आता सत्तर-एकाहत्तर वर्षे झाली. खरं म्हणजे एखाद्या सज्जन आणि आज उपद्रवमूल्य नसलेल्या माणसाला विसरून जायला एवढा काळ पुरेसा आहे, पण तसे झालेले नाही. जगाच्या कानाकोपऱ्यात गांधीजींचे स्मरण कोणत्या ना कोणत्या निमित्ताने होत राहते. जग अजून गांधींना विसलेले नाही; भारत तर विसरणे शक्य नाही.

आजसुद्धा गांधीजी का आठवत राहतात? त्यांचे जीवन चमत्काराने भरलेले नाही, जगाच्या कोणत्याही भागात, अगदी छोट्या तुकड्यावरही त्यांचे राज्य नव्हते. ते अनिर्बंध हुकूमशाही नव्हते. प्रचंड मोठी सेनादले किंवा अत्याधुनिक शस्त्रास्त्रे यांचे सामर्थ्य गांधीजींच्या विचारांच्या समर्थनार्थ उभे राहिलेले नाही. त्यांनी काही अपरिवर्तनीय सिद्धांत असलेले एखादे राजकीय तत्त्वज्ञान सांगितलेले नाही. त्यांच्या नावाने निश्चित चाकोरी असलेला एखादा 'वाद'ही अस्तित्वात नाही. तरीही गांधीजी आठवत राहतात.

इतर कोणत्याही राजकीय नेत्यापेक्षा भारतीय माणसाचे गांधीजींशी असलेले नाते अधिक जवळिकीचे आहे. आपल्या घरातल्या एखाद्या वडिलधाऱ्या माणसाने आपल्या चुकांबद्दल कानउघडणी करावी; पण पाठीवरून हात फिरवून योग्य रस्ता दाखवावा, असे भारतीयांचे गांधीजींशी नाते होते. गांधी एखाद्या धर्मपंथाचे सामर्थ्यवान प्रमुख आहेत किंवा आदेश देणारे हुकूमशाह आहेत असे कधीच कुणाला वाटले नाही; पण तरीही हजारो लोक गांधींनी सांगितले म्हणून आपले जीवन एखाद्या विशिष्ट गोष्टीसाठी वाहून घ्यायला तयार होतात, दारिद्र्य पत्करतात, जीवनाची आहुतीही द्यायला तयार होतात. काटकुळ्या शरीरयष्टीचा आणि कसलेही प्रभावी वक्तृत्व नसलेल्या, साध्या सरळ शैलीत हळू आवाजात बोलणाऱ्या या माणसाने हाक दिल्याबरोबर प्रचंड मोठे आंदोलन उभे राहते. असे गांधीजींच्या व्यक्तित्वाचे काय रहस्य आहे?

गांधीजी आठवतात म्हणजे अर्थातच त्यांच्या जीवनातले प्रसंग आठवतात, त्या त्या प्रसंगी गांधीजी कसे वागले हे आठवते. दक्षिण आफ्रिकेत वकिलीसाठी गेले असताना पहिल्या वर्गाचे तिकीट असतानाही केवळ ते काळे असल्यामुळे डब्यातून त्यांना बाहेर काढण्यात आले. तेव्हा शेजारी पीटर मॅरिटजबर्ग स्टेशनवर उघड्या प्लॅटफॉर्मवरच्या एका बाकावर फेकून देण्यात आलेल्या सामानाच्या सोबतीने कडाक्याच्या थंडीत रात्रभर कुडकुडत बसलेले गांधी, असली वागणूक मिळत असेल तर आपण परत

न्या. नरेंद्र चपळगावकर
१३, जयनगर,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो.: ९६२३०८८८८०
संपर्क :
nana_judge@yahoo.com

अनुक्रमणिका

जावे का, या अन्यायाविरुद्ध येथेच राहून लढा द्यावा, याचा त्या रात्रीच विचार करून दक्षिण आफ्रिकेत वंशभेदाविरुद्ध लढण्याचा निर्णय घेणारे गांधी आठवत राहतात. चंपारण्याच्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या नीळ लावण्याच्या सक्तीविरुद्ध त्यांना संघटित करीत असताना लज्जा रक्षणासाठीसुद्धा पुरेसे वस्त्र न मिळू शकणाऱ्या स्त्रीच्या रूपाने प्रकट झालेले दारिद्र्य पाहून अंत:करण हेलावलेले गांधीजी, गरिबातल्या गरीब माणसाचा आत्मसन्मान जागृत करण्यासाठी त्याला चरख्याचा मंत्र देणारे गांधीजी, एवढ्या मोठ्या साम्राज्याच्या शक्तीसमोर तुमच्या एकट्याचा आवाज कसा परिणामकारक ठरणार असा प्रश्न विचारणाऱ्या न्यायाधीशाला 'तेच तर मी सिद्ध करू इच्छितो' असे लोकशाहीचे मर्म सांगणारे उत्तर देणारे गांधीजी, प्रांतांचे गट करून अख्खा पंजाब आणि अख्खा बंगाल जीनांच्या घशात घालणाच्या योजनेला विरोध करणारे आणि शीख-हिंदूबहुल पूर्व पंजाब व हिंदूबहुल पश्चिम बंगाल लीगच्या अधिकार कक्षेत जाऊ नये म्हणून फाळणीला मान्यता देणारे गांधीजी, ज्या शस्त्रांनी कत्तली करण्यात आल्या ती शस्त्रे खाटकाकडून घेऊन ये म्हणून बीबी अमतुस्सलामला निर्जन रात्री एकटेच पाठवणारे आणि त्यानिमित्ताने निभर्यतेची शिकवण देणारे गांधीजी आठवत राहतात. आपल्या कल्पनेतल्या स्वयंपूर्ण आणि स्वायत्त खेड्याला पूर्णपणे नाकारणाऱ्या जवाहरलाल नेहरूंना आणि त्यांच्याशी सहमत असलेल्या घटना समितीच्या बहुमताला मान्य करणारे गांधीजी, फाळणीने हिंसेचा डोंब उसळला असताना पूर्व पाकिस्तानात जाऊन तेथे माणुसकीला आवाहन करून शांतता प्रस्थापनेचा प्रयत्न करणारे गांधीजी, अशी गांधीजींची अनेक रूपे साठवत राहतात.

गांधीजींविषयी सामान्य भारतीय माणसाला जी जवळीक वाटते तिचे काय कारण आहे? मी कुणी संत नाही, ईश्वराचा अवतार नाही, मी सामान्य माणूस आहे. माझ्या नावाने पंथ नको, माझे स्वतंत्र तत्त्वज्ञान नाही, असे सांगत आपले सामान्य माणूसपण गांधीजी लोकमानसाला पटवत राहिले आणि त्यामुळेही लोकांना गांधीजी आपले वाटले. सगळ्या संतांविषयी आपल्या मनात आदर आणि प्रेम असले तरी तुकारामांविषयी जशी विशेष जवळीक आपल्याला वाटते तशीच ती राजकीय नेत्यांच्या मालिकेत गांधीजींविषयी वाटते. दोन्हीचेही कारण एकच आहे. गांधीजींचे सामान्य माणूसपण हे त्यांचे मोठे वैशिष्ट्य होते.

गांधीजींचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची परिवर्तनशीलता आणि प्रयोगशीलता. एखाद्या चाकोरीबद्ध तत्त्वज्ञानात सगळ्याच प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शेवटी फसतो. कम्युनिस्टांचे साम्राज्य कोसळले याचेसुद्धा हे एक कारण आहेच. गांधीजी लोकांत राहिले, लोकांवर होणारे अन्याय, त्यांच्यासमोर प्रश्न समजून घेता घेता विचार करीत राहिले आणि त्या विचारातून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मार्गही शोधत राहिले. या शोधालाच गांधीजी 'सत्याचा शोध' म्हणत. सर्व प्रश्नांना लागू पडेल असे एखादे उत्तर गांधीजींजवळ नव्हते. ते दरवेळेला नवा विचार करीत, नवे मार्गसुद्धा शोधत याच प्रक्रियेला त्यांनी एका सत्याकडून दुसऱ्या सत्याकडे असा माझा प्रवास चालू असतो, असे म्हटले आहे. सत्याला त्यांनी परमेश्वर मानले, पण त्याला पूजेची वस्तू बनवले नाही. सत्य ही जीवनात मिळविण्याची सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे, असे मानीत. या अर्थाने त्यांना सत्य हे परमेश्वराचे रूप आहे, असे वाटत होते. गांधीजी जेव्हा एखादा प्रश्न हाती घेत तेव्हा आपल्यातलाच एक माणूस आपल्याबरोबर विचार करतो आहे आणि आपल्यावरील अन्यायाला दूर करण्यासाठी प्रयत्न करतो आहे, ही जाणीव लोकांच्या मनात असे. गांधीजींना आफ्रिकेतल्या काय, भारतातल्या काय लोकांशी जोडणारा तो एक धागा होता.

दोन महत्त्वाच्या गोष्टींबद्दल गांधीजींचे सांगणे, त्यांचा सल्ला फार महत्त्वाचा आहे. या गोष्टी त्यांनी प्रथम शोधून काढल्या, असे अजिबात नाही; मात्र अलीकडच्या काळात त्यांनी या गोष्टींची आपल्याला पुन्हा एकदा आठवण करून दिली आहे. पाप करणारा, गुन्हा करणारा, वाईट वागणारा माणूस आणि त्याने केलेले पाप, केलेला गुन्हा किंवा केलेली वाईट वागणूक या दोन्हीत फरक करावा हे ते आवर्जून सांगत असत. पापाचा द्वेष करा, पाप्याचा नको. हा मूळ ख्रिस्ताचा उपदेश गांधीजींनी वेळोवेळी सांगितला आणि आचरणात आणला. आपला उद्देश पाप नाहीसे करणे असला पाहिजे, गुन्हेगारी नष्ट करणे हा असला पाहिजे. पाप करणारी माणसे किंवा गुन्हा केलेली माणसे जगातून नाहीशी करणे आपला उद्देश नसला पाहिजे, असे त्यांना वाटे. म्हणून विरोधकांशीसुद्धा गांधीजी अतिशय शुद्ध व मोकळ्या मनाने बोलू शकत, चर्चा करू शकत. त्यांनाही

जाणून घेऊ शकत. ज्या ब्रिटिशांच्या साम्राज्याविरुद्ध त्यांनी लढा पुकारला त्या ब्रिटिशांचाही म्हणजे ब्रिटिश माणसांचा त्यांनी कधी द्वेष केला नाही. आज आपण लोकशाहीत राहतो. वेगवेगळ्या मतांचे लोक असणार व त्यांना आपले वेगळे मत सांगण्याचा अधिकार आहे, हे आपण गृहीत धरले पाहिजे. त्यांचे मत फार झाले तर अमान्य करावे; परंतु ते मत मांडण्याबद्दल शाब्दिक किंवा शारीरिक हिंसेने त्या माणसावर हल्ला करावं हे लोकशाहीत बसत नाही. यासाठी आवश्यक असणारी उदारता आपण हळूहळू गमावून बसू लागलो आहोत. याचे एक कारण असेही आहे की, आपण गांधींना नीट समजून घेतले नाही व त्यांचे महत्त्वाचे सांगणे लक्षात ठेवले नाही. गांधीजींचा उपदेश हा आपण राबवण्याचा प्रयत्न करीत असलेल्या उदारमतवादी लोकशाहीचे एक गृहीत तत्त्व आहे.

माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर गांधीजींचा प्रचंड विश्वास होता. स्वार्थाची व गैरसमजाची पुटे खरवडून काढली तर विरोधकांचेसुद्धा माणूसपण जागे होईल अशी त्यांना आशा वाटे. काही वेळा त्यांना यश मिळे तर काही वेळा अपयशी पदरी येई. त्यांचा नि:शस्त्र प्रतिकार, त्यांचा सत्याग्रह आणि त्यांचे उपवास हे सगळे माणसाचे माणूसपण, चांगुलपण जागे करण्याचे प्रयत्न असत. त्यासाठी आत्मक्लेश सोसण्याचेही त्यांची तयारी असे आणि त्यांच्या अनुयायांनीही तीच तयारी ठेवावी, असे त्यांना वाटत असे.

गांधीजींच्या मनोभूमिकेची मुळे भारताच्या सांस्कृतिक उदारतेत होती. आयुष्यभर धर्माधिष्ठित राजकारणाला विरोध करणारे गांधीजी मनोमन एक धर्मनिष्ठ सत्योपासक होते. त्यांना देवळातला देव आवश्यक वाटत नव्हता. मानवमात्रात असलेला ईश्वरी अंश आणि भ्रमांना बाजूला सारून शोध घेतल्यानंतर पडणाऱ्या सत्यातला ईश्वरी अंश हेच त्यांना महत्त्वाचे वाटत होते. गांधीजी धर्म हा आपल्या ध्येयासाठी (मग ते धर्मातील (Secular) असले तरी) प्रामाणिकपणे काम करण्याला मदत करतो असे मानत. कर्तव्यापासून बाजूला जाण्याचा उपदेश धर्म करीत नाही, हे त्यांना माहीत होते. या उदारतेसाठी सर्वच धर्मातल्या कडव्या मंडळींचा विरोधही त्यांना सहन करावा लागला होता. पण तरीही त्यांना वास्तवाची जाणीच होती.

गांधीजी हे जाणून होते की, भारत जर एकसंघ ठेवावयाचा असेल, अखंड ठेवावयाचा असेल तर यात दीर्घकाळापासून राहणाऱ्या सर्व धर्मांच्या लोकांना या भूमीबद्दल आपुलकी वाटली पाहिजे. येथल्या इतर धर्मीयांबद्दल विश्वास वाटला पाहिजे. देशाची फाळणी होवो अगर न होवो, अखंड किंवा उरलेल्या भारतात मोठ्या प्रमाणात मुस्लिम राहणार आहेत, हे वास्तव नेहरू, वल्लभभाई आणि इतर नेत्यांप्रमाणे गांधीजींनाही पूर्णपणे माहीत होते. म्हणून ते सर्वधर्मसमभावाचे धोरण स्वीकारत होते. देशातल्या मोठ्या लोकसंख्येला अविश्वास वाटेल असे कोणतेही पाऊल हानिकारक होईल असे त्यांना वाटे. त्यांनी स्वीकारलेले धोरण हा वास्तवाचा परिपाक होता. केवळ सैद्धांतिक आग्रह नव्हता. त्यात अनुनय किंवा लांगुलचालन काहीच नव्हते. आयुष्यात यासंदर्भात एकच चूक गांधीजींच्या हातून घडली, ती म्हणजे खिलाफत चळवळीला त्यांनी दिलेला पाठिंबा.

गांधीजींच्या अहिंसेबद्दलसुद्धा बराच अपप्रचार झालेला आहे. अन्याय सहन करीत राहा पण त्याचा प्रतिकार करू नका, असे गांधीजींनी कधीही सांगितलेले नाही. अहिंसेचा अर्थ विनोबांनी अधिक स्पष्ट करून सांगितला आहे. शस्त्र न वापरणे म्हणजेच केवळ अहिंसा नव्हे. अहिंसा हा अभावात्मक गुण नाही. अहिंसा म्हणजे प्रेम. दुसऱ्या प्रत्येक माणासाबद्दलसुद्धा प्रेम असेल तर शस्त्रांच्या साह्याने किंवा हिंसेने प्रश्न सुटू शकतात हे आपण मानणारच नाही. संवाद, चर्चा असेच मार्ग चोखाळावे लागतील. अर्थात अहिंसेच्या मर्यादा गांधीजी जाणत होते. काश्मीरमध्ये टोळीवाल्यांनी आणि त्यांच्या बुरख्याखाली पाकिस्तानने आक्रमण केले तेव्हा आता तुम्ही सैन्य पाठवले पाहिजे, असे नेहरूंना सांगण्यात गांधीजीही होते. हैदराबादमध्ये निजामाविरुद्ध चळवळ पूर्णपणे अहिंसक होती. मात्र लढ्याच्या शेवटच्या काळात रझाकारांचे अत्याचार वाढले तेव्हा लोकांचे मनोधैर्य कायम टिकण्यासाठी संस्थानाच्या सरहद्दीवर स्टेट काँग्रेसने सशस्त्र प्रतिकार शिबिरे उभारली. ही गोष्ट गांधीजींच्या कानावर जेव्हा लढ्याच्या नेत्यांनी घातली त्यावेळी गांधीजी म्हणाले, 'बरे झाले. शस्त्राच्या साह्याने का होईना पण लोक प्रतिकार करताहेत. भ्याडाप्रमाणे पळून गेलेले नाहीत. गांधीजींवर एकदा एका पठाणाने प्राणघातक हल्ला केला होता. नंतर काही दिवसांनी त्यांच्या मुलाने त्यांना विचारले. मी जर तेव्हा हजर

अनुक्रमणिका



असतो तर माझे काय कर्तव्य होते? मिळेल त्या शस्त्राने आणि शक्तीने त्या हल्लेखोराचा प्रतिकार करायला पाहिजे होता की, अहिंसाव्रत धारण करून स्तब्ध बसावयास हवे होते? गांधीजींनी स्पष्ट सांगितले की, आवश्यक ती सर्व शक्ती व शस्त्रसुद्धा वापरून तू मला वाचवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे होता. हा विवेक गांधीजींच्या मनात नेहमी असे. त्यांची अहिंसा ही भ्याडांची अहिंसा नव्हती, ती शूरांची अहिंसा होती. त्यामुळेच ती शस्त्र न घेता दक्षिण आफ्रिकेतल्या वंशभेदी राजवटीला आणि भारतातल्या ब्रिटिश सत्तेला लढा देऊ शकली. ज्या जनरल स्मटस्‌बरोबर गांधीजींनी संघर्ष केला होता त्या स्मटस्‌ला स्वत: तयार केलेला चामड्याचा चप्पल जोड गांधीजींनी भेट दिला होता व अनेक दिवस तो जोड स्मटस् वापरत असत.

गांधीजींच्या जीवनातला महत्त्वाचा काळ राजकारणांशी संबंधित असा होता; परंतु राजकारणाचे मूळ स्वरूप ते कधीच विसरले नाहीत. गोखल्यांनी त्यांची एक आठवण सांगितली आहे. राजकारणी स्वाभाविक प्रकृती भ्रष्ट होणे ही आहे. जो जातो त्याला भ्रष्टतेची लागण होते. अशा राजकारणाला नीतिमान बनण्याचा आपला प्रयत्न असेल, असे गांधीजींनी त्यांना सांगितले होते. राजकारणाचा हा भ्रष्ट स्वभाव आटोक्यात ठेवण्यासाठी शुद्ध धर्म आणि नैतिकता यांचा वापर होऊ शकेल असे त्यांना वाटे. नैतिकता वगळून होणारे राजकरण हा एक सापळा असतो व त्यात अडकणाऱ्या माणसाच्या आत्म्याचीच तो हत्या करतो, असे गांधीजींनी राधाकृष्णनना सांगितले होते. म्हणूनच कदाचित स्वतंत्र भारताचे जे चित्र गांधीजींच्या समोर होते त्यात राजकीय पक्षांना स्थानच नव्हते. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी काँग्रेस पक्ष त्यांनाही आवश्यक वाटला होता; पण लढा संपल्यानंतर लोकसेवा करण्यासाठी पक्षीय संघटनांची आवश्यकता आहे, असे त्यांना वाटत नव्हते.

स्वातंत्र्यानंतर सत्तेचे माध्यम म्हणून काम करणारा राजकीय पक्ष स्वार्थसाधूंच्या हातात जाईल, अशी शंका त्यांना प्रथमपासून होती. १९४० साली मौलाना आझादांच्या अध्यक्षतेखाली रायगड येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात भाषण करताना गांधीजींनी अतिशय परखडपणे ही वस्तुस्थिती आपल्या भाषणात मांडली होती. 'स्वातंत्र्याचा पायरव ऐकू येऊ लागताच काँग्रेसच्या

सभासदांची रजिस्टरे भरून चालली आहेत, या वस्तुस्थितीच्या त्यांनी मुद्दाम उल्लेख केला. लढ्याच्या काळात सभासद होणे त्रासदायक होते. आता सत्तेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदवावयाचे होते. याच काळात गांधीजींनी सामुदायिक सत्याग्रहाचे स्वरूप बदलून वैयक्तिक सत्याग्रहाचा कार्मक्रम दिला. सत्याग्रह करून तुरुंगात गेले म्हणजे एक राजकीय प्रतिष्ठा मिळेल हे सर्वांनाच कळले होते. गांधीजींची इच्छा आताचा सत्याग्रह शक्यतो निष्ठावंतांनी करावा अशी होती. सत्याग्रहींची निवड गांधीजींनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी करावी, असे त्यांनी ठरवले. पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे आणि जवाहरलाल नेहरू यांची निवड गांधीजींनी केली. नंतर गांधीजी किंवा त्यांचे प्रतिनिधी सत्याग्रह करू इच्छिणारांच्या मुलाखती घेऊन सत्याग्रहाची परावानगी द्यायची की नाही, हे ठरवत. गांधीजींच्या मनात असलेली चाळणी आजही लक्षात घेतली पाहिजे.

यापूर्वीही गांधीजींनी राजकारणाच्या शुद्धीकरणाचा एक प्रयोग केला होता. १९३५ च्या कायद्यान्वये प्रांतिक स्वायत्तता मिळाली तेव्हा १९३६-३७ साली झालेल्या निवडणुकीत सत्तेचा मोह नसलेल्या विधायक कार्यकर्त्यांना उभे करावयाचा प्रयत्न त्यांनी स्वत:च प्रमुख असलेल्या गांधी सेवा संघातर्फे केला. या प्रयोगात त्यांना फारसे यश आले नाही. स्वातंत्र्यानंतर तर एकापाठोपाठ एक अशा गोष्टी घडू लागल्या की, गांधीजींचा अतिशय दु:खद भ्रमनिरास होऊ लागला. घटना समितीने स्वायत्त खेडे हे घटक धरणारी त्यांच्या मनातली घटना नाकारली. सत्तेवर आलेल्या काँग्रेस सरकारने आजवर ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण मान्य असल्याचे सांगितले होते. आता मात्र त्यांनी खांडसरी साखरेच्या छोट्या कारखान्याऐवजी मोठ्या साखर कारखान्यांना परवाने देणे सुरू केले. खादीचा जयघोष आजवर केलेल्या काँग्रेस सरकारनीच कापड गिरण्यांना भराभर परवाने द्यायला प्रारंभ केला. विधायक कार्यात आयुष्यभर काम करणारे गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी भांबावले. या अनपेक्षित धोरणांना कसे तोंड द्यावे असा त्यांना प्रश्न पडला. वेगवेगळ्या स्वरूपाच्या विधायक कामात असलेल्या कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या संस्था स्थापन केल्या होत्या. त्या एकत्र करून आपली शक्ती वाढेल का असाही त्यांनी विचार केला. गांधीजींच्या मृत्यूपूर्वी काही दिवस डॉ. झाकीर हुसेनांच्या नई तालिम संघटनेतर्फे आणि विधायक कार्यसमितीतर्फे असे दोन मेळावे झाले. गांधीजी दोन्ही वेळेला हजर होते. आपली शक्ती एकत्र झाल्याने वाढेल, पण त्याचा उपयोग राजसत्ता ताव्यात घेण्यासाठी आपण जर केला तर आपला उद्दिष्टांचाच पराभव होईल, असे गांधीजींनी सांगितले. आपल्या निष्ठेनुसार काम करीत राहा, एवढेच गांधीजी सांगू शकत होते. सत्तेतील मंडळी गांधीजींना आदर दाखवीत, गांधीजींची सर्वच धोरण त्यांनी यापूर्वीही कधी पूर्णपणे मान्य केली नव्हती. स्वतंत्र झालेल्या देशाचा विकास कसा होईल, याबद्दल त्यांच्या स्वतंत्र कल्पना होत्या व त्याच प्रत्यक्षात येणार होत्या. विधायक कार्यातून सत्तेवर अंकुश ठेवणारी एक शक्ती निर्माण होईल अशी गांधीजींची अपेक्षा होती, पण तसे काहीच घडू शकत नाही, हे त्यांच्या लक्षात आले होते. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्ष बरखास्त करावा आणि एक लोकसेवक संघ स्थापन करावा, अशी त्यांनी सूचना केली होती; पण तिचा विचार करण्याच्याही मनःस्थितीत कोणी नव्हते. दिल्लीत एवढी अस्थिरता होती की, काँग्रेस लगेच विसर्जित झाली असती तर स्वातंत्र्य आणि शांतता दोन्ही धोक्यात आली असती.

स्वातंत्र्यानंतर एका परदेशी पत्रकाराने गांधीजींची मुलाखत घेतली. ती प्यारेलालांनी उद्धृत केली आहे. 'तुम्हाला हवे असलेले हिंदू-मुस्लिम ऐक्य, खादी आणि ग्रामोद्योग, हिंदुस्थानी राष्ट्रभाषा हे सगळे कुठे आहे? सध्याचे राज्यकर्ते ढोंग करीत आहेत काय? गांधींना त्यांच्या धोरणांना काँग्रेस पुढाऱ्यांनी जिवंतपणीच पुरले आहे काय?' या बोचऱ्या प्रश्नाला गांधीजींनी स्पष्ट उत्तर दिले. 'लोकांचा या तत्त्वावर विश्वास आहे. मला कबरीत पुरून टाकले तरी मी तिच्यातूनही उठेन आणि हेच कार्यक्रम आणि हीच तत्त्वे पुन्हा सांगत राहीन.' डॉ. सुशीला नय्यर गांधींना म्हणाल्या, 'आता स्वातंत्र्य मिळाले आहे, आता राजकीय कार्यक्रम थांबवून समाज सुधारणेचा कार्यक्रम हाती घ्यावा असे तुम्हाला वाटत नाही काय?' गांधीजी उत्तरले, 'राजकारणाच्या शुद्धीकरणाचा कार्यक्रम संपलेला नाही. तो आणखी करीत राहावा लागणार आहे.'

आयुष्याच्या अंतकाळी गांधीजी एकामागोमाग येत असलेली निराशा पचवीत पुढे चालले होते. जो प्रेमाचा, सहिष्णुतेचा, उदारतेचा संदेश गांधीजी सतत सांगत होते, राजकारणातून परिवर्तन होणार नाही, असे सांगत होते तो

अनुक्रमणिका

ऐकण्याची मन:स्थिती कोणाचीच नव्हती. सगळेच स्वार्थी होते असे नाही; देशसेवेसाठी काम करणे आवश्यक आहे, याबद्दलच्या त्यांच्या कल्पनाही निराळ्या होत्या. सत्तेचा त्याग करायला कोणी तयार नव्हते, तसेच संपत्तीचा त्याग करायलाही कोणी तयार नव्हते. आर्थिक समता आणण्यासाठी पहिले पाऊल म्हणून श्रीमंतांनी आपली संपत्ती सर्व जनतेचे विश्वस्त म्हणून बाळगावी अशी त्यांची कल्पना होती. १९४५ साली या विश्वस्त व्यवस्थेचे एक टिपण किशोरीलाल मशरूवाला आणि नरहरी पारीख यांनी तयार केले होते. ते विचारासाठी घन:श्यामदास बिर्लांकडे विचारार्थ पाठवण्यात आले होते. ते टिपणच पुन्हा गांधींपर्यंत परत आलेच नाही.

तरीही मला गांधीजी आठवत राहतात. विनोबांनी सांगितले आहे की, आजच्या विज्ञानयुगात पुराणकाळचा मनू आणि जुना मार्क्स चालणार नाही, तसाच गांधीही जसाच्या तसा चालणार नाही. प्रत्येक काळ नवे प्रश्न उपस्थित करतो, त्याची उत्तरे नव्याने शोधावी लागतात, त्यासाठी गांधीजींनी प्रकाश मात्र पुरवला आहे. द्वेष किंवा हिंसेने प्रश्न सुटत नसतात, उलट ते आणखी जटिल होत राहतात. म्हणून गांधीजींनी दाखवलेला मार्ग अनेकांना महत्त्वाचा वाटतो.

दहा वर्षांपूर्वी मध्यपूर्वेत बंदुकीचा आणि तलवारीचा मार्ग सोडून हजारो अरब शांतपणे कैरोच्या आणि इतर शहरांच्या चौकात जमू लागले. आजही सुदानसारख्या देशातही सैनिकी शासनावर दडपण आणण्यासाठी हजारो नि:शस्त्र लोक एकत्र जमतात. हे सगळेच श्रेय गांधींचे नसेल; पण त्यांचा या परिवर्तनात नक्कीच वाटा आहे. शांततापूर्ण चळवळींना काही होत नाही, हा समज आता कोणी शहाणा माणूस बाळगत नाही. चिपको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन यांना थोडे तरी यश मिळालेच आहे.

आज भोवती जे घडते आहे, ते पुन्हा गांधीजींची आठवण वेगळ्या अर्थाने करून देणारी आहे. गल्लीतल्या भांडणात मुलेसुद्धा जी भाषा बोलणार नाहीत, ती भाषा आमचे राजकारण बोलते आहे. पाच वर्षांत संपत्ती दहापट वाढवू शकणारे राजकारणी आपण पाहतो आहोत. दलित, आदिवासी आणि स्त्रिया यांचा तोंडाने उद्घोष चालू असतानाही संसदेत स्त्रीला योग्य प्रतिनिधित्वासाठी राखीव जागा ठेवण्याला सगळ्याच पुरुषांचा मनातून विरोध असतो. तिला देवळात जाण्याचा अधिकारसुद्धा आपण नाकारतो. न्यायालयापासून ते एखाद्या स्वायत्त संस्थेपर्यंत सगळ्याच आपली मालकी असावी ही मानसिकता सगळ्यावरच राजकीय पक्षात का दिसावी? असे काही पाहिले म्हणजे गांधी आठवतात. परमेश्वर अवतार घेतो की नाही हे माहीत नाही; पण सध्याच्या काळात सामान्य माणसांना एकत्र येऊन आपल्यातल्याच सद्गुणांना जागृत करून परमेश्वराचे काम करावे लागेल. सर्वजण मिळून गांधी होण्याचा प्रयत्न करावा लागेल.

गांधीजींचे एक चरित्रकार लुई फिशर यांनी म्हटले आहे :

''जगाच्या इतिहासात ज्या मोठमोठ्या व्यक्ती होऊन गेल्या, त्यांच्या पाठीशी सरकारची शक्ती उभी होती. चर्चिल, रूझवेल्ट, लॉईड जॉर्ज, स्टॅलिन, लेनिन, हिटलर, वुडरो विल्सन, कैसर, लिंकन, नेपोलियन, मेटरविच आणि टेलीरँड ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. त्यांच्याशी तुलना करता, अधिकारावर नसलेल्या आणखी एका व्यक्तीचे नाव मनात येते, ते म्हणजे कार्ल मार्क्स. परंतु त्यांनी केवळ सरकारी यंत्रणेची व्यवस्था कशी असावी याची निश्चित तत्त्वप्रणाली मांडली. गांधींप्रमाणे माणसांच्या सदसद्विवेकबुद्धीला अंत:करणपूर्वक ज्यांनी आवाहन केले, अशा व्यक्तीचा शोध घेण्यासाठी आपल्याला कित्येक शतके मागे जावे लागेल. धर्मप्रामाण्य इतिहासाचा तो एक कालखंड होता. येशू ख्रिस्त, रोमन चर्चमधील काही धर्मोपदेशक, बुद्ध, ईश्वराचे हिब्रू प्रेषित आणि ग्रीक संत इत्यादी धर्मवेत्त्यांनी माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीला हिरिरीने आवाहन केले होते; पण ते सगळे धर्मप्रचारक होते. गांधी या सर्वांपासून निराळे होते. त्यांनी ईश्वर किंवा धर्माचा प्रचार केला नाही. ते जणू जागते वागते प्रवचनकार होते. त्यांनी असे दाखवून दिले की, आधुनिक काळात आणि या काळातील राजकारणातही त्या सर्वांची तत्त्वे लागू करता येतील. सत्ता, संपत्ती आणि अहंकारातून माणसाला गिळंकृत करणाऱ्या आधुनिक जगात गांधींसारखा एखादा चांगला माणूस निर्माण होणे, हे अतर्क्य होते.''

• • •

(१६ मे २०१९ रोजी पुणे येथे वसंत व्याख्यानमालेत दिलेल्या व्याख्यानाचे परिष्कृत लेखरूप)

अनुक्रमणिका

महात्मा गांधी
१५०वे जन्मवर्ष

गांधी आणि माणूस



रामदास भटकळ

गांधींना समजून घेताना अनेक परस्परविरोधी मते, गट, संकल्पना यांचा समन्वय साधावा लागतो. गांधी दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्थानात परतले तेव्हा 'इंडियन नॅशनल काँग्रेस'मध्ये दोन गट होते – मवाळ आणि जहाल. गांधी हे स्वतः गोपाळ कृष्ण गोखले यांचे अनुयायी म्हणवून घेणारे आणि तरीही टिळक महाराजांविषयी आदर बाळगणारे. त्यांनी स्वतः देशाचे नेतृत्व केले ते या दोघांच्याही पलीकडे जाणारे. हे केवळ उदाहरणादाखल.

पशू आणि माणूस

गांधी 'माणूस' या प्राण्याला समजून घेत होते आणि त्यांना जे उमजले ते पुन्हा माणसांना समजावून देत होते. गांधी ओळखले जातात सर्वसामान्य जनतेला राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना कार्यरत करणारे म्हणून. व्यक्ती आणि समष्टी या द्वंद्वात गांधी कुठे याचा शोध असाच चकवा देणारा आहे. 'एकला चलो रे' अशी भूमिका घेऊन जरूर पडल्यास एकट्याने संघर्ष करण्याची त्यांची तयारी असायची, तरी प्रत्यक्षात त्यांच्यासोबत तत्कालीन नेत्यांपासून तो सर्वसामान्य जनतेपर्यंत आणि वृद्धापासून ते तरुणांपर्यंत सर्व असायचे. त्यांची विचारपद्धती जशी सर्वंकष किंवा 'हॉलिस्टिक' होती तशी आचारपद्धतीही सर्वसमावेशक होती. या सर्वांचे रहस्य समजून घेण्यासाठी योग्य अशी आकलनपद्धती आपल्याला शोधून काढावी लागते. नाइलाजाने आपण फक्त त्यांच्या एकेक पैलूचाच विचार करू शकतो.

सर्वोदय

आपल्या तरुण वयातच आणि सार्वजनिक आयुष्याच्या सुरुवातीलाच त्यांनी धर्मविषयक चिंतन करायला सुरुवात केली. ते बॅरिस्टर होऊन इंग्लंडहून हिंदुस्थानात परतले आणि लगेच त्यांची कवी राजचंद्र यांच्याशी भेट झाली. राजचंद्र व्यवसायाने जवाहिरे, वृत्तीने विद्वान, शतावधानी, व्यवहार आणि तत्त्वज्ञान यांची विलक्षण सांगड घालणारे आणि व्यवहार सांभाळत निष्काम वृत्तीने जगणारे. गांधींहून दोनतीन वर्षांनी ज्येष्ठ. पुढे जैन मुनी म्हणून नावाजले गेले तरी मुळातच सर्वधर्मांचा फक्त आदर करणारे नव्हे तर त्यांवर श्रद्धा असलेले. गांधी वर्षभर हिंदुस्थानात राहिलेल्या काळात

रामदास गणेश भटकळ
डी-३, प्रथमेश सोसायटी,
ऑफ सावरकर रोड, प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०२५
मो.: ९८२०८७१४०८
संपर्क :
ramdasbhatkal@gmail.com

अनुक्रमणिका

त्यांचा संपर्क झाला तरी खरे मार्गदर्शन मिळाले ते गांधी दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर. प्रिटोरियात अनेक धर्मासंबंधीचे वाचन केल्यानंतर अधिकच गोंधळात पडलेल्या बॅरिस्टर गांधींना कवी राजचंद्र यांनी पुस्तके पाठवून आणि पत्रव्यवहारातून मार्गदर्शन केले. या विचारमंथनातून गांधींनी सर्वधर्मसमभाव ही संकल्पना पक्की केली. जगाच्या इतिहासात अनेक धर्म प्रस्थापित झाले. प्रत्येक धर्माचा मुळाधार नैतिकता असला तरी त्यात हळूहळू काही विकृती येऊ लागल्या. त्या दूर करण्यासाठी अनेक सुधारक निर्माण झाले आणि त्यानुसार अनेक पंथ तयार झाले. हिंदुस्थानात अनेक शतकांपूर्वी सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला तर अकबर बादशहाने इस्लाम सोडून दिले-इ-लाही या नवीन धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. ख्रिश्चन, शीख प्रत्येक धर्मात नवीन पंथ निर्माण झाले. गांधींनाही काही काळ थिऑसॉफीसारख्या पंथाचे आकर्षण वाटले. तरी अखेरीस सर्वधर्मसमभाव हीच संकल्पना त्यांनी घट्ट धरली. या मागे त्यांची विचारसरणी जी होती त्यामुळे त्यांनी 'सर्वधर्मसमभाव', 'सर्ववंशसमभाव' आणि सर्वोदय या सर्वसमावेशक कल्पना आपल्या आचारविचारांत बाणवल्या.

अहिंसा आणि माणूस

हे सारे जगत असताना त्यांनी मांडलेल्या काही वेगळ्या संकल्पनांच्या आधारावर आपल्याला गांधी समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गांधींनी आपल्या आयुष्याच्या अखेरीस - विशेषतः ते आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध असताना - आपले सचिव प्यारेलाल यांच्याशी बोलताना उल्लेख केला की गांधी विचार आणि मार्क्सविचार यांत एकाच बाबतीत फरक आहे. तो म्हणजे हिंसा-अहिंसा यांविषयी. मार्क्सविचार हा हिंसक संघर्षातून न्याय आणू पाहतो तर गांधींची साधनशुचिता आणि अहिंसक मार्गावर दृढ श्रद्धा. पण या विचारामागे अधिक महत्त्वाची धारणा होती की गांधींना प्रत्येक माणसाची काळजी होती. जॉन रस्किनच्या 'अण्टू दिस लास्ट' या ग्रंथाचे गांधींना सापडलेले मर्म कदाचित रस्किन यांनाही अपेक्षित नसावे. मार्क्सवाद किंवा कल्याणकारी राज्याची संकल्पना यांत सर्वाधिकांचे महत् सुख महत्त्वाचे होते. गांधींच्या दृष्टीने सर्वाधिकांचे नव्हे तर प्रत्येकाचे सुख हे तितक्याच महत्त्वाचे होते. विनोबा भावे यांनी सर्वोदयाजागी अंत्योदय हा शब्द सुचवला. गांधींनीही विकास करायला हा दरिद्रीनारायणापासून सुरुवात करायची असे म्हणताना प्रत्येक माणूस महत्त्वाचा हेच त्यांना सांगायचे आहे.

विश्वस्त कल्पना

दरिद्रीनारायणाला सांभाळताना दुसऱ्या टोकाला असलेल्या श्रीमंत उद्योजकांची गच्छन्ती व्हावी असेही त्यांना वाटत नव्हते. ज्यांना आर्थिक बाबतींत यश मिळते त्यांनी जरूर ते मिळवावे, पण मिळालेले यश हे केवळ आपले नसून आपण त्या समृद्धीचे विश्वस्त आहोत हे त्यांनी सांगितले. त्यांच्या सांगण्यानुसार साऱ्याच गोष्टी सर्वार्थाने खालच्या पातळीवर असलेल्या माणसाच्या प्रगतीसाठी जशा होऊ शकल्या नाहीत तशाच सर्व साधनांनी विश्वस्त कल्पनेला पूर्ण पाठिंबा दिला नाही. जगाच्या इतिहासात कोणतीच गोष्ट अशी झटक्यात होत नसते. परंतु प्रत्येक व्यक्तीचे महत्त्व लक्षात घेणे याचा अनेकांवर परिणाम झालेला दिसतो. निव्वळ आर्थिक क्षेत्रात पाहिले तर आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेतील 'पीस कोअर' किंवा इंग्लंडमधील 'ऑक्सफॅम' संस्था यांच्या कामामागे हीच प्रेरणा असावी. अलीकडच्या काळात भारतात व्यावसायिक संस्थांना फायद्याचा काही भाग समाजासाठी खर्च करावा अशी कायद्यात तरतूद आहे.

गांधींनी विश्वस्त कल्पना ही मुख्यतः आर्थिक क्षेत्राविषयी मांडली. ते हिंदुस्थानात परतले तेव्हा चळवळ बांधायची तर ती प्रस्थापित उद्योजकांना दूर करून, टाळून की सोबत घेऊन या प्रश्नाचे हे उत्तर होते. एकूणच सर्वांना - म्हणजेच - प्रत्येकाला सोबत घेऊनच पुढे जायचे या कल्पनेशी हे सुसंगत होते. त्यांच्या अनुयायांनी त्यांच्याकडे संदेश देण्याचा आग्रह धरला तेव्हा त्यांनी सांगितले 'माझे जीवन हाच माझा संदेश'. हे लक्षात घेऊन जर आपण पाहिले तर लक्षात येईल की ही विश्वस्त कल्पना फक्त आर्थिक क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती. ज्याच्या ज्याच्याकडे काहीही अधिक प्रमाणात आहे किंवा तसे समजले जाते त्याने त्याने त्या आधिक्याचा उपयोग विश्वस्त भावनेने ते नसलेल्यासाठी केला पाहिजे, या पद्धतीने ते वागत आले. वयाचा मोठेपणा, स्त्री-पुरुष भेद, बालकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अगदी प्राण्यांकडे पाहण्याची भूतदयेपलीकडची दृष्टी, तथाकथित

अनुक्रमणिका

वंशश्रेष्ठत्व अशा अनेक बाबतींत त्यांनी स्वतः ही वृत्ती बाणवली होती आणि आपल्या अनुयायांमध्ये बाणवण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

इतिहासाचे सार–प्रेम

हिंदुस्थानाच्या राजकीय प्रश्नांत प्रत्यक्ष गुंतण्यापूर्वीच त्यांनी 'हिंद स्वराज' हा अद्वितीय ग्रंथ लिहिला. हे जरी सत्तरऐंशी पानांचेच चोपडे वाटले तरी त्यात त्यांनी इतक्या महत्त्वाच्या बाबतीतले मूलभूत सिद्धान्त मांडले आहेत की त्याला ग्रंथच म्हणावे लागेल. त्यातील एक महत्त्वाचा सिद्धान्त इतिहासाबद्दल. तत्कालीन इतिहासकार हे प्रामुख्याने भांडणे, संघर्ष, लढाया, तह, राजेरजवाडे, कटकारस्थाने यांविषयी लिहीत. सामान्य माणसांचा यांच्याशी संबंध असतोच असे नाही. अशा प्रकारच्या इतिहासावरून 'बळी तो कान पिळी' ही विचारसरणी दृढ होण्याची शक्यता होती. गांधींनी मांडले की या साऱ्या गोष्टी या अपवादात्मक आढळतात. प्रत्यक्षात अनेक वाद, भांडणेदेखील सामोपचाराने किंवा प्रेमाने मिटवली जातात. तसे झाले नसते तर मानवजात ही कधीच नष्ट झाली असती. प्रत्येक भांडणाचा शेवट जर शत्रूचा नायनाट करणे यातच झाला असता तर मानवाने प्रगती केलीच नसती. उलट माणसाचा स्थायिभाव प्रेम हाच आहे. या भावनेला आणि विचारपद्धतीला बळकट करणे हेच समाजाचे उद्दिष्ट असायला हवे. एका अर्थी गांधींच्या आयुष्याचे ध्येय फक्त देशाचे स्वातंत्र्य नसून माणसाला स्वतःला ओळखण्यास मदत करणे आणि त्यानुसार माणसे घडवणे हेच होते. त्यांच्या आश्रमात – दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स वसाहत आणि टॉलस्टॉय फार्म – येथील सत्याग्रही आणि त्यानंतर हिंदुस्थानात अहमदाबाद येथील सत्याग्रह आश्रम आणि वर्ध्याच्या सेवाग्राम इथे त्यांचा हाच प्रयोग चालायचा. या प्रकारचे अनेक आश्रम त्यांच्या अनुयायांनी ठिकठिकाणी काढले. आश्रमवासीयांखेरीजही अनेक माणसे अशी वेगळी घडवली गेली. साने गुरुजी हे आपण गांधीविचारांचे प्रतीक मानतो. त्यांची आणि गांधींची प्रत्यक्ष भेट फारच किंचित झाली होती. गांधींच्या मृत्यूनंतर जन्माला आलेली बरीच माणसे आपण आजही पाहतो जी माणूसपणाला जपणारी आहेत.

नैतिक उत्क्रांती

गांधीविचार आकार घेत होता त्यासुमारास किंवा त्याआधी आधुनिक युगातले कार्ल मार्क्स, चार्ल्स डार्विन, सिग्मंड फ्रॉइड असे मूलभूत विचार मांडणारे अनेक होऊन गेले. डार्विन यांना प्राण्यापासून झालेली माणसाची जीवशास्त्रीय उत्क्रांती याविषयी आपला सिद्धान्त मांडला. अ‍ॅडम स्मिथ आणि कार्ल मार्क्स यांनी परस्परविरोधी आर्थिक सिद्धान्त मांडले तरी त्यामागे 'आर्थिक माणूस' कल्पलेला होता. हर्बर्ट स्पेन्सर यांनी 'सामाजिक माणूस' कल्पून समाजशास्त्र मांडत असताना 'सर्वायव्हल ऑफ दी फिटेस्ट' ही संकल्पना पुढे केली.

गांधींनी माणसाची प्राण्यांपासून झालेली उत्क्रांती फार वेगळ्या प्रकारे मांडली. माणूस हा एका अर्थी प्राणीही आहे. क्षुधा, तृष्णा आणि कामवासना या पशूप्रमाणे माणसातही आहेत. तरी माणूस हा उत्क्रांत फक्त दोन पायांवर चालतो म्हणून नव्हे तर तो विचार करू शकतो, सहन करून शकतो. दुसऱ्यांसाठी काही करू शकतो – सगळ्यात म्हणजे नैतिकतेचा शोध घेऊ शकतो. हा विचार मनात धरला की माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. तहान, भूक, निवारा आणि वंशवृद्धी यांचे महत्त्व लक्षात घेऊनही त्यापलीकडे माणूस म्हणून काही आहे हे गांधींनी दाखवून दिले.

जलाशयातील तरंग

गांधीविचारांचा मागोवा घेताना आणखी एका संकल्पनेकडे पाहावे लागते. गांधीविचारात 'ओशियानिक सर्कल' किंवा शब्दशः भाषांतर केले तर 'सागरी वर्तुळ' ही ती संकल्पना. यासंबंधी स्वतः गांधींनी किंवा त्यांच्या अभ्यासकांनी फारसे लिहिलेले नाही. तरी प्रामुख्याने पाण्यात जर खडा टाकला तर जशी वर्तुळे किंवा तरंग निर्माण होतात अशा प्रकारची समाजरचना गांधींना अभिप्रेत होती. जात, धर्म, राष्ट्रीयत्व यांत उच्चनीच भाव गृहीत धरून उतरंड मानली तर त्या पिरॅमिडच्या पायथ्याशी अनेक तर वरच्या टोकाला काहीसे एकाकी दिसतील किंवा समाज हा संघर्षमय मानला तर विरोधक एकमेकांसमोर ठाकलेले दिसतील.

गांधींची या वर्तुळाकार समाजरचनेबद्दल कल्पना अशी होती की, या वर्तुळाच्या केंद्राशी असेल तो माणूस. त्याच्यासमोर कोणी विरोधक ठाकलेला नाही. त्या वर्तुळाकार प्रसारात माणसांचे समाजगट, खेडे, खेड्यांचे


गट, राज्य, देश आणि एकूण वैश्विक समाज असा प्रेमरूपी पसरलेला विस्तारित भाग असेल. संघर्षमय विचार बाजूला ठेवून माणूस जर विचार करू लागला तर एक वेगळे विश्व निर्माण होईल अशी काहीशी ती कल्पना असावी.

माणूस हाच केंद्र

या विचारामागे माणूस हाच क्रेंदीभूत होता. गांधींच्या राजकीय धोरणातही माणूस हा केंद्रीभूत होता. अतिशयोक्ती न करता आपण म्हणू शकतो की कोणतीही राजसत्ता, संपत्ती, दंड हाती नसतानाही जगाच्या इतिहासात माणसांच्या मनावर अधिराज्य करणारी दुसरी व्यक्ती नसावी. आणि तरीही गांधी प्रत्येक माणसाला महत्त्व देत असत. असंख्य अनोळखी माणसे त्यांच्याशी पत्रव्यवहार साधत. गुरूसमान टिळक, गोखले असोत, शिष्यवर जवाहरलाल, सुभाषचंद्र, विनोबा, जयप्रकाश असोत किंवा महारोगाने ग्रस्त परचुरेशास्त्री असोत. प्रत्येक व्यक्तीचे महत्त्व ते जाणून होते. त्यांच्या समाजरचनेचा केंद्रबिंदू माणूस हे फक्त तात्त्विक सत्य नव्हते तर त्यांच्या सत्याच्या प्रयोगांचे सार होते.


• • •

युगवाणीचे मागील अंक



एप्रिल–मे–जून २०१८

मल्लिका अमरशेख, प्रभाकर कोलते, प्रेमानंद गज्वी, नितीन दादरावाला, दीनानाथ मनोहर, रणधीर शिंदे, दीपक बोरगावे, ऑर्थर शॉपेनहॉवर– अनुवाद : श्रीनिवास हेमाडे, अ.ना. देशपांडे (वारसा), कमल व्होरा – अनुवाद : वर्जेश सोलंकी




जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०१८

वसंत आबाजी डहाके, रामदास भटकळ, निशिकांत ठकार, प्रभा गणोरकर, संदेश भंडारे : मुलाखत – प्रमोद मुनघाटे, प्रवीण बांदेकर, दीपक बोरगावे, म.म. दत्तो वामन पोतदार (वारसा), देवीप्रसाद मिश्र : अनुवाद : गणेश विसपुते, कात्यायनी : अनुवाद : नीरजा, नीलेश रघुवंशी – अनुवाद : बळवंत जेऊरकर, गीत चतुर्वेदी – अनुवाद : जुई कुलकर्णी



ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०१८

हेमंत गोविंद जोगळेकर, विकास पालवे, सुधीर रसाळ, रवींद्र इंगळे चावरेकर, राजू बावीस्कर, नंदा खरे, सुरेश आकोटकर, तुळशीराम काजे, फणीश्वरनाथ रेणू –अनुवाद : गोरख थोरात, ओक्ताविओ पास – अनुवाद : कृष्णा किंबहुने



जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०१९

दिनकर बेडेकर, मेघराज मेश्राम, गणेश कनाटे, यशवंत मनोहर, सुनील शिणखेडे, अविनाश सप्रे, कविता महाजन, शिवकन्या शशी, रवींद्र दामोदर लाखे, राजू बावीस्कर, राणी दुर्वे, रावबहादूर गो. स. सरदेसाई (वारसा), के. जी. संकरपिळ्ळै, सुकुमारन, नीलीमकुमार अनुवाद : चंद्रकांत पाटील

वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :

नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, भ्रमणभाष : ९४२३१०३३०१


दूरध्वनी : ०७१२–२५२३९२९ (संध्या. ६ ते ८)

पत्ता : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर–४४० ०१२

युगवाणी नियमित मिळण्यासाठी आजच युगवाणीचे वर्गणीदार व्हा.

महात्मा गांधी : २१व्या शतकाचा संभाव्य महानायक

डॉ. अभय बंग



मोहनदास करमचंद गांधी या महानायकाचा उदय विसाव्या शतकाच्या सुरुवातीस झाला. विसाव्या शतकातील सर्वांत प्रभावशाली नायक म्हणून 'टाईम'ने आइन्स्टाईन व महात्मा गांधींची निवड केली. पण तोही आता भूतकाळ झाला. एकविसाव्या शतकात गांधी कालबाह्य ठरतील की कालोचित वा कालातीत ठरतील?

एकविसाव्या शतकासमोर तीन वैश्विक महाप्रश्न उभे आहेत. भांडवलशाहीचे पाप, पृथ्वीला ताप आणि धार्मिक, सांस्कृतिक हिंसेचा शाप.

भांडवलशाहीमधून आर्थिक विकास तर वेगाने झाला; पण जागतिक मंदीही निर्माण झाली. थॉमस पिकेटीने व ऑक्सफामने प्रकाशित केल्याप्रमाणे आर्थिक विषमता अतिभयानक झाली आहे. भारतातल्या नऊ अब्जाधीशांकडे तळातल्या ६५ कोटी लोकांएवढी संपत्ती आहे. अशा आर्थिक विषमतेच्या छायेत राजकीय व सामाजिक समता तकलादू ठरते. अब्जाधीशच माध्यमांना नाचवतात, सरकारांना निवडतात अथवा पाडतात, बँकांना लुटतात. थोड्याशा बँकर्सचा भ्रष्टाचार व अतिश्रीमंतांचा लोभ अख्खा अर्थव्यवस्थेला मंदीत लोटतो.

डॉ. अभय बंग
शोधग्राम,
पोस्ट - चटगाव, ता. धानोरा,
जि. गडचिरोली - ४४२ ६०५
संपर्क :
search.gad@gmail.com

अनुक्रमणिका

या लोभाचे व विषमतेचे काय करावे ?

उपभोग 'उप' न राहता जीवनाचा प्रमुख हेतू झाला की चंगळवाद पसरतो. अनिवार इच्छा करणारे मानवी मन विज्ञानाच्या कल्पवृक्षाखाली बसून मागण्या करते व तेल, कोळशावर चालणारी ऊर्जाव्यवस्था त्याची प्रत्येक इच्छा पूर्ण करते. त्यातून ग्लोबल वार्मिंगचा भस्मासुर जन्माला येतो.

या अनिवार उपभोगाचे व इच्छांचे काय करावे ?

सम्युअल हंटिंग्टनने पंचवीस वर्षांपूर्वी 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स' मध्ये भाकीत केल्याप्रमाणे शीतयुद्ध संपल्यानंतर भांडायला काही कारण न उरलेल्या मानवजातीने धार्मिक व सांस्कृतिक द्वेषाचे पुनरुज्जीवन केले आहे. मुस्लिम विरुद्ध ख्रिश्चन देश, हिंदू विरुद्ध मुस्लिम, क्युबेक आणि ब्रेक्झिट - हजार रूपांनी हा राक्षस माणसांच्या मनात उगवतो आहे. इतरांना परकेच नव्हे तर शत्रू कल्पून मनाची व देशांची द्वारे बंद करतो आहे. सोबत असलेल्यांना परके म्हणून मॉब लिंचिंग करतो आहे. मुंबईला बिहारी नको, आसामींना बंगाली नको, म्यानमारला व भारताला रोहिंग्या व मुस्लिम नकोत. एकमेकांचं खाणं-पिणं, वेश, सण, कलाकार आणि भाषा सर्वच द्वेषाची कारणं बनतात. तुम्ही जॉर्ज बुश असाल तर इराक व अफगाणिस्तानवर हवाई हल्ले करता. तुम्ही सुन्नी मुस्लिम असला तर शियांना मारता. तालिबानी असला तर बॉम्बस्फोट करता. तुम्ही अतिरेकी हिंदुत्ववादी असला तर पिस्तूल, सुरे व बॉम्ब वापरता. अखंड भारताचा जप करत भारताचे भावनिक शतखंड करता.

या धर्मद्वेषाचं, या हिंसेचं काय करावं ?

एकविसाव्या शतकातील या प्रश्नांची गांधींकडे काय उत्तरे आहेत ?

यांची उत्तरे गांधींकडे कुठे शोधायची? त्यांची तीनच पुस्तकं आपल्यासाठी पुरेशी आहेत हिंद-स्वराज, मंगल-प्रभात व सत्याचे प्रयोग अर्थात आत्मकथा; पण गांधी निव्वळ ग्रंथ लिहिणारा तत्त्वज्ञ नाही. त्यानं आपलं तत्त्वज्ञान स्वतःच्या जीवनाच्या कागदावर लिहून ठेवलं आहे. म्हणूनच तो म्हणू शकला - 'मेरा जीवनहि मेरा संदेश है।' गांधींचे जीवन हेच त्यांचं तत्त्वज्ञान आहे. या तीन पुस्तकांत व गांधींच्या जीवनात आपल्याला आजच्या तीन वैश्विक प्रश्नांची उत्तरं आढळतात का ?

आजचे हे तिन्ही महाप्रश्न गांधींनी शंभर वर्षांपूर्वीच ओळखले आहेत. भारतातील अनेक नेत्यांना युरोपच्या उदारवादाचं, विज्ञानाचं, लष्करी सामर्थ्याचं व आर्थिक समृद्धीचं अमाप आकर्षण वाटलं. पाश्चिमात्य सभ्यतेच्या अनुकरणामध्ये त्यांनी भारताचा उद्धार पाहिला. या बाबतीत नेहरू, जिना, आंबेडकर व सावरकर एकाच नावेत आहेत. गांधींनी मात्र पाश्चिमात्य सभ्यतेच्या मुळाशी असलेली जीवनमूल्ये लोभ, संग्रह, अनिवार उपभोग, शक्तिपूजा व हिंसा - लख्ख पाहिली व नाकारली. आपल्या अंगावरची बॅरिस्टरी वस्त्रे व साहेबी जीवनशैली त्यागून नवीन जीवनशैली अंगीकारली. त्यांची जीवनमूल्ये त्यांनी फिनिक्स, टॉलस्टायवाडी, साबरमती व सेवाग्राम आश्रमात एवढंच नव्हे तर संपूर्ण स्वातंत्र्य लढ्यात प्रकट केलीत.

या वैश्विक प्रश्नांची उत्तरे गांधी पर्यायी समाजरचनेत तर देतात; तिला त्यांनी सर्वोदय म्हटलं. शेती व ग्रामोद्योगांवर, समता व प्रेमावर आधारित ग्राम स्वराज्य ही समाजरचना त्यांना हवी होती; पण त्याहूनही पुढे जाऊन या बाह्य प्रश्नांची व संघर्षाची उत्तरं गांधी माणसाच्या आत शोधतात. गांधींच्या जीवनदृष्टीत जे समाजासाठी, तेच माझ्यासाठी व तीच मूल्ये विश्वासाठी. गांधींची क्रांती स्वतःपासून सुरू होते. 'Be the change yourself that you wish to see in the world.' प्रश्न सामाजिक असो की वैश्विक त्याचं मूळ व्यक्तींच्या मनात व जीवनात असतं. त्यामुळे उत्तरही तिथं शोधायला हवं असं गांधी मानतात.

जगात लोभ आहे, म्हणून संग्रह करण्याची वृत्ती, भ्रष्टाचार, शोषण व आर्थिक असमानता निर्माण होते. गांधींचे व्यक्तिगत पातळीवर उत्तर आहे-अपरिग्रह (संग्रह न करणे), शरीरश्रमातून स्वतः उत्पादन करणे (दुसऱ्यांचे शोषण न करणे) व ट्रस्टीशिप-स्वतःकडे आलेल्या संपत्तीचा व सत्तेचा विश्वस्तवृत्तीने समाजाच्या हितासाठी वापर करणे. नेहरू, पटेल, राजाजीसारखे बॅरिस्टर व भावे, पटवर्धन, धर्माधिकारीसारखे ब्राह्मण सर्वच गांधींसोबत स्वयंपाकघरात भाजी कापत व संडास सफाई करत. गांधींनी स्त्री-पुरुष समानता, ब्राह्मण-भंगी समानता प्रत्यक्षात जगण्यात आणून दाखवली. त्यावेळी अशक्य वाटलेली ट्रस्टीशिपची कल्पना आज बिल गेट्स, वॉरन बफेपासून टाटा व अझीम प्रेमजीपर्यंत शेकडो अब्जाधीश आचरायला लागले आहेत.



जगात अतिरेकी उपभोग आहे. श्रम न करता केवळ नेत्रसुख, जिव्हासुख, लैंगिक सुख, कर्णसुख मिळावं अशी धडपड आहे; पण अशी सुखं सुखासुखी मिळत नसतात. त्यांच्यासोबत टीव्ही, मोबाईल, इंटरनेट, व्यसने येतात. दारू-तंबाखू, पोर्नोग्राफी येतात, लठ्ठपणा व हृदयरोग येतात, सोबतच प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगही येते. अख्ख्या पृथ्वीलाच ताप चढतो.

यावर गांधींचे उपाय संयम, दुसऱ्यांच्या गरजांचा विचार, शरीरश्रम स्वावलंबन आणि यंत्रमर्यादा हे आहेत. सोबतच गांधींनी एक विलक्षण व्रत सांगितले - अस्वाद. अन्न हे जगण्यासाठी व कर्तव्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक म्हणून चवीप्रती निर्लिप्त राहून ग्रहण करायचे. एका व्रतात गांधी लठ्ठपणा, मधुमेह, कोकाकोला व हल्दीराम हे सर्व रोग टाळतात.

शरीरश्रम केल्याशिवाय संपत्तीचा व उपभोगाचा अधिकारच प्राप्त होत नाही हे गांधींचं व्रत लागू केल्यास किती प्रश्न सुटतील! मुख्य म्हणजे अंबानी-अदानीऐवजी शेतकरी व मजूर आपला बंधू वाटायला लागेल.

धार्मिक द्वेषाला उत्तर म्हणून गांधींनी धर्म नाकारला नाही. उलट 'मी खरा हिंदू आहे' असं म्हणाले. हिंदू धर्मातली खरी मूल्ये कोणती हे त्यांनी जगून दाखवलं. सत्य, अहिंसा व सर्वत्र ईश्वराचे दर्शन हा हिंदू धर्माचा खरा अर्थ दोन हजार वर्षांच्या पुराणकथा व सनातनी विकृतींना ओलांडून पुनरुज्जीवित केला तो गांधी व विवेकानंदांनी. शिकॅगोच्या धर्मपरिषदेत सर्व धर्मीयांना 'बंधू-भगिनी' संबोधणारे विवेकानंद व ईश्वर आणि अल्लाला एकत्र बघणारे गांधी हे खरे हिंदू, खरे अद्वैत वेदांती, म्हणून खरे वैश्विक. आजच्या मंदिर-मस्जिद वादाला, क्रूसेड्स-जिहादला, क्लॅश ऑफ सिव्हिलायसेशन्सला गांधींचे उत्तर सर्वधर्मसमभाव व अहिंसा आहे.

एकविसाव्या शतकाचे हे प्रश्न १९०८ मध्ये बघू शकणारा व त्यांची उत्तरे आपल्या हातात देणारा - स्वराज्य देणारा - गांधी समजला, पटला व आपण अनुसरला तर तो याही शतकाचा महानायक सिद्ध होईल; पण त्यापेक्षाही महत्त्वाचं-बाविसावं शतक बघायला मानवसमाज उरेल.

३० जानेवारी १९४८ ला गांधी संपला नाही. संपूच शकत नाही. आपल्या पहिल्या आश्रमाचं नाव त्यांनी उगाच नव्हतं निवडलं - फिनिक्स!

• • •


अनुक्रमणिका

महात्मा गांधी

१५०वे जन्मवर्ष

गांधीजींची धर्मकल्पना

किशोर बेडकीहाळ



महात्मा गांधी याची धर्मकल्पना आणि त्यांची सर्वधर्मसमभावाची कल्पना हा विषय रुक्ष वाटण्याची शक्यता आहे. पण आजच्या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेता त्याची मी मुद्दाम निवड केलेली आहे; कारण आज आजूबाजूचं सगळं जे धर्मविषयक वातावरण आहे, ज्या प्रकारची माणसांची धार्मिकता आहे हे सगळं लक्षात घेता, माणसं या धार्मिकतेने आंतरिकदृष्ट्या समाधानी आहेत का? असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. लोकमान्य टिळकांच्या काळात लोकजागृतीच्या नावाखाली धर्म घरातून रस्त्यावर आला. तेव्हापासून तो रस्त्यावर आहे. आज त्या धर्माचा वावर सगळ्यात जास्त रस्त्यावर आणि घरातला वावर तुलनेने कमी व औपचारिक झाला आहे. हा धर्म पुन्हा रस्त्यावरून घरात जाणं शक्य होत का नाही यासाठी अनेकांनी अनेक मार्गांनी प्रयत्न केलेले आपल्याला दिसतात. नेहरूंना असं वाटत होतं की, देशाचं औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास वेगानं झाला तर कदाचित हे प्रस्थ थोडं कमी होईल आणि लोक मर्यादित अर्थानं, चांगल्या अर्थानं धर्मजीवन जगू शकतील. ते काही खरं ठरलेलं नाही हे आपल्याला माहीत आहे. त्यामुळे हा धर्म प्रासंगिक रस्त्यावर असता आणि साजरा झाला असता तर थोडीशी गोष्ट वेगळी होती. त्याचं आजचं जे स्वरूप आहे आणि विशेषतः नव्वदोत्तर काळात जागतिकीकरणाच्या कालखंडामध्ये बाजारपेठेच्या प्रभावाखाली आलेलं जे स्वरूप आहे ते जास्त चिंताजनक आहे. एका बाजूला तो उत्सवी बनत चाललेला आहे, त्याचे इव्हेन्टस् होतात, फेस्टिवलस् होतात. या अर्थानं धर्मकल्पनेतील गांभीर्य संपलेलं आहे. डीजेच्या आवाजात आणि प्रतीकांच्या भाऊगर्दीत तो हरवून गेला आहे.

दुसऱ्या बाजूनं धर्म ही एक मानवी जीवनातील आणि मानवी संस्कृतीतील विधायक शक्ती आहे असं जे धर्माविषयी मानलं जात होतं त्याच्या उलटा अनुभव जगभर येताना दिसतोय. हा अनुभव भारतातच येतो असं माझं म्हणणं नाही, इतर देशातही तो येत आहे. समाजाचे विभाजन,

किशोर बेडकिहाळ
'मैत्री', १२० ब, २/१,
यादोगोपाळ पेठ,
ढोल्या गणपतीसमोर,
सातार- ४१५ ००२
मो.: ९४२३०१२८८७
संपर्क :
kishorbedkihal@gmail.com

ध्रुवीकरण त्याचबरोबर ध्रुवीकरणाचा पुढचा टप्पा म्हणून काही ठिकाणी दंगेधोपे होणं या सगळ्यांमधून धर्म हा माणसाच्या आंतरिक गरजेऐवजी कुठंतरी त्याला बाह्यतः व्यक्त होण्यासाठी लागणाऱ्या 'अस्मितेचं हत्यार' या स्वरूपात पाहिलं जात आहे. त्यामुळे एका अर्थानं धर्माला अस्मितेच्या हत्याराचं स्वरूप प्राप्त होताना आज आपल्याला दिसतं. सगळे प्रचलित धर्म अस्तित्वात असूनही लोकांना आपल्या धर्मजीवनाचा 'आंतरिक' आनंदही घेता येत नाही. याचं सगळं जे असमाधान आहे ते दुसऱ्या बाजूनं अनेक नव्या संप्रदायांना जन्म देणारं आहे. म्हणजे सगळे प्रस्थापित धर्म आज असताना अनेक नवनवे धार्मिक संप्रदाय निर्माण झालेले आपल्याला दिसतात. हे संप्रदाय लोकांच्या कुठल्या ना कुठल्या मानसिक गरजेला पूर्ण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्या पूर्ण होतात की नाही हा भाग वेगळा; पण असे एक चित्र आपल्याला दिसते. असे अनेक धर्मसंप्रदाय आपल्याला सांगता येतील. अनेक ठिकाणी धर्माचं संस्थीकरण व रचना हे धर्माचार्यांच्या हातामध्ये गेलेलं आहे. तिथून धर्मकार्याचा अत्यंत विपरीत व विकृत अर्थसुद्धा आविष्कृत होताना आज आपण पाहात आहोत. एखादा धर्माचार्यच ज्यावेळी व्यासपीठावरून अमक्याचे हातपाय तुटले तरी चालतील अशा प्रकारची भाषा करतो, त्यावेळी कोणत्या प्रकारच्या धर्मभावनेकडे आपण चाललेले आहोत हेही आपल्याला पाहायला मिळतं आणि एका अर्थानं या सगळ्या प्रचलित धर्मांचा आज चालू असणारा जो व्यवहार आहे, त्याचं ते रस्त्यावरचं अस्मिताजन्य अवतरणं आहे.

मग ते नमाजाच्या स्वरूपात असेल, महाआरतीच्या स्वरूपात असेल वा अन्य कोणत्या स्वरूपात असेल आणि त्यामध्ये पुन्हा पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याच्यामध्ये धर्मभावनेपेक्षा वाद्यांना महत्त्व जास्त आहे. त्यानं अनेक भागांमध्ये दंगली किंवा गडबडी झाल्याचं आपल्या लक्षात येतं.

माणसाला सनातन काळापासून ज्या प्रकारच्या अध्यात्माची ओढ आहे, ज्या प्रकारच्या पूर्णत्वाची ओढ आहे त्या प्रकारच्या अध्यात्मापासून आजचे सर्व धर्म व प्रत्यक्षात त्यांचा व्यवहार शेकडो कोसो दूर आहेत असं आपल्याला दिसतं. म्हणून मग कोणत्याही सुजाण नागरिकाला, धर्मपालन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला आणि स्वतः धर्मपालन करत नसले तरीसुद्धा इतरांच्या बरोबर या समाजात राहात असताना कोणत्या प्रकारचं धर्मपालन व्हावं याची अपेक्षा करणाऱ्या सुजाण नागरिकांना यातून कोणता पर्याय पुढे आहे याच्याविषयी आज पूर्ण गोंधळ झालेला आहे. तत्त्वज्ञानाच्या पातळीवर, विचारप्रणालीच्या पातळीवर तीन-चार प्रकारचे उपाय गेल्या ६०-७० वर्षांमध्ये आपण योजण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही जण असं म्हणले की, धर्म हा व्यक्तीपुरता मर्यादित करा, धर्मांचा सामाजिक जीवनाशी संबंध असता कामा नये, समाजजीवनात त्याचं फार आविष्करण होता कामा नये, धर्म ही व्यक्तीची आंतरिक गरज आहे आणि ती त्याच्यापुरतीच मर्यादित राहावी अशा प्रकारचा एक प्रवाह जगाच्या इतिहासामध्ये विशेषतः प्रबोधन कालखंडानंतर गेले चार-पाचशे वर्षे आहे आणि त्याच्यावर आधारलेल्या राज्यसंस्थाही उभ्या असलेल्या दिसतात. या प्रवाहाला धर्म व्यक्तीपुरता मर्यादित करण्याला यश आलेले नाही. धर्म आणि राज्यसंस्थेचं नातं तोडण्याचाही प्रयोग अनेक देशांमध्ये झाला. आपल्याकडे राज्यघटना आपण त्या प्रकारची स्वीकारली. पण शेवटी जे राज्यकर्ते आपल्याला लाभले त्यांनी आपापल्या हितसंबंधानुसार धर्मनिरपेक्षतेचा किंवा धर्माचा अर्थ लावला. कोणाला शहाबानो प्रकरणात हस्तक्षेप करण्यासाठी त्याचा उपयोग झाला, कोणाला शबरीमला प्रकरणासंदर्भात त्याचा उपयोग झाला. त्यामुळे इतक्या चांगल्या राज्यघटनेची कोणाच्या हातून अंमलबजावणी होणार त्याच्यावर धर्मनिरपेक्षता अवलंबून राहिली. लोकांमधल्या धर्मभावनांना विधायक अंगाने, सर्जनशील अंगानं वळण दिलं गेलं नाही. त्यामुळे आहे त्या धर्मभावनांचा फायदा घेण्याची प्रवृत्ती बळावली आणि म्हणून धर्म भावना 'अस्मितेची हत्यार' होऊन बसली. तिसरा एक प्रयोग जगामध्ये धर्माला मर्यादित करण्याचा झाला आहे तो साम्यवादी राजवटीमध्ये झालेला आहे. सोविएत रशियासारख्या देशामध्ये जवळपास ७० वर्षे एकपक्षीय हुकूमशाहीची राजवट असताना आणि धर्मसंस्था, धर्मप्रसार, धार्मिक साहित्य याच्यावर प्रचंड बंधनं असतानासुद्धा, ज्यावेळी त्या हुकूमशाहीचं सावट दूर झालं त्यावेळी सोविएत रशियाचं विघटन झालंच, एका राष्ट्राची एका रात्रीत पंधरा शकलं झाली; पण लक्षात असं आलं की, धर्मभावना जिथल्या तिथेच होती. ती पुन्हा उफाळून आली. पुन्हा चर्चेस्, मशिदी यांच्याकडे लोकांचा ओढा वाढला. त्यामुळे

अनुक्रमणिका

धर्मभावनेचं उच्चाटन करणं ही गोष्ट जगाच्या इतिहासात आजवर शक्य झालेली नाही, ही गोष्टच अधोरेखित झाली.

आता असं जर असेल की धर्म मर्यादितही होत नाही, घरापुरताही राहात नाही, सार्वजनिक जीवनातून हद्दपारही होत नाही आणि मानवी जीवनातून नाहीसाही होत नाही तर कोणता पर्याय उरतो? तो उरलेला पर्याय आहे तो धर्मभावना, धर्मदृष्टी आणि धर्मकल्पना यांना अत्यंत प्रगल्भपणे नवे आयाम देण्याचा. हा प्रश्न जेव्हा गांधींसमोर उपस्थित झाला, तेव्हा गांधी आपल्या प्रतिभेने, ताकदीने व चिंतनाने त्याला भिडले. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचं एक वैशिष्ट्य होतं जेव्हा त्यांना प्रश्न पडे त्यावेळी त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी गांधींनी कधीही दुसऱ्याकडे पाहिलं नाही. प्रश्न मला पडला, मला जे करता येणार आहे आणि जे करावंसं वाटतं ते सरळपणे उठून जाहीरपणे करणारे या गांधींच्या वृत्तीमुळे धर्मभावनेसारख्या अत्यंत नाजूक असणाऱ्या गोष्टींना गांधींनी कशा पद्धतीनं एका प्रगल्भतेकडे नेण्याचा प्रयत्न केला, वळण दिलं हे पाहण्यासारखं आहे. गांधींच्या धर्मकल्पनेचा जो प्रवास आहे ती त्यांची जीवनाची साधना आहे. गांधी स्वतःकडे कायम साधक म्हणून पाहतात, जीवनाचा उपासक म्हणून पाहतात आणि सत्याचा शोधक म्हणून पाहतात. त्यामुळे माझ्या जीवनातल्या प्रत्येक गोष्टीला धर्मभावनेतून निर्माण होणारं नैतिक जीवनाचं अधिष्ठान असलं पाहिजे अशा प्रकारची भूमिका गांधींच्या सर्व व्यवहारामध्ये, सर्व कार्यक्रमांमध्ये आपल्याला पाहायला मिळते.

गांधींच्या धर्मकल्पनेकडे वळण्यापूर्वी गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची एक चौकट मला आपल्यापुढे ठेवायची आहे जिचा या विवेचनाशी संबंध आहे. माझ्या स्वतःच्या मतानुसार, विसाव्या शतकात जगातला सर्वांत निर्भय आणि सर्वांत बलवान आणि सर्वांत धैर्यशाली माणूस म्हणून कुणाचा उल्लेख करायचा असेल तर तो गांधींचा करावा लागेल. अत्यंत कृश शरीरयष्टी, कोणत्याही प्रकारच्या शस्त्राचा आधार नाही, शास्त्राचा आधार आहे किंवा नाही माहीत नाही, कोणी पाठिंबा देईल किंवा नाही याची फिकीर नाही, स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला, नैतिकतेला पटेल तेच करणं याचं विलक्षण धैर्य गांधींनी विसाव्या शतकात प्रकट केलेलं आपल्याला दिसतं. दुसरं गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचं एक अत्यंत महत्त्वाचं पण आपल्याला न पेलणारं वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे गांधींचं अत्यंत कठोर असणारं मूल्याचरण. जी जी मूल्यं गांधींनी मानली त्यांचं स्वतःच्या जीवनामध्ये मी अत्यंत कठोरपणे आचरण करेन ही गांधींची प्रतिज्ञा होती आणि संपूर्ण व्यवहार तसा होता. त्यामुळे त्यांना पत्नीला दुखवावं लागलं, बहिणीला दुखवावं लागलं. तरीही मूल्यांबाबत व्यक्तिगत जीवनात त्यांनी तडजोड केली नाही; पण सार्वजनिक जीवनात लोक जर माझ्यामागे यायचे असतील तर त्यांच्याकडून मी माझ्यासारख्याच तंतोतंत मूल्याचरणाची अपेक्षा करणार नाही. तसं ते करतील तर चांगलंच आहे; पण जेवढं पुढे येतील, एक पाऊल जरी माझ्याबरोबर चालले तरी मला हवे आहेत ही त्यांची भूमिका होती. म्हणजे एका बाजूला व्यक्तिगत जीवनात मूल्यांचा कठोरपणा आणि सार्वजनिक जीवनात थोड्या तडजोडीची तयारी. आजच्या संदर्भात आपल्या सगळ्यांच्या जगण्याकडे जर पाहिलं तर याच्याबरोबर उलट परिस्थिती आपल्या लक्षात येईल. व्यक्तिगत जीवनात पुष्कळ तडजोडी, मूल्यांपासून पुष्कळ बाजूला जाण्याची भूमिका, आपद्धर्म म्हणून बऱ्याच गोष्टी व समर्थन करण्याची भूमिका आणि सार्वजनिक जीवनात आत्यंतिक शुद्ध भूमिकेचा आग्रह हे असं आजचं आपलं मानस आहे. बरोबर आजच्या मानसाच्या विरोधात गांधींचं मानस आहे.

तिसरं गांधींचं मला भावलेलं वैशिष्ट्य या सगळ्या संदर्भात असं आहे, मी जे काही करणार आहे ते जाहीरपणे सांगून आणि त्याचे परिणाम विनातक्रार भोगण्याची तयारी ठेवून करणार आहे. मी सत्याग्रह केला, माझ्यावर खटला झाला तर मी जामीन देणार नाही. मी कायद्याने होईल ती शिक्षा द्या हाच आग्रह धरणार व शिक्षा भोगणार. (आजच्यासारखा अटकपूर्व जामिनाचा आग्रह करणार नाही.) याचा एक परिणाम लक्षात घेण्यासारखा आहे. टिळकांकडून गांधींकडे राजकारणाची जेव्हा सूत्रं गेली तेव्हा नेमका बदल काय झाला? असा जर प्रश्न केला, तर टिळकांच्या हातामध्ये राजकारणाची सूत्रं होती तोपर्यंत टिळकांचं सगळं लक्ष सरकार काय करतं याकडे लागलेलं असायचं आणि सरकार काय करते याचा जो काही सुगावा लागेल त्याच्यावरून त्यांचं राजकारण, पत्रकारिता चालत असे. गांधींच्या हातात राजकारणाची सूत्रं गेल्यानंतर पहिला जो बदल भारताच्या राजकारणात झाला असेल तर सरकारचं लक्ष गांधी काय

अनुक्रमणिका

करतात इकडे वळलं आणि संपूर्ण स्वातंत्र्य चळवळीच्या पुढच्या टप्प्यांमध्ये गांधींची भूमिका काय, गांधी काय करताहेत, गांधींच्या मनात काय आहे याकडे लागलं. ब्रिटिश कागदपत्रांमध्ये त्या काळातल्या काही पोलीस सुपरिइन्टेन्डन्टचे रिपोर्टस् आहेत त्यातल्या एका रिपोर्टमध्ये त्या सुपरिइन्टेन्डन्टने असं लिहिलं होतं की, गांधींशी कसं डील करावं हेच आम्हाला कळत नाही. का तर हे आमचे मित्र म्हणवतात पण आम्हाला सपोर्ट करत नाहीत आणि शत्रू म्हणावं तर शत्रूसारखे वागत नाहीत. त्यामुळे गांधी ब्रिटिशांचे शत्रू आहेत की मित्र आहेत इतका त्यांना प्रश्न पडला; कारण समाजाकडे शत्रुभावशून्य दृष्टीने गांधीजी पाहात होते. शत्रुभावाची भावना गांधींच्या मनामध्ये कोणाविषयीही नाही, अगदी त्यांच्या हत्येचा प्रयत्न करणाऱ्यालाही त्यांनी शेवटपर्यंत हे सांगितलं की माझ्याजवळ येऊन आठ दिवस राहा, आपण बोलू. तुझं सगळं म्हणणं मी ऐकून घेतो इथपर्यंत त्यांनी तयारी ठेवलेली होती संवादाची.

आधुनिक मूल्यांचा सन्मानही त्यांच्या विचारांमध्ये आपल्याला दिसतो. गांधींवर नेहमी दोन आक्षेप घेतले जातात. एक आक्षेप म्हणजे गांधी आधुनिक नव्हते या प्रकारचा आधुनिकांचा आक्षेप एका बाजूला आहे. त्या आक्षेपात अर्थातच तथ्य नाही; कारण आधुनिक मूल्यं म्हणून जी आहेत त्या मूल्यांना गांधींनी कुठे विरोध केलेला नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा असेल, आत्मसन्मानाचा असेल, बंधुभावाचा असेल याला कुठेच विरोध केलेला नाही त्यांनी. पण त्यांची आधुनिकता व्यक्त करण्याची पद्धत आहे ती कदाचित आपल्याला प्राचीन/पारंपरिक वाटेल अशा प्रकारची आहे. दुसरा आक्षेप जो गांधींबद्दल घेतला जातो तो त्यांच्या भाषेचा आणि धर्माच्या भाषेचा वापर करण्याचा आहे. तिथे गांधींच्या बाजूने सांगण्यासारखी गोष्ट ही आहे की या देशाचे जनमानस गांधींना नीट कळलेले असल्यामुळे, या देशाचं धार्मिक मानस कशा प्रकारे घडलेलं आहे हे त्यांना माहीत असल्यामुळे ती परिभाषा कोणत्या मर्यादेपर्यंत वापरायची आणि कुठे वापरायची नाही याचं भान त्यांनी राखलेलं आढळेल. त्यामुळे त्यांचं आधुनिक असणं हे आधुनिक पद्धतीनं जरी आपल्याला सिद्ध करता आलं नाही तरीही त्यांच्या व्यवहारामधून ते आधुनिक मूल्यांचा करत असलेला पुरस्कार आपल्याला सिद्ध करता येतो. तिसरी बाब म्हणजे गांधी आजच्या आधुनिक दृष्टीतून शास्त्रीय पद्धतीनं विचार करणारे, तळटिपा व संदर्भग्रंथांची यादी देऊन वैचारिक लेख लिहिणारे या प्रकारचे लेखक वा विचारवंत नाहीत. त्यांनी लिहिलं पुष्कळ, वाचलेलं त्याहीपेक्षा जास्त आहे; पण त्यांचं सगळं लेखन एका बाजूला, त्यांची स्वतःची अभिव्यक्ती आणि दुसऱ्या बाजूला त्यांनी जी पत्रकारिता केली इंडियन ओपिनियन, हरिजन असेल, यंग इंडिया असेल, आफ्रिकेतील पत्रव्यवहार असेल, त्यातलं त्यांचं लेखन वाचलं तर हे लक्षात येते की, असंख्य वाचक त्यांना पत्र लिहायचे आणि त्यांना ते उत्तरं द्यायचे ते सगळं त्यांच्या वर्तमानपत्रात छापून येत असे म्हणून त्यांनी त्याला न्यूज लेटर्सच्या ऐवजी व्ह्यूज लेटर्स असं स्वतःच म्हटलेलं होतं. तो जो संवाद त्यांचा व्हायचा त्यामधून त्यांचं सगळं लेखन, विचारप्रक्रिया आपल्याला समजावून घेता येते. गांधींच्या व्यक्तित्वाची ही चौकट मी यासाठी सांगितली की, पुढील विवेचनात जागोजागी तिचा संदर्भ आपल्याला दिसेल.

गांधी धर्माकडे कसं पाहतात असा एक साधा प्रश्न विचारात घेऊ. आपल्याला इतिहासात काय दिसतं? ज्या ज्या वेळी प्रचलित धर्म वा संप्रदाय वा रीतिरिवाज, लोकधर्म हे लोकांच्या अपेक्षांना, आकांक्षांना उतरत नाही व त्यांचा प्रगतीला काच होऊ लागतो त्या-त्यावेळी इतिहासामध्ये धर्माच्या संदर्भामध्येसुद्धा बंड झाली आहेत. येशू ख्रिस्त आहेत, गौतम बुद्ध असेल, महावीर आहेत, बसवेश्वर, आंबेडकर आहेत. त्याचबरोबर प्रचलित धर्मातील व्यवहार मान्य नाही म्हणून नवीन विचार करायचा म्हणून काही नवे संप्रदायही १९व्या शतकामध्ये निर्माण झालेले आहेत - सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज, दयानंदांचा आर्यसमाज, हे प्रयत्न इतिहासात झालेले आहेत. म्हणजे मला या धर्मश्रद्धा मान्य नाहीत. यांनी समाजजीवन पुढे जात नाही असं वाटणाऱ्यांनी बंड करण्याचा एक पर्याय घेऊन नवीन धर्माची स्थापना केलेली दिसते. ते लोन अगदी आताच्या शिवधर्मापर्यंत आपल्याला दिसते. धर्माची स्थापना झाली हा वादाचा मुद्दा नाही. या धर्मांची स्थापना झाल्यावर प्रत्यक्षात काय घडलं तर हे सर्व नवे धर्म एकेका सामाजिक गटाच्या रूपाने आपापल्या चाकोरीमध्ये रुळले आणि कालांतराने त्यांची एक निष्ठा व अस्मिता तयार झाली. बुद्ध धर्म, जैन, शीख, लिंगायत यांच्या नव्या चाकोऱ्या निर्माण झाल्या आणि

बंडखोरीच्या पाठीमागे जे उद्दिष्ट होतं व्यापक मानव्याकडे वा मानुषतेकडे जाण्याचं ते साध्य न होता प्रत्यक्षामध्ये या समुदायांचे आंतरसंबंध कसे राहिले? तर कधी सहकार्याचे कधी संघर्षाचे. त्यातून एकजिनसी समाज निर्माण झाला का? म्हणजे जगातल्या इतिहासामध्ये हा एक मोठा प्रयत्न होता की, नव्या धर्मांच्या स्थापनेमधून जगातल्या धर्मभावनांना एक नवीन वळण देण्याचा प्रयत्न होता. येथेही पाहण्यासारखी एक गोष्ट म्हणजे जे धर्म नव्याने निर्माण झाले, उदा. बौद्ध, जैन, लिंगायत, शीख त्यांचे धर्म म्हणून अस्तित्व आजही कायम आहे; कारण ते विशिष्ट सामाजिक गटांच्या पायावर उभे आहेत. पण जे नवे संप्रदाय झाले, उदा. प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज ते आज इतिहासाचे भाग व खरे तर अवशेष झाले आहेत. धर्म कल्पनांच्या इतिहासातील नोंदी एवढेच त्यांचे स्वरूप उरले आहे. म्हणून संप्रदाय निर्माण होणं, नवीन धर्म निर्माण होणं ही प्रक्रिया काही काळ चाललेली दिसते. गांधींचं वैशिष्ट्य असं की यातला कुठलाही मार्ग त्यांनी अवलंबलेला नाही. त्यांनी ना नवीन धर्माची स्थापना केली ना नवीन संप्रदाय निर्माण केला ना नवीन धर्मपंथाला जन्म दिला.

गांधींनी धर्मभावनेच्या दृष्टीने काय केलं ? तर त्यांनी - १) जन्माने लाभलेल्या धर्माचा मनःपूर्वक स्वीकार केला. मी माझ्या धर्माच्या भूमीमध्ये जी धर्मभूमी मला प्राप्त झालेली आहे हिंदू, त्या भूमीमध्ये घट्टपणे उभा राहीन.

२) मी स्वतःला हिंदू म्हणवतो आणि हिंदू म्हणून या धर्माचा आदर करतो त्याच वेळेला हा धर्म ज्या गुणदोषांनी युक्त आहे त्या गुणदोषांसकट मी त्या धर्माचा स्वीकार करतो.

३) हिंदू असल्यामुळे, मी हिंदूधर्मीय असल्यामुळे हिंदू धर्माचा अर्थ लावण्याचा मला मूलभूत अधिकार आहे. हा अधिकार असल्यामुळे धर्माचा अर्थ माझा मी लावू शकतो.

४) माझा धर्म मला वैश्विक पातळीवर जाण्याला मुभाही देतो म्हणून धर्माचा अर्थ लावताना कोणत्याही संस्थात्मक सत्तेचा आधार घेण्याची मला गरज नाही. ही गोष्ट किती मूलगामी आहे हे आपल्या लक्षात येत नाही. जगभरच्या धर्मांमध्ये विशेषतः ज्यांना संस्थापक आहेत अशा धर्मांमध्ये संस्थात्मक धर्माचं स्वरूप (इन्स्टिट्युशनल रिलिजनचं) आपल्याला दिसतं. संस्थात्मक धर्म निर्माण झालेले आहे. त्यांच्या संघटना आहेत. त्यांच्यात श्रेणीबद्धता आहे. सत्तासंबंधाची श्रेणी आहे आणि यानुसार ते धर्म चालतात. त्यामुळे तिथं असणारं व्यक्तीचं जे स्वातंत्र्य आहे ते गुदमरण्याची शक्यता जास्त असते हे आपल्याला चर्चेसूच्या रूपानं दिसतं, इस्लामच्या काही व्यवहारामध्ये दिसतं आणि जातिसंस्थेच्या रूपानं हिंदू धर्मामध्येही दिसतं. गांधी असं म्हणतात की, मला ही संस्थात्मकता (इन्स्टिट्युशनॅलिटी) मान्य नाही. (गांधींचे एक कट्टर अनुयायी जे.सी. कुमारप्पा ज्यांना गांधीवादी अर्थशास्त्राचे जनक मानलं जातं. त्यांनी त्याचं मॉडेल निर्माण केलं. ते याच भूमिकेवर शेवटपर्यंत होते. ते तर जिझस असाच उल्लेख करायचे.)

५) गांधी असं म्हणाले, येशू हा जर ईश्वराचा पुत्र असेल तर मग आपण सारेच ईश्वराचे पुत्र आहोत. मीही ईश्वराचा पुत्र आहे आणि येशू जर ईश्वराचा पुत्र नसेल तर येशू आणि मी याच्यात काहीच फरक पडत नाही. म्हणजे या संस्थापकांना चिकटलेले जे दैवत्व आहे तेही त्यांनी तिथे नाकारलेलं आहे. आणि म्हणून अस्पृश्यांना 'हरिजन' असा शब्द वापरायचा की नाही असा वादविवाद त्यांच्या वर्तमानपत्रात झाला तेव्हा त्यांच्या दृष्टीने तो चांगला शब्द होता; कारण आपण सगळे देवाचेच पुत्र आहोत. तेही देवाचेच पुत्र आहेत तर आपण सारेच ईश्वराचे पुत्र आहोत ही भूमिका घेऊन एकट्या येशूला अपवाद करायला गांधी तयार नाहीत.

६) धर्माचा अर्थ लावणं म्हणजे काय? सर्वच धर्म खरे आहेत म्हणजे एखाद्या स्पर्शामध्ये सर्वस्पर्श समानत्व जसं आहे तसं सर्व धर्म समानत्वही आहे. सगळे धर्म खरे आहेत ते ईश्वरी इच्छेतून निर्माण झालेले आहेत. त्यामुळे माझा धर्म ईश्वराने निर्माण केलेला आहे म्हणून चांगला असेल. इतरांचेही धर्म ईश्वराने निर्माण केलेले आहेत म्हणून तेही चांगले असणार. म्हणजे मग माझ्या धर्मात जे आहे ते तसंच्या तसं त्या धर्मात नसलं तरी दुसरं काहीतरी त्या धर्मामध्ये असणार आणि मग ते ईश्वराचंच असल्यामुळे त्या धर्मातील चांगली गोष्ट माझ्या धर्मात स्वीकारणं किंवा माझ्या धर्मातील चांगली गोष्ट त्या धर्मामध्ये स्वीकारली जाणं हा व्यवहार करायची मोकळीक आपल्याला आपोआपच मिळते. म्हणजे मग नुसती चिकित्सा होत नाही तर रीतिरिवाज आणि संस्कारमूल्य यांच्या आदानप्रदानाची शक्यता तिथे खुल्या


अनुक्रमणिका

होतात हे त्यांच्या कल्पनेचं आणखी एक वैशिष्ट्य.

कोणत्याही धर्माला मानवी जीवनातील तीन मूलभूत गोष्टींचा उलगडा करून दाखवावा लागतो किंवा त्यांचा अनुबंध बांधून दाखवावा लागतो. एक, व्यक्तीची धारणा, दुसरा प्रश्न आहे धर्मशास्त्रामधला महत्त्वाचा चर्चेचा तो लोकसंग्रह आणि धर्मशास्त्रामधला मोक्षाची चर्चा करताना सगळ्या पारंपरिक तत्त्वज्ञानामध्ये आलेला सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न अंतःकरण शुद्धी वा चित्तशुद्धीचा प्रश्न. आपल्याला असं दिसेल भारताच्या इतिहासामध्ये एका बाजूला चित्ताची शुद्धी सांगणारे धर्म सामाजिक संघर्ष नाकारतात ते येशू असेल, बुद्ध असेल, महावीर असतील आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक संघर्ष करणारे जे धर्म आहेत ते चित्ताची शुद्धता नाकारत नाहीत; पण संघर्षामुळे चित्त थोडंसं अशुद्ध झालं तर ते सहन करायची त्यांची तयारी आहे. आणि म्हणून आपल्याकडे भगवद्‌गीतेचे अर्थ लावतानासुद्धा दोन प्रधान विभागण्या झालेल्या दिसतात. एका बाजूला संन्यासयोग आहे. दुसऱ्या बाजूला टिळकांनी सांगितलेला कर्मयोग आहे आणि एवढ्या चौकटीमध्ये गांधी पूर्वकाळामध्ये गीतेची चर्चा होताना दिसते. लोकमान्य टिळकांनी गीतेचा अन्वयार्थ लावताना शंकराचार्यांनी गीता संन्यासमार्गी आहे, हे म्हणणे हे नाकारले. गीता कशाचा संदेश देते तर संन्यासाकडे चला. कारण शंकराचार्यांची मूळ भूमिका जग मिथ्या असण्याची, मायावादाची आहे. गीतारहस्यात ते असं म्हणाले की, संन्यासाची प्रेरणा ही खरी प्रेरणा नाही आहे. कर्मयोगाची प्रेरणा आहे. त्यामुळे लोकसंग्रहाची प्रेरणा गीतेमधून मिळते. स्वातंत्र्यलढ्याच्या अनुषंगाने टिळकांनी गीतेचा हा एक अर्थ लावायचा प्रयत्न केला. पण त्याच्यातून चित्ताची शुद्धता अगदी सगळीच्या सगळी नाही साध्य झाली. काही हीन राहिले तर ते स्वीकारायची माझी तयारी आहे इथपर्यंत टिळकांचा विचार पुढे आलेला दिसतो. साधनानाम् अनेकता ही टिळकांची साध्य-साधना संदर्भातली भूमिका होतीच. गांधींचं म्हणणं असं होतं की, सामाजिक संघर्षाचा मार्ग स्वीकारला म्हणून चित्ताची शुद्धता पूर्ण होणार नाही किंवा हीन राहील ही सूट कशासाठी घ्यायची? टिळकांपुढे पेच होता सामाजिक संघर्षाचा मार्ग योग्य कोणता यामध्ये टिळकांची मनःस्थिती द्विधा दिसते. अवंतिकाबाई गोखल्यांनी पहिलं गांधींचं चरित्र जे मराठीत लिहिलं आहे त्याला टिळकांची प्रस्तावना आहे आणि त्या प्रस्तावनेमध्ये गांधींची पुष्कळ स्तुती टिळकांनी केली आहे. टिळक म्हणतात, पुढच्या काळात हाच मार्ग कदाचित जास्त प्रभावी ठरण्याची शक्यता आहे सत्याग्रहाचा. पण तरीही टिळकांच्या काळामध्ये त्यांना एका बाजूला साधनाम् अनेकता सिद्धान्त मान्य होता, अनेक साधनांचा वापर संघर्षात करता येतो, पण साधनशुचितेच्या अंगानेच संघर्ष करावा की नाही या पेचात टिळक दिसतात.

गांधींपुढे हा पेच आला तेव्हा गांधींनी अशी भूमिका घेतली की सामाजिक संघर्षही करता येतो आणि चित्ताची शुद्धीही साधता येते. चित्तशुद्धी अधिकाधिक साधत असताना सामाजिक संघर्ष शुद्ध साधनानीही करता येतो. त्याचा एक नवा मार्ग गांधींनी हुडकला आणि तो म्हणजे अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग. मी करत असलेला संघर्ष जर सत्याग्रही मार्गाने होणार असेल तर त्यातून दोष निर्माणच होणार नाही; कारण सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान द्वेषावर उभारलेले नसल्यामुळे, अहिंसात्मक परिवर्तनासाठी मी जर सत्याग्रहाचा वापर केला तर सामाजिक संघर्षामध्ये प्रतिस्पर्ध्याच्या हृदयपरिवर्तनाची शक्यता राहिल्यामुळे चित्तशुद्धीला मदतच होईल. म्हणजे हे सगळं द्वैत गांधींनी तिथं मिटवलेलं आहे. गांधींच्या व्यक्तिमत्त्वात भारतीय राजकारणातील आणि समाजजीवनातील किती द्वैतं मिटली हे आपल्या लक्षात येत नाही. १९व्या शतकामध्ये फुले विरुद्ध रानडे असा एक संघर्ष होता, आंतरविरोध म्हणून आपण त्याला. पुढे जहाल की मवाळ असा आंतरविरोध आला. त्याला काही अर्थ नव्हता; कारण टिळकांच्या तुरुंगवासानंतर मवाळ-जहाल यांच्यात काही फरकच दाखवता येत नव्हता. (पण तरी आपण जहाल-मवाळ म्हणतो) पुढे चालून आधी राजकीय की आधी सामाजिक असा आंतरविरोध निर्माण झाला. पुढे चालून चित्तशुद्धी फक्त की चित्तशुद्धी, लोकसंग्रह यासह संघर्ष? व्यक्तिमत्त्वात. गांधींच्या धर्मकल्पनेत आणि गांधींच्या प्रत्यक्ष लढ्याच्या कार्यक्रमामध्ये मिटलेले दिसतात. सामाजिक की राजकीय हा प्रश्नच त्यांनी शिल्लक ठेवला नाही. त्यांनी काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीच्या कार्यक्रममालिकेतच प्रश्नाचा समावेश केला. त्यामुळे धर्मदृष्टी राखून लोकसंग्रहही करता येतो. संघर्षही करता येतो आणि चित्ताची शुद्धीही करता येते अशा प्रकारचा

अनुक्रमणिका



एक नवा आयाम गांधींनी हिंदू धर्मचिंतनाला दिला असं मत त्या काळातील विख्यात विचारवंत आचार्य भागवतांनी व्यक्त केलेलं आहे. वैराग्य आणि संन्यास या संकल्पनांनाही गांधींनी नवा आयाम दिला. दोन्हीही संकल्पना त्यांनी समाजाभिमुख मांडल्या. वैराग्याचे विश्वस्तवृत्तीत रूपांतर होऊ शकते, तर संन्यासी क्रियाशील होऊन निरपेक्ष रीतीने समाजसेवा करू शकतो असाही अर्थ लावता येईल. धर्म विचाराला गांधींचं हे योगदान आहे.

दुसरं, गांधींच्या धर्माकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये अजून एक मेख आहे. धर्म नावाची गोष्ट ही माणसाच्या जन्मापासून त्याच्याबरोबर आहे. तसेच माणसाला पूर्णत्वाच्या ओढीचीही प्रेरणा आहे. या सगळ्या चराचर विश्वाशी मला एकरूप व्हायचं आहे आणि तो एका अंगाने मोक्ष आहे ही एक प्रेरणा आहे. दुसऱ्या बाजूला गांधी असं म्हणतात की, माणसाला पूर्णत्वाची ओढ आहे पण प्रत्यक्षामध्ये मानवी जीवन मात्र अपूर्ण आहे. या द्वैताचा वापर गांधींनी त्यांच्या धर्मकल्पनेच्या स्पष्टीकरणात केला. धर्माच्या बाबतीत विचार करताना गांधी नेहमीच असं म्हणाले की, आय बिलिव इन द स्पिरीट ऑफ रिलिजन. धर्माच्या प्रेरणेशी मी इमान राखण्याचा प्रयत्न करतो आणि प्रत्यक्षात मला काय कराव लागतं तर आय हॅव टू रिलाय ऑन द टेक्स्ट्, मला धर्मग्रंथांवर अवलंबून राहावं लागतं. म्हणून गांधी असं म्हणाले, धर्म ईश्वरी आहेत पण धर्मग्रंथ मानवी आहेत. ईश्वराला जे वाटलं ते त्यांनी धर्मग्रंथात सांगितलं असलं तरी ते माणसाने लिहिलेलं आहे. या अर्थाने सर्व धर्मग्रंथांचं दैवीपण गांधींनी नाकारलं आहे आणि दुसऱ्या बाजूला ते माणसांनी लिहिलेले असल्यामुळे अपूर्णच आहेत. त्यामुळे पूर्णतेच्या ओढीकडे जाण्यासाठी अपूर्ण धर्मग्रंथ आपल्याला उपयोगी नाहीत. ही स्पष्ट भूमिका घेतली. कालाप्रमाणे त्याचं परिष्करण सतत करावं लागणार, त्यातलं हीन काढावं लागणार आणि ते हीन काढून आपण पूर्ण सत्याकडे, चित्तशुद्धीकडे जाणं हा खरा मोक्षाचा मार्ग आहे आणि हा मोक्ष हा खरा पुरुषार्थ आहे. ही गांधींची भूमिका दिसते. असं असल्यामुळे धर्मग्रंथात केले जाणारे बदल, रूढीत होणारे बदल, कालसुसंगत करावयाचे बदल यांना गांधींनी आपोआप एक अधिष्ठान

मिळवून दिले. म्हणून टेक्स्ट् ऑफ द रिलिजन आणि स्पिरिट ऑफ द रिलिजन ही जी फारकत गांधींनी केली त्या फारकतीमध्ये धर्माला नवा सामाजिक आयाम किंवा दृष्टी देण्याचं बीज आपल्याला दिसतं. आणि गांधींच्या सर्व धर्म सुधारणांचं बीज या प्रकारच्या विभागणीमध्ये आपल्याला पाहायला मिळेल.

ईश्वराची कल्पना करतानासुद्धा गांधी आधी असं म्हणाले, ईश्वर सत्य आहे. नंतर असं म्हणाले, सत्य हाच ईश्वर आहे आणि १९३३ साली ते म्हणाले, ईश्वर म्हणजे सामाजिक न्याय आहे. म्हणजे ईश्वराची कल्पना सक्रिय निर्मिकाच्या पातळीवर त्यांनी मांडलेली नाही. तो काहीतरी हस्तक्षेप करतो प्रत्येक वेळेला अशाही पातळीवर मांडलेलं नाही. जिचं साम्य कदाचित महात्मा फुलेंच्या निर्मिक संकल्पनेशी आपल्याला सांगता येईल. त्या निर्मिकाच्या प्रेरणेशी तुम्हाला इमान राखायचं तर तुम्ही स्वतःचं आंतरजीवन शुद्ध करा, सुधारा म्हणजेच सगळ्या मानवमात्रांच्या बरोबरचे तुमचे संबंध हे एका लयींमध्ये तुम्हाला आणता यायला पाहिजेत. म्हणून ते ईश्वराकडे तो सगुण आहे की साकार आहे, निर्गुण आहे की निराकार आहे या वादातही पडलेले नाहीत. त्यांनी असं लिहिलं की ज्यांना मूर्तिपूजा करायची ती त्यांनी खुशाल करा. मला मूर्तिपूजा करायची नाही, माझ्यासाठी निराकार हीच कल्पना जास्त श्रेयस्कर आहे. त्याचा परिणाम काय झाला? गांधींच्या सबंध धर्मप्रवासात त्यांना एकही मंदिर बांधावं लागलं नाही, एकही मशीद बांधावी लागली नाही, एकही चर्च बांधावं लागलं नाही आणि एकही धर्मस्थळ पाडावंसुद्धा लागलं नाही. नामजपापर्यंत अधिकार जर परंपरेने दिलेला आहे, तो एका अंगानं धर्मसंस्थांचं लोकशाहीकरण करून पुढे नेला पाहिजे; कारण नामजप न वाचता येणाऱ्यालाही अधिष्ठान देत असेल तर तेही गांधींनी मान्य केलं आहे. त्यासाठी कुठलंही स्वतंत्र देऊळ बांधलेलं नाही वा तशी गरजही गांधींना पडली नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या प्रयोगासाठी स्वतंत्र मंदिर बांधावं लागलं आणि पुढे कळत-नकळत ते हरिजनांचं मंदिर म्हणून प्रसिद्ध पावलं. पुन्हा तिथे इतरांनी न जाणं हा मुद्दा तसाच शिल्लक राहिला; कारण प्रेरणा जरी सावरकरांची कितीही चांगली असली तरी देवळांचा व्यवहार हा अत्यंत वाईट आहे. आणि म्हणून गांधी असं म्हणत की, चर्चेस्, मशिदी, देवळं ही धर्माच्या व्यभिचाराची दृश्य स्वरूपातील लक्षणं आहेत. तिथे जे व्यवहार चालतात त्याला लोक धर्म मानतात, त्याच्यातून धर्माच्या प्रेरणेचा नायनाट होतो आणि उपऱ्या धर्माला प्रतिष्ठा मिळते जी आपण आजच्या चौकटीत पाहतो आहोत.

गांधींना अनुभव होता का या संदर्भात? तर होता. विश्वनाथाच्या देवळात एकदा ते गेले. त्यांनी कनवटीचा एक पैसा तिथे टाकला. गांधींकडे पाहून त्या पुजाऱ्याने तो पैसा उचलला आणि बाहेर भिरकावून दिला. तिथेच त्यांना पहिली घृणा आली. नंतर तेथील सबंध अस्वच्छता, देवळात असणारी अस्पृश्यता हाही तिथल्या अनुभवाचा भाग होता. म्हणून ते म्हणाले की, या नादाला न लागतासुद्धा धर्माचं उन्नयन करता येतं. धर्माला प्रगल्भ करता येतं. आपली दृष्टी ही आपण कशा पद्धतीने धर्माकडे बघतो याच्यावर अवलंबून आहे. म्हणून गांधींनी एका अद्वैताचा स्वीकार केलेला होता. गांधी अद्वैती होते. ते असं म्हणाले 'ॲपिअरन्स आणि रियालिटी' याच्यात मी द्वैत मानत नाही, मला ते एकच दिसतं. म्हणून मी जे करतो तेच मी बोलतो आणि मी जे बोलतो तेच मी करतो, त्याची किंमत मोजावी लागली तरी. अनेकदा त्यांच्यावर हल्ले झाले. बॉम्बहल्लाही झाला हे सगळं १९३४-३५ सालापर्यंत अस्पृश्यतेच्या मुद्यावर गांधी जेव्हा काम करत होते तेवढ्यातून आलेले हे हल्ले होते. मी जे बोलतो तेच करेन त्यासाठी कशाकशाची किंमत मोजावी लागली बघा. आफ्रिकेमध्ये कस्तुरबांनी पूर्वास्पृश्याचे भांडे धुवायला नकार दिल्याबरोबर गांधींनी त्यांना सांगितलं, अस्पृश्यता पाळणाऱ्याला या घरात थारा नाही. भांडण मिटलं हा भाग निराळा. अहमदाबादच्या साबरमती आश्रमामध्ये एक तरुण मुलगा, तुलनेनं वयानं लहान त्याला संडास साफ करण्याचं काम दिलेलं होतं. त्याला ते प्रकृतीदृष्ट्या झेपत नव्हतं. योगायोगाने त्याच वेळेला विनोबा भावे व त्यांचे बंधू बाळकोबा भावे हे त्याच आश्रमामध्ये काम करत होते. बाळकोबांनी त्या मुलाला पाहिलं आणि त्यांना असं वाटलं, अरे याला हे काम झेपत नाही आहे. म्हणून मग बाळकोबा आणि विनोबांनी आपापसात चर्चा केली आणि असं ठरवलं की, आपण दोघं मिळून पायखाना साफ करण्याचे काम करू आणि त्या मुलाला स्वयंपाकाचं काम देऊ. ती तडजोड त्यांनी अमलात आणली. त्याच आश्रमात गांधींची बहीण राहात होती. ती अत्यंत सनातनीवृत्तीची होती आणि ब्राह्मणांनी भंग्याचं

काम करणं तिला मान्य नव्हतं. गांधी आश्रमात आल्यानंतर जेव्हा या घटनेची चर्चा झाली त्यावेळी त्यांनी बहिणीला सांगितलं की, तुला जर अश्पृश्यता मान्य असेल तर आश्रमात नाही राहता येणार. ती म्हणाली, मला अस्पृश्यता मान्य आहे, मी नाही राहणार. त्या रात्री गांधींनी तिला गाडीत बसवून दिलं. आपल्या कुटुंबात कुठल्याही कारणाने कुठेही हे घडलं नसतं आणि पुढेही घडणार नाही किमान शंभर वर्षे.

गांधींच्या आश्रमातील आश्रमवासीयांना नियम होते. त्यातील एक नियम असा होता की ज्या देवळांमध्ये अस्पृश्यांना जाता येत नाही त्या देवळांमध्ये माझ्या आश्रमातील माणूस जाणार नाही. गांधी स्वतः कधी गेलेच नाहीत. कारण तिथे देव नाही आहे, जो अस्पृश्यांना नाकारतो तो देवच नाही. ओरिसामध्ये गांधी एका बैठकीला गेले असताना त्यांच्याबरोबर कस्तुरबा होत्या. त्यांचा पुत्रवत असणारा सेक्रेटरी महादेवभाई देसाई त्यांच्याबरोबर होता आणि महादेवभाईंची बायकोही तिथे होती. हे तिघं गांधींना न सांगता जगन्नाथाच्या देवळात गेले आणि परत येताना महादेवभाईंच्या लक्षात आलं की, आपल्या हातून चूक झालेली आहे, आपण नियम मोडला आहे. ज्या देवळात अस्पृश्यांना प्रवेश नाही त्या देवळात आपण गेलो. आता बापू काय भूमिका घेतील याची त्यांना कल्पना होती. आणि ते आल्यावर गांधी महादेवभाईंना म्हणाले, ही बातमी सांगण्यासाठी इथे जे आलास त्याच्याऐवजी तिथे सत्याग्रह करून मेला असतास तर मला जास्त आनंद झाला असता. ही त्यांची अस्पृश्यांच्या प्रश्नावरची भूमिका होती. एकतर नियम मोडलास, भरपाई काय केली तर काहीच नाही. पुढे गांधींनी स्वतः जेव्हा असं ठरवलं १९४२ च्या आसपास, की मी फक्त हरिजन-सवर्ण विवाहालाच उपस्थित राहीन. तेव्हा महादेवभाई गेल्यानंतर त्यांच्या मुलाचं लग्न ठरलं. ज्याला पुत्रवत मानला त्याच्या मुलाचं लग्न असल्यामुळे तो गांधींना पत्रिका द्यायला आला; पण गांधी म्हणाले, तुझी पत्नी काही अस्पृश्य वर्गाची नाही आणि ते गेले नाही लग्नाला. महादेवभाईंचा मुलगा म्हणून त्यांनी अपवाद (स्पेअर) केला नाही. (पुढे जेव्हा आंबेडकरांनी दुसरं लग्न केलं तेव्हा गांधी हत्या झालेली होती. आंबेडकरांनी दुसरं लग्न केलं आणि तो आंतरवर्णीय विवाह होता. त्यांच्या नियोजित पत्नी ब्राह्मण समाजाच्या होत्या. लग्नाची पत्रिका द्यायला आंबेडकर सरदार पटेलांकडे गेले आणि सरदार आंबेडकरांना असं म्हणाले की, आज बापू असते तर त्यांनी या लग्नाला येऊन आशीर्वाद दिला असता; कारण ते लग्न बापूंच्या चौकटीत बसणारं होतं. ही त्यांच्या निष्ठेची किंमत होती. ती त्यांनी मोजली आणि त्याच्यात त्यांनी दुसऱ्या कोणालाही स्पेअर केलं नाही.)

ही सगळी धर्माचा अर्थ लावण्याची गांधींची जी मानसिक प्रक्रिया आहे याच्यावर कोणाकोणाचे प्रभाव होते आणि त्याचा कसकसा परिणाम झाला हे पाहाण्यासारखं आहे. सगळ्यात पहिला प्रभाव पडला तो गांधींचे ज्येष्ठ मित्र होते राजचंद्र जैन म्हणून त्यांचा फार मोठा प्रभाव गांधींच्या धर्मचिंतनावर आहे. हे गृहस्थ जैन होते. त्यामुळे जैन तत्त्वदर्शन आणि जैन तत्त्वज्ञानाची बरीचशी माहिती गांधींनी त्यांच्याकडून घेतली. दुसरा प्रभाव आहे परमहंसांचा, तो साधनेच्या वैविध्याचा प्रभाव आहे. परमहंसांनी स्वतः साधना करत असताना अनेक धर्मातील सत्याचा अनुभव येतो का, सगळे धर्म ईश्वरप्रणीत आहेत म्हणून अनेक धर्मांच्या पद्धतीनं उपासना आणि साधना करण्याचा प्रयोग आपल्या आयुष्यात केला हे आपल्याला माहिती आहे. त्याचा संस्कार गांधींवर आहे. त्यातून सर्वधर्मीय प्रार्थना येते आणि गांधींच्या सर्व-धर्म-समभावाची जी संकल्पना आहे त्याची मुळं रामकृष्ण परमहंसांच्या या साधनेमध्ये आहेत. विवेकानंदांचं 'राजयोग' नावाचं पुस्तक गांधींनी अत्यंत सखोलपणे वाचलेलं होतं. त्याचा परिणाम गांधींच्या धर्मकल्पनेवर झालेला आहे. टॉलस्टॉयचं 'किंगडम ऑफ गॉड' याचाही विलक्षण परिणाम गांधींच्या धर्मकल्पनेवर झालेला आहे. सगळ्यात मोठा परिणाम झाला तो 'अन् टू द लास्ट' हे जे रस्किनचं पुस्तक होतं जे 'सर्वोदय' नावानं पुढे गांधींनी भाषांतरित केलं. त्याचाही परिणाम झालेला आहे. या सगळ्यांच्या दृष्टीमधून सर्व मानवमात्राचं ऐक्य आणि चराचर सृष्टीचं ऐक्य याचं अद्वैत त्यांच्या नजरेत भरलेलं आहे आणि याच्या आधारावर गांधींची धर्मकल्पना ही विकसित होताना आपल्याला दिसते.

गांधी ज्या वेळेला धर्मग्रंथांचा अर्थ लावण्याची स्वतःची भूमिका घेतात तेव्हा त्यांनी अनेक गोष्टींचा वेगळा अन्वयार्थ लावलेला आहे. भगवद्गीतेचं उदाहरण घ्या. गीता हा भारतातील राजकारण्यांचा त्या वेळचा लोकप्रिय ग्रंथ होता (आणि आजच्या राजकारण्यांचा

राजकारणासाठीचा लोकप्रिय ग्रंथ आहे.) गांधींनी स्वतःचा अर्थ लावण्यासाठी 'गीतेचा अनासक्ती योग' या नावाचं पुस्तक गुजराथी भाषेत लिहिलं. त्याचं भाषांतर महादेवभाई देसाईंनी केलं; पण ते १९४२ ला गेल्यानंतर १९४६ साली ते प्रसिद्ध झालं. (ते प्रसिद्ध व्हायला उशीर झाला; कारण गांधींनी त्यातली ओळ अन् ओळ वाचून दुरुस्त्या करायच्या होत्या, भाष्य करायचं होतं. गांधींना प्रस्तावना लिहायची होती हे सगळं करून तो ग्रंथ १९४६ साली प्रसिद्ध झाला 'गीता अकॉर्डिंग टू गांधी' या नावानं.) मी या ग्रंथाच्या तपशिलात जाणार नाही. गीतेतील महाभारतातील युद्ध आणि त्याबद्दलचा गांधींचा अन्वयार्थ आहे तो वेगळा आहे. गांधींनी राम असेल, कृष्ण असेल, येशू असेल यांची ऐतिहासिकता नाकारलेली आहे. त्यांनी असं म्हटलं, ऐतिहासिक राम आणि कृष्ण स्वीकारणं यात गडबडी पुष्कळ आहेत. रामानं असं का केलं, तसं का केलं, रामायणातील कथा प्रक्षिप्त आहे का या सगळ्या चर्चा त्यातून सुरू होतात. त्यांना त्यात रस नाही. त्यांना वाल्मीकी रामायणापेक्षा तुलसी रामायण आवडायचं. महाभारतातील गीतेबद्दल ते असं म्हणतात की, आपल्याकडे समज असा आहे की, कृष्णानं अर्जुनाला क्षत्रिय धर्माची जाणीव करून दिली. क्षत्रियांवर असलेल्या विश्वकल्याणाच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आणि ती जाणीव करून देऊन त्याला युद्धाला प्रवृत्त केलं. हे युद्ध धर्मयुद्ध होतं व धर्माचा विजय होण्यासाठी ते आवश्यक होतं. म्हणून समोर कोण आहे याचा विचार न करता अर्जुनाला त्यांनी युद्धाला प्रवृत्त केलं. हा गीतेचा अन्वयार्थ ऐतिहासिकदृष्ट्या जो आहे तो गांधींना मान्य नाही. मग त्यांचा अन्वयार्थ कोणता? खरं तर राम आणि कृष्ण ही गांधींची आवडती दैवतं आहेत. ऐतिहासिकता त्यांनी नाकारली तरी गांधींनी त्याला वेगळा अर्थ दिला आहे स्वतःचा. रामाला वेगळा अर्थ दिलेला आहे आणि कृष्णालाही वेगळा अर्थ दिलेला आहे. कृष्णाबद्दल लिहिताना ते असं म्हणाले, तो अर्जुन त्यांना असं सांगतोय की सुष्ट आणि दुष्ट हे मानवी मनाच्या आत चाललेले द्वंद्व आणि प्रेरणा आहे. हे द्वंद्व माणसाच्या मनामध्ये चिरंतन काळापासून चाललेलं आहे आणि याच्यातील सुष्ट प्रेरणांचा विजय व्हावा म्हणून दुष्ट प्रेरणांवर आपल्याला मात करता यायला पाहिजे. ही मात जर करता आली नाही तर युद्ध होईल आणि युद्धातून फक्त विनाश होतो. जो जिंकतो त्याला जिंकल्याचा अनुभव घेता येत नाही, जो हारतो त्याला दुःख करण्याची संधी नाही, कारण त्याचा विनाश झालेला आहे म्हणजे जिंकल्याचा आनंद नाही. हारलेल्या तर दुःख करण्याची संधी नाही हा युद्धाचा परिणाम आहे. म्हणून युद्ध हे सगळ्यात वाईट आहे. युद्ध हा शांततेला पर्याय नाही हे गांधींचं महाभारताबद्दलचं, भगवत गीतेबद्दलचं, कृष्ण-अर्जुन संवादाबद्दलचं स्वतःचं म्हणणं आहे. गीतेचा संदेश युद्धाच्या भीषणतेची कल्पना देण्याचा आहे, असं गांधींना वाटतं.

मग ह्या प्रेरणांचा संघर्ष का होतो? गांधींनी अनासक्ती हा शब्द वापरला आहे. आसक्ती जोपर्यंत जात नाही आणि अनासक्त पद्धतीनं जोपर्यंत कर्म आपण करायला जात नाही तोपर्यंत हिंसा अटळ आहे, स्पर्धा अटळ आहे. युद्ध अटळ आहे. हे तुम्हाला नको असेल तर आसक्तीचं मूळ मनातून काढून टाकायला शिका. म्हणून गांधी त्यांच्या धर्मकल्पनेत एकादशव्रताची भूमिका घेतात. एकादशव्रताचं पालन केलं तर आसक्ती जाईल आणि असं म्हणता म्हणता त्या अकरा व्रतांच्या माध्यमातून गांधी त्या वेळच्या आधुनिक समाजरचनेला. भांडवली समाजरचनेला, वसाहतवादाच्या प्रेरणांनी युक्त असणाऱ्या समाजाला असणारा एक नवा सामाजिक पुनर्निर्मितीचा पर्याय आणि कार्यक्रम एकादशव्रतात जाहीर करतात. (हिंद स्वराज हा त्याचाच एक भाग आहे.) ही एकादशव्रतं शेवटी एका नव्या समाजाच्या रचनेला जन्म देणार आहे ज्याच्यात संयम, सत्य, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह, अहिंसा याला महत्त्व असणार आहे. नव्या रचनेत आसक्ती नसेल आणि स्पर्धेऐवजी सहकार्य असेल. याचं कारण गांधी माणसांच्या इतिहासाकडे सततचा संघर्षाचा इतिहास आहे म्हणून पाहात नाहीत. मानवी इतिहास संमिश्र आहे. त्यात संघर्षही आहे आणि सहकार्यही आहे म्हणून गांधींचं एक प्रसिद्ध वचन आहे की, डोळ्याला डोळा काढण्याची भूमिका मानवजातीमध्ये पहिल्यापासून जर अमलात आली असती तर निम्म जग आंधळं दिसलं असतं. ज्या अर्थी निम्म जग आंधळं दिसत नाही त्या अर्थी डोळ्याला डोळा काढण्याची भूमिका जगानं मोठ्या प्रमाणावर स्वीकारलेली नाही. तोपर्यंत माणसाला शांततेची आशा आहे आणि ही आशा तुम्हाला वाढवायची असेल तर तुमची आसक्ती कमी करा, संयमानं जगा. पुढे गांधी असं म्हणाले की, बुद्धी, अनुभव

अनुक्रमणिका



आणि काळ यांच्या कसोटीवर जे टिकणार नाही ते मी स्वीकारणार नाही, मग ते वेदवाङ्मय असू दे, धर्मशास्त्र असू दे. त्यांनी प्रयत्न करून पाहिला की, धर्मशास्त्र अस्पृश्यतेला किती अनुकूल आहे, किती प्रतिकूल आहे याचा एक मोठा प्रयत्न केला; कारण गांधींसमोर आंबेडकरांसारखा एक तुल्यबळ प्रतिस्पर्धी होता ज्यांच्या चिंतनाचा मोठा परिणाम गांधींच्या कार्यक्रमांवर झालेला आहे. येरवडा करार झाला २४ सप्टें. १९३२ ला आणि २३ डिसेंबर १९३२ ला गांधींनी एक नवीन प्रयोग केला येरवडा तुरुंगात असताना. वाईला जी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी नंतर नेतृत्व केली जी संस्था होती केवलानंद सरस्वतींची प्राज्ञ पाठशाळा त्या केवलानंद सरस्वतींना गांधींनी निरोप पाठवला की, मला तुमच्याशी धर्मशास्त्राबद्दलची चर्चा करायची आहे. तुम्ही तुरुंगात भेटायला या. चर्चा काय करायची की, धर्मशास्त्रामध्ये अस्पृश्यतेचं समर्थन आहे की नाही. केवलानंद गेले भेटायला. त्यांच्याबरोबर एक तरुण तेजस्वी धर्मशास्त्री लक्ष्मणशास्त्री जोशी यांना घेऊन गेले. (टीप : येरवडा तुरुंगातील या चर्चेच्या वेळी स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशिवाय खालील विद्वान उपस्थित होते - धर्मरहस्यकार के.एल. दप्तरी, भगवानदास, पी.एच. पुरंदरे, आनंदशंकर ध्रुव व इंदिरा रमण शास्त्री.) चर्चेला सुरुवात झाली. केवलानंद म्हणाले की, मी बोलणार नाही. या चर्चेत माझा प्रतिनिधी हा लक्ष्मण बोलेल. मग धर्मशास्त्राची गहन चर्चा सुरू झाली आणि सगळ्यांचा एक निष्कर्ष आला की, धर्मशास्त्रामध्ये अस्पृश्यतेला संमती नाही. दप्तरींना थोडीशी शंका होती. त्या शंकेचं निरसन स्वतः केवलानंद सरस्वतींनी केलं आणि मग गांधींनी तुरुंगातून धर्मशास्त्रामध्ये अस्पृश्यतेला समर्थन नाही असं या मान्यवरांच्या सहीचं एक पत्रक प्रसिद्ध केलं १५ डिसेंबर १९३२ ला. धर्मशास्त्र जर संमती देत असेल अस्पृश्यता नाही तर चांगली गोष्ट आहे; पण पुढे ते असं म्हणाले, की समजा नाही दिली तर मी त्यासाठी थांबणार नाही, मी पुढे निघालो आहे. १९४६ साली ते असं म्हणाले, की अस्पृश्यता टिकणार असेल तर हिंदू धर्म मेलेला बरा. यातून गांधी आपल्या धर्मसंकल्पनेचा विकास करत कुठल्या दिशेनं जायचं ती दिशा नेमकेपणाने सूचित करतात.

दुसरं गांधींच्या धर्मप्रवासाचं आणखी एक वैशिष्ट्य आहे की, ते साधना जी करताहेत ती सतत वरून खाली येणारी आहे. सुटाबुटातला बॅरिस्टर म्हणून गांधी आफ्रिकेत गेले. हळूहळू भारतीय राजकारणातील त्यांची ओळख एक पंचा नेसलेला, काठी हातात असलेला एक कृश म्हातारा अशी झाली. असेच उघडे अंग घेऊन ते इंग्लंडला गेले, थंडीवाऱ्यात राहिले पण ती भूमिका सोडली नाही; कारण मला कोणाशी तादात्म्य

पावायचं आहे, याचे सूचन त्यातून होते. हे मी मुद्दाम सांगतो याचं कारण गांधींनी एका नव्या व्रताची जोड भारतीय धर्मकल्पनांना दिली. ते त्यांना ख्रिश्च्यानिटीकडून मिळालेले होते ते सेवाव्रत आहे. म्हणून एका बाजूला एकादशव्रत, दुसऱ्या बाजूला श्रमाची आराधना आणि तिसऱ्या बाजूला सेवा. व्रत-श्रम-सेवा ही गांधींच्या धर्मकल्पनेची नवी वैशिष्ट्य आहेत, ज्यामुळे हिंदू धर्म हा नेहमीच्या परिघापेक्षा आणखी मोठ्या ठिकाणी जाताना दिसतो. नेहमीचा एक वाद आपल्याकडे जो होता तो गांधींच्या काळातही होता. बुद्धी आणि श्रद्धा यांचं नातं काय? गांधी आजच्या अर्थाने बुद्धिवादी नाहीत. वैज्ञानिक अर्थाने नाही म्हणजे काय तर बुद्धीला सगळं कळतं असं गांधींना वाटत नाही. फक्त पंचेंद्रियांमार्फतच ज्ञान होते ही भूमिका गांधींना मान्य नव्हती. विशेष म्हणजे दि.के. बेडेकर या मार्क्सवादी विचारवंताच्या धर्मचिंतनातही ही भूमिका आहे (हे अनेकांचं म्हणणं आजही आहे). श्रद्धेलाही महत्त्व आहे. याचा दृष्टांत देताना गांधी म्हणाले की, मला जर उद्या तुम्ही असं म्हणालात की, १० लाख वार खादीचं कापड तुम्ही मला निर्माण करून द्या. तर त्या १० लाख वारांसाठी किती कापूस लागेल, पेळू किती लागतील, वेळ किती लागेल, कामगार किती लागतील हे सगळं तुम्ही मला दिलंत तर मी तुम्हाला अचूक वेळ सांगू शकतो तिथे बुद्धीचा वापर आहे. पण तुम्ही जर मला असं आव्हान दिलं की, कमीत कमी पाच सवर्ण माणसांच्या चित्तातील अस्पृश्यता घालवून दाखवा तर त्याला ५-५० काय जास्तीही वर्षं लागू शकतील कारण मला श्रद्धेनं त्यांच्या अंतःकरणात घुसलं पाहिजे. हे बुद्धी आणि श्रद्धेचं गणित गांधींनी स्वतःपुरतं या पद्धतीनं सोडवलेलं आहे. मी बुद्धी वापरेन आणि अंतःप्रज्ञाही वापरेन या दोन्हींच्या मध्ये गांधींचा धर्मप्रवास आपल्याला होताना दिसतो.

या धर्मप्रवासातून अजून एक गोष्ट त्यांना साध्य करायची होती; ती म्हणजे वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था (या दोन्हीबद्दल गांधींनी खूप उलटसुलट विधानं १९१७ पासून १९२७ सालापर्यंत केली. १९२७ सालानंतर गांधींनी याच्याबद्दलचं बोलणं थांबवलं) याबद्दल निःसंदिग्ध भूमिका घेतली आहे. पण आधीच्या काळाच्या भूमिकेमध्येसुद्धा ते एका शास्त्र्याशी वाद घालताना असं म्हणाले (त्यांच्या आश्रमातील लक्ष्मी नावाची अस्पृश्य मुलगी सतत त्यांच्याबरोबर असे) की, मी वर्णधर्म मानतो; पण माझा वर्णधर्म काही मला अस्पृश्यांपासून लांब ठेवत नाही. ते माझ्या घरांत राहतात, मी त्यांच्याबरोबर जेवतो, त्यांच्याबरोबर वावरतो. ही भूमिका त्यांनी एका सनातनी शास्त्र्याशी वाद घालताना घेतली. गुजरातमधल्या भूज नगरपालिकेने त्यांना अस्पृश्योद्धाराच्या कामाबद्दल मानपत्र देताना कार्यक्रम केला. लोक बसलेले होते, व्यासपीठ होतं आणि भुज गावातले अस्पृश्य एका बाजूला कोपऱ्यात उभे होते. गांधी म्हणाले की, त्यांना पुढे बसवा. आयोजक म्हणाले, की नाही. आम्ही त्यांना पुढे नाही घेऊ शकत. मग गांधी म्हणाले, की मी तिथे जाऊन मानपत्र स्वीकारेन. म्हणून ते तिथे गेले. तिथे टेबल नेलं आणि तिथे त्यांनी मानपत्र स्वीकारलं; पण कोणत्याही परिस्थितीत अस्पृश्यता नाही मान्य करणार. तुम्ही मला अस्पृश्यतेच्या कार्यासाठी मानपत्र देत आहात तेव्हा तर हे नाहीच होणार. हा जो सगळा वर्णव्यवस्था आणि श्रमाचा असणारा जो सांधा आहे हा त्यांना तोडायचा होता आणि हा तोडायचा असल्यामुळे वर्णांतर करता येतं, कर्माने वर्ण बदलता येतो अशी भूमिका घेऊन अनेक आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी वर्णविद्रोहाची शिकवण दिली. 'अप्पासाहेब पटवर्धनांनी आयुष्यभर भंग्याचं व्रत घेतलं, अनेक ब्राह्मणांनी नागपूरसारख्या शहरात मेलेल्या गुरांच्या कातडी सोडवण्याला प्रोत्साहन दिलं. त्यांनी उत्पादक जाती, सेवा जाती अशी वर्गवारी करून जातिव्यवस्था नाकारली.

उत्पादक जातींचे कौशल्य टिकवले पाहिजे. त्याला नव्या ज्ञानाची, तंत्रज्ञानाची जोड द्यायला पाहिजे अशीही त्यांची भूमिका होती. सेवा करणाऱ्या जातींची मक्तेदारीही त्यांना अमान्य होती.

सर्वधर्मसमभावाकडे वळताना ती संकल्पना आज मला महत्त्वाची वाटते; कारण तिची आजची प्रस्तुतता. सर्व-धर्म-समभाव ही संकल्पना भारतामध्ये हेटाळणी झालेली संकल्पना आहे. एका बाजूला धर्मनिरपेक्षतावाद्यांनी त्याची हेटाळणी केली, दुसऱ्या बाजूला नास्तिक्य बाळगणाऱ्या लोकांनी हेटाळणी केली, तिसऱ्या बाजूला हिंदुत्ववादी प्रवाहांनीही त्याची हेटाळणी केली. प्रत्यक्षात या संकल्पनेत काय क्रांतिकारकता आहे हे या तिन्ही प्रवाहांना उमगलेलं नाही. गांधी जेव्हा असं म्हणतात, सर्व धर्म समान आहेत, याचा दुसरा अर्थ सर्व

अनुक्रमणिका

धर्म खोटे आहेत, असा एक अर्थ नरहर कुरुंदकर आणि सुरेश द्वादशीवार यांनी लावलेला आहे. त्यांचा अर्थ चुकीचा आहे असं माझं प्रामाणिक मत आहे. सर्व धर्म समान आहेत याच्यात फक्त एक महत्त्वाचा मुद्दा कोणता आहे की, सर्व धर्म समान असतील तर धर्मांतराची गरज नाही. एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणं याला अर्थ नाही. म्हणजे आवश्यकता नाही या अर्थानं. हाच एक मुद्दा यातून सिद्ध होतो; पण सर्व धर्म खोटे आहेत हे सिद्ध होत नाही याचं कारण गांधी ज्या वेळेला धर्माचा अर्थ स्वतः लावण्याची भूमिका घेऊन धर्माचा असणारा संस्थात्मक सत्तासंबंध (इन्स्टिट्युशनल पॉवर स्ट्रक्चर) नाकारतात. तेव्हा गांधी असं म्हणतात की, माझा धर्म किती चांगला आहे हे मला माहीत आहे; पण दुसऱ्या धर्मातील चांगलंही मला माझ्या धर्मात आणायचं आहे आणि सर्व धर्म समान असल्यामुळे त्याही धर्मात काहीतरी चांगलं असणार आहे आणि ते मला गोळा करायचं आहे. हे करायला सर्व धर्म समान आहेत हे म्हटल्याशिवाय जागा नाही. आणि या पद्धतीनं त्यांचं म्हणणं प्रत्येक धार्मिक माणसानं स्वतःच्या धर्माचा विचार केला पाहिजे व चिकित्साही. मुसलमानांनी या पद्धतीनं आपल्या धर्माची चिकित्सा करावी, ही जर सवय माणसाला लागली तर दुसऱ्या धर्मातील चांगलं शोधण्याच्या प्रेरणा ज्या वेळेला सर्व धर्मांमध्ये बळकट होतील तेव्हा धर्माच्या आधारे होणारं विभाजन आणि संघर्ष यांचं मूळ संपुष्टात येईल हा सगळ्यात मोठा फायदा त्याचा आहे.

दुसरं गांधींच्या डोळ्यांसमोर काय होतं? सर्व समाज सुधारकांचे आधीपासूनचे प्रयत्न अगदी लोकहितवादी, फुले, आगरकर, रानड्यांपासून ते विठ्ठल रामजी शिंदे इ. सर्व समाज सुधारकांपर्यंत या सगळ्यांचा मुख्य हेतू काय होता की येथे सुदृढ, शोषणरहित, समतेवर आधारलेला असा एक नागरी समाज निर्माण व्हायला हवा. आणि हा समाज जर निर्माण व्हायचा असेल तर समाजामध्ये असणाऱ्या धर्मासारख्या ज्या गोष्टी आहेत त्याचं नीट नियमन व्हायला पाहिजे. गांधी असं म्हणतात, सार्वजनिक जीवनात धर्म राहणारच आहे. 'धर्म राहणारच आहे' असं म्हणताना गांधींची त्यात एक अंतर्निहित भूमिका आहे. गांधींना जेव्हा असं विचारलं की, तुम्ही राजकारणात का आलात? तेव्हा गांधी म्हणाले की, मी जीवनाचा नम्र उपासक आहे, मी सत्याचा शोधक आहे, मी धर्मभावना मानतो आणि मला लोकांची सेवा करायची आहे आणि लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणाइतके उत्तम क्षेत्र नाही, म्हणून राजकारणातून जो धर्म आता बाद झालेला आहे तो धर्म मला पुन्हा राजकारणात प्रस्थापित करायचा आहे. इथे गांधी धर्म म्हणत असताना तो रूढ अर्थाचा धर्म नाही आहे, ती धर्मभावना आहे. आजचं राजकारण मूल्यांवर आधारलेलं झाल्याशिवाय या रूढ धर्माच्या आधारे निर्माण झालेले हे सगळे भेदाभेद संपणार नाहीत. म्हणून गांधी असं म्हणतात की, सार्वजनिक जीवनात धर्म जर अटळ असेल तर अटळ असणाऱ्या धर्मामध्ये संवाद हीसुद्धा अटळ गोष्ट आहे. इथे स्पर्धा नको संवाद हवा. प्रत्येक जण दुसऱ्या धर्माचा आदर करायला शिकला किंवा केला तरच तो संवाद होईल. दुसऱ्याचा द्वेष करून किंवा दुसऱ्याच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करून असा संवाद होणार नाही. तेव्हा असा संवाद होण्यासाठीसुद्धा सर्व धर्मांकडे समान नजरेनं पाहण्याची भूमिका तुम्हाला घेता यायला पाहिजे. मुळातच मी जेव्हा चांगल्या प्रकारचा हिंदू होण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मला चांगल्या प्रकारचा मुसलमान होता यायला पाहिजे, चांगल्या प्रकारचा शीख, ख्रिश्चन, दुसऱ्या धर्माचा माणूस होता यायला पाहिजे. आणि हे मला हिंदू राहून करता यायला पाहिजे. याचाच अर्थ सर्व धर्मातल्या चांगल्या मूल्यांचा संग्रह माझ्या धर्मामध्ये वा दुसऱ्या माणसाच्या धर्मामध्ये त्याने त्या पातळीवर करायला हवा, व्हायला हवा. म्हणून सतत धर्माची चिकित्सा व्हायला हवी.

मी जे सुरुवातीला म्हटलं आहे की, स्पिरिट ऑफ द रिलिजन आणि टेक्स्ट ऑफ द रिलिजन यामध्ये गांधी सतत फरक करतात. टेक्स्ट ऑफ द रिलिजनची चिकित्सा ही सतत धर्माची चिकित्सा आहे. ही काळानुसार परिष्करण करत जायची गोष्ट आहे. ती तशी केली नाही तर माणसांना धर्मभावना आंतरिक पातळीवर जाणवण्याऐवजी प्रतीकांच्या पातळीवर, बाह्य जगतामध्ये काय दिसते, याच्यावर माणसं उभी राहतील आणि प्रतीकं ही नेहमीच संघर्षांना जन्म देतात; कारण प्रतीकं कोणत्या ना कोणत्या अस्मितेचं वाहन होतात. म्हणून सर्व धर्म समानत्व, ईश्वराचेच सर्व धर्म आहेत म्हणून ईश्वराने त्यांना चांगला धर्म दिला, मला वाईट दिला असं म्हणू शकत नाही. म्हणून मला ते सगळं समजलं पाहिजे आणि म्हणून गांधींच्या व्रतांमध्ये जे वैविध्य आलेलं दिसतं त्याच्यात सर्वधर्मीय प्रार्थना हा एक मोठा आविष्कार

अनुक्रमणिका

आहे. दिल्लीतील दंगलीच्या शेवटच्या टप्प्यात गांधींची हत्या होण्यापूर्वी दोन-तीन दिवस आधी अनेक हिंदूंनी त्या प्रार्थनेत सहभागी होणाऱ्या असा आक्षेप घेतला की महात्माजी आम्हाला तुमचं सगळं मान्य आहे; पण फक्त या सर्व धर्म प्रार्थनेमध्ये मुसलमानांच्या प्रार्थना म्हणू नका. गांधी म्हणाले, ज्यांना हे म्हणायचं नसेल ते प्रार्थना न म्हणता जाऊ शकतात. मी हे म्हणणार नाही; कारण 'धीस इज माय आयडियल.' मुसलमानांच्या प्रार्थना म्हणणं हाच केवळ आयडियलचा भाग नाही आहे. सर्व धर्माचे लोक एकत्र जगून जगाच्या कल्याणासाठी स्वतः प्रार्थना करतात आणि एकत्र बसून प्रार्थना करतात. ह्या एकत्रीकरणाच्या दृष्टिकोनातून मी त्याच्याकडे पाहतो. ती प्रार्थना कोणत्या धर्माची आहे हे माझ्यासाठी महत्त्वाचे नाही. त्यामुळे प्रार्थना मी हिंदू धर्माचीही म्हणणार, ख्रिश्चन धर्माचीही म्हणणार. (आपण एक गोष्ट नेहमी विसरतो की, गांधींनी त्यांच्या तरुणपणाच्या काळामध्ये इंग्लंडमधल्या वास्तव्यात, आफ्रिकेतील वास्तव्यात अनेक धर्मांचा कसून अभ्यास केलेला होता.) प्रार्थना, व्रते, संन्यास, वैराग्य, वर्णधर्म आदींना गांधींनी नवे आयाम दिले. समाजविन्मुख, गुहाकेंद्री गूढ, धूसर सामान्यांना न कळणारे अध्यात्म गांधींनी समाजसन्मुख केले, लोकांना कळेल व भावेल असा त्याचा अर्थ लावला. प्रत्यक्ष जीवनानुभव व आपली प्रतिभा, चिंतनशीलता यांनी गांधींनी सहज पेलतील असे कार्यक्रम लोकांना दिले. सवर्णांना विवेकाची टोचणी लावली व धर्म परिवर्तनाकूल केला. त्याच्यावर माझा अधिकार आहे आणि तो अधिकार मी सर्वांपर्यंत पोहचवणार आहे अशा पद्धतीने माझा धर्म मी प्रगल्भ करणार आहे. या प्रगल्भतेकडे हिंदू धर्माची परिणती त्यांनी केली. आपल्यामागे लोक व शिस्तबद्ध अनुयायी उभे करण्यात त्यांना यश मिळालं हा याचाच परिणाम म्हणावा लागेल.

भारताच्या इतिहासामध्ये दोन उदाहरणे अशी दिसतात, एक गांधींचं ज्यांनी हिंदू धर्मातील दोषांसकट त्याचा स्वीकार करून त्याचं नवं इंटरप्रिटेशन देत एका प्रगल्भ धर्माची आणि त्याच्या आधारे एका चांगल्या नागरी समाजाची (सिव्हिल सोसायटीची) कल्पना केली. असा सुबुद्ध नागरिक सर्व धर्मांचा आदर करणारा हा इथल्या नागरी समाजाचा घटक असला पाहिजे. दुसऱ्या बाजूला आंबेडकरांचं उदाहरण आहे की, अत्यंत प्रतिकूल असणारा हिंदू धर्म आम्हाला, लोकशाहीच्या संरचनेला प्रतिकूल आहे अशी आंबेडकरांची धारणा आहे आणि त्याच्यात विषमता ठायी ठायी भरलेली आहे, विषमता हाच हिंदू धर्माचा आधार आहे, असं म्हणत म्हणत आंबेडकर हिंदू धर्मातून बाहेर पडतात, बुद्ध धर्माकडे जातात. बुद्ध धर्मामध्येसुद्धा स्वतःचं स्वातंत्र्य वापरून गांधींसारखं, स्वतःचा अधिकार वापरून बुद्धाचं नवयान चालवतात आणि नवी संकल्पना मांडतात. २२ प्रतिज्ञा तयार करतात आणि धम्माला सामाजिक नीतीच्या स्वरूपात प्रकट करतात आणि नागरी समाजाचा सिव्हील सोसायटीचा पाया घालतात. हे दोन विचारवंत दोन निरनिराळ्या बाजूंनी येतात; पण एकाच सिव्हिल सोसायटीच्या स्थापनेकडे येतात. दोन भिन्न सामाजिक स्थानांवरून स्वतःच्या धर्माकडे पाहणाऱ्या या दोन विचारवंतांनी धर्माचा अर्थ लावण्याचा अधिकार स्वतःकडे घेऊन विचार केला हे साम्य विलक्षण आहे. दोघांचीही प्रवृत्ती धार्मिकतेकडे होती. आणि दोघांनीही परंपरागत धार्मिकतेला नाकारून धर्मभावनांना नवे रूप दिले. दोन वेगळ्या वाटांनी येऊनही दोघे एकाच प्रकारच्या नागरी समाजाच्या मुद्यांपाशी आले. यासाठी उभयतांची उत्कट धर्मभावना आड आली नाही. नव्या युगाला साजेसे धर्माचे महत्त्व उभयतांनी अधोरेखित केले. आपलं दुर्दैव असं आहे की, या दोन्हीही विचारवंतांच्या अनुयायांनी त्यांना एकमेकांविरुद्ध उभे करून त्यांचा दारुण पराभव केलेला आहे आणि आजच्या अवनतीला हातभार लावलेला आहे.

(हा लेख औरंगाबाद येथे २२ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रा. दिनकर बोरीकर स्मृतिव्याख्यानाप्रसंगी केलेल्या व्याख्यानाचे पुनर्लेखन आहे. यासाठी खालील ग्रंथांचा उपयोग झाला :

१) *आचार्य स.ज. भागवत समग्र साहित्य खंड १/२*
२) *धर्मविचार - मो.क. गांधी*
३) *गांधी - नलिनी पंडित*
४) *गांधी आणि आंबेडकर - गं.बा. सरदार*
५) *गांधीविचाराचे अलक्षित पैलू - यशवंत सुमंत*
६) *धर्मचिंतन - दि.के. बेडेकर*
७) *गांधी जीवनरहस्य - आचार्य शं. द. जावडेकर*
८) *गांधी : परंपरा आणि परिवर्तन - सु.श्री. पंढरीपांडे*
९) *स्वामी केवलानंद सरस्वती चरित्र - विजय दिवाण)*

• • •

अनुक्रमणिका

वारसा

युगवाणी ऑक्टोबर १९६९
वर्ष २४, अंक सहावा

रस्त्यावरील राजकारण आणि गांधीजी

प्रा. डॉ. ना. र. देशपांडे

भारतीय राजकारणाच्या सध्याच्या अवस्थेमध्ये 'रस्त्यावरील राजकरण' याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रस्थापित लोकशाही पद्धतीच्या मार्गाने विशिष्ट मागण्या पुऱ्या होण्याची शक्यता नाही, असे दिसू लागले की या मागण्या 'रस्त्यावरील राजकरणा'द्वारे पुऱ्या केल्या जातील अशी धमकीवजा भाषा प्रचलित राजकारणामध्ये सर्रास वापरली जात आहे. 'रस्त्यावरील राजकारण' याचा आशय राज्यघटनेने किंवा नियम कायद्यांनी संमत केलेल्या मार्गाच्या बाहेर जाऊन किंबहुना त्यांना असंमत असेल, अशा मार्गांनी राजकीय प्रश्नांची सोडवणूक करणे, असा सर्वसाधारण केला जातो. यामध्ये प्रस्थापित शासनावर दबाव आणण्याचा आशय अभिप्रेत आहेच. परंतु हा दबाव सनदशीर किंवा वैध मार्गाने न आणला जाता जनक्षोभाचा वणवा पेटवून त्याचा दबाव शासनावर आणण्याचा प्रयत्न केला जातो. भारत स्वतंत्र झाल्यापासूनच्या गेल्या दोन दशकांमध्ये या प्रकारच्या राजकारणाला पुष्कळच अवसर मिळाला. विशेषत: ज्या प्रश्नावर लोकक्षोभ सहजरीत्या निर्माण होण्याची शक्यता जास्त, असे भाषावार प्रांतरचना, प्रादेशिक सीमावाद किंवा जातीय संबंध यासारखे प्रश्न महत्त्व पावल्यामुळे 'रस्त्यावरील राजकारणा'ला मोठ्या प्रमाणावर वाव मिळाला.

राजकारणामध्ये साधनांच्या स्वरूपाबद्दल विशेष चिकित्सा करण्याची आवश्यकता नाही. साध्य हेच महत्त्वाचे आणि त्या दृष्टीने साधन उपयुक्त ठरणारे असेल, तर ते श्रेयस्कर मानावे, अशी केवळ राजकारणी भूमिका असेल, तर 'रस्त्यावरील राजकारणा'चे साधन जो विशिष्ट हेतू साधण्यासाठी उपयोगात आणले जाते, तो हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने कितपत प्रभावी आहे. यावरूनच त्याबद्दल निर्णय घ्यावा लागेल.

परंतु राजकीय तत्त्वज्ञानामध्ये व्यवहाराचे एक अंग म्हणून त्याचा विचार करावयाचा असेल तर त्याच्या मूल्यमापनाला निराळे निकष लावायला हवेत. 'रस्त्यावरील राजकारणा'त मुख्यत: जनसामर्थ्याचा प्रभाव हीच निर्णायक शक्ती असल्यामुळे बऱ्याच वेळा जनसामर्थ्यांच्या प्रभावाला प्रत्यक्ष राजकारणामध्ये ज्यांनी मोठ्या प्रमाणावर उठाव दिला, त्या महात्मा गांधींच्या राजकीय चळवळीचा संदर्भ दाखल्यादाखल दिला जातो.


केवळ घटनेने नमूद केलेल्या किंवा सनदशीर समजलेल्या मार्गाव्यतिरिक्त जनसामर्थ्याचा संघटित प्रभाव राकारणामध्ये कार्यान्वित करण्याचे महत्त्वाचे कार्य गांधीजींनी केले आहे ही गोष्ट खरी. नि:शस्त्र प्रतिकार, सविनय कायदेभंग किंवा सत्याग्रह या मार्गांनी महात्मा गांधींनी

अनुक्रमणिका

जनशक्तीने सामर्थ्य संघटित करून राजकारणामध्ये त्याचा प्रभावीरीत्या उपयोग केला जे राजकारण अगोदरच्या काळात काही थोड्या सुशिक्षित आणि जागृत कार्यकर्त्यांपुरते मर्यादित राहात असे, ते गांधीजींच्या काळामध्ये सर्वसामान्य जनतेमध्ये पसरू लागले. राजकीय कृती ही घटनेने निर्देशिलेल्या सनदशीर मार्गापुरती मर्यादित न राहता नव्या स्वरूपात, नव्या क्षेत्रामध्ये व्यक्त होऊ लागली. सर्वसामान्य जनता कायदेभंग, बहिष्कार किंवा सत्याग्रह या मार्गांनी राजकारणामध्ये भाग घेऊ लागली. म्हणून, एका अर्थाने कायदेमंडळातील राजकारणाचे युग संपून 'रस्त्यावरील राजकारणा'च्या युगाला गांधीजींच्या काळातच प्रारंभ झाला, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

परंतु, गांधीजींनी राजकारणाचे क्षेत्र विस्तृत केले आणि त्यावर पूर्वीच्या काळी असलेल्या मर्यादा ढिल्या केल्या ते केवळ तत्कालीन लाभाकडे दृष्टी ठेवूनच नव्हे. राजकारणामध्ये सर्वसामान्य जनतेला गोवून घेताना ते गोवणाऱ्याची जबाबदारी फार मोठी आणि महत्त्वाची गांधीजींना अभिप्रेत होती. सत्याग्रह हे जे मुख्य साधन राजकारणामध्ये गांधीजींनी नव्यानेच मोठ्या प्रमाणावर सुरू केले त्याचे एक विशिष्ट तत्त्वज्ञान होते आणि गांधीजींच्या काळामध्ये ज्या राजकारणाचा विस्तार सर्वसाधारण जनतेप्रत पोचला, ते राजकारण आज त्याला रस्त्यावरील राजकारण संबोधले जाते, त्या स्वरूपाचे नसून सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले होते. सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाशी संबंध नसलेले 'रस्त्यावरील राजकारण' गांधीजींना अभिप्रेत नव्हते.

सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानासंबंधी गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेमध्ये या साधनांचा उपयोग करायला सुरुवात केल्यापासून बरेच विचारमंथन केले आहे. भारतामध्ये स्वातंत्र्य संपादनापर्यंत निरनिराळ्या प्रसंगी सत्याग्रहाच्या साधनाचा वापर केला आणि त्या सर्व प्रसंगी सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानासंबंधी त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत; परंतु या सर्व प्रसंगी ज्या एका महत्त्वाच्या सूत्रावर गांधीजींनी विशेष भर दिला आहे ते सूत्र म्हणजे सत्याग्रह करणाऱ्याच्या ठिकाणी आवश्यक असलेली विशिष्ट पात्रता ही होय. १९४० साली वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू करून गांधीजींनी पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली आणि सत्याग्रही



म्हणून निवड होण्यासाठी काही कठीण निकष पुरे करण्याची आवश्यकता दर्शवून दिली. इतर सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळेला ही गोष्ट इतकी स्पष्ट झाली नसली तरी सत्याग्रहाच्या चळवळीचे यश हे सत्याग्रहाच्या पात्रतेवर अवलंबून आहे. या गोष्टीवर त्यांनी नेहमीच भर दिला. याचे एक उदाहरण त्यांनी आपल्या आत्मवृत्तामध्ये वर्णिलेले आहे. हिमालयाएवढी चूक असे ज्याचे वर्णन गांधीजींनी केले ते खेडा जिल्ह्यातील कायदेभंगातील चळवळ पूर्वतयारीशिवाय सुरू केली, त्याला उद्देशून गांधींनी ते शब्द उच्चारले होते. यासंबंधी आपल्या आत्मचरित्रात गांधीजींनी म्हटले आहे की, खरा सत्याग्रही तोच की, जे समाजाच्या कायद्याला ज्ञानपूर्वक स्वेच्छेने मान देणे हा धर्म आहे, असे समजून मान देईल आणि अशा तऱ्हेने ज्याने समाजाच्या नियमांचे हेतुपूर्वक पालन केले आहे, त्याच्या अंगीच त्या नियमांच्या नीती, अनीतीचा न्याय करण्याची शक्ती येते व त्यालाच विशिष्ट नियमांचा भंग करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ज्या लोकांच्या अशा तऱ्हेचा अधिकार प्राप्त झालेला नाही त्यांना कायदेभंग करायला सांगणे, ही आपली हिमालयाएवढी चूक झाली, असे गांधीजींना वाटले.

या अनुभवावरून कायदेभंग किंवा सत्याग्रह या चळवळीमध्ये भाग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पूर्ण तयारी करायला पाहिजे याची जाणीव गांधीजींना झाली. आणि स्वयंसेवक दल निर्माण करण्याची आवश्यकता त्यांना विशेषत्वाने जाणवू लागली. ही जी पूर्वतयारी सत्याग्रहात भाग घेणाऱ्या व्यक्तीची व्हावयास पाहिजे ती केवळ प्रचारामधून होण्यासाठी नाही. गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम हा एका अर्थाने या पूर्वतयारीचा एक महत्त्वाचा भाग होता. या कार्यक्रमामध्ये कार्यकर्त्याला कामाची शिस्त लागावी, अशी तर योजना होतीच; परंतु त्याशिवाय सामाजिक न्याय आणि आर्थिक विकास यांना पोषक ठरलेल्या कार्यक्रमाची उभारणी मानवी श्रमाच्या मूल्यावर आधारून करण्याचा आशय अभिप्रेत होता. विधायक किंवा रचनात्मक कार्यामध्ये शिस्तबद्ध रीतीने सहभागी होणारा कार्यकर्ता हा सत्याग्रही म्हणून आवश्यक असलेली पात्रता अंगी बाळगू शकेल अशी गांधीजींची कल्पना होती.

गांधीजींनी सुरू केलेल्या अनेक चळवळींबाबत लोकांना पुष्कळ वेळा गूढ वाटत आले आहे. प्रत्यक्ष राजकारणाचे नेतृत्व स्वीकारून स्वातंत्र्याचा लढा चालवीत असताना रचनात्मक कार्यक्रम, अस्पृश्योद्धार, मद्यपानबंदीची चळवळ, भंगीमुक्ती या आणि अशा अनेक कार्यक्रमांमध्ये गांधीजी स्वत: लक्ष घालीत. एवढेच नव्हे तर राजकारणातील अनुयायी नाही अशा सर्व कार्यक्रमांमध्ये सक्रिय भाग घेण्याला लावीत. यामुळे लोकांना त्यांच्या राजकारणाच्या स्वरूपाबद्दल संदेह वाटू लागला. परंतु राजकारणाचा पाया विस्तृत करण्यासाठी म्हणजे मोठ्या संख्येने सामान्य जनतेला राजकारणामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी राजकीय चळवळीचे नेतृत्व करणाऱ्याची लायकी आणि पात्रता वाढविण्याची आवश्यकता गांधीजींना पहिल्यापासून जाणवत होती. आणि हे सर्व विविध कार्यक्रम दैनंदिन राजकारणाशी प्रत्यक्ष संबंधित नसले तरी राजकारणामध्ये नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी आवश्यक असलेले गुण वाढविणारे होते. दुर्दैवाने खुद्द गांधीजींच्या अनुयायी म्हणविणाऱ्या पुष्कळांना त्यांच्या रचनात्मक कार्मक्रमामागील ही भूमिका आत्मसात करता आली नाही. याचा परिणाम असा झाला की, गांधीजींच्या समाधानासाठी त्यांच्या या कार्यक्रमाला तोंडदेखला पाठिंबा देऊन त्यांच्या राजकीय चळवळीमध्येच प्रामुख्याने अनुयायांनी लक्ष घातले आणि या चळवळीमुळे वाढलेल्या जनशक्तीच्या संघटित सामर्थ्याचा राजकीय हेतुपूर्तीसाठी उपयोग करून घेतला. याचा परिणाम असा झाला की, राजकारणामध्ये नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व्यक्तिमत्त्व ज्या दृष्टीने एकात्म स्वरूपात जीवनाच्या निरनिराळ्या अंगांचा समावेश करून वाढायला हवे होते, तसे ते न वाढता एकांगी स्वरूपातच वाढले. भारतामधील राष्ट्रवादी चळवळ ही राजकारणावर विशेष भर देऊन राष्ट्रीय जीवनाच्या इतर अंगांचा त्या दृष्टीने कमी विकास करणारी झाली, हे या एकांगी वाढीचेच गमक म्हणता येईल.

रचनात्मक कार्यक्रमामध्ये अनुस्यूत असलेली व्यक्तिगत जीवनाची शिस्त ही एकात्म व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पोषक ठरणारी होती.रचनात्मक कार्यक्रमाची उभारणी समतेच्या पायावर झालेली होती. आणि ही समता मुख्यत: विकेंद्रीकरणाच्या साधनाद्वारे कार्यान्वित करता येणार होती. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या भारताच्या आर्थिक पुनर्रचनेबद्दल त्यांच्या अनुयायांतसुद्धा महत्त्वाचे मतभेद होते; परंतु संपत्तीचे आणि विशेषत: उत्पादनाच्या साधनाचे केंद्रीकरण होऊ नये आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुवतीनुसार आणि कलानुसार आर्थिक विकासाची संधी मिळावी ही सूत्रे कोणत्याही आर्थिक योजनेमध्ये पायाभूत मानली पाहिजेत. या गांधीजींच्या मतांबद्दल फारसे दुमत नव्हते. हा दृष्टिकोन किंवा मतप्रवाह वाढीला लागावा अशा तऱ्हेची योजना गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमांमध्ये अभिप्रेत होती. याहीपेक्षा भारतीय समाजाच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची बाब सामाजिक समतेची भावना निर्माण करण्याची! ती केवळ तात्त्विक चर्चेच्या द्वारा होणार नाही, तर प्रत्यक्ष लोकांच्या दैनंदिन आचरणामधून वाढीला लागली पाहिजे. हे गांधीजींनी ओळखले असल्याकारणाने अस्पृश्यता निवारणासारख्या कार्याला त्यांच्या कार्यक्रमामध्ये विशेष महत्त्वाचे स्थान मिळाले. जे कार्यकर्ते प्रत्यक्ष, व्यवहारामध्ये सामाजिक समता, आर्थिक आणि राजकीय विकेंद्रीकरण यांच्याशी सुसंगत असलेली कार्यपद्धती अंगी बाणवतील तेच कार्यकर्ते भारतीय राजकारणाला अभिप्रेत असलेले लोकशाहीनिष्ठ आणि प्रगतिपर असे नेतृत्व देऊ शकतील, अशी महात्माजींची श्रद्धा होती. या दृष्टीने त्यांचा हा सर्व रचनात्मक कार्यक्रम त्यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा

अनुक्रमणिका

भाग होता.

खुद्द गांधीजींच्याच हयातीमध्ये त्यांच्या राजकीय चळवळीचा ज्या मानाने लोकांनी पाठपुरावा केला, त्या मानाने त्यांच्या रचनात्मक आणि इतर कार्यक्रमांचा न केल्यामुळे राष्ट्रवादी चळवळीची वाढ एकांगी झाली याचा उल्लेख वर आलाच आहे. परिणाम असा झाला की स्वातंत्र्य संपादनाच्या वेळेला राजकीय चळवळ ही सत्ता संपादन करण्याइतक्या प्रगल्भ अवस्थेला पोचली असूनसुद्धा सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये भारतीय राष्ट्रवादाचा आशय बराचसा स्थित अवस्थेतच राहिला. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या अनेक वर्षांमध्ये भारतीय जीवन हे या दोन क्षेत्रांमध्ये मंद गतीने विकास पावू शकले याचे कारण हेच. आता राजकीय सत्ता लोकप्रतिनिधींच्या हाती आली असूनसुद्धा त्या सत्तेचा वापर प्रत्यक्ष व्यवहारामध्ये सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता होईल याची ग्वाही देता येत नाही; कारण राजकारणावर सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनाचा अंकुश ठेवण्याची परंपराच आपल्या राजकारणात निर्माण झाली नाही.

अशा अवस्थेत 'रस्त्यावरील राजकारणा'चा पुरस्कार हा गांधीजींच्या एकंदर तत्त्वज्ञानाशी सुसंगत नाही. एवढेच नव्हे, तर तो सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाला पूर्णपणे विरोधी आहे, असे म्हटले पाहिजे; कारण आज ज्या स्वरूपात रस्त्यावरील राजकारणाचा ज्या प्रमाणात पुरस्कार किंवा वापर केला जातो, तो केवल राजकीय सत्तास्पर्धेमधील एक साधन म्हणून. त्याला कोणत्याही तऱ्हेचा सामाजिक किंवा आर्थिक आशय आहे, असे म्हणणे कठीण आहे. या साधनाचा वापर करणारे राजकीय कार्यकर्ते सत्याग्रहाला आवश्यक असलेली शिस्तीची कोणतीही बंधने स्वत: पाळण्यास तयार नसतात. समाजाचे नियम पाळण्याची शिस्त ज्याने स्वत:च्या अंगी बाणवली आहे त्यालाच त्या नियमांसंबंधी बरे-वाईट ठरविण्याचा अधिकार येतो, असे गांधीजी म्हणत. पण यासाठी लोकांना समाजाच्या शिस्तीचे बंधन पाळण्याची सवय अंगी बाणवण्याचे शिक्षण कार्यकर्त्यांनी देणे आवश्यक आहे. आजचे राजकीय कार्यकर्ते अशा तऱ्हेचे शिक्षण देत नाहीत. उलट प्रस्थापित नीतिनियमांबद्दल अनादराची भावना वाढेल अशा तऱ्हेची शिकवण ते देत असतात. आपण सुरू केलेल्या चळवळींमधून हिंसा निर्माण होते आहे असे दिसू लागल्यास ती चळवळ थांबवायची. एवढेच नव्हे, तर आपल्या कृतीबद्दल प्रायश्चित्त घेण्याची तयारी दर्शवायची ही नीती गांधीजींच्या सत्याग्रहामध्ये अभिप्रेत होती. या उलट, आज लोकक्षोभाचा दबाव शासनावर पडावा यासाठी या लोकक्षोभाच्या प्रदर्शनामध्ये थोड्याबहुत प्रमाणात तरी हिंसाचार होणे आवश्यक आहे, अशी आजच्या 'रस्त्यावरील राजकारणा'च्या पुरस्कर्त्यांची भूमिका असते. राजकीय नेत्यांनी आर्थिक आणि सामाजिक समतेला पोषक असे प्रत्यक्ष कार्य करण्याची भूमिका गांधीजींना अपेक्षित असली तरीसुद्धा त्यांच्या हयातीमध्येच ही गोष्ट शक्य झाली नाही. सध्या राजकारणच झाल्यामुळे राजकारणातील कार्यकर्त्यांकडून अशी अपेक्षा बाळगणेच अवास्तव ठरेल. तेव्हा 'रस्त्यावरील राजकारणा'चा पुरस्कार करणाऱ्यांनी गांधीजींच्या नावाचा किंवा सत्याग्रहाच्या तंत्राचा समर्थनासाठी उपयोग करणे हे गांधीजींना आणि सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाला निश्चितपणे अन्याय करणारे ठरेल.

• • •

युगवाणीकरिता साहित्य पाठविण्याबाबत सूचना :

- युगवाणीकरिता ई-मेलने लेखन पाठविताना edityug@gmail.com या पत्त्यावर पाठवावे. लेखन पोस्टानेही पाठविले जाऊ शकते.
- आलेल्या लेखनाबाबत साधारणतः दोन महिन्यांत निर्णय घेतला जातो. लेखन स्वीकारले असल्यास तसे कळविले जाईल. पुरेसे टपालशील जोडलेले असल्यास अस्वीकृत साहित्य पोस्टाने परत पाठविणे शक्य होईल. अस्वीकृत साहित्याबाबत वेगळा पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

अनुक्रमणिका

कथा

दुखरे वाद्य

मूळ हिंदी कथा :
मनोज रूपडा

मराठी अनुवाद :
गोरख थोरात



त्या संध्याकाळी मी नरीमन पॉइंटच्या समुद्रकिनाऱ्यावरील भिंतीवर पहुडलो होतो. कित्येक किलोमीटर प्रदीर्घ पसरलेली ती भिंत समुद्र व शहर दोघांनाही आपापल्या मर्यादांची जाणीव करून देत होती. तिथं माझ्यासारखी कैक माणसं बसलेली होती. काही जण शहराकडं पाठ फिरवून बसले तर काही जण समुद्राकडं. मी मात्र भिंतीच्या दोन्ही बाजूंना पाय टाकून पाठीवर पडून आकाशाकडे पाहात होतो. माझ्या उजवीकडे समुद्राच्या लाटा आदळत होत्या आणि डावीकडे मुंबई वेगानं धावत होती.

समुद्र आणि शहर विसरून मी मान्सूनच्या ढगांची दाटी पाहू लागलो. मनात आलं, या शहरात माझाही एखादा मित्र असता तर...! मुंबईत येण्याआधी माझ्या छोट्याशा शहरात मी मित्रत्वाचे खूप मनस्वी असे जीवन जगलो होतो. पण इथं माणसांची एवढी गर्दी असूनही एकसुद्धा वस्तू मला आपलीशी वाटत नव्हती.


मी या शहरी जीवनाची तुलना माझ्या छोट्या शहराच्या जीवनाशी करू लागलो. पण अचानक मला सॅक्सोफोनचा आवाज ऐकू आला. खरं म्हणजे, सॅक्सोफोन हे माझं खूप आवडतं वाद्य. रेडिओ वा ग्रामोफोनवर सॅक्सोफोनची धून ऐकताना मला खूप आनंद होई. असं वाटे जणू मी माझ्या एखाद्या जिवलग मित्रालाच भेटतो आहे. मी लगेच उठून बसलो. जणू एखाद्या जिवलग मित्राने मला हाक मारावी तसा. मी मागे वळून पाहिलं. थोड्याच अंतरावर एक म्हातारा माणूस समुद्राला व बुडणाऱ्या सूर्याला सॅक्सोफोन एक आर्त धून ऐकवत होता. त्याच्या खांद्यावर एक राखाडी कबूतर बसलेलं होतं, ठिपक्याठिपक्याचं. त्याची पांढरी दाढी आणि पांढऱ्या केसांच्या झुपक्यावर चमकणारी मावळत्या सूर्याची सोनेरी किरणं पडत होती. त्याच्या वाद्याचं गोल तोंडसुद्धा सोनेरी ताऱ्यासारखं चमकत होतं. ते दृश्य मला खूप सिनेमॅटिक वाटलं. मी त्याच्याकडं पाहतच राहिलो.

डॉ. गोरख थोरात
हिंदी विभाग,
सर परशुरामभाऊ महाविद्यालय,
टिळक रोड, पुणे - ४११ ०३०
मो.: ९४०३१८५०९७
संपर्क :
gnthorat65@gmail.com

मनोज रूपडा
अमन फूडस्, प्लॉट नं. १४६५,
जयस्वाल आईस फॅक्ट्रीजवळ,
वैशालीनगर,
नागपूर - ४४० ०१७
मो.: ९५१८७०६५८५

तो वाजवत असलेली धून जरा मला ओळखीची वाटली. डोक्याला जरा ताण दिल्यावर आठवलं की, ती पेटेटेक्सच्या 'ब्ल्यू सी ॲण्ड डार्क क्लाऊड'ची धून आहे. सुरुवातीला वाटलं, हा म्हातारा कोणी विदेशी इसम असावा. कारण सनई आणि बासरीच्या बाबतीत भारतीय हस्तकौशल्य आणि फुफ्फुसांवर विश्वास ठेवला जाऊ शकतो; पण सॅक्सोफोनच्या बाबतीत नाही. कारण सेक्सोफोनची धून अचानक एखाद्या शक्तिशाली लाटेप्रमाणे उसळते आणि कातळावर आपटून दुधाळ फेसात बदलून जाते. कधी ढगांच्या गडगडाटासारखी कोसळते. त्यामुळे एखादा भारतीय माणूस एवढ्या कुशलतेने सॅक्सोफोन वाजवू शकेल याविषयी मला शंका होती. हे वाद्य कुठल्याही घराण्याच्या शास्त्रीय नियमांची तमा न बाळगणाऱ्या फक्त बिटनिक लोकांच्याच रांगड्या फुप्फुसांच्या आवाक्यातलं होतं. मी आणखी जवळ जाऊन पाहिलं - तो म्हातारा आणि त्याचे कपडे हे त्याच्या स्वतःविषयीच्या बेफिकिरीचा अस्सल नमुना होते. तो कोणा बेवारशी मनोरुग्णासारखा दिसत होता. बहुधा कित्येक महिने त्याने अंघोळ केली नसावी. त्याच्या दाढीच्या नि डोक्याच्या केसांच्या जटा झाल्या होत्या. शरीरावर मळाचा जाड थर साचला होता आणि कपडे एवढे कळकटलेले होते की त्यांचा मूळ रंगही ओळखू येत नव्हता. माझ्याशिवाय इतरही लोक तिथं गोळा झाले होते. पण तो काही कोणा लोकप्रिय चित्रपटाचं गाणं वाजवत नव्हता. त्यामुळे लोकांची दृष्टी तिथल्या इतर आकर्षणांकडे वळली. लोकांचं येणं-जाणं आणि क्षणभर रेंगाळून उभं राहणं बराच वेळ चालू होतं.

थोड्या वेळानं अचानक जोरदार वारा वाहू लागला. नंतर त्या वाऱ्याचं रूपांतर वादळात झालं. तिकडं आकाशात मान्सूनच्या काळ्या ढगांचा थवा सुसाट वेगानं पुढं निघाला आणि काही कळायच्या आत मान्सूनच्या पहिल्या पावसानं मुंबईला झोडपून काढलं. एवढा अचानक आणि भयंकर पाऊस यापूर्वी मी कधीही पाहिला नव्हता. पण ऐकून मात्र होतो की, मुंबईतला पाऊस कोणालाही सोडत नाही. क्षणार्धात लोक अचानक लाठीमार सुरू व्हावा त्याप्रमाणे इकडे-तिकडे धावू लागले. पण मी या धावपळीत सामील झालो नाही. कारण तिथं लांब-लांबपर्यंत एकही शेड नव्हतं की सुरक्षित जागा नव्हती. त्यामुळं पळापळ करून जीवाचा आटापिटा करण्यात काहीच अर्थ नव्हता.



वादळी पावसाच्या या तुंबळ धुमश्चक्रीत सर्व काही अस्तव्यस्त झालं होतं. पण तो म्हातारा अजूनही तल्लीन होऊन सॅक्सोफोन वाजवत होता. वातावरण बदलाचा त्याच्यावर काडीमात्र परिणाम झाला नव्हता. पण त्याची धून मात्र बदलली होती. अगोदर तिथं किनाऱ्याला गोंजारणाऱ्या लहान-लहान लाटा येत होत्या; पण आता त्याच्या फुप्फुसातून वादळं उठू लागली. जणू तो आपल्या आतल्या वादळानं बाहेरचं वादळ शांत करू पाहात होता. जसजसा पाऊस रौद्र होत गेला, तसतसा वादळाचा परीघ विस्तारित गेला आणि जसजशा समुद्राच्या लाटा आपल्या उंचीनं, गतीनं आणि पूर्ण ताकदीनं नरीमन पॉइंटचा तो दगडी तट उद्ध्वस्त करण्यासाठी वेडावत गेल्या, तसतसा त्या म्हाताऱ्याच्या धमन्यांमधील त्याच्या स्वैर व प्रतिकाराच्या भावना रक्त उसळवत बाहेर येत गेल्या. हे वादळ लवकर थांबलं नाही तर येथे रक्तपाताची वेळ येणार, असंच मला वाटलं.

आणि झालंही तसंच. वाऱ्याच्या जोरदार तडाख्यासरशी एक मोठ्ठी टपून बसलेली लाट आली आणि दगडी किनाऱ्याला धडकून रस्त्यावर चढली. संपूर्ण मरीन ड्राईव्हवर समुद्राचं फेसाळ मळकट पाणी पसरलं. लाट परतली तेव्हा मी पाहिलं, तो म्हातारा लाटेच्या तडाख्यानं रस्त्यावर फेकला गेला होता. मी लगेच त्याच्याकडे धावलो. त्याला उचलण्याचा प्रयत्न करू लागलो. पण त्याचं शरीर खूप शिथिल झालं होतं. मला उचलता आलं नाही.

मग मीही तिथंच रस्त्यावर बसलो. त्याला माझ्या मांडीवर ओढून घेतलं. तो खूप धापा टाकत होता. मी त्याचे लांब-लांब विस्कटलेले केस त्याच्या चेहऱ्यावरून दूर सारले आणि चेहरा निरखून पाहिला. त्या चेहऱ्यावर मला जरा सूज दिसली. ही सूज समान्यपणे प्रत्येक दुःखाचा व वेदनेचा इलाज दारूमध्ये शोधणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर दिसत असते.

थोडा वेळ मी तसाच बसून राहिलो. काय करावं काही कळत नव्हतं. तो जोरजोरात धापा टाकीत होता आणि त्याच्या धापेसरशी दारूचे भपकारे येत होते. मी त्याचे गाल थोपटून पाहिले, त्याचे खांदे हलवले, पण त्याने डोळे उघडले नाहीत. मी घाबरलो, माझ्या मांडीवरच मेलाबिला तर! रस्त्याच्या पलीकडे मोठमोठ्या इमारती होत्या. पण तिथं आमच्यासारख्या भणंग लोकांना आश्रय मिळणं शक्य नव्हतं. रस्त्यावर टॅक्सी व कारचं येणं-जाणं अव्याहत चालू होतं. पण त्यांचा वेग एवढा प्रचंड होता की धरणीकंपही त्यांना रोखू शकेल की नाही, शंका होती.

माझ्या पाठीमागे अजूनही समुद्र किनाऱ्याला धडका देत होता. आभाळात ढगांची तुकडी पुन्हा दुसऱ्या आक्रमणाच्या तयारीने पुढे निघाली होती. पण मी त्या म्हाताऱ्याला मांडीवर घेऊन तसाच बसून राहिलो. पुन्हा एकदा त्याच्या चेहऱ्यावर नजर टाकली. क्षणभर वाटलं, हा चेहरा तरुणपणी खूप सुंदर असावा. वय, प्रतिकूल परिस्थिती आणि व्यसनांनी त्या चेहऱ्याचं सौंदर्य हिरावून घेतलं होतं; पण तरीही तो अर्धा भरलेला होता. त्यातली सर्जनशीलता पूर्णपणे संपलेली नव्हती.

चार-पाच मिनिटांनी त्याने डोळे उघडले. थोडा वेळ डोळ्यांची उघडझाप केल्यावर त्याची नजर माझ्या चेहऱ्यावर स्थिरावली. त्याच्या पापण्या जड झाल्या होत्या आणि डोळ्यांत मृत्यूची व दुर्बलतेची काळी अशुभ सावली स्पष्ट दिसत होती. माझ्या चेहऱ्यावरील मित्रत्वाच्या भावनेमुळे त्याचा जीव भांड्यात पडला असावा. तो मंद हसला आणि माझ्या खांद्यावर हात ठेवून उठून बसला. थोड्याच वेळात तो माझ्याशी अशा गप्पा मारू लागला. जणूकाही घडलेच नव्हते. मला अजिबात अपेक्षा नव्हती की तो असा चुटकीसरशी नीट होईल व शुद्धीवर येईल. साधारणपणे पहिल्या भेटीत लोक काय विचारतात? काय करता? कुठं राहता? किंवा कोठून आलात? वगैरे. पण त्याचे प्रश्न जरा विचित्रच होते :

- ''तुला पावसात भिजायला आवडतं?''

- ''तुला हवेशी बोलता येतं?''

- ''दारू प्यायल्यावर तुला आत दुःखाने भरलेला आनंद जाणवतो?''

अर्थात या प्रश्नांची उत्तरं मी 'होय' अशीच दिली. त्यामुळे तो खूश झाला.

''मग तर तुला संगीताचीही आवड असणार, काय?''

''हो'', मी म्हटलं ''विशेषकरून मला सॅक्सोफोन खूप आवडतो.''

''अरे व्हा! मग तर आपलं खूप छान जमेल.'' त्याने आपला हात माझ्या हाताशी भिडवून अतिशय प्रेमाने मला टाळी दिली.

''तुम्ही सॅक्सोफान खूप छान वाजवता. भारतात एवढा परफेक्ट सॅक्सोफोन वादक आहे, हे मला माहीतच नव्हतं.''

पण स्तुती ऐकून खूश होण्याऐवजी त्याचं तोंड कडवट झालं आणि त्यानं माझ्याकडून लक्ष वळवून फेसाळणाऱ्या, गरजणाऱ्या समुद्राकडं तोंड वळवलं. मुसळधार पावसाचे थेंब समुद्राच्या घट्ट पाण्यावर आपटत होते. त्यांचा धूर-धूर होत होता. थोडा वेळ तो त्या धुरकट पाण्याकडे तसाच पाहात राहिला. नंतर थोडा विचार करून माझ्याकडे तोंड फिरवत म्हणाला, ''तुझ्याकडे थोडेफार पैसे आहेत?''


त्याच्या या अनपेक्षित प्रश्नाने मी चमकलो. माझा हात खिशात गेला; पण विचार करू लागलो - हा संमोहित करणारा कोणी तांत्रिक तर नसेल? पण पैसे मागताना त्याच्या चेहऱ्यावर कोणतीही लाचारी, लज्जा वा संकोच नव्हता. त्यामुळे मी निर्धास्त झालो. खिशातून पाकीट काढून त्याला विचारलं, ''किती हवेत?'' त्यानं माझ्या हातातलं पाकीट आपल्या हातात घेतलं आणि एखाद्या मित्रानं दुसऱ्या मित्राच्या हातातलं सिगरेटचं पाकीट घेऊन सिगरेट काढावी इतक्या सहजतेनं पाकीट उघडून शंभराच्या चार-पाच नोटा बाहेर काढल्या आणि पाकीट माझ्या हवाली करून न बोलता तो चालू लागला.

''अहो!'' मीही त्याच्यामागे निघालो.

त्यानं वळून मागं पाहिलं.

''पाहिजे तर आणखी घ्या.'' मी पाकीट पुढे करत म्हणालो, ''पण एका अटीवर - आजची संध्याकाळ... आणि शक्य झालं तर रात्रीसुद्धा तुम्हाला माझ्यासोबत

अनुक्रमणिका



राहावं लागेल.''

''मी धंदेवाली बाई नाही.''

त्याने हे शब्द एवढ्या तुच्छतेने उच्चारले की मी गोंधळून गेलो. म्हणालो, ''अहो तसं नाही. खरं म्हणजे या शहरात मला एकही मित्र नाही. म्हणून मला तुमच्यासोबत थोडा वेळ घालवावासा वाटतोय.''

''माझी मैत्री सोपी नाही. खूप मोठी किंमत मोजावी लागेल त्यासाठी.''

''हे पाहा, मला तुमच्याशी वाद घालायचा नाही. मी तुमच्यासोबत फक्त थोडा वेळ घालवू इच्छितो.''

''पण का? माझ्याबरोबरच का?''

''कारण दारू प्यायल्यावर मला आतल्या आत एक दुखरा आनंद होतो. मला पावसात भिजायला आवडतं. मला हवेशी बोलता येतं. मला संगीताची आवड आहे आणि विशेष म्हणजे, मी पेटेटेक्सचा चाहता आहे.''

आता त्यानं आश्चर्यानं माझ्याकडं पाहिलं. मग माझ्या खांद्यावर हात ठेवून तो हसला आणि माझ्या गळ्यात हात टाकून चालू लागला. त्यानं विचारलं, ''तुला पेटेटेक्स कसा माहीत?''

''आता तुम्ही वाजवीत होता ना, ती धून मी पाच वर्षांपूर्वी रेकॉर्डवर ऐकली होती.''

''नाही, ती धून मी वाजवीत नव्हतो.'' त्यानं माझं बोलणं मध्येच तोडलं. ''ती धूनच मला वाजवीत होती.''

''म्हणजे? मी नाही समजलो.''

''ते तुला समजणारही नाही; कारण अशा गोष्टी समजायला वेळ लागतो.''

त्याच्या हा बुजुर्गपणाचा आव मला अजिबात आवडला नाही; पण नंतर मी विचार केला – जरी तो माझ्या गळ्यात हात टाकून चालत असला तरी शेवटी तो माझ्यापेक्षा दुप्पट वयाचा आहे. त्यामुळे त्याच्या अशा वागण्याचं काय आश्चर्य वा वाईट वाटून घ्यायचं? मी चालता चालता सहज विचारलं, ''तुम्ही हा सॅक्सोफोन केव्हापासून वाजवता?''

''पंचवीस वर्षांपूर्वी गोव्यात एका हिप्पी माणसानं मला हे गोड जहर चाखायला दिलं. नंतर हळूहळू मला त्याची सवयच झाली.''

''तुम्ही तुमचं संपूर्ण आयुष्य याच नशेत घालवलं?''

''नाही, आधी मी थोडाफार शुद्धीवर असायचो. एखादा तुसडा घोडेस्वार आपल्या घोड्याशी वागतो तसा त्यावेळी मी सॅक्सोफोनशी वागायचो. पण मी नशेच्या आहारी गेलो आणि मग हाच माझ्यावर स्वार झाला. कदाचित तुला माहीत नसेल; पण सूड घेण्याच्या बाबतीत याच्याइतकं क्रूर आणि कावेबाज वाद्य दुसरं नाही. आत्ता, थोड्या वेळापूर्वी तू पाहिलं असेल, तो मला किती वाईट पद्धतीनं छळत होता. समुद्राच्या लाटेनं त्याच्यापासून मला सोडवलं नसतं तर आज त्यानं माझा जीवच घेतला असता.''

''मग तुम्ही तो जहरी नाग नेहमी स्वतःबरोबर का बाळगता?''

त्यानं सॅक्सोफोनकडं खूप विचित्र नजरेनं पाहिलं. मग हसू लागला. ''गोष्ट जरा गुंतागुंतीची आहे. चल, कुठंतरी बसून बोलू.''

त्यानं माझा हात आपल्या हातात घेतला. पाण्यात मिसळलेल्या हवेच्या आणि हवेनं लपेटलेल्या पाण्याच्या संसर्गानं रोमांचित होत आम्ही दोघंच मरीन ड्राइव्हच्या चाकोरीवर चालत होतो. त्या भिजक्या हवेने आमच्यात अचानक तहान जागवली – अशी कडाक्याची तहान, जी फक्त दारूच भागवू शकत नाही.

म्हाताऱ्याच्या हातांची पकड अचानक घट्ट झाली. रस्ता ओलांडण्यासाठी तो पुढे झाला आणि समुद्रकिनाऱ्याची चाकोरी सोडून समोरच्या चाकोरीवर चढला. ही चाकोरी अवखळ शहराच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवत किनाऱ्याकिनाऱ्याने खूप दूरवर पसरलेली होती.

थोड्याच वेळात आम्ही दोघं एका बीअर बारसमोर उभं होतो. पण त्या दारातल्या पहारेकऱ्यानं कडक सलाम

अनुक्रमणिका

ठोकून दरवाजा उघडण्याऐवजी आमच्याकडं जरा त्रासिक मुद्रेनंच पाहिलं. विशेषतः म्हाताऱ्याचे चिखलाने माखलेले पचपचीत बूट आणि मळकट कपडे पाहून त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. पण आम्ही गिऱ्हाईक होतो, भिकारी नव्हतो, म्हणून झक मारून त्याला दार उघडावं लागलं.

आत गेलो आणि आत फरशीच्या सुंदर गालिच्यावर निर्दयपणे बुटांचे घाणेरडे ठसे उमटवीत हॉलच्या मधोमध पोचलो. आम्ही खुर्चीवर बसताच एक खूप नटलेली मुलगी आमच्याजवळ आली. तिने धंदेवाईक हास्याने माझ्याशी हस्तांदोलन केले आणि म्हाताऱ्याजवळ बसून त्याला मिठीच मारली.

''हॅलो भाऊ अंकल! कुठं होतास इतके दिवस? आम्हाला विसरलास की काय?''

''ए मस्का मारू नकोस!'' म्हाताऱ्यानं आपल्या गळ्यातून तिचा हात काढून टाकला, ''लवकर जाऊन रम घेऊन ये.''

ती लटक्या नाराजीनं उठून जाऊ लागली. मग अचानक आपल्या केसांना मागे झटका देत मला विचारलं, ''तुम्हीही रमच घेणार?''

मी मानेनंच होकार दिला. तिनं खूप गहिऱ्या नजरेनं माझ्याकडं पाहिलं. जणू एकाच घोटात ती मला अखखा पिऊ पाहात होती. मी नजर खाली वळवली.

म्हाताऱ्यानं दारूची वाट न पाहता कुठल्याही प्रस्तावनेशिवाय थेट कथा सुरू केली. त्याची बोलण्याची पद्धत, शब्दांची निवड आणि अभिव्यक्तीमध्ये काहीही तारतम्य नव्हते. तपशीलवार बोलण्याऐवजी तो इकडून-तिकडून शब्दांचे तुकडे गोळा करत होता. सॅक्सोफोनविषयी बोलता बोलता तो अचानक बारबालांविषयी बोलू लागला. त्या पोरींना झिडकारणं, पुचकारणं झाल्यावर त्यानं दारूवर छोटंसं भाषणच दिलं. भाषण संपताच तो अचानक एका कब्रस्तानात घुसला. आपल्या एका मित्राच्या कबरीसमोर थोडा वेळ शांतपणे उभा राहिला. नंतर जवळजवळ पळतच बाहेर आला आणि पुन्हा हात धरून मला ओढत दादरच्या एका चाळीत घेऊन गेला. तिथं वीस-पंचवीस वर्षांपूर्वी काही वादक मित्रांसोबत तो राहात होता. ते सर्वजण सिनेमासाठी बॅकग्राउंड म्युझिक कंपोज करत असत. त्या काळच्या मानाने त्यांना पैसाही अमाप मिळे आणि तो पैसा ते खूप चांगल्या पद्धतीने खर्चही करीत असते.

तासाभराच्या चर्चेनंतर एकूण जो आलेख तयार झाला, तो खूप चढउतारांचा होता. तो आणि त्याचे साथीदार सर्वजण वेगळ्याच धुंदीत जगत होते. त्यांना जगातल्या गोष्टींची तमा नव्हती. त्यांचे स्वतःवरही बंधन नव्हते. त्यांच्यात कोणतीही विशिष्ट भावना वा खास असा गुण नव्हता. त्यांनी गुणावगुणांमधलं अंतरच संपवून टाकलं होतं. एका वेगळ्याच धुंदीत विचित्र परिस्थितीत जगणारे लोक होते ते.

त्या काळातले त्याचे जवळपास सगळेच साथीदार हे संगीताच्या आणि वेगवेगळ्या नादांच्या आहारी गेलेले होते. त्यांच्यापैकी जे समजूतदार होते, ते चित्रपटांचे संगीत दिग्दर्शक वा पहिल्या श्रेणीचे कलाकार झाले होते. बाकीचे होते तिथंच राहिले; पण त्या काळात त्यांना नियमित काम मिळत गेलं आणि पैसाही चांगला मिळत गेल्यामुळे ते वेगवेगळ्या आकर्षणांच्या मागे एका मायाबाजारात वाहावत गेले. ते सगळे दारुडे होते, जुगारी होते, वेश्यागामी व उधारीवर जगत होते, तरीही ते अथपासून इतिपर्यंत कलाकार होते. याच वादक कलाकारांनी भारतीय चित्रपट संगीताला खास उंची गाठून दिली होती. याच पिढीने स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय 'मनाचा' कानोसा घेतला होता. याच बेसुऱ्या दारुड्यांनी भावनांच्या तारा झंकृत करून आणि त्यांच्या श्वासात श्वास मिसळून आपल्या युगाच्या स्पंदनांना लय मिळवून दिली होती.

जवळजवळ दोन तासांनी आम्ही बारच्या बाहेर आलो. आभाळात ढगांची कुजबूज पुन्हा सुरू झाली होती. पण आम्ही आधीच एका वादळवाऱ्याचा सामना केला होता आणि बाहेरूनंच नव्हे तर आतूनही भिजलेलो होतो. त्यामुळे आता कोणत्याही ओलाव्याची आम्हाला तमा नव्हती.

तीन पेगनंतर माझा म्हातारा मित्र जरा फार्मात आला आणि या मुंबईचा मालक असल्यासारखा छाती काढून चालू लागला. त्याच्या या चालण्यात दारू पिऊन मनातील मळमळ ओकणाऱ्या कोणा दुबळ्या वा भित्र्या माणसाचा तोरा नव्हता, तर सर्जनशील विरोधावर आधारलेला एक आक्रमकपणा होता.

कुठं जायचं! काहीही न ठरवता आम्ही दोघं चाललो होतो. त्यालाही कुठं जायची घाई नव्हती अन् मलाही नव्हती. आमचा मनस्वीपणा या शहराच्या हेतुपुरस्सर मग्नतेशी धडका घेत होता. पण फुटपाथवर

अनुक्रमणिका

आम्ही व्हीटीकडे जाणाऱ्या वेगवान गर्दीत अडकलो. पण गर्दीच्या चपळतेसमोरची आमची ही सुस्ती थकव्यामुळे वा दारूच्या गुंगीमुळे नव्हती, तर ती आमची प्रतिक्रिया होती. आता माझी खात्री पटली की माझ्या या म्हाताऱ्या मित्राचासुद्धा निखळ आनंद हिरावून घेणाऱ्या आणि शॉर्टकट वापरून यशाच्या शिखरावर पोचण्याच्या प्रवृत्तीला विरोध आहे.

मी चालताचालता त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. तो मजेत होता. पण त्याची चाल बदललेली होती. चालताना अचानक तो एका दुकानासमोर थबकला. दुकानाबाहेर एक मोठे शो-केस होते. त्यात वेगवेगळ्या प्रकारची वाद्ययंत्रे ठेवलेली होती. त्यात एक मोठा इलेक्ट्रॉनिक की-बोर्ड होता. म्हातारा त्या की-बोर्डकडे पाहू लागला. मला वाटलं, त्या की-बोर्डमध्ये काहीतरी खास असेल. पण म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर मला अचानक एक मोठी लाट आल्यासारखी दिसली आणि क्षणार्धात त्याची भावमुद्रा बदलून गेली. तो त्या वाद्याकडे एक उपकरण म्हणून नव्हे तर एखाद्या शत्रूप्रमाणे पाहात असल्यासारखा पाहू लागला. एका अनामिक भीषण तणावाने आणि तिरस्काराने त्याचा चेहरा थरथर कापू लागला.

''तुला हे माहीत आहे?'' त्याने की-बोर्डकडे इशारा करीत मला विचारलं.

''हो.'' मी विचार करून सांगितलं, ''हे एक जपानी सिंथेसायझर आहे.''

''नाही.'' तो मोठ्यानं म्हणाला, ''हा एक हुकूमशहा आहे. खूनी आहे. याच्यामुळेच दासबाबू आणि फ्रांसिसचा जीव गेला. हाच आम्हा सर्वांच्या बरबादीला जबाबदार आहे.''

मी आश्चर्यानं शो-केसकडं पाहिलं. अनेक पुश बटणं आणि पियानोच्या चाव्यांसारख्या त्या वाद्यात मला काहीच धोकादायक आढळलं नाही.

शो-केसवर नजर टाकून 'मी पुन्हा त्या म्हाताऱ्याकडं पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर एक विचित्र ताठा दिसत होता. त्याचं शरीर खूप ताप भरल्यासारखं थरथरत होतं. त्याच्या या विचित्र क्षोभामुळे मी अस्वस्थ झालो. त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याची समजूत घालत त्याला पुढे नेण्याचा प्रयत्न करू लागलो. पण तो जागेवरून हलण्यासही तयार नव्हता. नंतर वेडाचा झटका यावा तशी त्यानं फुटपाथवरची वीट उचलली. मी लगेच त्याचा हात धरला आणि मोठ्या जिकिरीनं त्याला शो-केसची मोडतोड करण्यापासून रोखलं. माझ्या या हस्तक्षेपानं तो आणखी बिथरला. त्यानं मला एका बाजूला ढकलून दिलं आणि फुटपाथच्या गर्दीत विचित्रपणे धक्काबुक्की करत पुढं निघाला. त्याच्या तोंडून घाणेरड्या शिव्या बाहेर पडू लागल्या. त्याच्या आत उठलेल्या या चक्रीवादळाच्या दिशेचा व वेगाचा अंदाज घेणं अवघड होतं. पण त्या चक्रीवादळाच्या मुळाशी तेच इलेक्ट्रिक इंस्ट्रूमेंट होतं, हे मात्र नक्की. त्या वाद्याला तो चोर, हरामखोर, अशा शिव्या देत चालला होता.

त्या उपकरणाबरोबरच ज्यांनी अशी नकली वाद्यांच्या आणि फसव्या माध्यमांच्या मदतीने चित्रपट गाण्यांच्या नकली ऑडिओ कॅसेटचं होलसेल मार्केट उभं केलं होतं, त्या संगीत कंपन्यांनाही तो शिव्या देऊ लागला. मग तो दुसऱ्या वाद्यांची कॉपी करून तशी वाद्ये बनवणाऱ्यांनाही शिव्या देऊ लागला. अशी वाद्ये बाजारात येताच संगीताच्या दलालांनी ती विकत घेतली होती आणि या कलांच्या आधारे आपला चरितार्थ चालविणाऱ्या वादक कलाकारांना काम मिळणं दुरापास्त झालं होतं.

''आता या हरामखोरांना कोणी सांगावं? त्यांना फक्त स्वतःचा धंदा दिसतो. कला आणि कलाकार गेले खड्ड्यात. कोणाला माहीत तरी आहे का की, ते जुने वादक कलाकार गेले कुठे? ज्यानं आयुष्यभर व्हायोलिन वाजवलं, त्याला टांगा चालवता येणार आहे का? तबला वाजवणारे हात मसाज करू शकणार आहेत का? पियानोवर नाचणारी बोटं खाटकाकडे कोंबडी सोलू लागली, तर कसं वाटेल?''

तो कोणाला प्रश्न विचारीत होता, कोणास ठाऊक. थोड्या वेळानं मी त्याच्याबरोबर आहे, हेही तो विसरून गेला. मला त्याच्या चेहऱ्यावर मनोरुग्णपणाची लक्षणे स्पष्ट दिसू लागली. अचानक तो फुटपाथवरून खाली उतरून रस्ता ओलांडू लागला. तिथे झेब्रा क्रॉसिंगही नव्हता किंवा पादचाऱ्यांसाठी सिग्नलही नव्हता. चालू ट्रॅफिकमध्ये अचानक घुसल्यामुळे वाहने गोंधळली. तो एका सिटीबसखाली येता येता बचावला; पण त्याला वाचवण्याच्या नादात एक टॅक्सी मात्र रस्ता दुभाजकाला धडकली. टॅक्सी अचानक थांबल्यामुळे मागून येणाऱ्या अनेक गाड्या गोंधळून थांबल्या. त्या गाड्यांचे ड्रायव्हर रागाने बडबडत खाली उतरले आणि त्यांनी त्याला घेरलं;

अनुक्रमणिका



पण एका ट्रॅफिक हवलदारानं त्याला त्यांच्या घेऱ्यातून सोडवलं. त्याच्या नाका-तोंडातून रक्त येत होते. तिकडे लक्ष देण्याऐवजी तो कोणाला तरी शिव्या देत होता. हवलदार त्याची कॉलर धरून त्याला ओढत रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला घेऊन गेला.

ट्रॅफिक सुरळीत व्हायला थोडा वेळ लागला. या दरम्यान माझी नजर त्या म्हाताऱ्यावरच होती. तो अडखळत फुटपाथवर चढला आणि पाहता पाहता पुढच्या सर्कलमध्ये डावीकडे वळला.

पादचाऱ्यांचा सिग्नल लागताच मीही त्या सर्कलकडे धावलो. सर्कलचे वळण पार करून नजर फिरवली तर त्या लांब ओल्या रस्त्यावर छत्र्यांच्या गर्दीत मला त्याचे भिजणारे शरीर दिसले. मोठ्या मुश्किलीनं मी त्याच्याजवळ पोचलो. आणि लगबगीनं त्याच्या खांद्याला स्पर्श केला. त्यानं वळून माझ्याकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर मारहाणीच्या खुणा दिसत होत्या. नाकातून अजूनही रक्त वाहात होतं. डोळ्यांमध्ये एक विचित्र असा परकेपणा होता. चौकातील लाल सिग्नलच्या उजेडात त्याचा कोरडा, दगडी चेहरा मला भीषण वाटला.

''तुमचं घर कुठं आहे?''

बहुतेक जवळून जाणाऱ्या वाहनांमुळे माझे शब्द त्याला ऐकू आले नसावेत.

''तुमचं घर कुठं आहे?'' यावेळी मी त्याच्या कानाजवळ तोंड नेऊन विचारले. पण त्याच्या चेहऱ्यावर अजूनही तोच कोरडेपणा होता. तिसऱ्यांदा जेव्हा मी तोच प्रश्न विचारला, तेव्हाही त्यानं त्याच कोरड्या नजरेनं माझ्याकडे पाहिलं. आता माझ्या लक्षात आलं की दारू, रक्त व पावसानं भिजलेल्या त्या म्हाताऱ्याला एकटं सोडणं, हा एक मोठा गुन्हा ठरेल...

मीही वैतागलो होतो. काय करावं, काही सुचत नव्हतं. तो नुसता आजारी असता तरी त्याला सांभाळता आलं असतं; पण हा मामला वेगळा होता. त्याच्या वेडसरपणात मला एक 'जिनिअस' तर्कसंगत व्यवस्था दिसली नसती, तर मी त्याला तिथंच सोडून निघून गेलो असतो; कारण मला समाजसेवेचा षौक नव्हता किंवा अशा वेड्या वा बेवारशी लोकांना आश्रय द्यायला मला मदर टेरेसाचा कुत्राही चावलेला नव्हता.

काय करावं? अचानक आठवलं. कदाचित त्या बीअर बारवाल्या मुलीला म्हाताऱ्याच्या घरचा पत्ता माहीत असावा. मी लगेच टॅक्सी थांबवली. म्हाताऱ्याला आधार देऊन टॅक्सीत बसवलं आणि ड्रायव्हरला सँडहर्स्ट रोडला घेऊन जायला फर्मावलं.

आम्ही पुन्हा सँडहर्स्ट रोडच्या बारसमोर पोचलो. रात्रीचे साडेअकरा वाजून गेले होते. ड्रायव्हरने ब्रेक लावताच म्हाताऱ्याचं शिथिल शरीर माझ्या मांडीवर झुकलं. तो झोपेत होता किंवा बेहोश होता. मी त्याला हळूच सीटवर झोपवलं.

''पाच मिनिटं इथंच थांब, मी आत्ता जाऊन येतो.'' मी ड्रायव्हरला म्हटलं आणि खाली उतरलो. ड्रायव्हर जरा गोंधळात पडला. त्याला भीती वाटत असावी की हा माणूस भाडं न देता या म्हाताऱ्याला माझ्या गळ्यात मारून निघून गेला तर... मी पन्नासची नोट त्याच्या हातात दिली आणि जिना चढून बारमध्ये गेलो.

दरवाजा उघडताच कर्कश संगीताचा कानठळ्या बसविणारा आवाज माझ्या अंगावर धावून आला. मस्तकाला झिंग आणणारे ते संगीत होते. ध्वनिलहरींचा एवढा भयंकर वापर मी याआधी कधीच पाहिलेला

अनुक्रमणिका

नव्हता. थोडा वेळ चक्रावलो. नंतर त्या अंधूक निळ्या प्रकाशात मी त्या मुलीला शोधू लागलो. ती मुलगी डान्सिंग फ्लोअरवर इतर मुलींसोबत नाचत होती. मी पुढं होऊन तिचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला; पण ती एका मालदार माणसाला रिझवण्यासाठी पुन्हा पुन्हा आपले केस उडवत नितंब हालवत होती. समोरच्या खुर्चीवर बसलेला तो मध्यम वयाचा रंगेल माणूस त्या मुलीच्या प्रत्येक अदेवर शंभराशंभराची नोट उधळीत होता. त्याच्या गळ्यातलं व बोटांतलं सोनं खूप अश्लील पद्धतीनं चमचमत होतं.

खूप प्रयत्न करूनही त्या मुलीनं माझ्याकडं लक्ष दिलं नाही. शेवटी मलाही खिशातून नोटा काढाव्या लागल्या. हातात नोटा येताच बारमधल्या प्रत्येक वेटरचं, वेट्रेसचं आणि डान्सर मुलींचं लक्ष माझ्याकडं वळलं. त्या मुलीकडं मी फक्त एकदाच पाहिलं आणि ती हसत हसत माझ्याजवळ आली. नोट तिच्या हातात देण्याआधी मी तिला दोन-तीनदा मोठ्यानं म्हणालो, ''तुझ्याशी जरा महत्त्वाचं बोलायचंय.''

इतर आवाजांमुळे माझं बोलणं तिला कळलंच नाही. माझा हात धरून ती मला मागच्या दरवाजाकडं घेऊन गेली. इकडं रेस्टॉरंटचं किचन होतं.

''हां, बोला लवकर. काय काम आहे? माझा कस्टमर सोडून आलेय मी.''

''संध्याकाळी मी ज्या म्हाताऱ्यासोबत आलो होतो, त्याला तू ओळखतेस?''

''असं असं, तो होय? तो माझा रेग्युलर कस्टमर नाहीये, पण आल्यावर तबीयत खूश करून जातो.''

''पण त्याची तब्येत बिघडलीय... त्याच्या घरचा पत्ता तुला माहितेय का?''

''पूर्ण पत्ता माहीत नाही; पण बहुतेक तो दादरमधील कबुतरखान्याजवळ कोणत्या तरी चाळीत राहतो. काय बरं नाव त्या चाळीचं... आठवत नाही आता.''

''हे पाहा, मी या शहरात नवीन आहे. मला इथले रस्ते वगैरे काहीच माहीत नाही. तुम्ही या बाबतीत मला काही मदत केली तर फार बरं होईल.''

''नाही.'' तिनं स्पष्ट नकार दिला, ''तुम्हाला कळत कसं नाही? कस्टमर सोडून मला येता येणार नाही.''

मी गप्प बसलो. बाहेर आल्यावर टॅक्सीजवळ जाऊन खिडकीतून आत पाहिलं. म्हातारा अजूनही तसाच पडलेला होता - एखाद्या प्रेताप्रमाणे. मी दार उघडलं आणि सीटवर बसलो.

''दादर चलो.'' मी ड्रायव्हरला म्हटलं. मला माझाच आवाज खूप खोल गेल्यासारखा वाटला.

ड्रायव्हरनं चावी फिरवून इंजिन सुरू केलं. थोडं पुढं गेल्यावर यू टर्न घेतला आणि त्या लांब-रुंद रस्त्यावर आमची टॅक्सी टॉप गिअरवर धावू लागली.

मी एक सिगरेट पेटवली आणि मनातल्या मनात विचारांचे रवंथ करू लागलो, इतके की शेवटी माझी कानशिलं दुखू लागली. त्या विचारांच्या चोथ्यातून कुणास ठाऊक कधी एक शून्य निघालं आणि त्या शून्याच्या भाराखाली दबून माझे डोळे कधी मिटले, हे माझं मलाही कळलं नाही.

ड्रायव्हरनं जेव्हा खांदे थोपटत मला उठवलं तेव्हा थोडा वेळ मला काहीच कळेना. मी जोरात डोकं झटकून नशेचा अंमल आणि झोप उडवण्याचा प्रयत्न केला आणि म्हाताऱ्याला शुद्धीवर आणण्यासाठी त्याला हलवू लागलो; पण हा-हू करण्यापलीकडं त्याचा काहीच प्रतिसाद नव्हता. शेवटी खाली उतरून त्याचे दोन्ही खांदे धरले व त्याला दारातून बाहेर ओढलं. मी त्या म्हाताऱ्याचं शरीर ओढत रस्त्याच्या कडेला नेऊ लागलो. बेहोश असूनही पठ्ठ्यानं त्याची बॅग काही सोडली नव्हती. तो पूर्ण बेहोश होता; पण ज्या हातानं त्यानं बॅगेतून डोकावणाऱ्या सॅक्सोफोनची मान धरली होती, तो हात मात्र पूर्णपणे शुद्धीवर होता.

मी त्याच्या देहाला कबुतरखान्याच्या ग्रीलला टेकून बसवलं. वळून टॅक्सीचं भाडं दिलं आणि घड्याळात पाहिलं. सव्वातीन वाजले होते. रात्र आणि सकाळ यांच्या मधली वेळ. मी काही करूही शकत नव्हतो आणि कुठं जाऊही शकत नव्हतो. थोडा वेळ इकडचा तिकडचा विचार केल्यावर मीही त्याच्याशेजारी ग्रीलला पाठ टेकवून बसलो.

रात्रीच्या त्या शेवटच्या प्रहरी सगळ्या हालचाली झोपी गेल्या होत्या. कोणताही आवाज येत नव्हता. पण मला मात्र माझ्या हृदयाचे ठोके ऐकू येत होते. मी स्वतःबद्दल विचार करू लागलो. आपण बापाच्या इस्टेटीशी वैर पत्करलं. त्यानंतर ज्या क्षुद्र ऐषारामात जीवन जगत होतो, त्या जीवनात एखाद्या खऱ्या प्रेमाची अजिबात शक्यता नव्हती. आपल्या स्वतंत्र बाण्याच्या नि कुठंही बांधील न राहण्याच्या शेखीपायी करीअरलाही मी

लाथ मारली होती. ही शेखी कायम ठेवण्यासाठी मी नेहमी ज्या वांझोट्या ताठ्याचा वापर करीत होतो, त्या ताठ्यात आज पाऊस, दारू, रक्त आणि सॅक्सोफोनची एक आर्त धून, सगळे येऊन मिसळले होते आणि त्यांनी ओलावा निर्माण केला होता. त्याच ओलाव्याच्या कोमल बाहुपाशात एखाद्या दमलेल्या बाळासारखा मी झोपी गेलो.

अचानक अनेक पंखांच्या फडफडाटाने मला जाग आली. मी डोळे चोळत इकडं तिकडं पाहिलं – म्हातारा तिथं नव्हता. पुन्हा एकदा पाठीमागे पंखांची फडफड ऐकू आली. मागं वळून पाहिलं. तो म्हातारा कबुतरखान्यात मधोमध पडलेला होता. त्याच्या अंगावर अनेक कबुतरं फिरत होती. इतकी की कबुतरांनी त्यांचे संपूर्ण अंग झाकून टाकलं होतं. त्याचं तोंडसुद्धा व्यवस्थित दिसत नव्हतं. मी घाबरलो. मेलाबिला की काय? पण लगेच मला माझ्या बावळटपणाची लाज वाटली; कारण मेलेल्या प्राण्यावर कावळे बसतात, कबुतरं नाही.

मी कबुतरखान्याची ग्रील ओलांडून आत उडी मारली. माझ्या आत येण्यामुळे सगळी कबुतरं घाबरून उडून गेली. मी म्हाताऱ्याजवळ पोचलो. मला त्याचा चेहरा दिसला – शांत व हसरा, काल रात्रीच्या उपद्रवाची एकही खूण त्याच्या चेहऱ्यावर नव्हती. त्याच्या कपड्यांवर, चेहऱ्यावर बाजरी, ज्वारी आणि मक्याचे दाणे चिकटलेले होते. बहुतेक त्याने स्वतःच तो चारा कबुतरांसाठी आपल्या अंगावर पसरून ठेवला होता.

त्यानं प्रेमानं माझ्याकडं हात केला. मी त्याच्या हातात हात देताच एक कबुतर त्याच्या हातावर बसलं. पायात काळा धागा बांधलेलं ठिपक्याठिपक्याचं कबुतर मला आठवलं, काल संध्याकाळी हेच कबुतर त्याच्या खांद्यावर बसलेलं होतं.

''तू शांतपणे उभा राहा. माझ्या हातातला हात काढण्याचा प्रयत्न करू नको. मग बघ, हळूहळू हा तुझाही मित्र होईल.''

म्हाताऱ्याशी सहमत होत मी मान हलवली आणि आनंदमिश्रित आश्चर्यानं पाहिलं. ते कबुतर आमच्या दोघांच्या तळव्यांच्या गाठीवर येऊन बसलं. मग त्यानं झटक्यात मान वर करून माझ्या डोळ्यांत पाहिलं. त्याच्या डोळ्यांत कुतूहल व अनोळखीपणाचं मिश्रण होतं. थोडा वेळ माझ्याकडं बघत राहिल्यावर त्यानं मान तुकवली आणि दोन-तीन पावलं पुढं येऊन म्हाताऱ्याच्या हातावरून माझ्या मनगटावर आलं. त्याच्या खडबडीत स्पर्शानं मला एक हलकीशी शिरशिरी आली. पण मी हात थरथरू दिला नाही. त्यानं मान वर करून पुन्हा माझ्याकडं पाहिलं आणि बुजरेपणानं दोन पावलं आणखी पुढं आलं. थोडा वेळ माझ्या विश्वासार्हतेची पारख झाल्यावर तीन-चार पावलं पुढं येऊन माझं मनगट आणि कोपर यांच्यामध्ये आलं. आता त्याच्या डोळ्यांत भीती नव्हती. पुढच्याच क्षणी ते माझ्या खांद्यावर येऊन बसलं. मी हळूहळू हात वर करून त्याच्या पंखांवर हात फिरवू लागलो.

''पूर्वी हा रॉबर्टचा दोस्त होता.'' म्हाताऱ्यानं माझ्या खांद्यावरील कबुतराकडं मोठ्या प्रेमानं पाहिलं.

''त्याला जाऊन किती दिवस झाले?'' मी कबुतरावर हात फिरवत विचारलं.

म्हातारा थोडा वेळ गप्प झाला. तो त्या क्षणाच्या आठवणीनं कष्टी झाला. एक-दोन क्षणानंतर मोठ्या मुश्किलीनं त्यानं तोंड उघडलं, ''आज त्याचं पहिलं वर्षश्राद्ध आहे.''

मला दिसलं. काल रात्रीची वेदना आणि हताशा पुन्हा त्याच्या चेहऱ्यावर घोंगावू लागली होती. मी त्याला त्या दुःखातून बाहेर काढण्यासाठी त्याच्या खांद्याला आधार देत उभं केलं. ''चला, मी तुम्हाला तुमच्या घरी सोडतो.''

त्यानं आश्चर्यानं माझ्याकडं पाहिलं. ''तुला कसं कळलं मी इथं राहतो ते?''

''काल जेव्हा तुमची शुद्ध हरपली होती, तेव्हा मी पुन्हा त्याच बारमध्ये गेलो होतो.''

''पण तिथं तर मला कोणीच ओळखत नाही, ती मुलगी सोडून...!'

''होय, त्याच मुलीनं मला हा पत्ता सांगितला.''

''ती माझ्याबद्दल काही बोलली?''

''नाही. ती खूप बिझी होती.''

त्यानं एक खोलवर श्वास घेतला. एखादी कडू गोळी घेतल्यासारखा त्याचा चेहरा कडवट झाला. तो माझ्या खांद्याचा आधार घेत पुढं निघाला. आम्ही रस्ता पार करून डावीकडून एका गल्लीत वळलो. त्यानं माझ्याकडं न पाहताच विचारलं, ''तुला ठाऊक आहे ती मुलगी कोण आहे ते?''

मी नकारार्थी मान हलवली आणि कुतूहलानं त्याच्याकडं पाहू लागलो. त्याला काहीतरी सांगायचं

अनुक्रमणिका

होतं; पण सांगता सांगता राहून गेलं. त्याच्या चेहऱ्यावर पुन्हा कडवटपणा गिळण्याचं दुःख उमटलं.

पुढं गेल्यावर तो एका अरुंद बोळात शिरला. फारतर आठ-दहा फूट रुंद बोळ. तिच्या दोन्ही बाजूंनी दाटीवाटीनं वसलेल्या लाकडी व्हरांडा आणि जिन्याच्या चाळी. चाळीच्या प्रत्येक कोपऱ्यात कोंदटपणा, दमटपणा आणि अंधार कायमस्वरूपी भरलेला.

करकरत्या जिन्यावर रेलिंगच्या आधारे चढून आम्ही दुसऱ्या मजल्याच्या चौथ्या खोलीत आलो. तो खूप जोरजोरात धापा टाकत होता. मग त्याने खिशातून चावी काढली आणि दरवाजा उघडला.

''मी निघतो आता.'' मी अत्यंत नम्रपणे निरोप घेऊ लागलो.

त्यानं जरा प्रेमळ नाराजीनं माझ्याकडं पाहिलं, ''तुला एक कप चहाही पाजू नये, अजून तरी मी एवढा कफल्लक झालेलो नाही.'' तो माझा हात धरून मला ओढत आत घेऊन गेला.

आत पलंग व खुर्ची - एवढंच सामान होतं. पलंगावर मळकट अंथरूण पसरलं होतं. उशी वगैरेचा पत्ताही नव्हता. माझं लक्ष भिंतींवर गेलं आणि आश्चर्यचकित झालो. भिंतींवर जागोजागी खिळे ठोकून वेगवेगळी वाद्ये अडकवलेली होती. सर्वांत आधी माझं लक्ष तबल्याकडे गेलं. त्याचं चामडं फाटलं होतं आणि आत चिमण्यांनी घरटं केलं होतं. तबल्याशेजारी एक तुटकं व्हायोलिन होतं. त्याच्या तारा गायब झाल्या होत्या. भिंतीच्या कोपऱ्यात सारंगी ठेवलेली होती. कोळ्याच्या जाळ्यानं वेढलेली. सारंगीच्या वर बासरी लटकवलेली होती. बुरशीनं तिची छिद्रं बंद झाली होती. वाळवीनं तर तिचा माऊथपीसही खाऊन टाकला होता. खाली फरशीवर हार्मोनियम पडलेला होता. तोही पूर्ण खिळखिळा.

म्हाताऱ्यानं व्हरांड्यात जाऊन कोणा 'छोकऱ्याला' चहाची ऑर्डर दिली. तोवर मी या अवशेषांचे अवलोकन करीत होतो. चहा घेऊन एक पोरगा आला. त्यानं आमच्या हातात चहाचे ग्लास देण्याआधी आपल्या खिशातून एक लहानशी डायरी व पेन बाहेर काढला. म्हाताऱ्यानं त्या दोन्ही वस्तू आपल्या हातात घेतल्या आणि तो त्या उधार खात्याची मळकी पानं उलटू लागला. नंतर एका पानावर काहीतरी लिहिण्यासाठी पेन पुढं करताच तो पोरगा म्हणाला, ''आत्ताचे दोन कटिंग धरून सत्तर चहा होतील. शेठ तिकडं माझ्या नावानं बोंबा मारतोय. पैसे मिळाल्यावरच चहा द्यायचा - असं सांगितलंय मला...''

म्हाताऱ्यानं एकदाच त्या पोराकडं पाहिलं. खिशातून रात्रीच्या भिजलेल्या नोटा बाहेर काढल्या. एक पन्नासची आणि एक शंभरची अशा दोन नोटा त्याच्या हातावर ठेवल्या. उधार खात्याची पानं फाडून गॅलरीतून खाली रस्त्यावर फेकून दिली आणि चहाचे ग्लास त्याच्या हातातून हिसकावून चहा मोरीत ओतून दिला.

पण त्याच्या या कृतीचा त्या पोरावर काहीच परिणाम झाला नाही. तो शांतपणे ग्लास उचलून चालता झाला.

थोडा वेळ तिथं शांतता पसरली. नंतर अचानक त्याला झटका आला, ''तू बस... मी आलोच.''

त्यानं कटवट तोंड केलं आणि गॅलरी पार करून जिना धाडधाड उतरून खाली गेला.

म्हातारपणातील चिडकेपणा हा अनेकदा बालपणाच्या अवखळपणापेक्षाही जास्त जीवघेणा असतो. या म्हाताऱ्याची गोष्ट तर त्याहून वेगळी होती. मला वाटलं, या भांडकुदळ माणसाबरोबर आणखी काही वेळ थांबलो तर मीही एखाद्या मोठ्या भानगडीत सापडणार. क्षणभर वाटलं, गुपचूप इथून निघून जावं. पण माझी जिज्ञासा अजून शमली नव्हती. मला आणखी खोलात जाऊन या माणसाचा आतला आवाज ऐकायचा होता. असा आवाज जो जगातल्या अनेक अडगळींच्या गोंगाटाखाली दबला गेला होता.

पण मला भीतीही वाटत होती; कारण तो आवाज शोधता शोधता मी स्वतःच त्यात एवढा बुडून जाईन आणि पुन्हा वर येणं अवघड होऊन बसायचं. कारण खाली निसरडं शेवाळ होतं, गुंतागुंतीची करुणा होती, दगडी विवरं होती. त्यात अडकून मी बुडून जाऊ शकत होतो; पण माझी मानसिक दशा एखाद्या हावरट पाणबुड्यासारखी झाली होती जो दक्षिणावर्त शंख शोधण्यासाठी जीवाची पर्वा न करता आयुष्यभर पाण्यात बुड्या मारत राहतो आणि विशेष म्हणजे, जी वस्तू त्याला शोधायची आहे, ती त्याला व्यवस्थित माहीतही नसते.

पण जेव्हा मी माझ्या गतकाळातल्या गोष्टी आठवतो तेव्हा मला माझ्या या वृत्तीला दोष द्यावासा वाटत नाही; कारण माझ्या या उत्सुकतेमागे कोणताही नीचपणा नव्हता. पण मी जरा जास्तच गुंतत चाललो

होतो आणि ही गुंतागुंत खूप नाजूक होती. म्हणून तटस्थ असूनही मी स्वतःला या चिकटपणापासून वाचवू शकत नव्हतो.

त्या अजबघरात त्याची वाट पाहात-पाहात शेवटी मी थकून गेलो. रात्रीच्या जागरणामुळंही माझं डोकं जड झालं होतं. थोड्याच वेळात मला डुलकी लागली.

नंतर एका हळुवार चाहुलीनं, माझे डोळे उघडले. मी पाहिलं, तो दोन ग्लास घेऊन माझ्यासमोर उभा होता. पण त्या ग्लासांमधून वाफाळत्या चहाच्या गंधाऐवजी देशी दारूचा भपकारा येत होता. त्यानं एक ग्लास माझ्यासमोर धरला आणि दुसरा स्वतःच्या तोंडाला लावला. एका दमात ग्लास रिकामा करून त्यानं शर्टाच्या बाहीनं तोंड पुसलं आणि विचित्र नजरेनं माझ्याकडं पाहिलं. त्याचे लाल डोळे आणि धसमुसळ्या वागण्यावरून माझ्या लक्षात आलं की, कालच्यापेक्षा आज तो जास्त फार्मात आहे. ज्या हातात त्यानं माझ्यासाठी ग्लास धरला होता, तो हात थरथर कापत होता.

''ही माझी नाही, रॉबर्टची खोली आहे. आणि आता तू माझा नाही तर रॉबर्टचा पाहुणा आहेस. रॉबर्ट घराण्याची सकाळ दारूनेच होत असते. जर तुला या घराण्याचे कायदे-कानून शिकायचे असतील तर लाव हा ग्लास तोंडाला.''

मी किंचित हसलो आणि त्याच्या हातातून ग्लास घेऊन एका दमात रिकामा केला.

''गुड... व्हेरी गुड. आता तू आमच्या लायनीत आलास. जमेल... तुझी माझी चांगली गट्टी जमेल.''

त्याने आनंदाने आणखी दोन ग्लास भरले. आम्ही त्या दिवसाची सुरुवात अशा बेफिकिरीनं केली. आता पुढे काहीही होवो.

दारूचा पहिला ग्लास बहिरी ससाण्याप्रमाणे झडप घालून माझ्या छातीत उतरला. दुसऱ्या ग्लासातली दारू संथ घारीप्रमाणे हिंडू लागली. मी हळूहळू वर-वर जाऊ लागलो; पण खालच्या सगळ्या गोष्टी मला स्पष्ट दिसत होत्या. दुसरा ग्लास संपवल्यावर मी भिंतीवर लोंबकळणाऱ्या वाद्यांकडं खोल नजरेनं बघितलं. या वेळचं माझं पाहणं जरा वेगळं होतं. थोड्या वेळापूर्वी त्या वस्तू माझ्यासाठी निर्जीव होत्या; पण आता त्यातून काहीएक अर्थ ध्वनित होत होता.

''तुझ्या या मित्रांशी माझी ओळख करून देणार नाहीस?'' मी वाद्यांकडे पाहात विचारलं.

म्हातारा त्याच्या ग्लासातल्या हिंदकाळणाऱ्या दारूकडं टक लावून पाहात होता. त्यानं भुवया उंचावून माझ्याकडं पाहिलं. मग सरळ भिंतीकडे नजर उचलून मोठ्या विचित्रपणे हसला. ग्लास रिकामा करून टेबलावर ठेवला आणि भिंतीजवळ गेला. सगळ्यात आधी त्यानं तबल्यावर हात ठेवला, ''हा रफ़ीक खान आहे. उस्ताद सलाउद्दीन खाँ साहेबांचा सर्वांत धाकटा उडाणटप्पू पोर. पूर्वी कॉंग्रेस हाऊसमध्ये कोणा बाईच्या मुजऱ्याच्या मैफिलीत तबला वाजवायचा. नंतर या चित्रपट लाईनमध्ये आला.'' आता त्यानं तबला सोडून सारंगीवर बोट ठेवलं, ''आणि हा सलीमसुद्धा त्याचाच जोडीदार. त्यांच्या संगतीत नंतर वासुकीप्रसाद आणि जमुनादास हेही वाहावत गेले. (त्याचा इशारा बासरी आणि सनईकडं होता.) हे चौघेही आपापल्या गाण्यात, संगीतात पक्के होते. पण त्यांच्या जगण्यात मात्र लय-ताल नव्हता. चौघेच्या चौघे खूप बेसुरे आणि बेताल होते. पण ते प्रामाणिक होते, यात शंका नाही.'' नंतर या चारही वाद्यांकडं अभिमानानं आणि आपुलकीनं पाहून त्यानं जमिनीवर पडलेल्या हार्मोनियमवर नजर टाकली, ''हा हार्मोनियम नितीन मेहताचा आहे. हे पोरगं सगळ्यात जास्त चालू होतं. पाच वर्षांपूर्वी आमच्याकडं सा-रे-ग-म शिकायला आला आणि आजच्या घडीचा तो खूप लोकप्रिय संगीत दिग्दर्शक आहे. कारण त्याची बोटं हार्मोनियमवरून घसरून लगेच सिंथेसायझरवर आली आणि संगीतावरचं प्रेम धंद्यावर जाऊन बसलं. चान्स आणि स्कोपमध्ये घुसत त्याने अशा काही उचापती केल्या की काहीच कळलं नाही. नंतर त्याला एक सिंधी पार्टनर मिळाला. त्यानं संगीताच्या धंद्यात खूप मोठ्या प्रमाणावर इन्व्हेस्टमेंट केली. जुनी वाद्यं आणि वादक कलाकारांच्या जागी नवी वाद्यं आली. पूर्वी रेकॉर्डिंगच्या वेळी दीडदोनशे वादक कलाकारांचा ताफा गोळा व्हायचा. पण आता सगळ्या वाद्यांच्या आवाजासाठी आणि वेगवेगळ्या इफेक्टसाठी केवळ एकच इलेक्ट्रॉनिक यंत्र पुरेसं झालं होतं. त्या यंत्राच्या विरोधात मी आणि रॉबर्टनं आवाज उठवला. अनेकदा 'फिल्म आर्टिस्ट असोशिएशन'ला विनंती अर्ज लिहिले. या यंत्रावर बंदी घाला. पण दुर्दैव... कोणीही आम्हाला साथ दिली नाही आणि आर्टिस्ट असोसिएशननंही काही केलं नाही.''

आपल्या काही साथीदारांचा परिचय करून देऊन

अनुक्रमणिका

आणि आपल्या काही साथीदारांवर ओढवलेल्या प्रसंगाचा तपशील सादर केल्यावर त्यानं खिशातून सिगरेटचं पाकीट काढलं. एकल सिगरेट आपल्या ओठांमध्ये धरून त्यानं ते पाकीट माझ्यापुढं धरलं. मीही गुपचूप सिगरेट पेटवली.

दोन-तीन मोठे झुरके घेतल्यावर तो खूप बारकाईने आणि सहानुभूतीच्या नजरेने व्हायोलिनकडे पाहू लागला, ''सर्वांत जास्त मला दासबाबूची दया येत होती... बिचारा, ए ग्रेडचा आर्टिस्ट, पण सी ग्रेडचं जीवन जगत होता. खूप भिडस्त आणि संवेदनशील माणूस. ट्रेजिक धून वाजविण्यासाठी खास त्याला बोलावलं जायचं. नितीन मेहतासारख्या हरामी लोकांनी त्याचा खूप गैरफायदा घेतला. एकाच बैठकीत त्यांच्याकडून चार-पाच धून रेकॉर्ड करायचे. नंतर त्याच धुनींमध्ये काटछाट करून वेगवेगळ्या गाण्यांत आणि प्रसंगात वापरायचे. आपल्या धुनांच्या अशा गैरवापरामुळे दासबाबू उदास व्हायचा. पण कधीच त्याने या गोष्टीची तक्रार केली नाही.

पण एके दिवशी गाण्याची कंपोजिंग चालू होती. तेव्हा व्हायोलिन वाजवता-वाजवताच तो रडू लागला. त्या गाण्याच्या शेवटी मलाही एक मोठा पीस वाजवायचा होता. पण मी उठलो आणि दासबाबूचा हात धरून स्टुडिओच्या बाहेर निघून आलो.''

त्यानं सिगरेटचं थोटूक स्टूलवरील ॲश ट्रेमध्ये कुस्करलं. खुर्ची जवळ ओढली आणि आपले लटपटणारे पाय सांभाळत तो खुर्चीवर बसला. मग म्हणाला, ''त्या रात्री संपूर्ण चाळ झोपलेली असताना मध्यरात्री मला दासबाबूच्या खोलीतून व्हायोलिनचा आवाज ऐकू आला. माझ्या लक्षात आलं की दासबाबू फक्त व्हायोलिन वाजवत नव्हता, तर रडतही होता. थोडा वेळ मी शांतपणे ऐकत राहिलो. यापूर्वी मी कधीही असे आर्त स्वर ऐकलेले नव्हते. शेवटी मला राहावलं नाही. मीही माझा सॅक्सोफोन उचलला आणि त्याच्या पाठीवर हात फिरवण्यासाठी एक गहिरा स्वर खिडकीकडं भिरकावला. माझ्या या सहानुभूतीनं तो क्षणभर थांबला. नंतर त्याचं व्हायोलिन अचानक ओक्साबोक्शी रडू लागलं. मी त्याला रडू दिलं. सॅक्सोफोनच्या रुंद छातीवर डोकं ठेवून रडणाऱ्या व्हायोलिनची ती धून मी कधीच विसरू शकत नाही... ती धून एवढी मोठी, वळणावळणाची आणि कातर होती की, सॅक्सोफोन-सारखा बहादूरही थोडा वेळ डगमगला. पण मी बिथरण्याच्या आतच पियानोच्या एका मंद स्वरानं मला सावरलं. रॉबर्टची एक जुनी नोट आमच्या स्वरांकडं दोन्ही हात पसरत आली आणि आम्ही तिघांनी एकमेकांना आलिंगन दिलं...''

''अशा तऱ्हेने आम्ही तिघे पुढं निघालो. पण थोड्याच वेळात मागून सारंगीचा आवाज आला. ती खूप घाईघाईनं आमच्याकडं धावत आली. जणूकाही आम्ही तिला सोडूनच चाललो होतो. आम्ही आमच्या स्वरयात्रेत तिला सामील करून घेतलं. खरं म्हणजे आम्हीही तिला सोडू शकत नव्हतो; कारण ती खूप भावुक होती आणि शब्दाशब्दांत कष्टी होणं तिचा स्वभाव होता...

आता बासरी आणि सनईसुद्धा जाग्या झाल्या होत्या. त्या दोघींचे आळोखेपिळोखे देणारे आवाज खूप सुस्त पावलांनी बाहेर आले. पण आम्ही खूप लांब निघून गेलो आहोत, हे पाहून त्या दोघींनी आपला वेग वाढवला आणि थोड्याच वेळात तिथं सुरांचं वादळ घोंघावू लागलं. कोणतेही प्रयोजन नसताना, सराव नसताना, आपोआप तिथं ऑर्केस्ट्रा स्वतःहूनच सुरू झाला. त्या ऑर्केस्ट्राचा कोणताही ठरलेला असा शो नव्हता. तिथं ऐकायला 'रसिक श्रोते' नव्हते. कारण हे कंपोझिशन नव्हे तर एक अनागोंदी होती. आम्ही सगळे धिंगाणा घालत होतो. प्रत्येक स्वर आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या पुढं जाऊ पाहात होता. पियानो एखाद्या मस्तवाल हत्तीसारखा सगळ्यांना तुडवत होता. तेवढ्यात सारंगी पियानोला चुकवून पुढं निघून गेली. पण सनईच्या तीव्र, मंजूळ व धारदार आवाजाने सारंगीच्या ताराच तोडून टाकल्या. श्वास घ्यायला सनई थांबली आणि तेवढ्यात बासरीनं लांब उडी मारली व सगळ्यात पुढं निघून गेली...

बासरीला धडा शिकवावा म्हणून मी सॅक्सोफोन तोंडाला लावला. पण अचानक माझ्या लक्षात आलं की व्हायोलिनचा आवाज कुठंतरी हरवलाय. मी कान देऊन ऐकू लागलो. मला वाटलं इतर तीव्र आवाजांमुळे व्हायोलिनचा आवाज दबला गेला असावा; पण नाही. तो ऐकूच येत नव्हता. इतरांचा खूप धिंगाणा चालू होता. त्यामुळे त्यांना काहीच कळलं नाही. पण मी जरा सावध होतो. थोडं आणखी कान देऊन ऐकल्यावर मला भास झाला की, संगीताच्या या संगतीत काहीतरी विसंगत असं घडतंय... मला काहीतरी तोडण्याचा आवाज येत होता... हे स्वराघात खूप भयंकर होते. त्यात एखाद्या वस्तूला कायमस्वरूपी संपविण्याची क्रूरता होती. दोन-तीन मोठ्या आघातांनंतर तो आवाज बंद झाला. मी

विचारात पडलो. तो आवाज कोणती वस्तू आपटण्याचा आहे, हे माझ्या लक्षात आलं नाही; पण आवाज दासबाबूच्या खोलीतूनच आला होता. मी सॅक्सोफोन टेबलावर ठेवला आणि दार उघडून बाहेर गॅलरीत आलो. समोरच्या चाळीत सर्व दारं-खिडक्या बंद होत्या. दासबाबूच्या खोलीच्या दाराच्या फटीमधून पिवळ्या उजेडाचे कवडसे चमकत होते. मधेमधे एक सावली त्या चमकणाऱ्या कवडशांच्या आड यायची आणि कवडसे लुप्त व्हायचे. जेव्हा ते कवडसे वारंवार आणि खूप वेगाने लुप्त होऊ लागले, तेव्हा माझ्या लक्षात आलं की आत कोणीतरी तळमळतंय... मी लगेच जिन्याकडे धावलो. खाली उतरून तेवढ्याच त्वरेने समोरच्या चाळीचा जिना चढलो. दासबाबूच्या खोलीच्या बंद दरवाजासमोर पोचलो. माझा एक हात माझ्या धडधडणाऱ्या हृदयावर ठेवून दुसऱ्या हातानं मी दार ढकललं. आत दासबाबू फरशीवर व्हायोलिनच्या तुकड्यांमध्ये पडलेला होता. छातीवर हात ठेवून तळमळत होता. मी धावत जाऊन त्याला माझ्या बाहुपाशात घेतलं. मला पाहून त्याच्या चेहऱ्यावर थोडंसं स्मित झळकलं. पण दुसऱ्याच क्षणी कोणा अज्ञात शक्तीने त्यांच्या चेहऱ्यावर पोतेरं फिरवलं.''

दासबाबूच्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणांचं हे भयंकर वर्णन माझ्या कल्पनेत बराच वेळ एखाद्या चित्रपटासारखं फिरत राहिलं. म्हातारा गप्प झाला होता. पण त्याचे शब्द माझ्या कानात घुमत होते. नंतर मी त्या भीषण प्रभावातून बाहेर आलो. पाहिलं, म्हातारा खोल विचारात बुडालेला होता. मी त्याच्या तंद्रीत व्यत्यय आणला नाही.

किती वेळ आम्ही गप्प बसून राहणार होतो, कुणास ठाऊक! जर पण तेवढ्यात ते ठिपक्याठिपक्याचे कबुतर आमच्या दोघांच्या मधे आलं. आधी खोलीच्या उंबऱ्यावर बसून कुतूहलाने डोळे भिरभिरत आमच्याकडं पाहात राहिलं. नंतर उडून म्हाताऱ्याच्या मांडीवर येऊन बसलं. म्हातारा आपल्याच तंद्रित होता, पण तरीही त्याचे हात सवयीनं त्याच्या पंखांवरून फिरू लागले.

''ते एवढे अस्वस्थ का असायचे?'' मी जरा संकोचानं विचारलं.

''कोण?'' म्हाताऱ्यानं माझ्याकडं पाहात विचारलं.

''दासबाबू?'' मी म्हटलं.

माझ्या प्रश्नानं म्हातारा पुन्हा अपसेट झाला. त्याचं तोंड पुन्हा कडवट झालं आणि अचानक तो उभा राहिला. त्याचे हात पुन्हा थरथरू लागले. ती थरथर थांबविण्यासाठी त्यानं मुठी आवळल्या. त्याच्या चेहऱ्यावरून वाटलं, तो पुन्हा भडकेल; पण तो काहीच बोलला नाही. रागानं दातओठ खात होता.

त्याची ही अवस्था पाहून मीही घाबरलो अन् ते कबुतरही घाबरलं. कबुतरानं घाबऱ्याघुबऱ्या नजरेनं म्हाताऱ्याकडं पाहिलं आणि लगेच खोलीतून बाहेर उडालं.

थोड्या वेळानं माझ्या पोटात कळ मारून आली. मी बराच वेळ अंडकोषावरील दाबाकडे दुर्लक्ष करत होतो. पण जेव्हा सहन होईनासं झालं तेव्हा उठलो आणि खोलीमध्ये लोंबकळणारा पडदा दूर सारून खोलीच्या दुसऱ्या भागात गेलो. तिथं एक लहानसं किचन होतं. किचनशेजारीच पत्र्याचा दरवाजा होता. किचनच्या प्लेटफॉर्मवर बऱ्याच अडगळीच्या वस्तू अस्तव्यस्तपणे पडलेल्या होत्या. मी त्यांच्याकडे लक्ष दिलं नाही. माझं सगळं लक्ष त्या पत्र्याच्या दरवाजावर होतं. कारण त्या दरवाजाच्या पलीकडं मला त्या वेळच्या माझ्या वेदनेचा मुक्तिमार्ग दिसत होता.

संडासातून बाहेर आल्यावर मी सगळ्या वस्तू न्याहाळून पाहिल्या. त्या वस्तूंना स्वत:ची अशी वेगळी ओळख उरली नव्हती. त्या सर्वांची एकच ओळख होती अडगळ. फक्त पियानो वेगळा ओळखू येत होता आणि तोही आकार मोठा असल्यामुळे मी पियानोजवळ गेलो त्याच्यावर पडलेलं इतर साहित्य बाजूला केलं आणि न्याहाळून पाहिलं. त्याचे दोन्ही फूट पायडल तुटलेले होते. कीबोर्डची बहुतेक बटणं निघालेली होती. मी त्याच्या आत पाहण्यासाठी लाकडाचं झाकण वर उचचलं पण पुढच्याच क्षणी मला ते झाकण बंद करावं लागलं. आत काहीच नव्हतं. त्याच्या गाद्या, स्ट्रिंग फेल्टहेमर काहीच नाही. फक्त एक प्रकारचं रितेपण होतं आणि त्या रितेपणातून विचित्र अशी दुर्गंधी येत होती. बहुधा त्यात काहीतरी मरून सडून गेलं होतं...

पडदा सारून मी पुन्हा खोलीच्या पुढच्या भागात आलो.

''हा पियानो रॉबर्ट मास्टरचा आहे का?'' मी म्हाताऱ्याला विचारलं.

तंद्रीतून बाहेर येत त्यानं माझ्याकडं मान वळवली

अनुक्रमणिका

आणि प्रेमळ नजरेनं माझ्याकडं पाहिलं.

"आत जो पियानो आहे... तो रॉबर्ट मास्टरचाच आहे का?"

त्यानं मानेनंच होकर दिला आणि खाली पाहू लागला.

"तो एवढा घायाळ का?" मी पुन्हा मूर्खासारखा प्रश्न विचारला. माझा प्रश्न किती चुकीचा वा अनावश्यक होता, हे मला माहीत नव्हतं. त्यानं त्रासिकपणे माझ्याकडे पाहिलं. मग तो खुर्चीवरून उठला. खोलीतून बाहेर गेला. गॅलरी ओलांडली आणि धडाधडा जिना उतरू लागला. आधी मी हतप्रभ झालो. मग एका अज्ञात शक्तीने त्याच्यामागं धावलो. मी जिना उतरून गल्लीत येईपर्यंत त्यानं गल्ली ओलांडली होती आणि जेव्हा मी गल्ली ओलांडली तेव्हा तो रस्ता ओलांडत होता. मी वेग वाढवला. जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांपासून स्वत:ला वाचवत रस्ता ओलांडला आणि पळतच त्याच्याजवळ पोचलो.

"अहो!" मी त्याचा खांदा धरून हळूच त्याला मागं ओढलं.

"काय?" मी त्याला थांबविल्यामुळं तो अडखळला; पण त्याचा स्वर जास्तच त्रासिक झाला होता. "माझ्यामागं का लागलायेस? निघ इथून. मला कोणाच्याही सहानुभूतीची गरज नाही."

"अहो पण तुम्ही चाललात कुठं?"

"कुठंही जाईन? तू कोण विचारणार? तुझा- माझा संबंध काय?"

"संबंध आहे." आता मीही जरा दमात घेतलं, "मला येडझवा समजतोस की काय?" त्याचा शर्ट मी दोन्ही हातांनी गच्च धरला.

माझ्या या पवित्र्यामुळे तो जरा ढिला पडला. त्यानं तोंड वेंगाळत नि:श्वास टाकला. मी माझी मूठ आणखी आवळली. "तू एकदम वाया गेलेला आणि एक फालतू माणूस आहेस, हे मला माहीत आहे. आणि तरीही तू आपल्यासारखा तीसमारखा या जगात कोणीच नाही या भ्रमात जगतोयेस. तू फार काळ जगणारही नाहीस. पण तुला वाटतंय की तुझा मृत्यू खूप भीषण व्हावा आणि सगळ्या जगानं तुझ्यासाठी हळहळावं. पण तू हे जे कंगालीचं जीवन जगतोयस ना, ते तू कंगाल आहेस म्हणून नव्हे तर लोकांना स्वत:कडं आकर्षित करता यावं म्हणून... जशा वेश्या आपला चेहरा रंगवतात ना, तूही



तुझ्या शरीरावर तशाच या चिंध्या सजवतोयेस..."

मीही नशेत होतो. त्यामुळं आवाज चढणारच होता. "गो अॅण्ड फक योर आर्ट." मी ओरडलो आणि लगेच वळून वेगानं चौकाकडं निघालो. पण कबुतरखान्याजवळून स्टेशनच्या रस्त्याकडं वळणार तेवढ्यात मला माझ्या खांद्यावर त्याच्या हाताचा स्पर्श जाणवला.

मला मागं वळून पाहावंसंही वाटलं नाही.

"तुला त्रास द्यायचा माझा हेतू नव्हता." त्याचा आवाज थोडासा हळवा होता "माझ्यामुळं तुला खूप त्रास झालाय... जा आता कधीच माझ्यासारख्या भणंग माणसांच्या नादी लागू नकोस."

मी मागं वळून त्याच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवले. "अहो, मी कल्पना करू शकतो की रॉबर्ट आणि दासबाबूंशिवाय जगताना तुम्हाला किती त्रास होत असेल. पण तुम्हाला असं वाटत नाही का, की आपण दारू आणि या फालतू येडझवेपणापायी त्या महान दु:खाचा अपमान करतोय? सॅक्सोफोनच्या स्वरांबरोबर तुम्हाला त्या दु:खाचं सब्लिमेट (उदात्तीकरण) करता येणार नाही का?"

त्यानं खूप विवश नजरेनं माझ्याकडं पाहिलं आणि नकारार्थी मान हालवू लागला. जणू मी त्याला एखादी मेलेली गोष्ट जिवंत करायला सांगितलं होतं. मी त्याचा

निर्विकार चेहरा पाहातच राहिलो. तिथं निखळ शून्यता होती, भाव किंवा भावना नव्हती. स्वत:चा चेहरा माझ्या नजरेपासून लपविण्यासाठी त्यानं तोंड फिरवलं आणि तो कबुतरांच्या थव्याकडे पाहू लागला.

शहरातली धावपळ, गडबड, गोंधळ आणि त्रासापासून निर्लिप्त, बेफिकीर होऊन कबुतरं दाणे टिपत होती. तो हळूहळू पुढं झाला आणि लोखंडी ग्रीलजवळ जाऊन उभा राहिला. त्या गोल घेऱ्यात फडफडणाऱ्या राखाडी, पांढऱ्या आणि ठिपक्याठिपक्याच्या असंख्य कबुतरांच्या पंखांच्या शीतल सौंदर्यात तो त्याची तात्कालिक वेदना झाकून टाकील, असं काहीतरी शोधत होता.

बराच वेळ तो तसाच उभा होता. यादरम्यान त्यानं सदऱ्याच्या बाहीनं दोनदा आपले डोळे पुसले. त्याची माझ्याकडं पाठ होती. त्यामुळं आपल्या डोळ्यांतून त्यानं काय पुसलं, हे मला दिसलं नाही. थोड्या वेळानं आपलं त्यानं तोंड माझ्याकडं फिरवलं आणि सरळ माझ्या डोळ्याला डोळा भिडवला. आता तो खूप प्रेमानं माझ्याकडं पाहात होता. नंतर पुढं येऊन त्याने आपले हात माझ्या गळ्यात टाकले व पुन्हा मला आपल्या घराकडं घेऊन जाऊ लागला . घरी पोचताच तो एखाद्या लालची माणसासारखा त्या वस्तूंवर तुटून पडला. एक जुनं कापड घेतलं आणि हातात येणाऱ्या प्रत्येक वस्तूवरची धूळ तो झटकू लागला. नंतर त्यानं छताच्या कोपऱ्यात लोंबकळणारं कोळ्याचं जाळं स्वच्छ केलं. संपूर्ण खोली चांगल्या प्रकारे झाडून झाल्यावर त्याने एका स्वच्छ कापडाने सगळी वाद्यं घासून पुसून चकाचक केली. हे स्वच्छता अभिमान चालू असताना तो सतत शीळ घालीत होता. त्याच्या शीळेत हळूहळू वजन येत गेलं व थोड्याच वेळात त्याने आपला देह आणि आत्म्याचे विखुरलेले स्वर छानपणे 'ट्यून' केले.

थोड्या वेळाने पडदा सारून तो आत गेला. त्याच्या किचन कम बाथरूममधून बराच वेळ वाहत्या पाण्याचा आवाज येत होता. मी त्याच्या खोलीतील नवीन व्यवस्थेवर दृष्टिक्षेप टाकला. आता सगळी वाद्ये त्यांच्या दारिद्र्यात आणि कंगालीतही सन्मानाने चकाकत होती. केवळ वाद्यंच नव्हे तर एक अलबम वगळला बाकी सगळं साहित्य आपल्या खऱ्या रंगारूपात उजळून निघालं होतं. अलबम मात्र एका कोपऱ्यातील टेबलावर दुर्लक्षित पडलेला होता. त्याच्या कव्हरवर धूळ साचलेली होती. मला त्याची दैना पाहवेना. मी त्याची धूळ झटकली व विचार न करता उघडून पाहू लागलो. खूप जुने फोटो त्यात होते. सगळ्या त्याच्या यार दोस्तांचे.

काही फोटो स्टेज-प्रोग्रामचे होते व काही रेकॉर्डिंग स्टुडिओचे. मधेमधे प्राइज डिस्ट्रिब्युशन व पार्ट्यांचेही फोटो होते. हे फोटो म्हाताऱ्याच्या तारुण्यातील होते. त्या फोटोंमध्ये तो रसिकता आणि तारुण्यानं ओथंबलेला दिसत होता.

पण मध्यांतरानंतर अलबममधील फोटो शांत, उदास आणि शेवटीशेवटी तर खूपच वेदनादायी होत गेले. अलबमच्या शेवटच्या दोन पानांवर दोन पार्थिव शरीरं जोरदार विलापाच्या मधोमध शांत पडलेली होती. अंत्ययात्रेला निघण्यापूर्वीचा विश्राम. एक प्रेत तिरडीवर होतं आणि दुसरं ताबुतात. ताबुतातल्या प्रेताचे दोन्ही हात गायब होते. मला खूप आश्चर्य वाटलं. हा रॉबर्ट मास्टरचा फोटो तर नाही? मग त्याचे दोन्ही हात...?

मी त्या भयंकर आश्चर्याचा विचार करीत होतो. एवढ्यात पडदा सारून म्हातारा पुढं आला. मी त्याच्याकडं पाहातच राहिलो. त्याचा दाढी केलेला चेहरा छानपैकी चमकत होता. त्याने पिंगट रंगाची पँट व पांढरा सदरा घातला होता. त्यावर एकही डाग दिसत नव्हता. त्याच्या या स्वच्छ, नीटनेटक्या आणि जोरदार एन्ट्रीनं मी सुखावलो. मला वाटलं तो आता परिस्थितीशी दोन हात करण्याच्या मन:स्थितीत आहे.

तो पंख्याखाली आपले लांब केस सुकवत होता. त्याचे पांढरे मुलायम केस त्याच्या उभट व गोऱ्या चेहऱ्यावर डोलत नव्हते तर तरंगल्यासारखे वाटत होते.

''आता तू व्यवस्थित वाटायला लागलास.'' मी म्हटलं.

त्यानं आपल्या बोटांनी केस झटकत माझ्याकडे पाहिलं. ''आतापर्यंत मी चुकीचा दिसत होतो की काय?''

''नाही.'' मी हसत म्हणालो. ''आतापर्यंत तू चूक आणि बरोबर यांच्यामध्ये होतास.''

त्यानं डोकं झटकून केस मागे केले आणि मला न्याहाळीत म्हणाला, ''तू चांगला गुरू भेटलास यार मला. मला तुझ्यामधल्या बॅलंसचा हेवा वाटतो.''

''वाण्याची औलाद आहे मी.'' मी हसत म्हटलं, ''तराजू नेहमी बरोबरच असतो तसं मला मोलभाव करणं

आवडत नाही. पण गंमत आहे नाही? मी तुझ्या धसमुसळ्या आणि फक्कड जीवनाकडं आकर्षित झालो आणि तू माझ्या व्यापारी वृत्तीवर.''

थोडा वेळ त्यानं मला न्याहाळलं. मग पहिल्यांदा त्यानं माझ्या खाजगी गोष्टीत रस दाखवत आपुलकीनं विचारलं, ''तू काय काम करतोस?''

''सध्यातरी काहीच करत नाही.'' मी म्हटलं.

''तू काहीच करत नाहीस, यावर मी कसा विश्वास ठेवू? सध्या तू दुसरं काही करत नसशील, पण एका म्हाताऱ्या आणि सनकी माणसाला झेलतो आहेस, काय?'' आणि तो हसू लागला.

''नाही.'' मीही त्याच्याबरोबर हसू लागलो. ''मी तुला झेलत नाही तर तुला एन्जॉय करतोय. तू खूप स्वादिष्ट पण पचायला तेवढाच अवघड असा माणूस आहेस. तुझ्या स्वभावात बाहेरून कुरकुरीत आणि आतून रसाळ अशी एक वेगळीच चव आहे.''

तो आणखी जोरजोरात हसू लागला. मग त्यानं आपली सॅक्सोफोनची बॅग उचलली. टेबलाच्या एका कप्प्यातून गिफ्ट पॅकेट बाहेर काढलं आणि माझा हात धरून घरातून बाहेर आला.

''तुझं घर मला घर कमी आणि तालमीचा हॉलच जास्त वाटतो.'' मी जिना उतरत त्याला म्हणालो.

''खरं म्हणजे...'' जिना उतरल्यावर माझ्या खांद्यावर हात ठेवत तो म्हणाला, ''ही खोली आम्ही सर्वांनी मिळून घेतली होती, तालमीसाठी. पण नंतर हाच आमचा ऐयाशीचा अड्डा झाला. घर सोडून आलेल्या वा घरातून हाकलून दिलेल्या लोकांसाठी तर हे फार मोठं आश्रयस्थान होतं माझं आणि रॉबर्टचं खाणंपिणं आंघोळपांघोळ आणि झोपणं वगैरे सगळं इथंच चालायचं...''

तो पुन्हा एकदा त्याच्या भूतकाळात गेला, पण या वेळचं त्याचं भूतकाळात जाणं जरा वेगळं होतं. त्याच्या आविर्भावात त्रासिकपणा नव्हता तर स्थिरता होती, एक व्यवस्थित प्रवाह होता.

''सर्व प्रकारे असभ्य वागणूक करत असूनही आम्ही सगळे एक होतो. आमची भांडणं अनेकदा मारहाणीपर्यंत जायची आणि 'बसायच्या' वेळी सगळ्या गोष्टी विसरून जायचो. पण एका कालावधीनंतर संगीताचा धंदाच चेंज झाला आणि सगळंच बदललं. आमचा संपूर्ण ग्रुप विखुरला गेला. फक्त काही ए ग्रेडचे आर्टिस्ट तेवढे उरले. पण सिनिअर असूनही मला आणि रॉबर्टला काम फार कमी मिळायचं. कारण नव्या काळात जे कंपोजिंग आलं होतं, त्यामध्ये कॉपी करण्यावर आधारलेल्या येडझवेपणाची रेलचेल होती. त्यात पियानो वा सॅक्सोफोनसारख्या क्लासिक वाद्यांच्या एकट्या पीसला काहीच जागा नव्हती.''

चालता चालता तो थांबला व मला पुन्हा ओढू लागला. आम्ही रस्ता ओलांडला आणि एका कॅफेमध्ये घुसलो. नाष्ट्याची ऑर्डर दिल्यावर तो थोडा वेळ शांत बसला. मग माझ्याकडं न पाहता काहीतरी पुटपुटू लागला. स्वत:शीच बोलत असल्यासारखाः ''साला नीतीन मेहता, एकटा तूच हुशार निघालास. बाकी सगळे बावळट. तबला-पेटीला लाथ मारलीस, खूप चांगलं केलंस. तू जर नवी वाद्ये नव्या पद्धती शिकला नसता, तर तुझीही अशीच दैना झाली असती. आम्ही पडलो येडझवे वाद्यांच्या पावित्र्याच्या नि रागशुद्धतेच्या गप्पा झोडत बसलो. रॉबर्ट तर स्वत:ला खूप मोठा तीसमारखां समजायचा. कारण त्याच्यासारखा पियानोवादक अख्ख्या मुंबईत दुसरा नव्हता. त्यानं तुझ्या नवीन यंत्रांची हेटाळणी केली होती. हे यंत्र म्हणजे लहान मुलांचं खेळणं आणि कॉम्प्युटर गेम, असंच तो म्हणायचा. पण आज याच लहान मुलांच्या खेळण्यानं त्याच्या हत्तीला चारी मुंड्या चित केलं. रॉबर्टच कशाला त्या काळातला प्रत्येक ए ग्रेड आर्टिस्ट याच गुर्मीत असायचा की, त्यांच्या स्किलवर कोणीच मात करू शकत नाही. पण त्यांचं 'स्किल' आणि बाजाराची गरज यांच्यामध्ये जो गॅप आला होता, तो त्यांना दिसलाच नाही.''

म्हातारा आपल्याच तंद्रीत बोलत होता आणि ब्रेडबटरबरोबर कॉफीचा घोटही घेत होता. तोंडाच्या या दुहेरी वापरामुळे त्याला ठसका लागला. मी लगेच पाण्याचा ग्लास पुढे करून त्याच्या तोंडाला लावला. पाण्याबरोबर घशात अडकलेला ब्रेडचा तुकडा खाली गेला. थोडा वेळ खोकून झाल्यावर त्यानं मोठा श्वास घेतला आणि तुच्छतेनं मान हलवत म्हणाला, ''शेवटी त्यांच्या ह्याच गुर्मीनं त्यांचा घात केला. सगळे खड्ड्यात गेले. जुन्यांपैकी कोण उरलंय? कोण कुठंय आणि काय करतंय, काही पत्ता नाही. कधी गाठ पडली तरी एकमेकांना टाळून जातात. एकदा मला वासुकीप्रसाद चौपाटीवर बासरी विकताना दिसला. बांबूच्या बारीक बारीक कामट्यांमध्ये बासऱ्या खोचून ठेवल्या होत्या. तो

बासरी वाजवूनही दाखवायचा आणि विकायचाही. मी त्याला भेटलो नाही. फक्त त्याचं विकणं-वाजवणं पाहात राहिलो. अचानक मनात विचार आला जर सॅक्सोफोनही पितळेऐवजी बांबूचा असता तर मलाही गल्लोगल्ली सॅक्सोफोन विकावा लागला असता, नाही का? पण मला माझ्या आतून होय-नाही काहीच उत्तर मिळालं नाही.

आणि निरुत्तर होणं हे नेहमीच घातक असतं. निरुत्तर झाल्यामुळे मी खूप जास्त दारू ढोसली. माझे पाय लटपटू लागले. स्वत:ला कसाबसा सावरत मी चर्नी रोडचा एक ओव्हर ब्रिज क्रॉस करत होतो. रस्ता ओलांडल्यावर जिना उतरण्यासाठी मी जसा पायरीवर पाय ठेवला तेवढ्यात शेवटच्या पायरीवर मला रॉबर्ट मास्टर दिसला. आधारासाठी त्यानं रेलिंग पकडली होती आणि खिन्न नजरेनं उंच जिन्याकडं पाहात होता. नशेत झिंगणारा उंच धिप्पाड देह, हाय ब्लडप्रेशरनं धपापणारी छाती आणि थकल्याभागल्या पायांची विखुरलेली शक्ती एकवटत होता. जिना चढणं सोडाच, तो उभं राहण्याच्याही अवस्थेत नव्हता. पण मला खात्री होती की तो जिना चढणारच. कारण तो हार मानणाऱ्यांपैकी नव्हता, मग विजय प्राणघातक ठरला तरी बेहत्तर...''

शेवटी तो ओठ आवळून दोन दोन पायऱ्या एकदम चढू लागला. वर आल्यावर हात पुढं करून मी त्याला माझ्याकडं ओढलं आणि काळजीच्या स्वरात विचारलं, ''कुठं गेला होतास? आणि एवढे दिवस होतास कुठं?''

तो धापा टाकत होता. त्याची नजर माझ्या बॅगमधून डोकावणाऱ्या सॅक्सोफोनवर होती. त्यानं विचारलं, ''स्टुडिओतून येतोयेस का?''

मी नकारार्थी मान हालवली. हो म्हटलं असतं तर लगेच त्यानं माझ्या खिशात हात घालून माझी दिवसभराची कमाई जबरदस्तीनं काढून घेतली असती. माझ्याकडं खूप कमी पैसे होते. त्यामुळे खोटं बोलण्यावाचून पर्यायच नव्हता. पण खोटं बोलणंही प्रत्येकाला जमत नसतं. त्याला लगेच कळलं की माझा खिसा रिकामा नाही. त्याने एका हाताने झडप घालून माझी कॉलर धरली आणि दुसऱ्या हाताने माझा खिसा चाचपू लागला. ''साल्या, खोटं बोलतोस? काढ शंभर रुपये.''

''आधी कॉलर सोड.'' मी रागावलो. माझ्या कॉलरवरील पंजाची पकड सैल झाली. मी पँटच्या खिशातले सगळे पैसे काढून खूप नाराजीने त्याच्या हातात ठेवले आणि कॉलर सोडवून काही न बोलता जिन्याकडं वळलो.

त्याने पुन्हा मागून झडप घालत माझी कॉलर पकडली. पैसे पुन्हा माझ्या खिशात कोंबले आणि मला ढकलून दिलं. ''साल्या, मित्र आहेस म्हणून उसने पैसे मागत होतो. भीक मागत नव्हतो. आजपासून कधीच तुझ्या खिशाला हात लावणार नाही, जा...''

त्याच्या या कृतीमुळे मी आणखी भडकलो आणि जिना चढून दोन्ही हातांनी त्याचा शर्ट धरला. त्याला ढकलत रेलिंगजवळ नेलं आणि जोरानं त्याच्यावर डाफरलो, ''दोन वर्षांपासून तुझी दादागिरी सहन करतोय. दोन वर्षांपासून तू स्वत:ही नीट जगत नाहीस आणि मलाही जगू देत नाहीस. बोल, काय हवंय तुला? झालंय काय तुला, सांग तरी!''

त्यानं खूप रागानं माझ्याकडं पाहिलं. नंतर त्याचा राग कमी होत गेला आणि डोळ्यात विवशता डबडबली. त्यानं मान खाली घातली. बराच वेळ तो तसाच उभा होता. त्याच्या या स्तब्धतेनं मी वैतागलो. दारूच्या व रागाच्या भरात त्याला तीन-चार झापडीही मारल्या. पण माझ्या या हल्ल्यापासून त्यानं वाचण्याचा प्रयत्नही केला नाही. खाली मान घालून उभा राहिला. बहुधा तो आत भिरभिराणाऱ्या कुठल्याशा वस्तूला धरायचा प्रयत्न करीत होता. थोड्या वेळानं त्यानं मान वर केली आणि माझा हात धरून मला ओढून घेऊन जाऊ लागला.

आम्ही ज्या विचित्र तऱ्हेनं जिना उतरत होतो, त्यात आम्ही खाली कोसळण्याचा धोका होता. तो स्वत:ही सावध नव्हता आणि मलाही सावध होऊ देत नव्हता. शेवटी आम्हा दोघांचे पाय गडगडले आणि त्या गडगडण्यानं आम्हा दोघांचा चारचौघात तमाशा झाला. पण तो तमाशा पाहायला वेळ कुणाकडे होता...

त्याला त्या तसल्या हास्यास्पद स्थितीची आणि माझ्या डोक्यातून वाहणाऱ्या रक्ताचीही फिकीर नव्हती. तो चपळाईनं उठला आणि मागच्या बाजूनं माझ्या शर्टाची कॉलर धरून मला उभं केलं. मग मला गर्दीतून ढकलत रस्त्याच्या मधोमध घेऊन गेला. मी स्वत:ला सोडवण्याचा खूप प्रयत्न केला; पण व्यर्थ. शेवटी त्यानं मला एका नाईट बीअरबारसमोर आणून आत ढकललं एखाद्या हवालदारानं एखाद्या गुन्हेगाराला लॉकअपमध्ये ढकलावं तसं...

बारमधल्या संगीताच्या गोंगाटानं आणि रंगीबेरंगी

अनुक्रमणिका

दिव्यांच्या झगमगाटानं क्षणभर मी चक्रावून गेलो. या गडबडीत एका वेट्रसलाही धडकलो. पण तेवढ्यात आधारासाठी मी एका टेबलाचा कोपरा पकडला. त्यामुळं खाली पडलो नाही. थोड्या वेळानं माझं चक्रावणं कमी झालं. पण मला कळत नव्हतं की रॉबर्टनं मला इथं का ओढत आणलंय...

नंतर एक गोष्ट माझ्या लक्षात आली की तिथं डांसिंग फ्लोअरवर ज्या पॉप्युलर गाण्यावर मुजरा चालू होता त्याची धून नितीन मेहतानंच कंपोज केलेली होती. होय, तोच नितीन मेहता ज्याच्याविषयी रॉबर्टच्या मनात फक्त तिरस्कार भरलेला होता...

तेवढ्यात ते गाणं संपलं आणि क्षणभराने एक खूप जोरदार असं डिस्को गाणं सुरू झालं. हे गाणंदेखील त्याच चित्रपटातलं होतं. नितीन मेहतानं स्टीवी वण्डरच्या अल्बममधून ही धून उचलली होती. त्यात राजस्थानची घाघरा - चोली, भोजपुरीची कामुक ठुमरी, गुजरातचा गरबा आणि पंजाबी भांगड्याचे मिश्रण करून खूप खूप बेढब व अश्लील कॉकटेल तयार केलं होतं. परिणामकारक आणि लगेच मेंदूवर हल्ला करणाऱ्या हेवी मेटलच्या स्ट्रोक्सबरोबर तंग चोळी आणि घागरा नेसलेली एक मुलगी डान्सिंग फ्लोअरवर आली आणि तिला पाहताच प्रेक्षकांची हुल्लड सुरू झाली. मागच्या बाजूने तिची पाठ उघडीच होती. तिथं फक्त एक बारीक दोरी होती. प्रेक्षकांकडं पाठ करून ती आपली कंबर आणि नितंब हालवीत होती. थोड्या वेळाने ढोलकीच्या एका जोरदार थापेसरशी तिनं तोंड फिरवलं आणि तिचा चेहरा पाहताच मी सुन्न झालो. ती रॉबर्ट मास्टरची मुलगी विनी होती. लोक तिच्याकडे वखवखलेल्या नजरेने पाहात होते. हातात नोटा घेऊन ती नाचत नाचत नोट दाखविणाऱ्याकडे जायची आणि मादकपणे हसत नोट घ्यायची. नोट देण्याघेण्याच्या वेळी हातांमधल्या गिळगिळीत इशारेवजा खुणा पाहून मला सरसरून थांबवता न येणारी ओकारी आली. मी लगेच बारच्या बाहेर आलो आणि आतलं सगळं काही रस्त्यावर ओकून टाकलं. या ओकारीनंतर मला लगेच कळलं की रॉबर्ट स्वत:ला शांतपणे का जगू देत नाही.

खूप वेळा गप्पा मारल्यानंतर आम्ही कॅफेच्या बाहेर आलो. दिवस कूस बदलत होता. उन्हाचा डाव संपला होता आणि रस्त्यांवर संध्याकाळच्या लांब-लाब सावल्या पसरल्या होत्या. म्हाताऱ्याच्या रसिक चेहऱ्यावर रॉबर्टची आठवण एखादा काळ्या सावलीसारखी पसरली होती. तो शांतपणे चालत होता. थोड्या वेळानं तो आपल्या विचारात एवढा गढून गेला की मी बरोबर आहे, हेही तो विसरला. चालता-चालता मधेमधे काहीतरी बडबडतही होता. त्याची बडबड मला समजण्यापलीकडची होती. तो त्याच्या वेगळ्या जगात गेला होता. अशा जगात जिथं फक्त आठवणी आणि काल्पनिक वास्तव असतं वर्तमानाच्या ठोस वास्तवापासून पूर्णपणे वेगळं वास्तव.

तो पोर्तुगीज चर्चच्या लांबवर परसलेल्या फुटपाथवर सुस्तपणे चालत होता. मी त्यात व्यत्यय आणला नाही. त्याच्याशी बोलण्याऐवजी मी फक्त त्याची आकृती न्याहाळीत राहिलो. त्याची स्वेडची रुबाबदार पिंगट पँट, पांढरा शर्ट, शर्टामागे गेलिसची क्रॉस पट्टी, ब्लॅक कॅप, कॅपखाली रुबाबदार रुळणारे पांढरे केस, खांद्याला चामडी पिशवी आणि त्या पिशवीतून डोकावणारं सॅक्सोफोनचं गोल तोंड. त्याची ही आकृती इस्थेटिकली खूप श्रीमंत दिसत होती. तिच्यावर भूतकाळाच्या मळकट गरिबीचे चिन्हही नव्हते.

तो फूटपाथ ओलांडून डावीकडे वळला. थोडं पुढं गेल्यावर त्यानं फुलवाल्याच्या दुकानातून फुलं घेतली आणि जवळ बसस्टॉपवर रांगेत उभा राहिला. कुठं चाललाय हे मला विचारावंसंही वाटलं नाही. मीही त्याच्यामागे रांगेत उभा रहिलो. थोड्या वेळानं बस आली. आम्ही लगबगीनं बसमध्ये चढलो. तीन-चार स्टॉपनंतर आम्ही अगदी निर्मनुष्य अशा भागात उतरलो. बसस्टॉपसमोरच एक कब्रस्तान होतं. तो कब्रस्तानात गेला आणि सरळ एका कबरीसमोर जाऊन उभा राहिला. त्या कबरीच्या पांढऱ्या दगडावर काळ्या अक्षरांत रॉबर्टचा जन्म आणि मृत्यूच्या तारखा रेखाटलेल्या होत्या.

त्यानं खांद्यावरची बॅग काढून खाली ठेवून कबरीवर फुलं वाहिली. थोडा वेळ मौन पाळून झाल्यावर बॅगमधून सॅक्सोफोन बाहेर काढला आणि त्यानंतर गिफ्ट पॅकेट बाहेर काढलं. पॅकेटचं आवरण उघडलं. आत पीटर स्कॉचची बाटली होती. ती बाटली त्यानं कितीतरी दिवसांपासून अशाच एखाद्या विशेष प्रसंगासाठी राखून ठेवलेली असावी. बाटलीचं झाकण उघडताना त्याच्या चेहऱ्यावर मला कालचीच आक्रमक अस्वस्थता दिसली. उलट त्याचा सुंदर नेटका चेहरा कालच्याही पेक्षा जास्त घातक परिणामांची पूर्वसूचना देत होता. झाकण

उघडल्यावर त्यानं बाटली आणि सॅक्सोफोन समोरासमोर धरले व संपूर्ण बाटली सॅक्सोफोनमध्ये ओतली. ती दारू सॅक्सोफोनच्या बारीक बारीक रीपमधून वाहात माऊथपीसमधून बाहेर आली आणि संपूर्ण कबरीवर पसरली.

रिकामी झालेली बाटली पूर्ण ताकदीनिशी त्यानं कब्रस्तानच्या एक कोपऱ्यात भिरकावली. बाटली कबरीवरील एका क्रूसवर आदळली आणि काच फुटण्याच्या आवाजानं कब्रस्तानच्या नीरवतेला हलवून टाकलं. क्षणभराच्या सामसुमीनंतर त्याने आपल्या वाद्याकडे निरखून पाहिलं. त्या पाहण्यात आव्हान होतं. अंतिम फेरीच्या वेळी एखाद्या प्रतिस्पर्ध्याच्या डोळ्यांत दिसतं, तसं.

मग त्यानं वाद्य ओठांना लावलं. पण पहिल्याच फुंकरीत जो आवाज निघाला, तो एखाद्या लाऊडस्पीकरच्या घोगऱ्या आवाजापेक्षाही जास्त कर्कश होता. त्यानं एक घाणेरडी शिवी देत वाद्य जोरानं झटकलं. आतले दारूचे थेंब बाहेर पडले. मग त्यानं माऊथपीस रुमालानं पुसून स्वच्छ केला आणि जोरात हवा फुकली. ती फुंकर सॅक्सोफोनच्या शरीरात घुसली आणि तिनं आपलं काम फत्ते केलं. त्यानं ती फुंकर कब्रस्तानाच्या नीरवतेत आणखी पुढं नेली आणि सुरांची एक लांबलचक रेषा काढली. सुरुवातीला खाली हलकी रेषा व पातळ आणि वर गेल्यावर रुंद व भारदस्त स्वरांचा विस्तार. पण त्यात समेपासून समेवर येण्याच्या आवृत्तीची विवशता नव्हती किंवा मागं फिरवण्याचीही शक्यता नव्हती – फक्त पुढं आणि अज्ञात अंताकडे जाणारी अनागोंदी. त्याला कोणी रोखूही शकत नव्हतं आणि धरूही शकत नव्हतं.

थोड्या वेळात माझ्या लक्षात आलं की तो सॅक्सोफोन वाजवत नव्हता तर कब्रस्तानात भटकणाऱ्या लयींनी किंवा भूतकाळातील रक्तपाताच्या आठवणींनी आपली उत्तप्त आणि भुकेली फुफ्फुसं शांत करत होता.

मला वाटलं, त्याला थांबवावं, पण ती धून तो माझ्यासाठी वाजवत नव्हता. त्या संगीत अधिवेशनात काही कबरी होत्या, काही क्रूस होते आणि काही सुकलेली म्हातारी झाडंही होती आणि तेच त्याचे खरे श्रोते होते. काही वेळानं लांब होत होत सावल्याही थकल्या, पक्षी झाडांवर परतले आणि अंधार सृष्टीला वेढू लागला. म्हाताऱ्यानं अचानक सॅक्सोफोनपासून तोंड बाजूला केलं. थोडा वेळ तिथं सगळं काही थांबलं. जणू नुकताच तिथं एखाद्या तडफडणाऱ्या गोष्टीनं शेवटचा श्वास घेतला होता. म्हातारा खूप जोरजोरानं धापा टाकत होता. त्याच्या नसा अजूनही ताणलेल्या होत्या. मोठ्या मुश्किलीनं तो चार-पाच पावलं पुढं गेला आणि एका झाडाच्या बुंध्याला टेकून बसला. मी त्याच्याजवळ गेलो. त्यानं मला त्याच्याजवळ बसायची खूण केली. मी त्याच्या शेजारी बसलो.

''ही बिटनिक धून होती.'' धापा कमी झाल्यावर तो म्हणाला.

''रॉबर्ट बिटनिकच्या क्रूर करामतींचा भक्त होता.''

''आणि तू?'' मी विचारलं.

''तू कोणत्या पंथाचा अनुयायी आहेस?''

''मी जाझ आणि इंडियन क्लासिकलच्या मधला रिकामा मार्ग निवडला होता आणि आजही त्याच मार्गावर चालतोय.''

''हा मार्ग कुठं जाऊन संपतो?''

''जिथून सुरू होतो, तिथंच.''

''म्हणजे?''

''म्हणजे समेपासून समेवर.''

''पण मला नाही असं वाटत.''

''तुला वाटत नाही; कारण माझं वाद्य सॅक्सोफोन आहे आणि फुफ्फुस आहे थेट हिंदुस्तानी. माझं वाद्य जाझच्या भडक प्रभावाखाली येऊन कधी कधी वहावत जातं; पण माझी फुफ्फुसं त्याला परत कायद्यावर घेऊन येतात.''

''पण आता तू जे वाजवीत होतास, तिथं कुठंच हिंदुस्तानी कायदा दिसत नव्हता.''

''होय.'' त्यानं मान हलवून होकार दिला. नंतर पुन्हा विचारात पडला.

''तुला असं वाटतं की, तुझी ही धून कायद्यापासून मुक्त होऊन जरा चुकीच्या मार्गात अडकून पडली आहे?''

त्यानं झटक्यात माझ्याकडं मान वळवली आणि आश्चर्यानं पाहू लागला. नंतर पुन्हा मान खाली केली आणि खूप भावुक होऊन म्हणाला, ''ही गडबड रॉबर्टच्या मृत्यूनंतर सुरू झाली... मी रेल्वेरुळावर त्याचा मृतदेह पाहिला होता. त्याचे दोन्ही हात कापले गेले होते आणि एक हात कुत्र्यानं पळवला होता... त्या दृश्यानं माझा श्वास खरवडून टाकला... माझ्या फुंकरीमध्ये आता पहिल्यासारखा दम राहिला नाही.''

अनुक्रमणिका

''दम आहे...'' मी जोरकसपणे म्हणालो. ''जेवढा एखाद्या कलाकारात असायला पाहिजे, तेवढा आहे. कोणतीही घटना कलाकाराच्या आतली बोच संपवू शकत नाही. अर्थात, त्याच्या आत थोडासा तरी प्रामाणिकपणा शिल्लक असता तर.''

''प्रामाणिकपणा?'' तो टक लावून माझ्याकडं पाहू लागला.

''होय, जेव्हा आपण आपल्या दुबळेपणाचा दोष काळाच्या माथी मारू लागतो तेव्हा आपण इतरांशी नाही तर स्व:शीच बेइमानी करत असतो.''

त्यानं रागानं मुसमुसत माझी कॉलर धरली. त्याच्या चेहऱ्यावरून वाटलं, आता तो माझ्या कानाखाली वाजवणार. पण पुढच्याच क्षणी त्याचा हात शिथिल झाला. जणू त्याच्या आत काहीतरी स्खलित झालं होतं आणि त्या स्खलनाने केवळ आत्ताच्या रागाचेच नव्हे तर त्याच्या आयुष्यभराच्या गुर्मीचंही शमन केलं होतं.

''आता मला श्वास घ्यायला त्रास होतोय.'' त्यानं खूप विवश नजरेनं माझ्याकडं पाहिलं. ''मी जेवढा जोरात श्वास सोडतो, तेवढ्या जोरात श्वास आत घेऊ शकत नाही...''

''जर तू मुळातच कमी श्वास घेऊन बाहेर जास्त सोडत असशील, तर घेतलेला छोटा श्वास एक मोठ्या नि:श्वासाच्या रूपाने बाहेर कसा येईल?'' मी आश्चर्यानं विचारलं.

''हे कसं होतं, मला माहीत नाही. पण मला जावणतं की प्रत्येक नि:श्वासाबरोबर माझ्या आतून काहीतरी विरघळून वाहात आहे.'' आणि तेव्हा पहिल्यांदा मला त्याची दया आली. मी बराच वेळ त्याच्या तोंडाकडे पाहात राहिलो. त्याच्या आतून विरघळून काय वाहात आहे ते माझ्या लक्षात आलं. ते मी त्याच्या हातातला सॅक्सोफोन घेतला -''काही दिवस हे वाजवू नकोस. फक्त दीर्घ श्वास घ्यायचा. स्वत:ला सावरून स्वत:ची मॅग्नेटिबिटी वाढवायची. मग तुला कळेल आणि सर्वकाही पुन्हा परत येईल. जे काही विरघळून वाहून गेलंय, तेही पूर्ववत होईल. तू प्रयत्न कर... या बाबतीत मी तुला मदत करीन.''

''मी आता कोणत्याही मदतीच्या पलीकडे गेलो आहे आणि आता मला काहीही मिळवायचं नाही.''

''पण माझी इच्छा आहे.''

''काय?... काय इच्छा आहे तुझी?'' त्याचा आवाज जरा चढला.

''मला बघायचंय की...''

''काय बघायचंय? मी कसा मरतो हे बघायचंय? की मला रक्ताची उलटी कशी होते, हे बघायचंय?''

''नाही, मला हे बघायचंय की तू सॅक्सोफोन वाजवू शकतोस की नाही. आतापर्यंत तर तोच तुला वाजवीत होता ना.''

त्याच्या भुवया पुन्हा ताणल्या गेल्या. तो थोडा वेळ माझ्याकडे आव्हानात्मक नजरेनं पाहात राहिला. नंतर त्याची नजर सॅक्सोफोनकडे वळली. त्यानं सॅक्सोफोन आपल्या मांडीवर घेऊन प्रेमानं त्याला कुरवाळलं. मग पुन्हा आपल्या बॅगमध्ये ठेवून दिला आणि उठून उभा राहिला. एका हातानं बॅग खांद्याला अडकवली. मग त्यानं माझ्या खांद्यावर हात ठेवला. आणि आम्ही दोघं त्या कब्रस्तानच्या जुनाट अंधारातून शहराच्या झगमगत्या उजेडात आलो. आम्ही फुटपाथवरून चालत होतो. त्याचा हात अजूनही माझ्या खांद्यावरच होता. मला त्याच्या हाताचा स्पर्श आधीपेक्षा नरम वाटला. आता त्याच्या चालण्यात पूर्वीसारखी गुर्मी नव्हती तर पराभूतपणाचा भाव होता.

''घराकडं परत जाताना असं वाटतंय, जणू मी माझ्या ध्येयाकडंच चाललोय.'' त्यानं खूप हळू आवाजात म्हटलं.

''तुझे ध्येय काय आहे?'' मी विचारलं. मला अपेक्षा होती की, तो त्याची खूप खोलवरची महत्त्वाकांक्षा उकरून काढील किंवा वर्षानुवर्षे निद्रिस्त पडलेलं स्वप्न जागं करील. पण त्याचं उत्तर खूप संक्षिप्त होतं - ''सॅक्सोफोन वाजवणं.''

खरं म्हणजे तो ही गोष्ट खूप सहजपणे बोलला होता; पण त्यातही एक अर्थ लपलेला होता. मी त्या अर्थाचं गांभीर्य तसंच ठेवलं. रस्ता संपेपर्यंत मी त्याच्याशी काहीही बोललो नाही.

शहराच्या सर्व गोष्टी तेवढ्याच कठोर, निरुत्साही आणि अश्लील होत्या; पण कोणत्याही वस्तूशी भिडण्याची, अडकण्याची किंवा तिची मोडतोड करण्याची तलफ त्याच्यामध्ये नव्हती. त्याच्या या गांभीर्यामुळे मी जरा निर्धास्त झालो. त्याचा निरोप घेताना मला खात्री होती की, आता तो सुखरूप घरी पोचेल.

• • •

अनुक्रमणिका

भाषाभान

वऱ्हाडी लोकगीतांतील बोलीभाषा

■

रावसाहेब मुरलीधर काळे

'**लोकगीते**' हा शब्द Folklore साठी मराठीमध्ये वापरला जातो. लोकगीते म्हणजे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेला अलिखित गीतप्रकार होय. वऱ्हाडात प्रचलित असलेल्या लोकगीतांची बोलीभाषा ही 'वऱ्हाडी बोली' आणि काही मोजक्या लोककलावंतांच्या लोकगीतांची भाषा 'प्रमाण मराठी' असल्याचे दिसून येते.

प्रमाण मराठीची एक प्रमुख बोली म्हणून वऱ्हाडी बोलीचा उल्लेख केला जातो. या बोलीचे प्राचीन वैभव म्हणजे 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभू चरित्र' तसेच या बोलीत निर्माण झालेले लोकवाङ्मय होय. 'लीळाचरित्रा'त आलेल्या वऱ्हाडी लोककथेवरून वऱ्हाडी लोकवाङ्मय अतिप्राचीन असल्याचे सिद्ध होते. आज ही वऱ्हाडी बोली अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा व वाशीम अशा पाच जिल्ह्यांत बोलली जाते.

वऱ्हाडी लोकगीतांचा भाषेच्या दृष्टिकोनातून अभ्यास करताना वऱ्हाडात आढळणाऱ्या लोकगीतांची भाषा व आजची वऱ्हाडी भाषा असा तुलनात्मक केला आहे. लोकवाङ्मयात संबंधित बोलीचे प्राचीन स्वरूप दडलेले असते असे म्हणतात किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर काळाच्या प्रवाहात लोप पावलेले शब्द, वाक्यरचना लोकवाङ्मयात आढळतात, असे गृहीत धरून पुढील अभ्यास केला आहे. आजच्या वऱ्हाडी बोलीसाठी प्रस्तुत संशोधकाच्या संशोधनाचा वापर केला आहे तर लोकगीताचा आधार हा प्रतिमा इंगोले यांच्या 'वऱ्हाडी लोकगाथा' या लोकगीतांच्या पुस्तकाचा व प्रस्तुत संशोधकाने संकलित केलेल्या लोकगीतांचा घेतला आहे. या लोकगीतांमध्ये आलेली बोलीभाषा ही आज उच्चारात असलेल्या बोलीशी साम्य दाखविते तर काही शब्दांचे स्वरूप प्राचीन वऱ्हाडीशी नाते सांगणारे आहे. काही शब्द हे लोकगीताला लय प्राप्त व्हावी म्हणूनही घडविलेले आढळतात किंवा असू शकतात. प्रस्तुत संशोधक अकोला येथील आहे व लोकगीतांचे संकलन हे दर्यापूर आणि अकोला या भागांतील असल्यामुळे संपूर्ण वऱ्हाडी बोलीचा येथे अभ्यास केला गेला आहे, असे म्हणता येणार नाही.

स्वरप्रक्रिया

१. वऱ्हाडी लोकगीतातील शब्दात आलेल्या 'अ' या स्वराचा आजच्या वऱ्हाडी बोलीत 'आ', 'ओ' होताना दिसून येतो.
उदा. (लोकगीत > वऱ्हाडी बोली)

रावसाहेब मुरलीधर काळे
मु. लोणी, पो. रिधोरा,
ता. बाळापूर,
जि. अकोला
मो.: ९९२३१९३२६२
संपर्क :
raosaheb_kale@rediffmail.com

अ > आ = अशीर्वाद > आशीर्वाद,
मया > माया,
अ > ओ = मारवती > मारोती. (लोकगीतात काही ठिकाणी 'मारोती' हा शब्दही वापरलेला आढळतो.)

२. वऱ्हाडी लोकगीतात काही शब्दांत येणाऱ्या 'आ' या स्वराचा आज वऱ्हाडी उच्चार 'अ' असा होताना दिसतो.
उदा. आ > अ = आजूक > अजून, इसान > इसन, गाऱ्हाणे > गऱ्हाने.

३. शब्दात येणाऱ्या 'इ' स्वराचा 'ए', 'य' होताना दिसून येतो. तर, काही शब्दारंभी व क्वचित शब्दांती येणाऱ्या 'इ' स्वराचा लोप होतो.
इ > ए = ठिव > ठेव,
इ > य = ईळ > येळ, लेइल्या > लेयल्या,
इ > लोप = इईनबाई > ईनबाई, निया > न्याया, हयदी > हयद.

४. वऱ्हाडी लोकगीतातील शब्दात येणाऱ्या 'उ' ऱ्हस्व स्वराचा 'आ', 'ओ' होताना दिसून येतो.
उ > आ = भुवा > भावा,
उ > ओ = दरुजा > दरोजा, भुवलं > भोवलं, मारुती > मारोती.
'व' या अर्धस्वरानंतर जर 'उ' स्वराचा उच्चार होत असेल तर त्या शब्दांतर्गत येणाऱ्या 'उ' या स्वराचा उच्चार आज वऱ्हाडी बोलीतून लोप पावला आहे.
उ > लोप = मावूद > मावद.

५. वऱ्हाडी बोलीत प्रमाण मराठीच्या प्रभावाने शब्दात येणाऱ्या 'ए' या स्वराचा कधी 'इ' होतो तर कधी शब्दांतीचा 'ए'चा लोप होताना दिसतो.
उदा. ए > इ = लेहन्याची > लिहन्याची,
ए > लोप = काये > काय.

६. क्वचित काही शब्दाच्या अंती येणाऱ्या 'ए' स्वराचा 'आ' होतो, शब्दाच्या मध्यस्थानी येणाऱ्या 'ए' स्वराचा लोप होतो.
ए > आ = पवने > पवना (एक गवताचा प्रकार.),
ए > लोप = मायेर > मायर (माहेर).

७. शब्दारंभी 'व' या अर्धस्वरानंतर 'ओ' स्वर आल्यास 'व' अर्धस्वराचा लोप करण्याची वऱ्हाडी बोलीची प्रवृत्ती आहे. ही क्रिया वऱ्हाडी लोकगीतातील शब्दांच्या आधारेही सिद्ध होते.
ओ > लोप = वोटी > वटी.

८. लोकगीतातील संयुक्त स्वराचे पृथक उच्चार होताना दिसतात.
ऐ > अई = वैद > वईद.

व्यंजनप्रक्रिया

१. क्वचित एखाद्या शब्दात अनुस्वारानंतर 'च' व्यंजन आल्यास त्याचा 'त' व्यंजन झालेला आढळतो.
च > त = कोंचा > कोन्ता.

२. शब्दाच्या मध्यभागी 'झ' व्यंजन आल्यास त्याचा 'ज' व्यंजन होतो.
झ > ज = बझार > बजार.

३. काही शब्दांतर्गत 'ड' नंतर 'ल' आल्यास दोन्हीचा द्वित 'ळ' होतो.
ड > ळ = बडल > बळ्ळ.

४. शब्दाच्या आरंभी 'द' आल्यास 'ड' होतो.
द > ड = दवना > डवना.

५. द्वित 'न्न'चा 'न' होतो.
न्न > न = देन्नं > देनं.

६. 'ब' या ओष्ठ्य व्यंजनाचा सजातीय 'भ' होताना दिसतो.
ब > भ = ऊब > उभ, उबी > उभी.

७. 'ळ' नंतर 'ल' आल्यास 'ल'चाही 'ळ' होऊन 'ळ'चा द्वित तयार होतो.
ल > ळ = बेळल्या > बेळ्ळ्या.

८. लोकगीतात आढळणारे 'ल' या व्यंजनाचे द्वित वऱ्हाडातील अमरावतीकडे देल्लं, बोल्लं असे वापरण्याची पद्धत आजही आहे. मात्र, अकोल्याकडे अशा प्रकारचे 'ल'चे द्वित उच्चारात आढळत नाही.
उदा. ल्ल > ल = हेल्लं > हेलं.

९. 'व' अर्धस्वराचा कधी 'य', 'ह' होताना दिसतो. स्वरमध्यस्थ 'व' आल्यास त्याचा लोप होतो. तसेच, 'व' नंतर 'उ' स्वर आल्यास 'व'चा लोप होऊन 'उ' स्वर कायम राहतो.
व > य = आवं > आयं, कावड > कायळ,
व > ह = लोवार > लोहार,
व > लोप = जावू > जाऊ, दवू > दऊ, येवू > येऊ.

अनुक्रमणिका

१०. काही मोजक्या शब्दांतील 'य' अर्धस्वराचा 'इ' स्वर होताना दिसतो. काही शब्दांत 'व'चा जसा 'य' होताना दिसतो तसाच 'य'चा 'व' होतानाही आढळतो. काही शब्दांत येणाऱ्या 'य' चा 'ळ' होतो. स्वरांतर्गत येणाऱ्या 'य' अर्धस्वराचा लोप होऊन 'उ' स्वर कायम राहतो. क्वचित काही वेगळी प्रक्रिया आढळते.

य > इ = नोय > नाई, बाभूय > बाभूई,

य > व = डाया > डावा, जेये > जेवे, लाये > लावे,

य > ळ = बाय > बाळ,

य > लोप = उयशी > उशी, बयीन > बईन, चोयी > चोई, दयी > दई. खेळायले > खेळाले.

११. 'र'चा क्वचित काही शब्दांत 'य', 'ळ्' होतो तर काही शब्दांत 'र'चा लोप होतो.

र > य = पाऱ्याले > पायऱ्याले,

र > ळ = धुरडा > धुळ्ळा,

र > लोप = मुंदरिका > मुंदी, धोंडरी > धोंडी.

१२. काही मोजक्या शब्दांत येणाऱ्या 'ह' या महाप्राण व्यंजनाचा 'य' होतो. तर 'ह' नंतर 'ई', 'य' आल्यास 'ह'चा लोप होऊन 'ई', 'य' कायम राहतो.

ह > य = पहन्या > पायटी,

ह > लोप = कही > कई, हिनं > इनं,

आह्यना > आयना, पाह्यरी > पायरी, वाह्यतो > वायतो.

लोकगीतातील 'मादेव' हा वऱ्हाडीत आजही 'मादेव'च असतो तर कधी प्रमाण मराठीच्या प्रभावाने 'महादेव' होतो.

१३. 'स' ऊष्माचा प्रमाण मराठीच्या प्रभावाने 'श' ऊष्म होताना दिसतो.

स > श = दरसन > दरशन, दुसमनी > दुशमनी.

१४. स्वरमध्यस्थ 'ळ' व्यंजन आल्यास त्याचा लोप होतो.

ळ > लोप = आरोळी > आरोई.

संयुक्त व्यंजने

आज प्रमाण मराठीचा प्रभाव प्रत्येक बोलीवर मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. आतापर्यंत रूढ असलेली बोलीची वैशिष्ट्ये लोप पावताना दिसून येतात. प्रमाण मराठीतील प्रथमाक्षरातील संयुक्त व्यंजने लोकगीतात स्वराचे आगम होऊन असंयुक्त बनतात. वऱ्हाडी बोलीतही लोकगीताप्रमाणे प्रथमाक्षरातील संयुक्त व्यंजनाचे स्वराचे आगाम होऊन असंयुक्त होत असत. मात्र, आज प्रमाण मराठीच्या मोठ्या प्रभावाने शिक्षित वर्गात मराठीप्रमाणेच संयुक्त व्यंजनांचा उच्चार आढळतो. उदा. (लोकगीत > प्रमाण मराठी/शिक्षित लोकांची वऱ्हाडी) अरपन > अर्पण, अरभका > अर्भक, अरदे > अर्धे, अरजुन > अर्जुन, करज > कर्ज, करोध > क्रोध, कारतिक > कार्तिक, गरभार > गर्भार, गरव > गर्व, गरदी > गर्दी, तीरथ > तीर्थ, परकार > प्रकार, परकास > प्रकाश, परसंग > प्रसंग, परसाद > प्रसाद, परसन > प्रश्न, परीकरम > परिक्रम, पुरथवी > पृथ्वी, पेरम > प्रेम, पिरती > प्रीती, बरमचारी > ब्रह्मचारी, समरथा > समर्था.

अपवादात्मक एकाच संयुक्त व्यंजनाचे लेखन हे संयुक्त (पर्वत, भर्तार/भ्रतार) व असंयुक्त (परवत, भरतार) असे दोन्ही प्रकारचे आढळतात. मात्र, प्रत्यक्ष गाताना असंयुक्त असावेत.

अनुस्वार : 'कंच'मधील अनुस्वार आज लोप पावलेला आहे. हिरवंकंच > हिरवकच.

सर्वनामे : वऱ्हाडी लोकगीत व वऱ्हाडी बोलीतील सर्वनामांत फक्त स्वरभेद आढळतो. तो पुढील उदाहरणांवरून अधिक स्पष्ट होईल. वऱ्हाडी लोकगीते > वऱ्हाडी बोली :- माहा > माया, माही > माई, माहे > मायं, माह्या > माया, माहे > माये, मायी > माई, मावं > मायं, तुवं > तुयं, तुहा > तुया.

आजही वऱ्हाडी बोलीत आढळणारी काय, कुकळे, कोनाचा कोन अशी प्रश्नार्थक सर्वनामे लोकगीतात आढळतात.

कुकळे : कुकळे केलं येनं। बाई! मंग कुकळे केलं येनं। (वलो.३१)

काय : बाईचा धरला पदर। तू काय कोनाची व्हय नार? (वलो.३२)

मांडू गिरजा नारी ग। मी काय मांडा डावावरी। (वलो.३१),

कोनाचा कोन : पाराबती म्हने, देवा। कोनाचा कोन हा? (वलो.३७)

कोनाचा हाय कोन : जनलोक झाले जमा। कोनाचा हाये कोन? (वलो. ३८)

विशेषण

कवी किंवा गीतकार आपल्या सोयीनुसार ओळीतील शब्दाचे स्थान निश्चित करतो. विशेषणाबाबत मराठी किंवा भारतातील इतर अनेक भाषांमधील वाक्यांत विशेषणानंतर विशेष्य तर अरबी-फारसी भाषेत विशेष्यानंतर विशेषण असा क्रम आढळतो. वऱ्हाडी लोकगीतात असे दोन्ही क्रम आढळतात. तसेच, 'कामिनी', 'पायरो', 'फुलारनी', 'फोपेदार'सारखी विशेषणे आजच्या काळात लोप झालेली आढळतात.

गांजाची : गजाननबाबा चिलीम गांजाची वळते। (वलो.१२९)

चकवन्या सावळ्या सुर्तीवर, मोर चकवन्या, बाळ नवथी, भरला रूपवन्या।। (वलो.५८)

तान्या तान्या बाळाचं लळनं, मोठे खेंदखोर। (वलो.५७)

संख्याविशेषणाबाबत वऱ्हाडी बोलीत व लोकगीतांच्या भाषेत जास्त भेद आढळत नाही. मात्र दो, ती, इस ह्या संख्या विशेषणांचा उच्चार प्रमाण मराठीसारखा दोन, तीन, वीस असा आज वऱ्हाडी बोलीत होताना दिसतो.

दोन, तीन, चार, पाच, सात, नऊ, इस, पन्नास ह्या संख्याविशेषणांचा उल्लेख आढळणाऱ्या लोकगीतांच्या काही ओळी -

अरे दियाची आरती। पाचा दियाची आरती। (वलो.३९)

नवरोजाचे नवरात। रांगोयी काढली त्यावर सातधान्य ठेवलं। घट पुरनं भरला।। (वलो.३०)

चवघा खांदी उचलेले। कोऱ्या भूमिकेले नेले। (वलो.४०)

इसाचं नेसली बाई तिसाचं खुटीले। (वलो.२३५)

डाव पन्नाचा मांडला। नरदा घेतल्या वाटून। (वलो.३१)

आवृत्तिवाचक 'दोहिरा' विशेषणातील 'ह' महाप्राणाचा लोप होतो. दोहिरा > दोयरा. तसेच, लोकगीतात विशेषतः बाऱ्या (नागमंत्रांची गाणी) यात पहिल्या येळ्यानं, दुसऱ्या येळ्यानं, तिसऱ्या येळ्यानं, चवथ्या येळ्यानं, पाचव्या येळ्यानं अशी आवृत्तिवाचक संख्याविशेषणे आलेली आढळतात.

क्रियाविशेषणे

वऱ्हाडी लोकगीतात आढळलेली 'मरनगती', 'आसळा' ही क्रियाविशेषणे आजच्या वऱ्हाडी बोलीतून लोप पावलेली आहेत. काही क्रियाविशेषणांबाबत थोडा भेद आढळतो. उदा. घालोनी > घालून, चालोनी > चालून, भरोनी > भरून, बराबरी > बरोबर.

शब्दयोगी अव्यय

लोकगीतात आढळणारी काही शब्दयोगी अव्यये आजही वऱ्हाडी बोलीच्या भाषिक व्यवहारात आढळतात. उदा. संग (सोबत) - भाजीसंग, पशी (जवळ) - येशीपशी, पायी (मुळे) - सरापापायी, पासी (जवळ) - जात्यापासी, भांगय - रक्ताभांगय, वानी (सारखा) - गुळावानी. मात्र, लोकगीतात आढळणारी काही शब्दयोगी अव्यये आज उच्चारात आढळत नाहीत. सुदे (सोबत) - गोऱ्यासुदे गाय, झांबय - रक्ताझांबय.

वरी (वर) हे शब्दयोगी अव्यय लोकगीताप्रमाणे आजही बुलडाण्याकडे विशेषतः संग्रामपूर तालुक्यात आढळते. बाईनं तपस्या मांडली। एका रिंगनी काट्यावरी। सुमरला देव। बाईनं सुमरला देव। (वलो.३३).

लोकगीत हे गायिले जाते. ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत याच स्वरूपात येते. नंतर कधीतरी त्या लोकगीताचे संकलन केले जाते. मात्र, हे संकलन करताना उच्चारानुसार काटेकोर लेखन केले जाते, असे निश्चित म्हणता येत नाही. त्यामुळे कदाचित, शब्दयोगी अव्यय दोन रूपिका एकत्र येऊन तयार होतात; मात्र पुढील ओळीत 'कारन' हे शब्दयोगी अव्यय सुटे येताना दिसते.

घटं पोतला पातला। गेले इंधनाचे कारन। यानं इंधन आनलं। घट आव्यात मांडला।। (वलो.२९)

घट पोहाळून देला। आले घराचे कारन। वाजत गाजत गेले। विरीच्या कारनं।। (वलो.३०)

माती भूमीची खंदली। माती टोपल्या भरली। उचलून शिरावर घेतली। आले घराचे कारन।। (वलो.२९)

मान अंबिकेले देला। तुमचं पळलं कारन।। म्हणून मांडलं सुमरन। माझ्या सुमरना यावे।। (वलो.३०)

समास

वऱ्हाडी लोकगीतात आलेले काही सामासिक शब्द आज उच्चारात आढळत नाहीत. उदा. आगोल्या, कनगोरे, गावगोतरी, गिरजाई, नाचनी, पायघोय, मव्हन्या, मोत्याजाई, मोहन्या, रानोमान, वाटमारगी, सरापते, संदेखोर, सातोळा, हालेकरी.

अभ्यस्त शब्द :

पूर्णाभ्यस्त शब्द

आयाबाया, आयीबायी, कटकट, कलकल, कानीकानी, कापूकापू, कांडलीकुंडली, कुलूमुलू, कोऱ्यामेऱ्या, खटखट, खाऊखाऊ, गवूगवू, गळगळ, गुटगुट, गुलूगुलू, घयघय, घळघळ, घळ्याघळ्या, घाईघाई, चिंध्याचिंध्या, चोरूचोरू, ठिपीठिपी, ठुनूठुनू, तरतर, तानाताना, दनदन, पसापसा, पायीपायी, पावूपावू, भिरीभिरी, मुलूमुलू, रागराग, रोजरोज, लंबेलंबे, हालहाल.

अंशाभ्यस्त शब्द

(अ अभ्यस्त आ, उ, ब, म् + अ) – कळकळा, खराखुरा, अयाळाबयाळा, अंदीमंद, (आ अभ्यस्त इ, उ) – लोटालोटी, झाळलंझुळलं. (आ अभ्यस्त ग् + ए, च् + ओ, त् + उ, म् + उ) – आल्यागेल्या, आबळचोबळ, आसळतुसळ, आळीमुळी. (उ अभ्यस्त आ, अ) – चुरलीचारली, मांडूमांड. ओ अभ्यस्त अ, आ, इ, उ) – काठोकाठ, चोरूनचारून, काठोकाठी, पोखळपुखळ. (ख् + ए अभ्यस्त प् + आ) – खेळेपाळे. (च अभ्यस्त प, भ) – चटपट, चंगीभंगी, (प अभ्यस्त स) – पोरीसोरी. (फ् + आ अभ्यस्त त् + उ) – फाटकंतुटकं. (म् अभ्यस्त ध्) – माठाधाटा, (म् + आ अभ्यस्त क् + उ) मातीकुती, (य अभ्यस्त फ) – येरफेर. (ल अभ्यस्त प, ब) – लटपटा, लटाबटा. (व अभ्यस्त ग, च) – वाजतगाजत, वानीचिनी. (स् + ओ अभ्यस्त ध् + आ) – सोयराधायरा.

विभक्तिप्रत्यय

१) प्रमाण मराठीतील द्वितीया विभक्तीचा 'ला' प्रत्यय जेथे येतो तेथे वऱ्हाडी बोलीत 'ले' प्रत्यय येतो मात्र, वऱ्हाडी लोकगीतात द्वितीया विभक्तीचा 'ला' प्रत्यय येतो तर कधी तो अध्याहृत असतो.

उदा. १) देवाच्या सुदीला। गेली देवाच्या सुदीला। (वलो.३२), तिला झाडंझुडं बोलती। देव इकळेच गेले बाई। (वलो.३२).

२) तुम्हा टाकीन मारून। (वलो.३२), तान्या लेकराची माय, माय गेली पान्या, साखर देजो वान्या। (वलो.५७).

प्रमाण मराठीत व वऱ्हाडी बोलीत नसलेला 'सी' हा प्रत्यय वऱ्हाडी लोकगीतात येताना दिसून येतो. उदा. तपासी बसले। शंकर तपासी बसले।

२) सप्तमी विभक्तीचा 'इ' हा प्रत्यय प्रमाण मराठी व वऱ्हाडी बोलीमधून लोप पावलेला आहे. मात्र, वऱ्हाडी लोकगीतात सप्तमीचा 'इ' हा प्रत्यय आढळतो. लोकगीतात 'इ' प्रत्यय लागताना नामाचे सामान्यरूप होत नाही.

कान > कानी – चोळी हिरवी घातली। कानी बुगळ्या चारी। (वलो.३४)

मकान > मकानी – माती मकानी टाकली। त्याची अस्तोरी शायनी।। (वलो.२९)

शिवासन > शिवासनी – शिवासनी बसले। ते काय शिवासनी बसले। महादेवाले देला। मान महादेवाले देला। (वलो.३२)

मात्र, ज्या नामाचा शेवट हा 'इ'कारान्त होत असेल त्या नामाला कोणताच प्रत्यय न लावताही ओळीतील इतर शब्दावरून सप्तमीचा अधिकरण हा अर्थ व्यक्त होतो. उदा. साखर देजो मुठी। (वलो.५७), शेजारीन बाई, माह्या घराकडे देख। पायन्यात अभिषेक, वसरी मैना लेक। (वलो.५२)

काही 'आ'-कारान्त नामाचे सामान्यरूप होऊन सप्तमीचा प्रत्यय अध्याहृत राहतो. उदा. वाडा/ळा – सकाळच्या वेळी घट घेऊन चालले। गेले अंबिकेच्या वाड्या (वलो.२६) भिल्लीनीच्या वाळ्या। गेली भिल्लीनीच्या वाळ्या (वलो.३१), सांजयेरा झाली, गोठ्या आल्या गायी। (वलो.५१)

३) काही लोकगीतांच्या ओळीत विभक्तिप्रत्ययाचे कार्य शब्दयोगी अव्ययेही करताना दिसतात. उदा. मंदी – त मंग मावसीनं त्याले घरामंदी नेलं। (वलो.३८)

सामान्यरूप

१) वऱ्हाडी लोकगीतात 'अ'कारान्त नामाचे जेथे 'इ'कारान्त सामान्यरूप होते तेथे आजच्या वऱ्हाडी बोलीत 'आ'कारान्त सामान्यरूप होते. ई > आ =

खारकीच्या > खारकाच्या, बदामीच्या > बदामाच्या, नारयी > नारयाच्या.

२) लोकगीतात 'अ'कारान्त नामाचे सामान्यरूप 'आ'कारान्त होते तेथे आज वऱ्हाडी बोलीत 'या'कारान्त होते. आ > या – वारकाच्या > वारक्याच्या.

३) लोकगीतात 'इ'कारान्त नामाचे सामान्यरूप होताना 'इ' कायम राहतो तर आजच्या वऱ्हाडी बोलीत 'इ'चा लोप होऊन 'या'कारान्त सामान्यरूप होते. उदा. इळियाले > इळ्याले, माळीयाचे > माळ्याच्या.

लिंग

'इन' हा प्रत्यय लागून पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी होण्याची पद्धत आजच्या वऱ्हाडीप्रमाणे लोकगीतातही आढळते. उदा. कसार > कसारीन, माळी > माळीन.

क्वचित 'इन'ऐवजी 'नी' हा प्रत्यय लागून लोकगीतात पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी नाम तयार होते. उदा. कलाल > कलालनी, शेजार (शेजारी) > शेजारनी.

वचन

आज ज्या शब्दात वऱ्हाडीत अनेकवचन होत नाही त्या शब्दाचे अनेकवचन लोकगीतात होताना दिसून येते. उदा. आंघोया (अने.) – आंघोळ (एव.), टाळ्या – टाळन्या, ननद – नन्दुल्या, मामी – माम्हीना.

आख्यात विचार

क्रियापदाला लागणाऱ्या प्रत्ययाबाबत लोकगीतात आणि आजच्या वऱ्हाडी बोलीत फारसा भेद आढळत नाही. पुढील विशेष लोकगीताप्रमाणे आजच्या वऱ्हाडी बोलीतही आढळतात. १) प्रथमपुरुषी एकवचनी वर्तमानकाळी क्रियापदाचा तिन्ही लिंगी 'तो' हा प्रत्यय – मी जातो (स्त्रीलिंगी). भाऊ करतो सोयरा (गोरे.१८). २) तृतीय पुरुषी एकवचनी वर्तमानकाळी क्रियापदाचा पुल्लिंगी प्रत्यय 'ते' असा आहे – तो जाते. दोघ्या नारीचा पुरुष करते विचार मनी (गोरे.२४)

म्हणी व वाक्प्रचार

लोकगीत, म्हणी व वाक्प्रचार या लोकवाङ्मयाच्या वेगवेगळ्या प्रकारांमध्ये आपसात देवाणघेवाण होताना दिसून येते. कदाचित लोकगीतांनी समाजात रूढ असलेल्या म्हणींचा वापर केला असेल किंवा तुकोबांच्या गाथेतील ओळींप्रमाणे लोकसमूहाने लोकगीतांतील ओळींना म्हणीचे स्वरूप प्राप्त करून दिले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही लोकगीतातील ओळी व म्हणी, वाक्प्रचार यांच्यात साम्य आढळते ते पुढीलप्रमाणे :

आंदी पुजले खोडंखांड आता बसली तुइशीपुळे –

गोरींन केला छंद पूजले खोडंखाड / बसली तुळसीपुढं (गोरे.६७)

पान्यावर काठी मारल्यानं पान्याचे दोन तुकळे होत नसता –

भांडते झगडते एकाचे एक होते, मारून का कधी पाणी वाहते तुटते (गोरे.५८),

हात धुतला म्हणून नशीब नस्ते धुतले जात –

हात धुतला नायी नसीब धुतलं। (वलो.२४८),

डोंगर जयते तं जन पायते, मन जयते तं कोन पायते –

डोंगर जळतो पाह्याले गेले जन / जीवाले करवत ह्याले पारख करील कोन। (वलो.४८)

उबळून टाकनं – गवळ्याच्या राधिकेचं / टाके उबडुनी दही (गारे.२९)

कळ लागनं – कसारीण बाई! बांगडी का चढवता / लागे कळ मणगटा (गोरे.६७)

ताव देनं – लंकेचा रावन मिशीवर देते ताव/रामाघरची सीता नाईल एकडाव (वलो.२९०)

पोटी येनं – सासरा महादेव सासूबाई पारबती, आले पोटी गणपती (गोरे.२५)

लहऱ्या मारनं – राहिली उभी गोरी / बाजुबंद लहरा मारी! (गोरे.२७)

इंग्रजी भाषेचा परिणाम

इंग्रजी भाषेने पुणे-मुंबई शहरांतील मराठीवरच आक्रमण केले असे नाही तर ग्रामीण भागात बोलल्या जात असलेल्या बोलीवरही इंग्रजी भाषेचा मोठा प्रभाव पडलेला आहे. ग्रामीण जीवनात अबालवृद्धांनी आपल्या आनंदासाठी निर्माण केलेल्या लोकगीतातही इंग्रजी शब्द आलेले दिसून येतात. 'वऱ्हाडी लोकगाथा'मधील तुंबडी गीत पाहण्यासारखे आहे :

लख लख लख तुंबडीचा दाना / थोडक्यात गानं माज आयकून घ्याना / अकोला शयरात पा काय झाले / टांग्यावाले मेले रिक्शावाले थंडे झाले / मोटारचे टायर पंचर झाले / फटीफटीवाले लोकं घयबरून गेले / सायकलवाला कसा पळाला उताना / लख लख लख

तुंबडीचा दाना (वलो.१६२)

याशिवाय चेकिंग मास्तर, तिकिट, डागतर, विंजक्षन, शेनिमा, संडास, इस्टन, फॅशन इत्यादी इंग्रजी शब्द वऱ्हाडी लोकगीतात आढळतात.

लोप पावलेले शब्द

वऱ्हाडी लोकगीतात आढळणारे काही शब्द आजच्या वऱ्हाडी बोलीत आढळत नाहीत. असे काही शब्द पुढीलप्रमाणे :

अनघळ, अस्तुरी, अंबरस, आकोस, आगजाळी, आगदा, आगास, आमासकार, आयेसन्दी, आंगड, उजवट, उधळलं, उतरीले, उपरपर, उबरवटा, उल्लासली, उसंगी, इतस, इराओवानी, इस्त्याचा इंगय, कनानी, कनानी, कढान, करन्नी, कवटाळी, कवला कचोरा, कवंड, कळे, कंगन्या, कंथान, काचोळी, कान्या, कामिनी, कांबोळे, किबलटखोर, कुतक, कुंची, कोळ, खनपट, गरती, गंठाना, गुलाना, गोपडं, गोंगलावान, घागरमाळा, घुटीपात्र, चापड, चितांग, चिलीपाट, चिरा, चिराड, छबिना, जोट, झाडा, झिंगार, झुबा, झोह, टकरीचा, टवसन, टायघोय, टुरूंग, टोकरं डागीन, ढबळ,, तोंगलं, दवन्याची, दळपा, दंडते, दिनमान, दिवनाली, दिंड, दोंद, धनकद, धनइसे, धारना, धांद, धोकनी, नवलख, नंगीन, नरदा, नांदके, निनंता, निवनं, पन्नाव्यानं, पागचा, पानचोळी, पिंजर, पोवा, पोहळनं, पोंगरा, फुलना, फुलमाला, बकानी, बन्नातीचाजोळा, बंदाटी, बंधवान, बाजीबंद, बिदी, बिंदले, बुगळ्या, बोचरी, बोथरी, बोवान, भरग्या, भोंबारा, मथारी, मव्हन्या, माजरे, माठाची, मातेसरी, मानमोळा, मालवला, मुडल्या, मुंडासं, मोताळनी, मोहन पहाटे, येवन, येळ, रायरंद, रांगूळ, ललकारा, लवती, लवू, लावूलान, लंडबाई, वचकलं, वढा, वावडी, वेल्हाळानं, शवकीन, शियानी, शेंदखोर, समरीत, सराळा, सहाळसुटे, संगीन, संधीन, सातोळा, सादीकुंदी, सामा, सांगळ, सिलगावनं, सिंदनं, सुदी, हस, हळवटा, हारबळले, हिकमती, हिरवटा, हिरासी, हुजिम, होरा.

• • •

आत्मकथन

काळ्यानिळ्या रेषा

(क्रमशः)

राजू बावीस्कर



नबा

मोठी बहीण नबा ही नेहमीच मोठ्या भावाविषयी आणि माझ्याविषयी खूप मोठाली स्वप्नं पाहायची. आम्ही बँड वाजवून शिक्षण घेतो ही तिला नेहमीच अभिमानाची गोष्ट वाटायची. मोठा भाऊ नोकरीला लागला तेव्हा तिनं आझाद चौकाच्या मांगवाड्यात पेढे वाटले होते. वाड्यात प्रत्येक घराच्या दाराशी तिचा आनंदित चेहरा फिरून आला होता. मी खिरोद्याला चित्रकला महाविद्यालयात शिक्षणाला जातो हे तिला कळल्यावर ती चोपड्याच्या बस स्टँडवर हजर होती. घरून दोरीनं बांधून आणलेली गादी तिनं डोक्यावर उचलली आणि माझ्या हातात बॅग दिली आणि तिच्या आझाद चौकातल्या रस्त्यावर असलेल्या झाडू विकण्याच्या ठिकाणी ठेवली. आंघोळीला बादली लागेल म्हणून स्वतःच्या हातानं प्लास्टिकची बादली घेऊन दिली. पुन्हा गादी डोक्यावर घेत गाडीत बसवायला आली. तिचा खूप जीव होता आमच्या सर्वांमध्ये. तिच्या संसारात ती कष्टच सहन करत गेली. तिचं लग्न झालं तेव्हा मी खूपच लहान होतो. लग्न आठवत नाही इतका लहान.

आमच्या समाजात शेती, बँड पाच भावांच्या मोठ्या कुटुंबातील चोपड्याजवळच्या वेल्याला नबाला दिलं होतं. त्यांचा सर्वांत मोठा भाऊ वेल्याची शेती सांभाळायचा आणि बाकीचे चोपड्याला बँडचा व्यवसाय

राजू बावीस्कर
प्लॉट क्र. ६बी,
याज्ञिकी अपार्टमेंट,
गुजरात पेट्रोल पम्पाच्या मागे,
रामद्वार पार्कजवळ,
जळगाव - ४२५ ००१
मो.: ९८८१४१५४७२
संपर्क :
rbaviskar.raju1@gmail.com

अनुक्रमणिका

करायचे. चोपड्यालाही त्यांचं आझाद चौकाच्या मांगवाड्यात स्वतःचं घर होतं. मांगांमध्ये त्या वेळी हे सर्वांत श्रीमंत कुटुंब. आईवडिलांना वाटायचं आपली पोरगी खूप श्रीमंत घरात दिली. लग्न झाल्यावर दोघं खूप समाधानी होते. इतर गावातले मांगही म्हणायचे, 'आनीने पोरगी श्रीमंत घरात दिली.' असं ऐकून यांच्या अंगावर मूठभर मांस चढायचं. बाप नबाला जेव्हाही भेटायला गेला असेल तेव्हा मला घेऊन जायचा. सकाळीच आमच्या गावातून चार वाजेला दुधाची गाडी (मालट्रक) चोपड्याला जायची. याच गाडीत तालुक्यावर जाणारे लोक जात असत. गावातले एकदोन श्रीमंत लोक जात असतील तर ते ड्रायव्हरच्या कॅबिनमध्ये बसायचे. बाकी सर्व मागे दुधाच्या कॅनवर बसून रुबाबात जायचे. चोपड्याच्या मांगवाड्यात आम्ही सकाळी सातलाच हजर असायचो. तिथं नातलगांकडे चहा झाला की, आझाद चौकातल्या जाकीर सायकल मार्टवर जात असू. चुलतकाका तिथं काम करायचा. त्याचंही नाव बाबूच होतं. त्याच्याकडून बापानं सायकल काढली की, सायकलच्या दांडीवर मला बसवायचा आणि वेल्याच्या डांबरी रस्त्याने सायकल जोरात धावायची ती थेट नबाताईच्या घरीच थांबायची. प्रत्येक वेळी नबाकडे जाण्याची हीच पद्धत असायची. तिच्या लग्नाला आता एकदोन वर्षं झाली होती. संसारात तिला खूप त्रास होत होता. आईला हातेपरहाते हा निरोप मिळायचा. त्या वेळीही मी बापाबरोबर तिला भेटायला गेलो होतो. चटणीभाकरी खाल्ल्या नि त्याच दिवशी परत गावी आलो. आई, बापाला विचारत होती, 'कसी हे पोरगी, तब्बेतबिब्बेत बरी हेन् तिची?' चुलीच्या धुरानं डोळे लाल झालीत असं सांगत नबानं डोळ्यांना पदर लावला होता; पण बापाला तिचा रडण्याचा चेहरा लक्षात आला होता. तरी त्यानं आईला पोरीचं छान चाललं आहे असंच सांगितलं.

तो दिवस गेला नि दुसऱ्या दिवशी नबाचा लहान दीर सायकलवर सकाळीच आमच्याकडे आला. त्याला पाहून पोरीचं काही बरंवाईट तर झालं नाही, या भीतीनं आई भयंकर धास्तावली. तिचं मन नको त्या वाईट गोष्टींच्या खोलात जाऊन घिरट्या घेत होतं. इतक्या भक्कमपणे संसाराला तोलून ठेवणाऱ्या आईच्या चेहऱ्यावर मात्र उनसावलीसारखा भीतीचा खेळ सुरू होता. त्यानं पाणीही घेतलं नाही. बापाकडे निरोप दिला नि सायकलवर टांग मारून निघून गेला. पोरीचं काय झालं, अशी किर्घानी आईनं बापामागं, लावली. बापानं सांगायला सुरुवात केली, ''आपले आत्ताचे आत्ते चोपड्याले जानं पडीनं. म्हणे मी काल्दी पोरीले काहीतरी जडीबुटी दी आलू न् तिनं पिठमधी टाकीसन भाकरी केल्यात असं ते म्हणी राहिलेत.'' आई हे ऐकताना पोरीचं काही बरंवाईट झालं नाही हे ऐकून ती थोडी भानावर आली. ''त्यान्हलेच जमता असे लफंगेधंदे, चला आत्ते मीच बोलते त्यान्हले जातपंचाईतमधी.'' आई प्रत्येक वेळी बोलताना धाडसवान वाटायची. गावात संध्याकाळी चारपर्यंत गाडी येणार नाही म्हणून ती दोघं पायी हातडला गेली; कारण हातड हे शिरपूर ते नंदूरबार डांबरी रहदारीच्या रस्त्यावर. त्यामुळे त्यांना तिथून चोपड्याला जायला सोपं होतं. आझाद चौकाच्या मांगवाड्यात दुपारीच पोहचले. मोठा भाऊ, लहान दोन बहिणी घरीच होतो. यांचा मुक्काम होणार हे निश्चित. आझाद चौकातच दुधाची गाडी थांबायची. रात्री त्या गाडीत बसून सकाळीच चार वाजेला आईवडील घरी आलीत. आईच्या मोठ्या बहिणीच्या घरी थांबून त्यांनी रात्री तीन वाजेपर्यंत जागरण केलं होतं. म्हणून घरी आल्यावर ते झोपी गेले. बापानं दुपारच्या भाकरी मांगून आणल्यात. सर्वांनी थोडंथोडं पोटात टाकलं नि आईवडील दोघंही घरासमोरच्या निंबाच्या झाडाखाली लक्ष्मामामी चुलतमामा यांच्याबरोबर सुपडं-डालक्या विणायला बसलीत.

लक्ष्मामामीला आई डालक्या विणत नबाच्या सासरची गोष्ट सांगत होती. ''लक्ष्मे. लई खराब लोकं हे बाई नबीकडचे.'' आई रडत होती आणि लुगड्याच्या पदरानं डोळे पुसत होती. ''अनाबाई रडू नका वं शेवटी खऱ्याचा देवच राहातो.'' मामी तिला समजवत होती. त्यांनी डालकीतल्या भाकरीसह नबालाही चोपड्याच्या मांगवाड्यात आणलं होतं. वाड्यात मांगांना गोळा करून पंचायत बसवली होती. नबा खाली मान घालून सर्व वयस्कर लोकांच्या समोर बसली होती. तिचा मोठा जेठ सांगत होता. ''या पोरच्या बापानं काही तरी दिलं हे इच्याकडं, ते इन पिठात टाकलं हे. आम्हले ही पोर काही जगू देनार नही. सांगा भो काय कऱ्याचं आत्ते.'' हे शब्द ऐकून आईवडील दोघंही भडकली होती. इतक्या गरीब आणि प्रामाणिक मुलीविषयी हे असं चाललेलं त्यांना असह्य झालं होतं. आई पटकन उठली नि डालकीतली

भाकर घेऊन चोखणभर नबाला दिली आणि उरलेली भाकर त्या संतापात आईवडिलांनी सर्वांच्या समोर खाऊन टाकली. जमलेले सर्व सुन्न होऊन पाहात होते. मधूनच कोणी तरी बापाला, नबाला पाणी आणून दिलं. बाप तेव्हा खूप धाडसीनं बोलला. डोळ्यांत पाणी होतं. 'खऱ्या सोन्याले कस लाई राहिले तुम्ही, आते आम्ही भाकर खाल्ली हे काही हुईन तर आम्हले हुईन.'' हा सगळा प्रकार बघून नबाचा मोठा जेठ बाजू सावरत बोलत होता. तो खाटीवर बसला होता आणि नबानं पिठात काहीतरी टाकलं असा भास झाला होता, अशी स्वतःची बाजू सारवासारव करत काही तरी माझ्या बघण्यात चूक झाली असं सांगून आपली बाजू मांडत होता. नबानं शेवटी आईवडिलांना सांगितलं, ''मल्हे आता तुम्ही मरेस्तोवर कोणीबी भेट्याचं नई.'' हे बोलताना ती खूप रडत होती. बापाच्या खांद्यावर डोकं ठेवून भरपूर रडून घ्यावं असं तिला वाटलं असेल त्यावेळी. बापाच्या डोळ्यांत पाणी होतच. तसाच तो आईबरोबर तिच्या मोठ्या बहिणीच्या घरी निघून आला. ते जीजीकडेच थांबले. ''अने लई गर्व हे त्यान्हले पैश्याचा. गरिबाले ते कुछमाल समजतात. मी भी कसं घेतलं त्यान्हले रिंगयमधी तव्हय ते ढिले पल्ले.'' जीजी बोलत होती. हे खोटं आहे हे समजल्यावर तर घमा जिजा त्यांच्यावर तुटून पडला होता. सर्वांना यातलं सत्य पटलं होतं. नबा आईवडिलांची, आमच्या सर्वांची खूप काळजी करायची म्हणून तिनं बोलणं बंद केलं होतं. नबानं त्यांच्या त्रासाला तोंड देत आपला संसार ओढत नेला. रविवारच्या चोपड्याच्या बाजारी ती मांगवाड्यातल्या बांबू सोसायटीत बांबूचं बारकं घ्यायला यायची. आईवडिलांना ती दिसायची. बापाची बोलण्याची इच्छा असून बोलायचा नाही. पुन्हा आपल्या पोरीला त्रास नको म्हणून ते तेवढं टाळायचे; पण मला गुपचूप खाऊ घेऊन द्यायची. 'भुऱ्या हे घे' असं म्हणत पटकन खाऊ देऊन पुढे जायची. ती मला लहानपणापासून भुऱ्या म्हणायची.

बऱ्याचदा तिला लांबून बघितल्यावर बापानं डोळ्यांत कचरा गेल्यासारखं करत डोळे पुसले होते. तिला पहिला मुलगा झाला तेव्हा मोठी हिंमत करून ते तिच्यासाठी खायायला आणि मुलासाठी हातावरचे कडे घेऊन गेले होते. मुलगा झाला म्हणून एकदोन टक्क्याने त्रास कमी झाला होता. मुलगा थोडा मोठा झाला. मुलगीही झाली. वर्षातून एक वेळा का असेना ती मुक्कामाला नाही पण भेटीला यायची. दाजी घरच्याच बँडमध्ये क्लॉरोनेट वाजवायचे. खूप दारू प्यायचे. हा त्रास तिला जास्त कंठावा लागला. हा त्रास, त्यांच्या सवयी या सर्व गोष्टीची जशी तिला सहन करण्याची सवयच झाली होती. तिच्यातला भित्रेपणाही थोडा निवत गेला होता. बँड वाजवत वाजवत आम्ही शिक्षण घेतो, ही गोष्ट म्हणजे तिच्या आजूबाजूला अभिमानाच्या भक्कम भिंती उभ्या आहेत असं तिला वाटायचं. मी नोकरीला लागलो त्या वर्षी ती पोटाच्या आजाराने खूप त्रासली होती. खूप काबाडकष्ट करून तिनं बरेच दिवस हा त्रास कुणाला सांगितला नव्हता. सर्व दुखणं अंगावर काढत गेली. मीही अधूनमधून भेटायला जायचो. आईवडील, मोठा भाऊ गावाकडे असल्यानं, ते एकदोन दिवसआड तिला भेटायचे. नंतर नंतर तिला चोपड्याला खाजगी दवाखान्यात अॅडमिट केलं तेव्हा आईवडील तिच्या जवळच असायचे. मोठा भाऊही शाळेत रजा टाकून तिच्याजवळ थांबायचा. मीही जिल्ह्यावरून जायचो. शेवट शेवट दोन-तीन महिने दवाखान्यातच होती. आमचं येणंजाणं सुरूच होतं. त्या दिवशी मी नुकताच चोपड्याच्या स्टँडला उतरलो होतो. त्या वेळी दवाखान्यात ती आजाराच्या कटकटीला तोंड देत हारली होती. 'मां भुऱ्या कुठं हे?' असं आईला शेवटचं एवढंच विचारलं. अखेरीस दुसरा मुलगा आईनं उभा केला तिच्यासमोर. 'नबे हा भुऱ्या आला.' तेव्हा ती गेली. असंही जाणं असतं का? नबाचं जाणं म्हणजे त्रासाला प्रश्न विचारल्यासारखंच होतं. बाई त्रासाची सुई होऊन शिवत राहाते झावरीसारखं स्वतःलाच स्वतःच्या आतमध्ये, असंच काही तरी सांगायचं होतं का तिला माझ्याजवळ? तिच्या मनातले असे अनेक प्रश्न मला सतवत असतात. कधीही त्या हरताळकरांच्या दवाखान्याजवळ गेलो की, फक्त नबाचा भुऱ्या इतकंच आठवतं. तिच्यानंतर मला भुऱ्या म्हणून कोणीही हाक मारली नाही.

जाड्या रम्या

सातवीच्या वर्गाला सुरुवात झाली होती. मी ज्याच्यामुळे माझी चौथीला शाळा सुरू केली, तो जाड्या रम्या मात्र शाळेत तेव्हाच यायचा जेव्हा खो-खो, कबड्डीची स्पर्धा असायची. गुरुजी माझ्याकडे निरोप देऊन स्पर्धेसाठी त्याला बोलवून घ्यायचे. पाचवीच्या



वर्गात तर रम्या कबड्डीचा तर मी खो-खोचा कॅप्टन होतो. त्या वर्षी तालुक्यावरच्या दोन्ही ढाली आम्ही जिंकून आणल्या होत्या. बैलगाड्यांवर वर्गातल्या दोन लाकडी खुर्च्या ठेवून त्या ढालींची बाजारपट्ट्यातून, गावभर मिरवणूक काढली होती. डफडं वाजवायला बापाला नि गट्या काकाला आम्हीच बोलवून आणलं होतं. आमच्या पाच, सात पोरांच्या हातात गुलालाची पुडी. आम्ही आमच्या गावासाठी काही तरी मोठं युद्ध जिंकून दिल्यासारखे प्रत्येकाच्या कपाळाला गुलाल लावत सुटलो होतो. हे दोघं मांगांचे पोरं पुढे खूप चांगले खेळाडू होतील असं धर्मागुरुजी आम्हा दोघांकडे बोट दाखवत गावातल्या प्रतिष्ठित लोकांना सांगत होते. ही मिरवणूक म्हणजे गरिबीला प्रतिष्ठेचं स्वप्न पडावं अशीच होती. 'त्या ढोर खातस्नं म्हनीसन तेस्नामा एवढी ताखद से भो' असे मुलं आमच्या मराठी शाळेत कुचूकुचू करायचे. रायसिंग अण्णा, धर्मा आबा, खैरनार गुरुजी, हेडमास्तर शिंपी गुरुजी आमच्या खेळाबद्दल खूप स्तुती करायचे. पण आमचं शाळेला दांड्या मारणं त्यांना आवडायचं नाही. त्यासाठी ते आम्हाला झोडूनही काढायचे. धर्मा आबा तर आमचा खेळ बघून अंगावरचा सदरा काढायचे आणि पोटावर खिसा असलेली बांडी न् धोतर कमरेला खोसून पहिलवानासारखे आमच्यात कबड्डी खेळायचे. रा.शा. पाटील, सुतार गुरुजी मी वह्यांवर काढलेल्या चित्रांची स्तुती करायचे. सातवीच्या वर्गाचे वर्गशिक्षक- त्यांनी तर मला सुरुवातीलाच सूचना देऊन टाकली, 'बाप्या लगन सराईत दांड्या मारल्या तर विचार करून ठेव.' मी हे त्यांचं बोलणं खाली मान टाकून ऐकत होतो. पुन्हा त्यांनी बोलायला सुरुवात केली. 'आणि तो तुझ्या जातीचा रम्या रे, तो गेल्या वर्षी फक्त परीक्षाच द्यायला आला. त्याला सांग तुझं नाव कमी करायचं म्हणत आहेत गुरुजी.' रम्याला गुरुजीचा निरोप दिला की तो चिडून बोलायचा, 'सांगी दे गुरुजीले महे नाव कमी कऱ्याचं' रम्याची परीक्षेची जबाबदारी मीच सांभाळायचो. तो फक्त परीक्षेला यायचा. गुरुजींची मान हजेरी भरण्यात खाली असायची तेव्हा बऱ्याचदा त्याचं नाव आलं की हजर गुरुजी असं मीच म्हणायचो. एकदा तर भिंतीच्या रांगेला खेटून बसलेल्या कोळीच्या विलासनं सांगून टाकलं, 'गुरुजी रम्या नई हे' गुरुजींना हजर असा आवाज आला होता. त्या पायी पाठीवर दोन, तीन रपाटे खावे लागले. त्याला खूपदा सांगीतलं तुझे पेपर मी गुपचूप लिहील. तू फक्त परीक्षेला ये. शेवटी रम्यानं सातवीतच शाळा सोडली. त्याला शिक्षणात रसच नव्हता. ढोरं फाडणं, डफडं वाजवणं, बँड वाजवणं आणि म्हसनखाईतलं सोनं काढण्यात तो अत्यंत पटाईत होता. त्याला या कामापायी ग्रामपंचायतमध्ये कानात खावी लागली होती. हे मला औरंगाबादच्या शासकीय चित्रकला महाविद्यालयाला शिकत असताना समजलं होतं. तो लहान असतानाच मोठ्या माणसांबरोबर सोनं शोधायला जायचा. त्याने या कामासाठी आमची लहान टीम तयार केली होती. पाचवी, सातवीचं वय असलेल्या मागांच्या पोरांची. मीही त्या टीममध्ये बऱ्याचदा असायचो. मात्र या कामात भीती विषारी सापासारखी मनात फिरायची. आपण शाळेत जातो. दाम्या, बारक्या, रम्या हे तर शाळा सोडून बाजूला झालेले. हे काम करताना कुणाला सापडलो तर आपलं सर्व संपलचं समजायचं, असं स्वतःच स्वतःला बोलत राहायचो. या कामात मनाचा खूप थरकाप व्हायचा.

गावात एका हवेलीतील म्हातारी वारली होती. आम्ही किडीवरचे पैसे वेचायला सोबत होतो. रम्या त्या म्हातारीची तयारी होताना गर्दीत चक्कर मारून बघून आला. त्याला पटकन कळायचं काय काय दिलं असेल म्हातारीबरोबर, 'आज तर आपल्या सगळ्यांची चांदी हुई जाईन भो' तो आम्हाला सांगत होता. त्याला सोनं काढण्याचं सर्व काम जमायचं. म्हातारीला जाळल्यावर तो आम्हाला जवळ घेत सुचवत होता. त्याचं म्हणणं होतं मोठ्यांच्या आधीच आपण हे सोनं काढण्याचं काम

उरकवून टाकायचं. कारण ते रात्री दोनच्या पुढे जातात. शेंप्या, धांग्या हे मोठे जाण्याआधीच आपण रात्री बाराला निघू असं ठरलं.

काचेच्या लहान बाटलीत रॉकेल, तिच्या बुचाला छिद्र पाडून त्यात कापडी चिंधीची वात, ती पेटवायला आगपेटी, एक तगारी असं साहित्य तो घ्यायचा. आधी गेलो की रात्रीच्या अंधारात तोंडापासून ते छातीपर्यंतची खालची राख उचलायची. जवळच नाल्यात राखेची तगारी पाण्यात थोडी बुडवायची आणि वरवरची राखेची घाण निघत गेली की बाटलीची चिमणी तयार केलेल्या उजेडात सोन्याचे बारीक छऱ्यांसारखे खडे चमकले की त्याला तोंडात जिभेखाली टाकायचं कारण इतकी बारीक वस्तू, ही वस्तू हरवली तर, मेहनत पाण्यात जाईल म्हणून शरीराची जागाच योग्य होती. ही पद्धत सोनं शोधण्याची परंपरेने आलेली. या म्हातारीला सकाळीच दहा, अकरापर्यंत जाळलं होतं. म्हणून रम्याचा अंदाज होता रात्री बारापर्यंत आपलं काम आपल्याला करता येईल. आम्ही चारही जण अंधारात निघालो होतो. प्लॉटच्या लांब अंतरावर हातेड रस्त्याच्या बाजूला म्हसनखाई होती. तिकडं घरं नव्हतं. फक्त एकच झोपडी, तीही एका बाईची. तिला कुष्ठरोग होता म्हणून ती गावातून या ठिकाणी राहायला आली होती. तिचे सर्व नातलग गावात असायचे. त्या झोपडीला टाळून आम्ही अंधाराचा आधार घेत चौकसपणे इकडे तिकडे बघत म्हसनखाईत पोहचलो. अंधारात धूर निघताना दिसत होता. जाळ जरी नसेल तरी राखेखाली विस्तव असावा हा अंदाज रम्याने बांधला. जिथं प्रेत जाळायचे त्याच्या थोडं खाली उतरलं की, पतायगंगाचा नाला, त्याला बारमाही पाणी असायचं. आमच्या गुडघ्याला पाणी लागेल इतकं रम्यानं मला नाल्यात उभं राहायला सांगितलं. हातात बाटलीची चिमणी दिली आणि आगपेटी. तो जेव्हा राख तगारीत भरून पाण्यात धुवायला आणेल तेव्हा ती चिमणी पेटवून त्या ओल्या राखेत सोनं शोधायला मला मदत करायची होती. त्यांनी लांब काड्या शोधल्या. त्याच्याने विस्तव हळूहळू बाजूला करत होते. सगळीकडे अंधार होताच पण त्या विस्तवाने त्यांच्या अंधूक आकृत्या नाल्यातून दिसत होत्या, ते तोंडाकडची राख तगारीत भरण्याचा प्रयत्न करत होते; पण राखही विस्तवासारखी गरम असणार म्हणून ते काहीतरी राख भरायला सापडतं का यासाठी शोधाशोध करत असावेत. तेव्हाशी हातडे रस्त्याने शेतात जाणाऱ्या माणसाचं लक्ष गेलं. त्याला अंधारात लांब काही तरी हालचाली असण्याचा भास झाला असावा. तो घाबरलाही असावा. पण त्याने जोराचा आवाज दिला, 'कोन से रे ऽ ऽ ऽ कोन से रे ऽ ऽ ऽ'.

बारक्या, दाम्या अंधारात धावत नाल्याच्या पाण्यात उतरले. मला काहीच कळत नव्हतं. अगदी सेकंदात ते नाल्याच्या कपारीने चढत सुटले होते. रम्या तगारी घेऊन जोरात उडी मारून नाल्याच्या दुसऱ्या किनाऱ्याला केव्हा गेला हे मात्र जादूसारखं वाटलं. मला तो अंधारात दिसलाच नाही. मी पाण्यात उभा. त्याने सेकंदात माझा हात पकडला 'बाप्या पळ'. मला तानत कपारीच्या दिशेने धावला. तगारी कपारीच्या वरच्या दिशेने जोरात फेकली वर शेतातच. कपारीच्या झाडं, वेलींना माकडाच्या वेगाने वर चढून शेतात तगारी शोधली. डोळ्याची पापणी हलावी इतक्या वेगाने या गोष्टी होत होत्या. रम्याने तगारी घेतली नि सर्व जीव मुठीत घेऊन धावत सुटलो. थेट गावाबाहेर हिंगोण्याच्या रस्त्यालाच. प्रत्येकाच्या हातापायाला ओरखडलेलं, काटे पायात घुसलेले; पण काहीही जाणवत नव्हतं. हे संकट टळलं फक्त इतकचं डोक्यात होतं. हा गावाचा एसटीची. ये-जा करण्याचा मुख्य रस्ता असल्याने कुणाला दिसणार नाही अशा रस्त्याच्या कडेकडेने धावत सुटलो. त्याला एक नाल्यात उतरणारा जोड रस्ता होता. कलाल बाप्पाच्या खळ्याकडून किर्र असा अंधार. या अंधारात रात्रीचा साधारण एक वाजला असावा. या वेळेला आपल्याला कोणी बघितलं आणि विचारलं, 'कोठे फिरी राहीनातं' तर काय सांगावं? आम्ही रात्रीला शेतात चोरी करायला गेलो होतो, अशी शंकाही येऊ शकते एखाद्याला. अशा अनेक विचारांनी अर्ध डोकं संपल्यासारखं वाटत होतं. दबकत-दबकत गावाकडे येत गेलो. गाव संपते नि प्लॉटला सुरुवात होते त्या रस्त्याने आम्ही खाली नाल्यात उतरलो. नाला ओलांडून पुढे यावं तर रस्त्याच्या बाजूलाच बायांचा गावसंडास होता. चुकून एखादी बाई आली तर नसेल हा विचार करूनच थंडीतही घाम आल्यासारखं होत होतं. बाई आम्हाला रस्त्याने पाहून ओरडली तर... बाप रे ऽ ऽ. आमच्या सर्वांच्या आईवडिलांना गाव तर सोडावं लागणार नाही ना? मन खूप विचित्र मार्गानं फिरत होतं. मी मनातल्या मनात मांगीरबाबा, धांगुबा महाराज या आमच्या देवांचं नाव घेत

सुटलो. त्यांच्याही मनात ते चाललं असावं कदाचित; कारण कुणीच कुणाशी बोलत नव्हतं.

आता अंधार संपला होता. त्या संडाशीजवळही कोणी नव्हतं. आमचं नशीब चांगलं असं वाटलं. नशीब नावाचं मला काहीही माहीत नाही. पण गरीब कुटुंबाला संकटात उद्ध्वस्त होण्यापासून निसर्ग वाचवत असेल हेच नशीब म्हणता येईल. संडाशीच्या थोडं पुढं गेल्यावर उकिरड्यावर दाम्याचं घर. त्याच्या घरी थांबलो आणि आधी जगण्याचा श्वास सर्वांनी घेतला. आता कुणीही आलं नि विचारलं तर सांगता येईल. आमच्या समाजाचं घर आहे. पुढच्या गल्लीत बारक्याचं घर होतं. तिथून तर छातीतली धडकी बंद झाली. बारक्याचे आईवडील झोपले होते. त्याने घरातून पाणी आणलं. रम्याला नि मला दिलं. एवढ्या थंडीतही घसा कोरडा पडला होता. तेव्हा मात्र हातापायाला लागलेलं जाणवत होतं. बारक्याच्या घरी चिमणीच्या उजेडात ते बघितलं. जाड्या रम्याच्याही पायाला लागलं होतं. त्याच्या अंगावरचं कुडतं बरंच फाटलं होतं. पण हा आमच्यातला खूप धाडशी. त्यानंच धीर देत गावापर्यंत पोहचवलं. त्यानं हुशारीनं बारक्याकडे तगारी ठेवली नि आम्ही घरी निघालो. घरी माझ्या गोधडीखाली घुसताना आई मात्र जागी होती. तिनं इतकंच विचारलं, 'भुऱ्या काय चालू हे?' मी न बोलताच गोधडीत घुसलो. टोपलीत भाकरी होत्या. गावातून आणलेल्या. 'खाई घे' असं सांगत ती झोपली होती. मला वाटलं बरं झालं घरी कुणाला कळलं नाही. कारण हे लहान मुलांचं काम नाही. आईवडिलांना माहीत होतं. पण आईला निश्चितच हे समजलं होतं. हा कुठल्या तरी चुकीच्या कामाला तर गेला नव्हता ना, या विचाराने ती अंथरुणात चुळबुळ करत होती. त्या दिवशी माझाच प्रश्न डोक्यात घेऊन ती झोपली असावी हे मात्र निश्चित. सकाळी शाळेत गेलो नाही. त्यासाठी आई माझ्याकडे पाहात होती. मी शाळेत गेलो नाही. शाळा बुडवली त्यासाठी आई माझ्याकडे पाहात होती. आईचा चेहरा बघितला आणि कानाला कानखडी लावली. आता या कामासाठी जायचं नाही, असं ठरवून टाकलं.

ही लहान टीम नंतरही या कामाला जायची. मी मात्र टाळायचो. माझे हळूहळू गावात चांगल्या घरातले मित्र होत गेले. माहीत नाही पण मनात सारखं यायचं यात जास्तीचे पैसे मिळत असले तरी नको वाटायचं. जर आपण कुणाला सापडलो तर... भीतीनेच नकोसं वाटायचं.

मोठा भाऊ अंमळनेरच्या प्रताप कॉलेजला बी.ए.च्या पहिल्या वर्षाला होता. वहिनीही घरी असायच्या. भावाचं लग्न तो सातवीला असताना झालं होतं. वहिनींचाही धाक मनात असायचा. वहिनींनी भावाला सांगितलं तर... अशा घरातल्या धाकाने आणि बाहेरच्या लोकांच्या भीतीने स्वतःमध्ये ठोकला गेलो. ओल्या मातीसारखा. जाड्या रम्या कधीकधी जिल्ह्यावर यायचा. मी नोकरीला लागलो तेव्हा बिश्याकाकांच्या सोबत ताश्यांवर डफडं वाजवायला गणपतीसाठी. तेव्हा हमखास खांद्यावर डफडं टांगून माझ्याकडे यायचा. मी मांग जातीचा आहे हे शहराच्या कॉलनीत माझ्या आसपासच्या लोकांना कळायचं. त्याच्या दुसऱ्या मुलीचं मागच्या वर्षीच लग्न झालं. त्या लग्नाला माझ्या गावातली, समाजाची माझ्या मनात लहानपणापासून घर करून बसलेली सगळी माणसं भेटलीत. मुलीच्या लग्नात खांद्यावर डोकं ठेवून जाड्या रडला. लहानपणाचा खऱ्या मित्रासारखा तो तसाच आहे माझ्यासाठी. आधी होता अगदी तसाच जीव ओवाळून टाकणारा.

मी शहरात येताना त्याच्या हजारो आठवणी सोबत घेऊन आलो. मी मुलांमध्ये शाळेत शिकवायला जातो, तेव्हा त्या मुलांचा होत असतो. घरात बायको, पोरं यांचा असतो, तर शहरात शहराचा व्हावं लागतं. माझ्यासाठी शिक्षणाने जीवनात बदलण्याची एक संधी दिली आहे. त्याच्यासाठी काय? या काळात गावातही एखादा रम्या असेल का, बाप्याला शिक्षणासाठी दिशा देणारा आणि एखादा बाप्याही असेल का? पुन्हा पुन्हा शिक्षणासाठी रम्याला सांगत राहाणारा? असे बरेच प्रश्न स्वतःला आज सतत खात जातात.

माझ्या थांबलेल्या शिक्षणाला पुन्हा शिक्षणाकडे घेऊन जाणाऱ्या पहिल्या पायरीचं नाव रम्या असंच आहे.


गुल्फीवाला कालूचाचा

एखादा माणूस, त्याची प्रतिमा आपल्या लहानपणापासूनच डोक्यात ठशासारखी कायमची उमटून जाते. मग ती कधीही आणि शेवटपर्यंत ठळक राहते. बदलत जाणारा चेहरा आपण कितीही जवळून बघत असू तरी ती प्रतिमा, आकृती माणसाच्या मनात त्याच्या चेहऱ्यासह आठवत राहते. ती अगदी कायमची. हा कालू चाचा आम्हाला कोणतीही समज आलेली नव्हती

अनुक्रमणिका

तेव्हापासूनचा आमच्या गावाला सायकलवर गुल्फीचा चौकोनी डबा घेऊन यायचा. या चाचाच्या सायकलचं चाक माझ्यापेक्षा उंच होतं. तेव्हापासून गावातले अनेक मुलंमुली त्याच्या जवळचे होत गेले. तो आसपासच्या अनेक गावांत जायचा. तो चोपड्याला राहणारा. सकाळी लवकर आपला कुल्फीचा चौकोनी डबा सायकलच्या मागे कॅरियरला रबरी ट्यूबने फिट्ट बांधून तो चोपड्याच्या बर्फाच्या कारखान्यातून कुल्फ्या डब्यात भरायचा आणि सायकलवर टांग मारली की, चोपड्याहून चुंचाळे, चौगाव, या मार्गाने लासूरला यायचा. तो गावात आला की, पागाबडा, वाघवाडा, चांभारवाडा, सर्व गावात फिरून मग शेवटी गावाबाहेर भिलाटीत यायचा. आमच्या झोपडीच्या समोरच रस्त्यावर त्याचा भरदुपारी एक, दोन वाजता आवाज यायचा. 'गुल्फीवाले' हा कालू चाचाचा आवाज पोरांचा अगदी ओळखीचा. तो पार रस्त्याच्या त्या बाजूने माधू मांगाच्या घरासमोर सायकल उभी करायचा. सर्व मुलं त्याच्या आजूबाजूला गर्दी करून कुल्फी मागायचे. 'जारे पैसे ले आ' ज्यांच्याकडे पैसे नाहीत त्यांना हकलायचा. बऱ्याचदा पैसे नसतील तरीही त्याच्या सायकलच्या आजूबाजूला आम्ही काही मुलंमुली चकरा मारायचो. त्याच्या कुल्फीच्या डब्याच्या खालच्या एखाद्या कोपऱ्यातून कुल्फीचं पाणी टपटप पडत असेल तर एक दुसऱ्याला ढकलत माझा एक हात त्या पोरांच्या हाताजवळ घुसवायचो. दुसऱ्यांच्या ओंजळमधलं लाल गोड आणि थंड पाणी थोडं तरी खाली पडलं तर आमचं भांडणं व्हायचं. 'रांडनानी पाडी टाकं पाणी. थांब छिनालना मी भी तुन्हा हातले धक्का मालसू' असे शिव्या देत कुल्फीच्या पाण्याचा ओला हात चाटत पोरांपोरांची भांडणं सुरू व्हायची.

हा चाचा लहान लहान पोरांची भांडणं सोडवायचा. त्याने कुल्फीचे छोटे छोटे झालेले डब्यातले तुकडे काढून आमच्या हातावर ठेवलेत की भांडणं थांबायची. हा आला की बरीच मुलं त्यांच्या आईच्या हातचा मार खायचे. आईकडे पैसे नसले की माझीही रिंगी तिच्या भोवती सुरू व्हायची. 'बघ मल्हे गुल्फी घी दे. मल्हे गुल्फी खावाची हे. देना वं पैसे' ती टोपल्या विणत बसलेली असायची. माझी ही सारखी भुणभुण ऐकत ती संतापून बोलायची, 'घे मल्हे खाईटाक' ती शेवटी उठायची. त्या कालू चाचाला आवाज द्यायची. 'कालू भावू उधार दे ना एक गुल्फी. दि टाकीन परवाले पैसे.'



तेव्हा कालूचाचा रस्त्यावर आईला सांगायचा, 'परसो के भी तो पाच पैसे रुखेल है और अभी के पाच ऐसे दस होंगे. मेरा भी तो इसपेच चलता है घर.' मी आई जवळून सुसाट धावत त्याच्या डब्याजवळच उभा राहायचो. कुल्फी चोखत चोखत बाजूला थांबायचो. खोक्याच्या खालचं पाणी चाटणारी मुलं बघायची. त्यांना मनातल्या मनात वाटायचं आता थोड्यावेळापूर्वी हा आपल्याबरोबर कुल्फीचे पाणी आपल्यासारखं चाटत होता; पण याच्या हातात लालभडक दिसणारी संपूर्ण कुल्फीच आली. 'याची माय किती चांगली हे भो. आपल्या आईपेक्षा गैरी समजदार हे भो. उधार का असेना पण घी दिलं याचा मायनं. आपणभी याच्या घरी जन्मलो असतो तर आपलेभी गावातलं काही वेळले चांगलं चांगले भाकरीमधे ते पन भेटलं असतं आपल्याले.' ज्यांना कुल्फी खायाला मिळायची नाही ते मग माझ्याकडे मागायचे. मी दाताने थोडा तुकडा तोडून एक दोन जणांना द्यायचो. ज्यांना मी द्यायचो ते मग खेळताना माझं ऐकायचे. या कालूचाचाच्या सायकलच्या दांड्याला पायडलला लागणार नाही अशी एक गोनट्याची पिशवी पूर्ण दंड्याला शिवून घेतली होती. गावात बऱ्याच सासरवाशीण बाया दुपारच्या वेळला लहान मुलांचं नाव करून पैशांच्या ऐवजी धान्यांवर कुल्फी घ्यायच्या. अर्ध

पोतं भरेल इतकं धान्य याच्या पिशवीत बसायचं. हा कॅरीयरवर कुल्फीचा रिकामा डबा आणि ते धान्य घेऊन चारपाचला बाजारपट्ट्यात झगा महाजनच्या हॉटेलवर किंवा कौसर काकांच्या हॉटेलवर चहा प्यायचा आणि सायकलवर टांग मारली की सरळ हिंगोणामार्गे चोपड्याच्या रस्त्याला लागायचा. हा भिलाटीत जेव्हाही आला असेल तेव्हा सर्व भिलाटीच्या पोरांना डब्यातले उरलेसुरले बारीक बारीक तुकडे असंच देऊन टाकायचा आणि अख्ख्या भिलाटीभर या चाचाची उधारी. हा कधीही कुणाला रागावून बोलला नसेल. त्याचे उधारीचे पैसे आठदहा दिवसाने का असेना दिले जायचे. त्याचे उधारीचे पैसे आईही ठेवायची नाही. 'केव्हडा दुरं सायकलवर येतो हा बिचारा. त्याचा भी लहान मुलांचा पसारा असेन घरी. त्या बिचाऱ्याची स्थितीभी गरीबीची. दि टाकले माय कालूचे विस पैसे झाल्ते ते.' असं कधीकधी बापाला आई सांगायची.

भिलाटीतल्या बाया, मुली आणि पोरं जास्त करून लाल होटवाली कुल्फी विकत घ्यायचे. 'लाल होटवाली गुल्फी लाल होटवाली गुल्फी...' तो भिलाटीत आला की हा स्पेशल आवाज द्यायचा. शिवाय ही कुल्फी गोड थंडी होती. पान खाल्यासारखे पोरांचे, बायांचे, मुलींचे ओठ लालभडक व्हायचे. एखादा मुलगा मुलगी पहाडात आईवडिलांबरबर गेले असेल ते चारपाच वाजेला घरी आले की, बाकीच्या मुलामुलींच्या ओठांवरून त्यांना समजून जायचं. काल कालूचाचा आला नव्हता आज आला असेल, 'गुल्फी खायला सनं' असं भिलाटीत त्या एखाद्या पोराला विचारलं की तो सांगायचा, 'नाहारं पान खायलंसं, कारेभो पान खायला संगीनामी.' असं तो मला पुरावा ठेवायचा. ही लाल होटवाली गुल्फी पहाडाच्या गावात नि आमच्यासारख्या भिलाटीत जास्त विकली जायची. गावात हळदच्या रंगांची कुल्फी जास्त विक्री व्हायची. लहान मुलंमुली, बाया पानखाणं म्हणजे लांबच. पण नुसते त्यांना लाल ओठही दिसायला नको. मुलींचे, बायांचे म्हणून ते पिवळ्या रंगाची कुल्फी खायायचे. चुकून एखादी बाई गावातली पान खात असेल तर तिला हमखास नाव ठेवायचे. 'तमासामधली रांड सारखी पान खास ती' असं बोलायलाही माणसं कमी करायचे नाही. पण आमच्या भिलाटीतला कारभार मनमोकळेपणे असायचा. बऱ्याच बायका पान खायच्या. आमच्या घरीच बाप आईला पानटपरीवरून पान आणून द्यायचा. नाही तर गोंट्यामध्ये सुटे पान माथनच्या खाली लहान बाडगीमध्ये ते ओले राहावेत म्हणून ठेवायची. पिशवीमध्ये एक डबी, त्यात काथ, दुसऱ्या डबीच्या खात्यात चुना आणि तिसऱ्या मोठ्या खात्यात तंबाखू, सुपारीचे तुकडे असं पान घरच्या घरी बनवायची सुविधा तिच्याकडे असायची. एक पानाचा इडा बनवला तो तोंडात टाकला की तिला कशी कामात तरतरी यायची. वीसवीस टोपल्यांचा जोड विणून झालेला त्यांना पटापट अर्धा तासात जोड लावून मोकळी व्हायची. पुरुषी वर्चस्व मात्र गरिबांच्या घरातही सारखंच. पण पिण्याखाण्याच्या बाबतीत मात्र बायांना मोकळीक. अशा बऱ्याच बायका पान खायला गावातही जायच्या. म्हणून ती आमच्यासाठी विशेष बाब नव्हती. माझा बाप असमनताऱ्याचा तुकडा पानटपरीवरून आईचं पान घेताना मागून माझ्यासाठी द्यायचा. पण त्याचे इतके ओठ लाल व्हायचे नाहीत जितके या कालूचाचाच्या लाल होटवाली गुल्फीने व्हायचे. शाळेत प्रार्थनेच्या वेळी गुरुजींनी शिटी मारली की जशी पोरं आपापल्या रांगेत पळत पळत एका ठिकाणी यायची तसे कालूचाचाचा आवाज आला की सर्व भिलाटीतली लहानलहान पोरं पळत पळत त्याच्याजवळ यायचे. हा चाचा स्वभावाने खूप गरीब. इमानदारीनं मेहनतीचं काम करणारा, त्याची उंची सायकलवर बसल्यावर जमिनीला जेमतेम पाय पुरतील इतकी. रंगी अतिशय काळा. डोक्याला लाल फटका नेहमी बांधलेला. पायजमा पांढरा पण तो कधी पांढऱ्यासारखा दिसला नाही. कुडतं बारकी चौकोटी रंगीत, हमेशा बाह्या अर्धवट वर गुंडाळलेल्या. पायात मालट्रकच्या टायरची वाकलेली चप्पल. याचे कपडे काढून जरी पाण्यात धुतले तरी ते पाणी कुल्फीचं गोड पाणी लागेल इतके कुल्फीच्या डागांनी भरलेले. त्याच्या पोटापाण्यासाठी जरी तो व्यवहारी होता तरी भिलाटीतल्या मुलांसाठी मात्र त्याने व्यवहार बघितला नाही. जे मिळेल ते तो घ्यायचा. पैसे असले नसले तरी भिलाटीत ते कुल्फीचे तुकडे देऊन निघून जायचा. त्याचा इतका भयंकर नाद होता मुलांमध्ये की काही वेळेला मुलं 'कालूचाचा आला' असं रात्रीला झोपेतही बोलायचे. मलाही असंच झोपेत बडबड करताना उठवलेलं आठवतं.' 'कालू भावू सर्व भिलाटीतले पोरं अंगावर घरी घेतले भो तू' असं काही वेळा आई पैसे देताना, कुल्फी घेताना सांगायची. 'नही भाभी बच्चे तो भगवान से है, यही

तो दुवा है मेरे परिवारके वास्ते.' माझ्या हातात कुल्फीचा तुकडा देताना तो असं म्हणत डब्यात हात टाकत दुसऱ्या मुलांनाही कुल्फीचे तुकडे किंवा अर्धी कुल्फी देऊन टाकायचा.

आम्हा लहान मुलांना कुठल्याही शिक्षणाच्या पुस्तकातली परीची किंवा सांगितल्याबरोबर हातात काहीतरी खाण्याचं काढून देणाऱ्या देवाची गोष्ट माहीत नव्हती. पण हा देवासारखं त्या डब्यात हात घालून पोरांना कुल्फीचे तुकडे काढून द्यायचा. याच्यावर सर्व मुलंमुली मनापासून प्रेम करायची. भिलाटीतली मोठी माणसंही त्याला सांगायची, कालू पहाडात सायकलनं जाताना कुणी आडवलं की आम्हाला सांग, आम्ही बघतो त्याला. 'मै क्या गरीब आदमी भो' असं तो हसत त्यांना उत्तर द्यायचा.

पण त्या दिवशी तो सकाळीच भिलाटीत न थांबता आणि गावात न विकता सरळ तो सेत्रासेनला गेला होता. भिलाटी सोडली की, सरळ पहाडाकडे हा जाणारा रस्ता होता. भिलाटीच्या थोड्या अंतरापर्यंत घेवरशेटच्या टेकडीपर्यंत चढ होता. मग तिथून पुढे पायडल न मारता सायकल थेट कमळजादेवीच्या मंदिरापासून ते नाटेश्वर मंदिराच्या पुढपर्यंत दोन-अडीच मैल उतारावर जायची. माणूस शीटवर बसून आरामात जायचा. याची सायकल तशीच भिनफाट बिना पायडलची गेली असणार. नाटेश्वरपासूनच खूप दाट झाडी लागायची. उंच उंच सागवानची झाडं, अंजन, धावडा, हजारोंच्या संख्येने रस्त्याच्या एका बाजूला होती. दिवसाही अंधाराचा भास व्हावा अशी गर्दी करून वेली, झाडं होती. एका बाजूने पहाड कोरून रस्ता तयार केल्याने मोठमोठ्या डोंगराच्या कपारी होत्या. पाच-सहा पायडल मारले की वळणाचा रस्ता. डोंगरावर चढतो आहोत असा चढ असलेला रस्ता. या रस्त्याने जाताना तिकडचा माणूस आपल्याला दिसणार नाही आणि आपण त्याला दिसणार नाही इतके. असा वळणदार रस्ता वर गेल्यावर हा सत्रासेनचा मोठा घाट लागायचा. याच घाटावर लुटमार व्हायची आणि नाटेश्वरच्या थोडं पुढे रस्त्याला आडवा वाहणारा मोठा नाला. दाट जंगल असलेल्या या ठिकाणी संध्याकाळच्या वेळेस वाघासारखे प्राणीही पाणी प्यायला यायचे. मध्येच सर्व जंगलात वेगवेगळ्या पक्ष्यांचा, किड्यांचा किर्रकिर्र करणारा आवाज, झाडांचे पान वाऱ्याने हलण्याचा, जमिनीवर कोरड्या झाडांचा पानांचा वेगळा आवाज ऐकू येई. दगडांवरून त्या नाल्यात वाहणाऱ्या पाण्याची खळखळ. आपण एकटे असलो की सगळा हा निसर्ग आपल्या गळ्याला मिठी मारतो आहे की काय असा भास होत राहायचा. पण मध्येच सुनसान जागेत आपण एकटे आहोत अशीही भीती मनात दाटून यायची. पण या घाटावरून सत्रासेनकडे जाताना घाटाची उतरण होती. या उतरणीवर पायी चालणाऱ्यांनाही पायाचा ब्रेक लावताना स्वतःचा तोल सांभाळावा लागे. त्यामुळे सायकल तर तिच्या वेगापेक्षा जास्त वेगाने आपोआप धावते. असं वाटायचं. जाताना उजव्या बाजूला रस्त्याच्या वळणाची शेवटपर्यंत दरी होती. पहाडातून येणारा नेहमी खळखळ वाहाणारा नाला. घाटाच्या शेवटच्या टप्प्याला हा नाला ओलांडला की हा घाट संपायचा. थोडं पुढे रस्त्याच्या दुतर्फा लांब डोंगर सर्व सपाटी. तिथंच पंधरा-वीस घरांची 'उत्तमनगर' या गावाची वस्ती. तेथून काहीच अंतरावर सत्रासेन हे पहाडातलं पहिलं गाव.

त्या दिवशी तो हे सर्व सपसप पार करून सकाळी दहा वाजेपर्यंत सत्रासेनला पोहचला असेल. उन्हाळ्याचे दिवस होते. बारा ते एक वाजेपर्यंत कुल्फ्या विकून घरून भात्यात बांधून आणलेली चटणी-भाकर त्याची खाऊन झाली होती. सत्रासेनच्या आश्रम शाळेसमोरच्या निंबाच्या झाडाजवळ असलेल्या लहान मंदिराच्या ओट्यावर बसून तो आपल्या कापडी पिशवीतलं पाणी पिला. शीटच्या सरळ दांड्याला बांधलेला पंप काढून दोन्ही चाकांची हवा व्यवस्थित भरून घेतली. आज तो जास्तच खुशीत होता. त्याची बऱ्यापैकी लोकांकडची उधारी मिळाली होती आणि सर्व कुल्फीचा डबा खाली झाला होता आणि धान्यही अर्ध्या पोत्याच्यावर दांड्याच्या गोंट्यात भरले होते. त्याच्या धंद्याला आज चांगलीच बरकत लाभली होती. माघ महिना असल्याने सगळीकडे झाडांची कोरडी पानं उडून वाऱ्याबरोबर पूर्ण गावभर, जंगलभर त्यांचा खेळ सुरू होता. याने टायरची हवा भरून पंप दांड्याला बांधला नि सायकलवर टांग टाकून हळूहळू सत्रासेन सोडलं.

आज वाऱ्याइतकाच त्याचा आनंद रस्त्याने धावत होता. त्याच्या मनाला असंही वाटत असेल कदाचित धंदा छान झाला. उधारीही बऱ्याच जणांकडची मिळाली. चार वाजेपर्यंत आपण चोपड्याला पोहचू. घरी बायकोला सांगू आज किती पैसा आला आपल्याकडे आणि शिवाय धान्यही भरपूर आणलं. लहान पोरांना आझाद चौकात

बोट धरून लक्ष्मीच्या दुकानावर घेऊन जाऊ. आज बायको पोरं खूप खूश होतील माझ्या कमाईवर. रस्त्यावरच्या मागे जाणाऱ्या झाडांना, त्या उडणाऱ्या कोरड्या पानांना, त्या मध्येच सुर्रकन जंगलात खेळणाऱ्या हवेलाही आनंद वाटत असावा. रस्त्याने पुढे पुढे निघत होता. उत्तमनगर केव्हा आलं त्या आनंदाच्या धुंदीत त्याला समजलंही नाही. ते त्याने सोडलं आणि त्या घाटाच्या नाल्याजवळ तो आला नि नाल्यात जोरात सायकल घेत घाट पूर्ण एका दमात तो चढला. थोडा श्वास घेऊ म्हणतो तेव्हाशी दरीत लपून बसलेल्या एका चोराने त्याच्या पायावर लाकडी दांडा मारला. याने काही सेकंदात हा नेम चुकवला नि हा दांडा त्याच्या कुल्फीच्या डब्यावर खड्कन लागला. याला अगदी जीव गमावल्यासारखा घाम आला. याने नको तितक्या जोरात सायकल घेतली. मागे वळूनही पाहिलं नाही. याला वाटलं त्याच कपारीत दोन चार जण असतील. हा सुसाट वेगाने जीव वाचवत वाऱ्याच्या गतीने सायकल चालवत होता. मागून तो चोर जोरात आवाज देत त्याच्या दिशेने दगड फेकत होता. त्याच्या साथीदारांना त्याने जोरात आवाज दिला. त्याचे काही साथीदार टप्प्याटप्याने झाडांच्या दाट पानांच्या आडोशाला झाडावर तिरकामटा घेऊन लपत बसले होते. एकाने त्याच्या सायकलच्या धावण्याचा अंदाज घेत बाण सोडला. तो सप्पकन त्याच्या पायाला न लागता दांड्याला गोंट्याच्या धान्याच्या गाठोड्यात आरपार घुसून बसला. ज्या बाजूने तो घुसला त्या गाठोड्याच्या खालच्या बाजूला जाड गोंट्याला बोटाइतकं गोल छिद्र पडलं. धान्याची पाण्याच्या धारीसारखी धार सुरू झाली. याला वाटून गेलं आपलं जिवंत राहणं आता काही खरं नाही. तरी तो त्याच वेगात सायकल चालवत होता. त्याच वेगाने दुसरा बाण पहाडाच्या वरच्या बाजूनं तितक्याच वेगानं आला आणि याच्या डाव्या पायाच्या पोटरीत आरपार. बाणाचं लोखंडी टोक दुसऱ्या बाजूनं तीन-चार इंच बाहेर निघालं. घाट उतरत त्याने उजव्या पायाचा पायडल कायम सुरू ठेवला. पायडल आपोआप जर फिरत होता तरी तो त्या उतारावर शुद्धीत नसल्यासारखा उजव्या पायाचा पायडल मारत होता. नागमोडी सापासारखी घाटापासून सायकल बरोबर सुरू झालेली ती धान्याची रांग गोंट्यातलं धान्य संपल्याने बंद झाली होती. त्याची सायकल दडदड, खडखड करत दगडावरून खड्ड्यामधून दणके घेत नाटेश्वरच्या जवळ असलेल्या नाल्याजवळ आली. आता नाटेश्वर जवळच होतं. नाटेश्वर केव्हा मागं टाकलं त्याला काहीही समजत नव्हतं. त्याने डाव्या पायाचा तळवा समोरच्या दांड्याला लावला होता. चड्डीच्या कपड्याला धरून त्याचं रक्त रस्त्यानं टपटप पडत होतं. कमळजादेवीचं मंदिर आलं आणि त्याच्या थोडा जीवात जीव आला. मात्र त्याचा सायकलचा वेग कमी झाला नव्हता. त्याच वेगानं तो आला व भिलाटीच्या तोंडाला सायकल रस्त्यावर थांबवली. विमल मावशीच्या घरासमोर रस्त्यावर त्या बायांचं लक्ष गेलं. बाया धावत सुटल्या. आम्ही मावशीच्या लहान निंबाच्या सावलीत खेळणारे पोरंपोरी त्याच्याकडे धावत सुटलो. दुपारचे दोन-तीन वाजले होते. विमल मावशी झोपडीत धावत गेली आणि पाण्याचा लोटा भरून आणला. तो घामाघूम झालेला चड्डीतून बाण त्याच्या पोटरीत आरपार घुसलेला दिसत होता. सर्व पोटरीच्या खाली चड्डी रक्ताने ओली झाली होती. चेन-चक्क्यावर रक्ताचे थेंब टपटप पडत होते. सर्व चेनला ऑईल देतात तसं सर्व चेनभर रक्त दिसत होतं. आम्हीही मोठ्या बायांच्या मधून त्याच्याकडे बघत होतो.

'कालू ले जल्दी गोरखदादाकडे लि जा' असं कोणीतरी गर्दीत बोललं. तो सायकलवर बसला. आम्ही चारपाच पोरं त्याच्या सायकलला धक्का मारत नेत होतो. भिलाटीपासून त्याला सायकलचा पायडल आम्ही मारू दिला नाही. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. गावातले लोक बाजारात जमा झाले. बाजाराच्या तोंडावरच दूध डेअरीकडे पायऱ्या चढून जाणाऱ्या दगडी ओट्यावरच कौलारू छताचा गोरखदादांचा दवाखाना होता. आता त्याच्या पायाचा त्रास वाढला होता. लोकांनी ह्याचा हात धरून पायऱ्या चढवल्या. दवाखान्यात सर्व बाजूंनी गर्दी होती. आम्ही पोरं चौकोनी लाकडी पाट्यांमधून त्याला लाकडी पलंगावर झोपवलेलं पाहात होतो. डॉक्टरांनी त्याची गुडघ्यापर्यंत चड्डी गुंडाळली आणि तो बाण डाव्या बाजूने घुसून उजव्या बाजूला त्याचं लोखंडी टोक स्पष्ट दिसत होतं. डॉक्टरांनी करवतसारखं लहान अवजार घेतलं आणि अणकुचीदार लोखंडाच्या बाणाला लावलेल्या काडीचं रक्त पुसलं आणि लोखंडी टोक कापून बाजूला केलं. ते कापताना तो खूप लहान मुलासारखा बोंबलत होता आणि दोन लोकांना त्याच्या पोटरीजवळ फिट्ट धरायला लावलं

आणि डॉक्टरांनी त्या बाणाच्या बेताच्या काडीला दोन्ही हातांनी पकडून सप्पकन त्याच्या पोटरीच्या मांसातून ओरपून काढली. त्यावेळी तो ढोरासारखा ओरडला. खूप रक्त वाहात होतं. जखम साफ करत, त्याला मलमपट्टी करत त्याला दवाखान्यातच गोळ्या औषधी खायायला दिली. त्याची सायकल आणि त्याला पाच वाजेच्या दुधाच्या मालट्रकमध्ये बसवलं. पायाचं रक्त मलमपट्टी केल्याने थांबलं होतं.

आम्ही सर्व पोरं भिलाटीत निघून गेलो. आई विचारत होती, 'दवाखान्यात घी गेल्थे का त्याल्हे. कश्यावर घरी धाड्ल त्याला.' मी आईला सर्व माहिती सांगत असताना तिनं टोपलीला येट लावणं थांबवलं होतं. 'हे आपल्याकडचे खावळे नई वाटतं. कापूसच्या येळलेच आपल्याकडचे खावळे खावळाई कऱ्याले जाता. हे पहाडात्ले असतील.' अशी आई सांगत होती. माझ्या मनात, भिलाटीच्या लहान लहान पोरांच्या मनात या चोरांविषयी खूप संताप होत होता. इतक्या गरीब माणसालाच का मारतात हे? आणि हा चाचा तर स्वभावानेही खूप गरीब. मग या चोरांना गरीब-श्रीमंत समजत नसेल का? मी माझ्या लहान मनाने विचार करत राहायचो.

हा गुल्फीवाला कालूचाचा नंतर फक्त अधूनमधून यायचा. त्या दोन-तीन वर्षांनंतर त्याचं अधूनमधून येणंही बंद झालं. त्याच्या पायाचा त्रास हळूहळू वाढला होता. म्हणून त्याला जास्त लांबपर्यंत सायकल चालवता यायची नाही. चाचाचं येणं कायमचं बंद झालं होतं आता. पण चाचांची 'लाल होटवाली गुल्फी' आमच्या ओठांवरून जात नव्हती. मी मोठा झाल्यावर कधीही सत्रासेनला कधीही बँड वाजवायला गेलो असेल आणि घाट लागला की चाचा आठवला नसेल असं कधी झालं नाही. पायात यांनी कसा तिरकामठा मारला असेल. हा घाट बघून डोळ्यांसमोर फिरायचा. एकट्याने किती धाडसाने पार केला असेल हा नाटेश्वरपर्यंतचा घाट. तो जाईपर्यंत मी नेहमी त्या चाचाच्या त्या घटनेमध्ये पार आत घुसून विचार करत राहायचो. हा घाट सत्रासेनचा असो किंवा बिल्हाडचा पण तो फक्त कालूचाचांचा घाट आहे, असं मला नेहमी वाटत राहतं.

• • •

साभार पोच

१) **तंतोतंत** (कविता) : केशव सखाराम देशमुख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृ.१२०, मूल्य : रु. १५०/-
२) **यथार्थ** : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, गौरवग्रंथ (लेख), संपादक : डॉ. श्रीपाल सबनीस, संवेदना प्रकाशन, पुणे, पृ.३७५, मूल्य : रु. ४००/-
३) **कर्मठकथा** (आत्मकथन) : सुगंधा चितळे-पांडे, पब्लिक स्पीकर, पुणे, पृ.१९२, मूल्य : रु. २५०/-
४) **बाऊल** (कविता) : सौमित्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.२३२, मूल्य : रु. ४७५/-
५) **टाहोरा** (कविता) : अनिल साबळे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ.८४, मूल्य : रु. १३०/-
६) **वृद्धशतक** (कमल व्होरा यांच्या अनुवादित कविता) : वर्जेश सोलंकी, लोकवाङ्मय गृह, पृ.१२०, मूल्य : रु. १६०/-
७) **उजेडाची बारा भाषणे** (भाषणे) : यशवंत मनोहर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पृ.१३२, मूल्य : रु. १५०/-
८) **काजवा** (कथा) : नारायण लाळे, संवेदना प्रकाशन, पुणे, पृ.१६६, मूल्य : रु. २००/-
९) **वैदर्भीय संशोधक** (संशोधन) : डॉ. राजेंद्र डोळके, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, पृ.३९०, मूल्य : रु. ४५०/-


कविवर्य ग्रेस यांच्या लोकप्रिय साहित्याचा
नजराणा रसिकांसाठी पुन्हा एकदा!
काव्यसंग्रह
संध्याकाळच्या कविता - रु. ११५
राजपुत्र आणि डार्लिंग - रु. १५०
सांध्यपर्वातील वैष्णवी - रु. ३६०
चंद्रमाधवीचे प्रदेश - रु. ३५०
बाई! जोगियापुरुष - रु. ३००
सांजभयाच्या साजणी - रु. २२५
विशेष सवलतीत रु. ११००/- (अधिक पोस्टेज)
ललित लेखन
संध्यामग्न पुरुषाची लक्षणे - रु. ४००
कावळे उडाले स्वामी - रु. ३४५
ओल्या वेळूची बासरी - रु. ४००
मृगजळाचे बांधकाम - रु. २७५
वाऱ्याने हलते रान - रु. २००
चर्चबेल - रु. १३०
मितवा - रु. ३५०
विशेष सवलतीत रु. १५००/- (अधिक पोस्टेज)
सवलत दि. ३० जुलै २०१९ पर्यंतच!
छायाचित्र : मिलिंद देशमुख
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६. फोन नं. २३५३०३०३

काही राजस्थानी कविता

राजेंद्र जोशी
ओम नागर
अंबिका दत्त
जितेंद्र सोनी
नीरज दइया
हरीश शर्मा

अनुवाद
सुनीता डागा

राजेंद्र जोशी

जन्म – २९ जुलै १९६२
प्रमुख प्रकाशित साहित्य – कद आवैला खरुंट (राजस्थानी कवितासंग्रह)
सब के साथ मिल जाएगा, मौन सें बतकही (हिंदी कवितासंग्रह)
संपादक, आखर गंगा (भाग-१, २ आणि ३) 'आखर उजास'चे १० वर्षं संपादन

१. वाळूचा समुद्र

दूरदूरवर पसरलेला
वाळूचा समुद्र
पांथस्थाला
सांगू पाहतोय काही
बोल माझ्याशी काहीतरी
ऐक माझं
जाणून घे माझं दुःख
बोलू लागला जर
माझ्या शरीराचा आवाज
तर अनेक वाटा उघडतील इथं
इथेच मिळेल तुला मृगनयनी
माझ्या आत सोनं आहे
त्याला गमवू नकोस
रक्षण कर त्याचं
मग सगळ्यांना घे सोबत...

• • •

२. नात्यांची वाळू

रस्त्यांचा अभाव आहे
वाळूच्या समुद्रात
मऊ उबदार वाळू
रस्त्याच्या मधोमध
आपला हक्क दाखवत

सुनीता डागा
ब्रह्मा सनसिटी, डी-४,
८०३, वडगाव शेरी,
पुणे-४११ ०१४,
मो. : ८१४९१७६६३८
संपर्क :
sunitadaga1@gmail.com

अनुक्रमणिका

आणि
बदलून जातो
रस्त्याचा चेहरा
अनवाणी पायांना
सुख व आपलेपणा देत

रस्त्याला दृष्टी देणारी
टेकड्याटेकड्यांची वाळू
अहिंसक असते ही
समुद्रासारखी
अथांग पसरलेली वाळू!

• • •

३. पाणी

परत करा मला
माझं पाणी
माझं हे शरीर
माझ्या चेहऱ्यावरचं हास्य
त्याचा थकलेला चेहरा
सगळं काही व्यक्त करतोय
की तुम्ही
घेतलं नाहीय माझं पाणी
तर हिरावलंय ते
घेतलंय स्वतःमध्ये भरून
त्यामुळेच तर जिवंत आहात तुम्ही
अशाच पाण्यावर
पोसतंय तुमचं शरीर
तुमचं पाणी तर
कधीच आटून गेलंय
तुमच्याजवळ नाहीय का
तुमचं स्वतःचं असं पाणी?

• • •

४. शेजारी

कोणाला म्हणू मी शेजारी
एका दिशेतून
अमली पदार्थ येतात
दुसरीकडून
गोळी सुटते
तिसऱ्या दिशेतून
ठिणग्या उडतात
चौथ्या दिशेला
ट्रेनिंग चालूय
कोणाला म्हणू मी शेजारी...

एका दिशेतून सायरन वाजतो
दुसऱ्या दिशेला अजान
तिसरीकडे गुरुवाणी
चौथ्या दिशेला अहिंसेची शिबिरं

माझ्यासमोर गांधी आहे
हिंसा भ्याडपणा आहे
खरं तर
माणसाचा माणूसच शेजारी आहे
असायला हवा
माझे शेजारी तर
ते आहेत!

• • •

डॉ. ओम नागर

कवी आणि अनुवादक. जन्म : २० नोव्हेंबर १९८०
प्रकाशित साहित्य : छियांपताई, प्रीत, जद बी मांडबा बैठूं कविता (२०१२) (साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त राजस्थानी कवितासंग्रह)
अनुवाद : जनता बावळी होगी (नाटक)
कोई एक जीवतो छै (प्रसिद्ध हिंदी कवी लीलाधर जगूड़ी ह्यांच्या कवितांचा अनुवाद)

१. तरंग

कसं शक्य आहे की
तुम्ही जे काही सांगाल
ते खरं मानेन मी
की ह्या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत
उरलं नाही आता पाणी
ओंजळभरदेखील

की लहानपणी नदीच्या वाळूत

अनुक्रमणिका

रचलेली घरकुलं
ढासळून गेलीत काळाच्या आघाताने
की नदीच्या पोटात आता
उरला नाहीय एकही झरा

खरं तर हेही असू शकतं की
विहिरीत ढकलून दिल्याहेत तुम्ही
सगळ्या आठवणी
आणि दुर्लक्षित केलं
कासरा आणि घागरीचं नातं

पण अशातही
आज जरी न्याहाळाल तुम्ही
विहिरीच्या कठड्यावर बसून
उरलंसुरलं अमृत
तर एक-एक तरंग त्याचा
तुमच्या पायांच्या स्पर्शानं
होऊन जाईल कृतार्थ !

• • •

२. भूक

कदाचित कोणत्याही भाषेच्या शब्दकोशात
आपल्या भयानक अर्थासहित उपस्थित असतो
भूक हा शब्द
आयुष्यात किती कितीदा
पूर्णविरामाच्या शोधात
अल्पविरामांचे अडथळे ओलांडून
पुढे सरकण्यास असमर्थ ठरते भूक

विस्मयचकित होऊन
काळाच्या कंठावर
अर्धचंद्राकारात झुलत राहते
कधीच उतरवू न शकणाऱ्या दागिन्याप्रमाणे

काना-मात्रा-वेलांट्यांनी कंटाळलेली
भुकेची बाराखडी सतत
रचत असते जीवनाचं व्याकरण

शेवटच्या श्वासापर्यंत
फडफडतात भुकेचे पंख
काळाच्या शुष्क निब्बर लाकडावर

एकामागोमाग एक
आपली रक्तबंबाळ चोच मारत असते
सुतार पक्ष्याप्रमाणे भूक

भुकेच्या विळख्यात सापडलेली ही पृथ्वी
आपल्याच परिघात पुढे पुढे सरकत
परतते आपल्याच अक्षावर
जिथं भुकेमुळे
वाहात असते एक नदी !

• • •

३. उगवावं तर काय उगवावं

उगवावं तर काय उगवावं
काय असंच भुकेला रोवून
कापत राहावं आम्ही आत्महत्यांचं पीक !

किंवा मग
ज्या करवतीनं करत आलोय
पिकांची कापणी
त्या करवतीनं कापून टाकावेत
प्रलोभनांचे फास
सावकार-जमीनदारांचे गळे !

उगवावं तर काय उगवावं
काय असंच हुंदके आणि रुदन रोवून
अश्रूंनी सिंचन करत राहावं मातीचं !

किंवा मग
क्रांतीच्या घोषणांनी
उद्ध्वस्त करावेत लखलखणारे महाल
उखडून टाकावे संगमरवरी अंगण !

उगवावं तर काय उगवावं
काय घाम गाळून उगवावेत
रक्तबीज !

किंवा मग
चालू लागावं सरळ
नवा इतिहास घडवायला !

• • •

अनुक्रमणिका

अंबिका दत्त

कवी आणि अनुवादक. जन्म : २० जून १९५६
प्रकाशित साहित्य : आंथ्यो नहीं दिन हाल (साहित्य अकादमी पुरस्कार (२०१३) प्राप्त राजस्थानी कवितासंग्रह), नुगरे रा पद, तसेच हिंदीत 'सौरभ का चितराम', 'लोग जहाँ खड़े हैं', 'आवो में बारहों मास है' कवितासंग्रह

१. बर्फ आणि कापूस

हे जे तुम्ही पाहताय
जमिनीवर भुरभुरणारं ताजं ताजं बर्फ
अगदी असंच
कापसाच्या रूपानं
जमिनीतून उगवून येतं सत्य

कधीकाळी माझंदेखील
रक्त होतं
गुलमोहोराच्या फुलाप्रमाणे
लालभडक!

अलीकडे वापरून उरलेल्या
लोण्यासारखा शिळा झालोय मी
का कोण जाणे
माझ्यावर बरसतच नाही
थोडाही बर्फ
माझ्या आत
उगवतच नाही
थोडादेखील कापूस!

• • •

२. अभिजाततेच्या भीतीनं

का मी किंचाळतोय?
प्रलोभनं, इच्छांच्या ह्या शहरात

कोण अमृतपुत्र आहे
जो आनंदाने वाटतोय सुधारस?

तीव्र, अजून अधिक तीव्र का आहेत
उफाळणाऱ्या इच्छांच्या लाटा?

वातानुकूलित काचेच्या आडून
जेव्हा बाहेर फेकला जातो
दह्याचा खरकटा द्रोण
देशाचं नागडं उघडं दारिद्र्य त्याला
आकंठ तृप्तीत बुडून
चाटत राहतं केविलवाणं
खरं तर मला अजिबात हौस नाहीय
मानवतेला शब्दांमध्ये उघडं करण्याची
परंतु तिला नग्न पाहून
मी गप्प बसतो तर
आळ येतो माझ्यावर अभिजात असण्याचा!

• • •

३. दिनचर्या

उठलोय
डोक्यात बधिरता आहे
आणि शरीर जडशीळ
ताणून देत
तटतट तोडतो मी
नसानसांतून अडकलेली
कच्च्या दोऱ्याची सकाळ
आणि अशा प्रकारे
तुटण्यानेच होते दिवसाची सुरुवात –

सांधण्याचा प्रयत्न करतो
चष्म्याच्या कमानीवर
सूर्याचा संदेश
पेनाच्या शाईनं
कागदाच्या शुभ्रपणावर
लिहायचा प्रयत्न करतो
पिवळ्या गुलाबाचा ताम्रपर्णी रंग

हे सगळं असं असताना
दिवस फिरत राहतो पवनचक्कीसारखा
हॉटेलच्या पोराच्या पायांच्या थकव्यासारखी संध्याकाळ
घड्याळाच्या सेकंदकाट्यावर आरूढ होऊन
हळूहळू
मुक्काम करू लागते
माझ्या पापण्यांवर
आणि भुवयांच्या खालच्या भुईवर
अगतिकपणे लवंडतो मी
एका थंड सपाट

अनुक्रमणिका

सिमेंटच्या काळ्या पट्टीवर
– की अचानक माझ्या विचारांमध्ये
निखळतो एक काचेचा तारा
रुततं खुपतं काही
रंगीत टोकदार
माझ्या मेंदूच्या मागल्या भागात
गाढ झोपेत असूनही
विचार करू शकतो मी
कदाचित असूही शकतं हे
पहाटेचं स्वप्न!

• • •

डॉ. जितेंद्र सोनी

कवी आणि अनुवादक. जन्म : २९ नोव्हेंबर १९८१
प्रकाशित साहित्य : रणखार (साहित्य अकादमी युवा पुरस्कार राजस्थानी कवितासंग्रह)
उम्मीदों के चिराग (हिंदी कवितासंग्रह), सम्पादन : शब्दों की सीप
अनुवाद : म्हारी पांती रा पाना (हरिभजन सिंह रेणू ह्यांच्या पंजाबी कवितांचा राजस्थानी अनुवाद)
निर्वाण (मनमोहन सिंह ह्यांच्या पंजाबी कादंबरीचा हिंदी अनुवाद)
देहरा मांय आज ई उगै है आपणा रुंख (रस्किन ब्रॉडच्या इंग्रजी कथांचा राजस्थानी अनुवाद)

१. माझी ओळख

माझी ओळख करून देण्याआधी
सांगून ठेवतो
माझ्या घराबद्दल की
तिथं भेटतील तुम्हाला
भिंतींवर जखमांच्या खुणा
कपड्यांवर कोळिष्टकं शिवणारी ठिगळं
शोषली गेलेली भांडी
खिजवणारा पिठाचा डब्बा
थंड पडलेली चूल
उंदरांची रिकामी बिळे
पावसाळ्यात गळणारं छत
आणि पाठीला चिटकलेलं पोट
अजूनही जर तुमची असेल इच्छा
मला जाणून घ्यायची
तर स्वागत आहे तुमचं
कारण कळलंय मला की
तुमचे पाय आहेत
अजून जमिनीवर!

• • •

२. किंकर[1]

मांगीलालचं शेत आणि
तलावाच्या मध्ये उभा किंकर
जाणत नाही
ग्लोबल वार्मिंग
दहशतवाद
की राजकारणातील डावपेच
नाही जाणत तो
ओबामा
सोनिया
मुशर्रफ
किंकर जाणतो
फक्त हे की
जेव्हा भरून वाहतो तलाव
मांगीलालची बायको
डोलत येते शेतात
मुलं करतात गलका
पातडी[2] तोडत, हसत, खिदळत

जेव्हा कमी होऊ लागतं
तलावातलं पाणी
तेव्हा मांगीलालचे डोळे
भरू लागतात पाण्याने
आटत चाललेल्या तलावासोबत
वाळत जातं शेत
होऊ लागतं पडीक
अन्
उरतो मी एकटा
वाट पहात
तलावातल्या पाण्याची!

*(१. **किंकर** – वाळवंटातील बाभळीसदृश एक झाड, २. **पातडी** – किंकरच्या शेंगा)*

• • •

३. थार थोर' स्थिर

हलाखीच्या थारमध्ये
उगून येतात कायमच दुर्दम्य आशा
जशी उगवून येतात थोरची झुडपं
कोणत्याही आधाराच्या अपेक्षेशिवाय

अभावांचा कोरडेपणा
समीक्षेच्या झळा
आणि संघर्षाच्या तापत्या उन्हात
थोर शोषून घेतं सगळं
पाणी शोषल्यागत
जिवंत राहण्याच्या धडपडीत
जिजीविषेला घट्ट चिवटपणे चिकटत

थारमध्ये आयुष्य
थोर बनण्यात आहे
स्थिर होण्यात नाही
(१. थोर – थारच्या वाळवंटातील प्रमुख झाड)

• • •

४. शंखनाद

वेशीच्या बाहेर
दलित शोषकांच्या वस्तीत
आपलं कोवळं ऊन घेऊन
सूर्य
प्रवेश करतो झोपड्यांमध्ये
छपरांच्या फटींतून
कपडे पांघरूण
कुरवाळत
बाहेर अंगणात पेटलेल्या चुलींना
मायेने पाहात
होऊन जातो सगळ्या वस्तीचा
सामील होतो
गरिबांच्या हास्यकल्लोळात...

मग जोहड पार करून
हवेल्या आणि महालांच्या
महागड्या जाडजूड पडद्यांच्या मागे
आलिशान खोल्यांमधून...
नाही थांबत फार काळ
फारशा आवडत नाहीत त्याला
रुबाबदार दिमाखदार
हवेल्या
श्वास कोंडल्यागत
निघता निघता
फक्त कोपराच शिवतो एखादा
किंवा थांबतो
अगदी थोडा वेळ
काली किंवा दुर्गेच्या देवळाची
घंटा वाजवत
चढून जातो डोंगर...

शंखनाद
सूर्याचादेखील
काही कमी नाही!

• • •

नीरज दइया

कवी आणि अनुवादक. जन्म : २२ सप्टेंबर १९६८
साख, देसूंटो (राजस्थानी कवितासंग्रह)
अनुवाद : ग-गीत (मोहन आलोक ह्यांच्या कवितांचा अनुवाद), कव्वैं और काला पानी (निर्मल वर्मा यांच्या कवितासंग्रहाचा अनुवाद), 'कागद से कॅनवास' ह्या अमृता प्रीतम ह्यांच्या कवितांचा राजस्थानी अनुवाद.

१. जेव्हा जेव्हा पडतो दुष्काळ

जेव्हा जेव्हा पडतो दुष्काळ
भुकेनं व्याकूळ होतात मुलं
शिकतात ती रडायला
आणि रडता रडता
विसरून जातात मुलं
रडण्यातील उद्वेग

जेव्हा जेव्हा पडतो दुष्काळ
आयुष्य वाढत जातं मुलांचं
विसरून जातात मुलं सगळं
आणि शिकतात आयांसोबत
तोडायला
दुष्काळी दिवस
अस्मानी रात्री!

• • •

अनुक्रमणिका

२. अंधार आणि मूल

मूल घाबरतं
अंधाराला
भीत भीत शिकतं
न भिणं!

कधीतरी येतो असा एक दिवस की
भरदुपारी
मूल ओळखतं
उजेडातल्या अंधाराला

जेव्हा कळतो – अंधार
मूल राहात नाही मूल
दबून जातं
एका ओझ्यानं
करू लागतं युद्ध
अंधाराविरुद्ध!

• • •

३. तर मी लिहीन

देव शरीरात घुमू लागले
बडबडत राहिले ते
काही झालेल्या चुकांबद्दल
उडाली एकच खळबळ
आणि मग
खूश केलं गेलं त्यांना

सभोवताली असूनही
आपल्या लोकांपासून कायम दूर असतात
आमचे देव आमचे पूर्वज
जर दिले नाही आम्ही आमचे शब्द
तर मुकेच राहतील त्यांचे शब्द

माझ्या ओठांवर मात्र
शब्द आहेत माझ्या मर्जीचे
मला तर लांबच ठेवा
कोणत्याही आशेपासून
आशेचा जर झाला भंग
परत येतील देव शरीरात
आणि लिहीन मी –
एक कविता ह्या ढोंगीपणावर!

• • •

४. माझ्या वाट्याची सावली

मी पार थकून गेलोय
वाळून शुष्क झालेलं झाड म्हणालं
हे काय आयुष्य आहे
घेऊन ये तुझी कुऱ्हाड
मला समजते
त्याच्या विनवणीत दडलेली लाचारी
खुरटं झाड नतमस्तक होतं
मुक्त होण्याच्या इच्छेनं भरून
झाडाचे हात घाबरतात
मुळांना
आणि माझे
कुऱ्हाडीला

वाळलेल्या झाडाच्या आत
अजूनही दिसतं मला
एक डेरेदार बहरलेलं झाड
आणि माझ्या वाट्याची सावली

ऋतूंसोबत खेळते
लपंडाव
सावली माझ्या वाट्याची
माझ्या वाट्याची सावली!

• • •

हरीश शर्मा

सहसंपादक, राजस्थानी भाषा विभाग, कविता कोश. जन्म : ९ ऑगस्ट १९७२. कथा, कविता, नाटकलेखन, थम पंछीडा (राजस्थानी कवितासंग्रह), सतोळीयो (किशोर कथासंग्रह), फिर मैं फिर से फिरकर आता (हिंदी कवितासंग्रह)

१. दखल

विजेची एक तार
आत घेऊन पाहिली
झिणझिण्या आल्या
म्हणजे शहारून आलं
असंही म्हणू शकतो
माझ्या ह्या दिमाखाला
नाही कबूल केलं कोणी
वाटलं होतं मला

अनुक्रमणिका

पाहावं सगळ्यांनी
जे भोगलं ते पाहावं
अनुभव करावं
दखल घ्यावी
माझ्या आत उजेड निर्माण
करण्याच्या प्रक्रियेची...

किती कठीण होतं
मी माझ्या आत ठेवली होती
विजेची तार कितीतरी वेळ
कोणीतरी पाहील
ह्या आशेवर
वाट पाहात
जाळत राहिलो मी रक्त!

• • •

२. वाळू

तप्त सहनशील वाळू
जळत राहते तापत राहते
बोलत नाही काही
राहते मूक
पडतो पाऊस
तुटतं मौन
अन्
बोलू लागते वाळू
पसरते सर्वदूर दमट वाफ
घाम सुटतो
भल्याभल्यांना !

• • •

३. पाणी

संपून जातं आयुष्य
वाळूत
अखंड शोध घेत
पाण्याच्या स्रोतांचा
जेव्हा कोणी ढकलून देतं
पाण्याच्या उगमापाशी
सापडतं पाणी
पूर्ण होतो शोध
हाताला लागतो आपला स्वतःचा तळ
ही जाणीव नसती तर
बरं झालं असतं
शोध चालू राहिला असता
आयुष्य संपून गेलं असतं
सहानुभूती तर मिळाली असती!

• • •

४. मान्यच आहे

प्रत्येक क्षणी भीती
दरवाजावर थाप पडण्याची
फडफडणाऱ्या कॅलेंडरच्या अक्षरांमधून
नजरेस पडतात भयावह आगामी आकर्षणं
नकोसे राग – घनदाट अरण्ये, पर्वत, समुद्र
आणि जखडून टाकलेल्या सीमा
तरीही आम्ही
जगून दाखवलंय आयुष्य
गरजांशी झुंजत
आत्मीयतेचा गळा घोटून
चिता सजवत – भस्म करत

मान्यच आहे की
काहीच करत नाहीय आम्ही
होतंय सगळं यांत्रिकपणे!

• • •

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त

मकर संक्रांत १९२३

(जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१९ या काळातील)

दिनांक २० जानेवारी २०१९

वि.सा. संघ आणि 'सर्जना निर्माण' यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि त्यांचे आप्त गगनेंद्रनाथ व अवनींद्रनाथ टागोर यांच्या तीन चित्रकृतींवर लघुव्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला. 'अवनींद्रनाथ : रंग गझल' या विषयावर प्रा. बाबर शरिफ, 'गगनेंद्रनाथ : गूढ चित्रे' या विषयावर मिलिंद लिंबेकर आणि 'रवींद्रनाथ टागोर : बाल आभास' या विषयावर चंद्रकांत चन्ने यांनी आपले विचार व्यक्त केले.

दिनांक ४ फेब्रुवारी २०१९

सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक राजदत्त यांनी वि.सा. संघास भेट दिली. कॉन्फरन्स हॉलमध्ये राजदत्त यांचे स्वागत संस्थेचे कार्याध्यक्ष वामन तेलंग यांनी केले. नवनिर्मित सांस्कृतिक सभागृह तसेच ग्रंथालयास त्यांनी भेट दिली. संस्थेच्या कार्याबद्दल तसेच प्रगतीबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. सरचिटणीस विलास मानेकर, कोषाध्यक्ष विकास लिमये, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, प्रकाश एदलाबादकर, प्रदीप मुनशी, नितीन सहस्रबुद्धे, अरविंद पुराणिक, डॉ. अरुंधती वैद्य, शुभदा फडणवीस, नरेश सबजीवाले प्रभृती सदस्य यावेळी उपस्थित होते.

दिनांक १३ फेब्रुवारी २०१९

स्व. ना. के. बेहेरे स्मृती विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा यंदा यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे घेण्यात आली. एकूण २२ स्पर्धक विदर्भातील महाविद्यालयांतून या स्पर्धेत सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी वि.सा. संघाचे कार्याध्यक्ष वामनराव तेलंग होते. तर स्पर्धेचे प्रमुख अतिथी यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य विलास देशमुख होते. वि.सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीतर्फे विकास लिमये, प्रदीप मुनशी व भाग्यश्री बनहट्टी उपस्थित होत्या. वर्धा शाखेतर्फे शाखाध्यक्ष संजय इंगळे (तिगावकर), श्री. बावीस्कर, सौ. रंजना दाते आणि वि.सा. संघाचे शाखा समन्वयक प्रदीप दाते हजर होते.

स्पर्धेचे आयोजन आणि नियोजन यशवंत महाविद्यालयातर्फे अत्यंत उत्तमरीत्या केले गेले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. राजेश देशपांडे व डॉ. स्मिता वानखेडे यांनी काम केले.

प्रथम क्रमांक यांना कु. रुची दुबे – फार्मसी कॉलेज, बोरगाव मेघे.

द्वितीय क्रमांक यांना निखिल हटवार – फार्मसी कॉलेज, बोरगाव मेघे.

तृतीय क्रमांक यांना प्रिया वडेकर – प्रियदर्शिनी महाविद्यालय, वर्धा.

प्रोत्साहनपर कु. कोमल गोमासे – एस.एस.एन.जे. महाविद्यालय, देवळी.

प्रोत्साहनपर मिलिंद पाटोळे – श्री शिवाजी विज्ञान म.वि. चिखली, बुलडाणा.

अशी पारितोषिके मिळाली.

स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा स्व. ना.के. बेहेरे स्मृती चषक – फार्मसी कॉलेज बोरगाव मेघे यांना प्रदान करण्यात आला.

१ मार्च २०१९

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२२ व्या जयंती वर्षानिमित्त विदर्भ साहित्य संघ आणि राजहंस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष व्याख्यानाचे आयोजन झाले.

ज्येष्ठ साहित्यिक व वक्ते आनंद हार्डीकर यांनी नेताजींच्या मृत्यूभोवती असलेल्या गूढतेची आपल्या व्याख्यानात उकल केली. "नेताजी, तुमि कोथाय?" हा व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग होते. प्रकाश एदलाबादकर यांनी सूत्रसंचालन केले.

दिनांक २ मार्च २०१९

अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या माजी अध्यक्षा व ज्येष्ठ अभिनेत्री फैयाज आणि प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी वि.सा. संघास सदिच्छा भेट दिली. संघाचे कार्यालय, ग्रंथालय तसेच नवनिर्मित रंगमंदिर यांना त्यांनी भेट दिली. संस्थेच्या कार्याबद्दल आणि उपक्रमांबद्दल अभिनंदन करीत संस्थेला शुभेच्छा दिल्या.

अनुक्रमणिका

दिनांक २ मार्च व ३ मार्च २०१९

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, वि.सा. संघ व राजहंस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवोदितांसाठी लेखन शिबिराचे आयोजन झाले. ज्येष्ठ कवी व 'युगवाणी'चे संपादक प्रफुल्ल शिलेदार यांच्या हस्ते ह्या शिबिराचे उद्‌घाटन झाले. उपरोक्त दोन्ही दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीतील विविध सत्रांमध्ये आनंद हार्डीकर, डॉ. सदानंद बोरसे, विनय खडपेकर व करुणा गोखले या सन्माननीयांनी शिबिरार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. एकूण २० शिबिरार्थी सहभागी होते. डॉ. विलास चिंतामण देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली शिबिराचा समारोप झाला. वि.सा.संघ, अ.भा.म.सा. महामंडळाचे पदाधिकारी व राजहंस प्रकाशनाचे नरेश सबजीवाले शिबिरात पूर्णवेळ उपस्थित होते.

दिनांक ३ मार्च २०१९

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ कवी प्रा. वसंत आबाजी डहाके यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठान (नाशिक) द्वारा 'जनस्थान' पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तसेच ज्येष्ठ कवी प्रफुल्ल शिलेदार यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वि.सा. संघातर्फे ह्या दोन्ही महनीयांचा सन्मान करण्यात आला. वि.सा. संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांचे हस्ते शाल, श्रीफळ, ग्रंथभेट व पुष्पगुच्छ देऊन ह्या दोन्ही पुरस्कारार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वामन तेलंग, प्रफुल्ल शिलेदार व प्रा. वसंत आबाजी डहाके यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

दिनांक १४ जानेवारी २०१९

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही १४ जाने. २०१९ रोजी मकरसंक्रांतीच्या दिवशी ९६ वा वर्धापनदिन समारंभ नवनिर्मित सभागृहात उत्साहाने पार पडला. मराठवाडा सा.प. चे (औरंगाबाद) अध्यक्ष प्रा.डॉ. कौतिकराव ठाले पाटील समारंभाचे प्रमुख अतिथी होते. ९२व्या अखिल भा.म.सा. संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे यांचा प्रसंगी सत्कार करण्यात आला. मुंबई म.सा. संघाच्या अध्यक्ष उषा तांबे, महाराष्ट्र सा.प. चे (पुणे) अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी तसेच प्रकाश पायगुडे विशेष अतिथी होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी वि.सा. संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर होते. डॉ. चंद्रशेखर मेश्राम (विश्वस्त) व न्या. विकास सिरपूरकर (कार्यकारी विश्वस्त) यांची समारंभास विशेष उपस्थिती होती.

वि.सा. संघातर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या वाङ्मय पुरस्कारांचे वितरण अतिथींच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अरुणा ढेरे यांची प्रकट मुलाखत डॉ. वंदना कुलकर्णी-बोकील यांनी घेतली. पुरस्कार विजेत्यांतर्फे श्रीपाद कोठे यांनी मनोगत व्यक्त केले. मनोहर म्हैसाळकरांनी डॉ. अरुणा ढेरे यांचा शाल/श्रीफळ/पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

या समारंभाचे प्रास्ताविक प्रकाश एदलाबादकर यांनी तर समारंभाचे सूत्रसंचालन सीमा शेटे व नितीन सहस्रबुद्धे यांनी केले. प्रदीप दाते यांनी आभार प्रदर्शन केले तर निधी रानडेंच्या पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थितांना मकरसंक्रांतीनिमित्त तीळगूळ वितरण करण्यात आले.

– **सरचिटणीस**, विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ
ग्रंथ ||सहवास||
वाचन संस्कृतीचे निवांत स्थळ
महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय आणि विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय ह्यांचा संयुक्त उपक्रम

ग्रंथालय कार्यवृत्त

(जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१९ या काळातील)

७ जानेवारी क्षितिजरंग

विजय तेंडुलकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने नवोदित लेखकांच्या एकांक लेखन संहितांच्या वाचन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यात मुख्यतः नवोदितांच्या संहितांचा विचार करण्यात आला.

विजय तेंडुलकर यांच्या जन्मदिनाच्या औचित्य पर्वावर त्यांच्याच मूळ इंग्रजी 'हिज फिफ्थ वुमन' या चंद्रशेखर फणसळकर यांनी मराठीत अनुवाद केलेल्या 'त्याची पाचवी' या नाटकाच्या निवडक अंशाचे वाचन सचिन गिरी (सखाराम), दाऊद (दिलीप म्हैसाळकर) यांनी केले. त्यानंतर 'सखाराम बाइंडर' मधला एक प्रवेश सचिन गिरी (सखाराम), अश्विनी पिंपळकर (चंपा)

अनुक्रमणिका

यांनी सादर केला. तेंडुलकरांच्या नाटकातील अवकाश आणि रंगसूचना या विषयावर संजय आर्वीकर यांनी तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे', 'सखाराम बाइंडर' आणि 'घाशीराम कोतवाल' या नाटकांच्या आधाराने ऊहापोह केला, तर डॉ. पराग घोंगे यांनी तेंडुलकरांची संस्मरणे उपस्थितांपुढे जागविली.

१४ जानेवारी : पोस्टर पोएट्री

यंदा हा मान साहित्य संमेलनाध्यक्षपदी नेमणूक झालेल्या लोकसाहित्याच्या अभ्यासक कवयित्री अरुणा ढेरे यांना देण्यात आला.

त्यांच्या छायाचित्रांसह १९ कवितांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. ढेरे यांनी केले. डॉ. अरुणा ढेरे यांनी पोस्टर पोएट्रीविषयी आनंद व ग्रंथांविषयी समाधान व्यक्त केले.

६ फेब्रुवारी मुकुंद नानिवडेकर यांच्या स्मरणार्थ अभिवादन सभा आणि ग्रंथदेणगी

राजाराम सीताराम दीक्षित अ वर्ग सार्वजनिक वाचनालयाचे विद्यमान अध्यक्ष वसंतराव ढवळे, दिवंगत नानिवडेकर यांचे कुटुंबीय मृणालिनी दर्शने-नानिवडेकर व धनंजय नानिवडेकर तसेच विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग तसेच मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष विलास चिंतामण देशपांडे या कार्यक्रमाला उपस्थित होते. या छोटेखानी अनौपचारिक सभेत दिवंगत मुकुंदरावांच्या ग्रंथालयीन कारकीर्दीवर वक्त्यांनी प्रकाशझोत टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथसहवासाचे समन्वयक दिलीप म्हैसाळकर यांनी केले, तर मुकुंद नानिवडेकर यांच्या स्मरणार्थ विदर्भ साहित्य संघाने १०० पुस्तकांची देणगी वसंतराव ढवळे यांच्याकडे सुपूर्द केली.

९ फेब्रुवारी – मनातल्या दुर्गाबाई

विदुषी दुर्गा भागवत यांचा जन्मदिवस 'मनातल्या दुर्गाबाई' या शीर्षकांतर्गत आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले तर 'ऋतुचक्र' आणि 'पैस' या ललितसंग्रहातील अनुक्रमे 'मायावी माघ' आणि 'महेश्वराची महाश्वेता' यांचे संपादित अंश प्राध्यापक विवेक अलोणी व पूर्वा कुलकर्णी यांनी वाचले. त्याचप्रमाणे आदिवासीचे मृत्यूविषयीचे तत्त्वज्ञान डॉ. रजनी हसनअली हुद्दा यांनी तपशिलाने मांडले. दिनकर बेडेकर यांनी व्यासपर्वच्या पार्श्वभूमीवर द्रौपदी, श्रीकृष्ण, अश्वत्थामा या व्यासांनी निर्मिलेल्या पात्रांवरचा ऊहापोह श्रोत्यांपर्यंत पोचविला तर ज्येष्ठ लेखिका श्रीमती शुभांगी भडभडे यांनी आणिबाणीच्या पर्वात दुर्गा भागवत यांच्या कराड साहित्य संमेलनाच्या भाषणावर आपली मते मांडली.

२७ फेब्रुवारी – जागतिक मराठी भाषा दिवस

जागतिक मराठी भाषा दिवस ग्रंथसहवासमध्ये साजरा करण्यात आला. 'मराठी भाषा आणि स्त्री' या नात्याचा अनुबंध डॉ. अरुंधती वैद्य यांनी उलगडून दाखविला. डॉ. विनिता हिंगे यांनी स्त्रिया कादंबरी लिहायला लागल्यापासून मराठी भाषेचे दालन कसे समृद्ध झाले हे सांगितले.

श्री. प्रकाश एदलाबादकर, डॉ. ईश्वर नंदपुरे, श्री. अभिषेक वाघमारे, श्री. अक्षय वाघ, अंजली भांडारकर, डॉ. अरुंधती वैद्य, माधुरी वाडीभस्मे, सुषमा मुलमुले यांचा सहभाग होता.

२८ फेब्रुवारी – राष्ट्रीय विज्ञान दिवस

यंदाही राष्ट्रीय विज्ञान दिवसाच्या निमित्ताने साहित्यातून विज्ञानाकडे या विषयावर प्रथमच सर्वेश फडणवीस या युवा वक्त्याला व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. राजेन्द्रसिंह सायन्स एक्सप्लोनेटरी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या डॉ. माधवी कवीश्वर यांची विशेष उपस्थिती होती. अतिथींना दिलीप म्हैसाळकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह तर आमंत्रित वक्त्यास मराठी शब्दकोश भेट देण्यात आला. मुकेश जुनघरे यांनी निवेदन केले.

२८ फेब्रुवारी – कथनांजली

कथनांजलीच्या पर्व २ मध्ये 'वाढवू झाड... कथेचे' अंतर्गत ग्रंथालयाच्या सदस्या सुरुची डबीर आणि श्रद्धा भारद्वाज यांनी अनुक्रमे ओ हेन्री या लेखकाची 'लास्टलिफ' आणि अमृता प्रीतम यांची 'पाच बहने' या कथा मराठी आणि हिंदीतून सांगितल्यात. कार्यक्रमाला इंग्रजी विभाग अध्यापक वर्ग आणि प्राचार्य डॉ. दीपाली कोतवाल प्रामुख्याने उपस्थित होत्या.

२ मार्च – अम्लान – राम शेवाळकर जन्मदिन

शेवाळकर-कुरुंदकर अनुबंध लक्षात घेता नांदेडच्या सौ. श्यामल पत्की कुरुंदकर यांना व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. श्रीमती

अनुक्रमणिका

पत्की यांनी कुरुंदकर, शेवाळकर आणि नांदेडचे दिवस यावर प्रकाश टाकत या दोनही मोठ्या व्यक्तींच्या स्वभावधर्मावर, गुणसमुच्चयावर आठवणींचा गोफ विणला. कार्यक्रमाची सुरुवात प्रकाश एदलाबादकर यांनी राम शेवाळकर यांच्यावर रचलेल्या 'अर्घ्य' या कवितेनी केली. कार्यक्रमाचे आटोपशीर सूत्रसंचालन स्वाती हुद्दार यांनी केले.

८ मार्च – जागतिक महिला दिवस

मार्च हा जागतिक महिलादिन विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवासमध्ये साजरा करण्यात आला. 'शोध त्याचा तिच्या मनाचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात राजन खान यांची 'पदर' ही कथा आभा मुळे यांनी तर अभय नवाथे यांनी सौमित्रची मौजच्या दिवाळी अंकात आलेली 'चोवीस चोवीस ते चोवीस' ही कविता सादर केली. अक्षर दिवाळी अंकातल्या 'आम्ही पुरुष' या लेखाचे अभिवाचन सुभदा फडणवीस यांनी केले. शुभं सप्रे याने कुसुमाग्रजांची 'आम्ही सारे' ही कविता सादर केली.

प्रमुख अतिथी असलेले कवी वसंत वाहोकर व संचालक ग्रंथालय डॉ. अरुंधती वैद्य यांच्या हस्ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या डॉ. आभा परांजपे यांचा सत्कार करण्यात आला.

१२ मार्च कथनांजली

श्रीमती मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सेमिनरी हिल्स येथील सभागृहात प्राचार्य उज्ज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनाखाली रसिका करमाळेकर आणि डॉ. वसुधा वैद्य यांनी अनुक्रमे 'गाय द मोपासां' या फ्रेंच कथाकाराची 'युजलेस ब्युटी' तर मराठीत जी.ए. कुलकर्णी यांची 'पुरुष' ही कथा मुलींसमोर प्रभावीपणे सादर केली.

१३ मार्च – महामहोपाध्याय डॉ. वा.वि. मिराशी जन्मदिन

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाचा महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती हा विभाग सार्वजनिक वाचनालयाचा असून त्यांचा शतकोत्तरी वर्षपूर्तता रौप्यमहोत्सवी दिवस आणि विविध ग्रंथांचे मिळालेल्या मानसन्मानाचे एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन या दिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन सौ. व श्री. सतीश मिराशी यांनी ग्रंथालयात सकाळी केले. संध्याकाळच्या सत्रात 'देवाघरचे लेणे' या कार्यक्रमात श्रीपाद कोठे यांनी 'मिराशीचे कार्यकर्तृत्व आणि वर्तमान' या विषयाची मांडणी आपल्या व्याख्यानातून केली.

नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन इतिहास संस्कृती व पुरातत्त्व विभागाच्या प्रमुख असलेल्या प्रोफेसर डॉ. प्रीती त्रिवेदी यांनी डॉ. मिराशी यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानावर प्रकाशझोत टाकला. 'नानासाहेबांच्या स्थितप्रज्ञतेविषयी मला आजही अप्रूप वाटते', असे संस्थेचे विश्वस्त निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर आपल्या छोटेखानी समारोपीयामध्ये म्हणाले. साहित्यशास्त्रकार डॉ. जी.टी. देशपांडे यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीची चित्रफीतही दाखविण्यात आली. सूत्रसंचालन माधुरी वाडीभस्मे यांनी केले.

२५ मार्च – दीप लाविला... जाणा

तुकाराम बीजाच्या पर्वावर ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी तसेच श्री. प्रकाश एदलाबादकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रकाश एदलाबादकरांनी एकांतवासावर ऊहापोह करून त्याचे एक टोक वर्तमानाशी जोडण्याचा प्रयत्न केला. घळसासी यांनी या एकांतवासामुळे तुकोबारायांना जो साक्षात्कार झाला तसा आपल्यालाही सगळ्यांना तो लाभ मिळो असे मागणे मागितले.

– **संचालक** (ग्रंथालय)
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

• • •

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका